भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

# मोटार वाहन अधिनियम, १९८८

(सन १९८८ चा अधिनियम क्रमांक ५९)

[ ३० जून १९९८ रोजी यथाविद्यमान ]

# The Motor Vehicles Act, 1988

(Act No. 59 of 1988)

[ *As in force on the 30th June 1998* ]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

२००१

[किंमत : रु.३४-००]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३० जून १९९८ रोजी यथाविद्यमान असलेला दि मोटार वेहिकल ॲक्ट, १९८८. याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १०, अंक १, दिनांक १२ ऑक्टोबर १९९९ यात पृष्ठ ३ ते १४८ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क्) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :
दिनांक १२ ऑक्टोबर १९९९.

डॉ. एस्. सी. जैन,
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the Motor Vehicles Act, 1988 as on the
contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 10, dated 12th October 1999 on page 3 to 148.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative texts of that Act in Marathi.

New Delhi :
Dated the 12th October 1999.

Dr. S. C. JAIN,
Secretary to the Government of India.

# मोटार वाहन अधिनियम, १९८८

## कलमांचा क्रम

कलमे

### प्रकरण एक

### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

### प्रकरण दोन

### मोटार वाहनांच्या चालकांना लायसन देणे

३. चालन लायसनाची आवश्यकता.

४. मोटार वाहने चालविण्यासंबंधी वयोमर्यादा.

५. कलमे ३ व ४ यांच्या व्यतिक्रमणाबद्दल मोटारवाहनांच्या मालकांची जबाबदारी.

६. चालन लायसने धारण करण्यावरील निर्बंध.

७. विवक्षित वाहनांकरिता शिकाऊ लायसन देण्यावरील निर्बंध.

८. शिकाऊ लायसन मंजूर करणे.

९. चालन लायसन मंजूर करणे.

१०. चालन लायसनाचा नमुना व मजकूर.

११. चालन लायसनामध्ये आणखी वाहने दाखल करणे.

१२. मोटार वाहने चालविण्याचे शिक्षण देणाऱ्या शाळा किंवा आस्थापना यांना लायसन देणे व त्यांचे नियमन करणे.

१३. मोटार वाहने चालविण्यासाठी लायसनाच्या परिणामकतेची व्याप्ती.

१४. मोटार वाहने चालविण्यासाठी चालन लायसने चालू राहण्याचा अवधी.

१५. चालन लायसनाचे नूतनीकरण.

१६. रोग किंवा नि:समर्थता या कारणावरून चालन लायसनाचे प्रत्याहरण.

१७. चालन लायसन नाकारणारे किंवा प्रत्याहृत करणारे आदेश व त्यावरील अपिले.

१८. केंद्र शासनाच्या मालकीची मोटार वाहने चालविण्यासाठी चालन लायसने.

१९. चालन लायसन धारण करण्यास निरर्ह ठरविण्याची किंवा असे लायसन प्रत्याहृत करण्याची लायसन प्राधिकरणाची शक्ती.

२०. निरर्ह ठरविण्याची न्यायालयाची शक्ती.

२१. विवक्षित प्रकरणांमध्ये चालन लायसनाचे निलंबन.

२२. दोषसिद्धी झाल्यावर चालन लायसन निलंबित करणे किंवा ते रद्द करणे.

२३. निर्हता आदेशाचा परिणाम.

२४. पृष्ठांकन.

२५. पृष्ठांकनाचा नोंदबदल करणे आणि पृष्ठांकनरहित चालन लायसन देणे.

२६. चालन लायसनाची राज्य नोंदवही ठेवणे.

कलमे

२७. केंद्र शासनाची नियम करण्याची शक्ती.

२८. राज्य शासनाची नियम करण्याची शक्ती.

## प्रकरण तीन

### टप्पेगाड्यांच्या वाहकांना लायसने देणे

२९. वाहक लायसनाची आवश्यकता.

३०. वाहक लायसन देणे.

३१. वाहक लायसन देण्याबाबतच्या निरर्हता.

३२. रोग किंवा निःसमर्थता या कारणावरून वाहक लायसनाचे प्रत्याहरण.

३३. वाहक लायसन आकारणे इत्यादी आदेश व त्यावरील अपिले.

३४. लायसन प्राधिकरणाची निरर्ह ठरविण्याची शक्ती.

३५. न्यायालयाची निरर्ह करण्याची शक्ती.

३६. दुसऱ्या प्रकरणाचे विवक्षित उपबंध वाहक लायसनाला लागू असणे.

३७. व्यावृत्ती.

३८. राज्य शासनाची नियम करण्याची शक्ती.

## प्रकरण चार

### मोटार वाहनांची नोंदणी

३९. नोंदणीची आवश्यकता.

४०. नोंदणी कोठे करावयाची.

४१. नोंदणी कशी करावयाची.

४२. राजनैतिक अधिकारी इत्यादींच्या मोटार वाहनांच्या नोंदणीसाठी विशेष उपबंध.

४३. तात्पुरती नोंदणी.

४४. नोंदणीच्या वेळी वाहन हजर करणे.

४५. नोंदणी करण्यास किंवा नोंदणी प्रमाणपत्राचे नूतनीकरण करण्यास नकार.

४६. नोंदणी भारतात परिणामक असणे.

४७. वाहन अन्य राज्यात हलविल्यावर त्यास नवीन नोंदणी चिन्ह नेमून देणे.

४८. ना-हरकत प्रमाणपत्र.

४९. राहण्याची जागा किंवा कामधंद्याची जागा बदलणे.

५०. मालकीचे हस्तांतरण.

५१. भाडे-खरेदी इत्यादी करारास अधीन असलेल्या मोटार वाहनांच्या संबंधातील विशेष उपबंध.

५२. मोटार वाहनात फेरबदल करणे.

५३. नोंदणीचे निलंबन.

५४. कलम ५३ अन्वये निलंबित केलेली नोंदणी रद्द करणे.

५५. नोंदणी रद्द करणे.

५६. परिवाहनांचे योग्यता प्रमाणपत्र.

५७. अपिले.

५८. परिवहन वाहनासंबंधी विशेष उपबंध.

५९. मोटार वाहनांचे आयुर्मान निश्चित करण्याची शक्ती.

कलमे

६०. केंद्र शासनाच्या मालकीच्या वाहनांची नोंदणी.

६१ अनुवाहनांना हे प्रकरण लागू करणे.

६२. चोरीस गेलेल्या आणि पुन्हा ताब्यात घेतलेल्या मोटार वाहनासंबंधातील माहिती पोलिसांनी राज्य परिवहन प्राधिकरणाला देणे.

६३. मोटार वाहनांच्या राज्य नोंदवह्या ठेवणे.

६४. नियम करण्याची केंद्र शासनाची शक्ती.

६५. नियम करण्याची राज्य शासनाची शक्ती.

## प्रकरण पाच

### परिवहन वाहनांचे नियंत्रण

६६. परवान्याची आवश्यकता.

६७. मार्ग परिवहनांचे नियंत्रण करण्याची राज्य शासनाची शक्ती.

६८. परिवहन प्राधिकरणे.

६९. परवान्यांसाठी करावयाच्या अर्जासंबंधातील सर्वसाधारण उपबंध.

७०. टप्पेगाडीच्या परवान्यासाठी अर्ज.

७१. टप्पेगाडीच्या परवान्यासाठी करण्यात आलेला अर्ज विचारात घेताना प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने अनुसरावयाची कार्यपद्धती.

७२. टप्पेगाडी परवाने देणे.

७३. कंत्राटी गाडीच्या परवान्यासाठी अर्ज.

७४. कंत्राटी गाडी परवाने देणे.

७५. मोटार कॅब्स भाड्याने देण्यासंबंधातील योजना.

७६. निजी सेवा वाहनाच्या परवान्यासाठी अर्ज.

७७. मालवाहन परवान्यासाठी अर्ज.

७८. मालवाहन परवान्यासाठी करण्यात आलेला अर्ज विचारात घेणे.

७९. माल परिवहन परवाना देणे.

८०. परवान्यासाठी अर्ज करण्याची व ते देण्याची कार्यपद्धती.

८१. परवान्यांची मुदत व त्यांचे नूतनीकरण.

८२. परवान्यांचे हस्तांतरण.

८३. वाहने बदली करणे.

८४. सर्व परवान्यांना संलग्न असलेल्या सर्वसाधारण शर्ती.

८५. परवान्यांचा सर्वसाधारण नमुना.

८६. परवाने रद्द करणे व निलंबित करणे.

८७. तात्पुरते परवाने.

८८. परवाने ज्या प्रदेशात देण्यात आले असतील त्या प्रदेशाबाहेर त्यांचा उपयोग करता यावा यासाठी ते विधिग्राह्य करणे.

८९. अपिले.

९०. पुनरीक्षण.

९१. चालकांच्या कामाच्या तासांवर निर्बंध घालणे.

९२. दायित्व मर्यादित करणाऱ्या संविदा शून्य होणे.

९३. अभिकर्ता किंवा प्रचारक याने लायसन मिळविणे.

कलमे

९४. दिवाणी न्यायालयाच्या अधिकारितेचा रोध.

९५. टप्पे गाड्या व कंत्राटी गाड्या यांच्या संबंधात नियम करण्याची राज्य शासनाची शक्ती.

९६. या प्रकरणाच्या प्रयोजनांसाठी नियम करण्याची राज्य शासनाची शक्ती.

प्रकरण सहा

राज्य परिवहन उपक्रमासंबंधी विशेष उपबंध

९७. व्याख्या.

९८. प्रकरण पाच व इतर कायदे यापेक्षा हे प्रकरण अधिभावी ठरणे.

९९. राज्य परिवहन उपक्रमांच्या मार्ग परिवहन सेवासंबंधीचा प्रस्ताव तयार करणे व प्रसिद्ध करणे.

१००. प्रस्तावाला आक्षेप.

१०१. विवक्षित परिस्थितीत राज्य परिवहन उपक्रमाने अतिरिक्त सेवा चालवणे.

१०२. योजना रद्द करणे किंवा तिच्यात फेरबदल करणे.

१०३. राज्य परिवहन उपक्रमांना परवाना देणे.

१०४. अधिसूचित क्षेत्राच्या किंवा अधिसूचित नियत मार्गाच्या संबंधात परवाने देण्यावर निर्बंध.

१०५. भरपाई ठरविण्याची तत्त्वे व पद्धती आणि तिचे प्रदान.

१०६. वाहनांमध्ये सापडलेल्या वस्तुंची विल्हेवाट.

१०७. राज्य शासनाची नियम करण्याची शक्ती.

१०८. राज्य शासनाच्या विवक्षित शक्तींचा वापर केंद्र शासनाने करणे.

प्रकरण सात

मोटार वाहनांची बांधणी करणे, ती सुसज्ज करणे व त्यांची देखभाल करणे

१०९. वाहनांची बांधणी व देखभाल या संबंधीचा सर्वसाधारण उपबंध.

११०. केंद्र शासनाची नियम करण्याची शक्ती.

१११. राज्य शासनाची नियम करण्याची शक्ती.

प्रकरण आठ

वाहतुकीचे नियंत्रण

११२. वेगाच्या मर्यादा.

११३. वजनाच्या मर्यादा व वापरावरील मर्यादा.

११४. वाहनाचे वजन करवून घेण्याची शक्ती.

११५. वाहनांच्या वापरावर निर्बंध घालण्याची शक्ती.

११६. वाहतूक संकेत चिन्हे उभारण्याची शक्ती.

११७. वाहने उभी करण्याच्या जागा व मुक्कामाची ठिकाणे.

११८. चालन विनियम.

११९. वाहतूक संकेत चिन्हांच्या इशाऱ्यांचे पालन करण्याचे कर्तव्य.

१२०. डाव्या बाजूस नियंत्रण असलेली वाहने.

१२१. संकेत व संकेतन साधणे.

१२२. वाहन धोकादायक स्थितीत ठेवून देणे.

१२३. पायफळी इ. वर उभे राहून प्रवास करणे.

१२४. पास किंवा तिकीट यांविना प्रवास करण्याला मनाई.

१२५. चालकाला अडथळा करणे.

कलमे

१२६. स्थिर वाहने.

१२७. सार्वजनिक ठिकाणी परित्यक्त अवस्थेत अथवा लक्ष न देता तशीच सोडलेली मोटार वाहने तेथून हलवणे.

१२८. चालक व पाठीमागच्या आसनावर बसून प्रवास करण्याकरता सुरक्षिततेचे उपाय.

१२९. संरक्षक शिरटोप वापरणे.

१३०. लायसन व नोंदणी प्रमाणपत्र सादर करण्याचे कर्तव्य.

१३१. रक्षकरहित रेल्वे ओलांडणी ओलांडित असता विवक्षित सावधगिरी बाळगण्याविषयी चालकाचे कर्तव्य.

१३२. विवक्षित बाबतीत वाहन थांबवणे हे वाहकाचे कर्तव्य.

१३३. माहिती देणे हे मोटार वाहनाच्या मालकाचे कर्तव्य.

१३४. एखाद्या व्यक्तीस अपघात व दुखापत झाल्यास त्याप्रसंगी चालकाचे कर्तव्य.

१३५. अपघातांच्या तपासणीकरिता आणि रस्त्यालगतच्या सुखसोयी इत्यादीकरिता तयार करावयाच्या योजना.

१३६. अपघातात गोवलेल्या वाहनाचे निरीक्षण.

१३७. केंद्र शासनाची नियम करण्याची शक्ती.

१३८. राज्य शासनाची नियम करण्याची शक्ती.

## प्रकरण नऊ

### भारतातून तात्पुरती बाहेर जाणारी किंवा भारतास भेट देणारी मोटार वाहने

१३९. नियम करण्याची केंद्र शासनाची शक्ती.

## प्रकरण दहा

### विवक्षित प्रकरणात दोष नसतानाचे दायित्व

१४०. दोष नसण्याच्या तत्त्वावर विवक्षित प्रकरणात भरपाई देण्याचे दायित्व.

१४१. मृत्यू अथवा कायम स्वरूपी विकलांगता यांच्या बाबतीत भरपाईसाठी दावा करण्याच्या इतर अधिकारांसंबंधी उपबंध.

१४२. कायमस्वरूपी विकलांगता.

१४३. १९२३ च्या अधिनियम क्रमांक ८ खाली विवक्षित दाव्याच्या बाबतीत प्रकरणाची प्रयोज्यता.

१४४. अधिभावी परिणाम.

## प्रकरण अकरा

### त्रयस्थ पक्षीय जोखमीबद्दल मोटार वाहनांचा विमा

१४५. व्याख्या.

१४६. त्रयस्थ पक्षीय जोखीमीकरिता विम्याची आवश्यकता.

१४७. विमापत्राबाबतच्या आवश्यकता व दायित्वाच्या मर्यादा.

१४८. देवाणघेवाण करणाऱ्या देशांमध्ये दिलेल्या विमापत्रांची विधिग्राह्यता.

१४९. त्रयस्थ पक्षीय जोखमीच्या संबंधात विमेदार व्यक्तीच्या विरुद्ध देण्यात आलेले न्याय निर्णय आणि निवाडे यांची पूर्तता करण्याचे विमाकाराचे कर्तव्य.

१५०. विमेदार दिवाळखोर झाला असताना त्रयस्थ पक्षांना विमाकाराविरुद्ध असलेले अधिकार.

१५१. विवादासंबंधी माहिती देण्याचे कर्तव्य.

१५२. विमाकार व विमेदार यांच्यात समझोता.

१५३. कलमे १५०, १५१ व १५२ याबाबतीतील व्यावृत्ती.

कलमे

१५४. विमा उतरवण्यात आलेल्या व्यक्तींच्या दिवाळखोरीमुळे विमारक्षित व्यक्तींच्या दायित्वांवर किंवा तयस्थ पक्षाच्या मागणीहक्कांवर परिणाम न होणे.

१५५. मृत्यूचा विवक्षित वादकारणांवर परिणाम.

१५६. विमा प्रमाणपत्राचा परिणाम.

१५७. विमा प्रमाणपत्राचे हस्तांतरण.

१५८. प्रमाणपत्रे, लायसन आणि विवक्षित प्रकरणांमध्ये परवाना सादर करणे.

१५९. वाहन उपयोगात आणण्याच्या प्राधिकारासाठी अर्ज केल्यावर विमा प्रमाणपत्र सादर करणे.

१६०. अपघातात गोवल्या गेलेल्या वाहनाचा तपशील देण्याचे कर्तव्य.

१६१. ठोकर मारून व पळून गेलेल्या मोटार वाहनांमुळे घडलेल्या अपघाताच्या प्रकरणातील भरपाई म्हणून विशेष उपबंध.

१६२. कलम १६१ खाली देण्यात आलेल्या भरपाईचा काही विवक्षित प्रकरणात परतावा.

१६३. ठोकर मारून व पळून गेलेल्या मोटार वाहनांमुळे घडलेल्या अपघाताच्या प्रकरणात भरपाई देण्याची योजना.

१६४. केंद्र शासनाची नियम करण्याची शक्ती.

## प्रकरण बारा

### मागणीहक्क अधिकरणे

१६५. मागणीहक्क अधिकरणे.

१६६. भरपाईसाठी अर्ज.

१६७. विवक्षित प्रकरणात भरपाई करता करावयाच्या मागण्यांसंबंधी विकल्पाधिकार.

१६८. मागणीहक्क अधिकरणाचा निवाडा.

१६९. मागणी हक्क अधिकरणाची कार्यपद्धती व त्यांची शक्ती.

१७०. विवक्षित प्रकरणात विमाकारांवर कार्यवाही करणे.

१७१. कोणतीही मागणी मान्य झाल्यास व्याज देववणे.

१७२. विवक्षित प्रकरणी भरपाईदाखल खर्च देणे.

१७३. अपिले.

१७४. विमाकाराकडून जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे पैशांची वसुली.

१७५. दिवाणी न्यायालयाच्या अधिकारितेस आडकाठी.

१७६. नियम करण्याची राज्य शासनाची शक्ती.

## प्रकरण तेरा

### अपराध, शास्ती व कार्यपद्धती

१७७. अपराधाबद्दल शास्ती लादण्यासाठी सर्वसाधारण उपबंध.

१७८. पास किंवा तिकीट याविना प्रवास करण्याबद्दल आणि वाहकाकडून कर्तव्यच्युती झाल्याबद्दल आणि संविदा गाडी इ. चालविण्यास नकार देण्याबद्दल शास्ती.

१७९. आदेशांची अवज्ञा करणे, अटकाव करणे व माहिती नाकारणे.

१८०. अनधिकृत व्यक्तींना वाहने चालविण्यास मुभा देणे.

१८१. कलम ३ किंवा कलम ४ चे व्यतिक्रमण करून वाहने चालवीणे.

१८२. लायसनासंबंधीचे अपराध.

१८३. वेगमर्यादेपेक्षा अधिक वेगाने वाहन चालवणे वगैरे.

कलमे

१८४. धोकादायक रीत्या वाहन चालविणे.

१८५. दारू प्यालेल्या व्यक्तीने किंवा औषधिद्रव्याचा अंमल असणाऱ्या व्यक्तीने वाहन चालविणे.

१८६. वाहन चालवण्यास मानसिक किंवा शारीरिक दृष्ट्या अपात्र असताना वाहन चालविणे.

१८७. अपघाताच्या संबंधातील अपराधाबद्दल शिक्षा.

१८८. विवक्षित अपराधांना अपप्रेरणा दिल्याबद्दल शिक्षा.

१८९. शर्यत लावणे आणि वेग अजमावणे.

१९०. असुरक्षित स्थितीतील वाहनाचा उपयोग करणे.

१९१. जीमुळे या अधिनियमाचे व्यतिक्रमण होईल अशा स्थितीत वाहन विकणे किंवा त्यात फेरबदल करून ते तशा स्थितीत आणणे.

१९२. नोंदणीशिवाय किंवा परवान्याशिवाय वाहन वापरणे.

१९३. योग्य प्राधिकाराविना काम करणाऱ्या एजंटांना व प्रचारकांना शिक्षा.

१९४. अनुज्ञेय वजनाहून अधिक वजन लादून वाहन चालवणे.

१९५. विवक्षित परिस्थितीत किमान द्रव्यदंड बसवणे.

१९६. विमा न उतरवलेले वाहन चालवणे.

१९७. प्राधिकाराविना वाहन घेऊन जाणे.

१९८. वाहनांच्या संबंधात विनाप्राधिकार ढवळाढवळ.

१९९. कंपन्यांनी केलेले अपराध.

२००. विवक्षित अपराधांमध्ये आपसाती करणे.

२०१. सुरळीत वाहतुकीत अडथळा निर्माण करण्याच्या कारणासाठी शास्ती.

२०२. वॉरन्ट विनाअटक करण्याची शक्ती.

२०३. उच्छवासाच्या चाचण्या.

२०४. प्रयोगशालेय चाचणी.

२०५. वाहन चालवण्याच्या अपात्रतेबाबतचे गृहीतक.

२०६. दस्तऐवज अडकवून ठेवण्याची पोलीस अधिकाऱ्याची शक्ती.

२०७. नोंदणी प्रमाणपत्र किंवा परवाना इ. याशिवाय वापरण्यात आलेली वाहने अडवून ठेवण्याची शक्ती.

२०८. प्रकरणे संक्षिप्त रीत्या निकालात काढणे.

२०९. दोषसिद्धीवर निर्बंध.

२१०. न्यायालयांनी दोषसिद्धी झाल्याची सूचना पाठवणे.

## प्रकरण चौदा

### संकीर्ण

२११. फी आकारण्याची शक्ती.

२१२. नियमांचे आणि अधिसूचनांचे प्रकाशन व त्यांचा प्रारंभ व त्या काढणे.

२१३. मोटार वाहन अधिकाऱ्याची नियुक्ती.

२१४. मूळ प्राधिकरणाने दिलेल्या आदेशांवर अपिल व पुनरीक्षण यांचा परिणाम.

२१५. मार्ग सुरक्षा परिषदा व समित्या.

२१६. अडचणी दूर करण्याची शक्ती.

२१७. निरसन व व्यावृत्ती.

# मोटार वाहन अधिनियम, १९८८

[१९८८ चा अधिनियम क्रमांक ५९]

(३० जून १९९८ रोजी यथाविद्यमान)

[१४ ऑक्टोबर, १९८८]

**मोटार वाहनांसंबंधीचा कायदा एकत्रित व विशोधित करण्यासाठी अधिनियम.**

**भारतीय गणराज्याच्या एकोणचाळिसाव्या वर्षी, संसदेकडून याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे:—**

## प्रकरण एक

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास "मोटार वाहन अधिनियम, १९८८" असे, म्हणता येईल. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

(३) तो, केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास [1]अंमलात येईल ; आणि निरनिराळ्या राज्यांसाठी निरनिराळे दिनांक नियत करण्यात येतील आणि एखाद्या राज्याच्या संबंधातील या अधिनियमाच्या प्रारंभाविषयीच्या निर्देशाचा अर्थ हा, त्या राज्यात हा अधिनियम अंमलात येण्याविषयीचा निर्देश असल्याप्रमाणे लावण्यात येईल.

२. या अधिनियमामध्ये, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसल्यास,— व्याख्या.

(१) "क्षेत्र" याचा या अधिनियमातील कोणत्याही उपबंधाच्या संबंधातील अर्थ, त्या उपबंधाच्या आवश्यकता लक्षात घेऊन, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील असे क्षेत्र, असा आहे.

(२) "सांधीव वाहन" याचा अर्थ, ज्याला अर्ध अनुवाहन जोडले आहे असे मोटार वाहन असा आहे ;

(३) "अक्षलवजन" याचा एखाद्या वाहनाच्या अक्षलाच्या संबंधातील अर्थ, वाहन ज्यावर स्थिरावले त्या पृष्ठभागावर अक्षास जोडलेल्या अनेक चालकांकडून आलेले एकूण वजन, असा आहे ;

(४) "नोंदणी प्रमाणपत्र" याचा अर्थ, मोटार वाहनाची चौथ्या प्रकरणाच्या उपबंधानुसार रीतसर नोंदणी करण्यात आली आहे अशा आशयाचे सक्षम प्राधिकरणाने दिलेले प्रमाणपत्र, असा आहे ;

(५) "वाहक" याचा टप्पेगाडीच्या संबंधातील अर्थ, उतारूकडून भाडे गोळा करण्याचे व टप्पेगाडीत त्यांची चढउतार होताना त्याबाबत नियमन करण्याचे काम व विहित करण्यात येतील अशी अन्य कामे यासाठी नेमलेली व्यक्ती, असा आहे ;

(६) "वाहक लायसन" याचा अर्थ, सक्षम प्राधिकरणाने प्रकरण तीन अन्वये दिलेल्या लायसनाद्वारे त्यात विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तीस वाहक म्हणून काम करण्यास प्राधिकृत करण्यात यते ते लायसन, असा आहे ;

(७) "कंत्राटी गाडी" याचा अर्थ, भाडे किंवा बक्षिसी घेऊन एका उतारूची किंवा अनेक उतारूंची जे ने-आण करते असे मोटार वाहन आणि जे मोटार वाहन व्यक्ती किंवा उपलक्षित संविदेअन्वये त्यात नमूद केलेल्या उतारूंची ने-आण करण्यास त्या संपूर्ण वाहनाचा उपयोग करण्या करिता कामावर लावले आहे असे मोटार वाहन आणि अशा वाहनाच्या संबंधात परवानाधारकाच्या बरोबर त्या वाहनात प्रवेश करणारी व्यक्ती किंवा तिने याबाबतीत अधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती :—

(क) वेळेच्या बोलीवर मग ती कोणत्याही मार्गाच्या किंवा अंतराच्या संदर्भात असो वा नसो ; किंवा—

(ख) एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणापर्यंत आणि दोन्हीपैकी कोणत्याही बाबतीत, दरम्यानच्या प्रवासात कोठही संविदेत समाविष्ट नसलेल्या उतारूंना घेण्यासाठी किंवा उतरवण्यासाठी न थांबता, ठरवून दिलेल्या किंवा संमत केलेल्या दराप्रमाणे किंवा तशा रकमेइतके भाडे किंवा मोबदला घेऊन त्या बदल्यात एका उतारूची किंवा अनेक उतारूंची ने-आण करते, ते मोटार वाहन, असा आहे, आणि

(एक) मेक्सीकॅब ; आणि

(दोन) मोटारकॅबच्या बाबतीत तीमधील उतारूंवर वेगवेगळे भाडे आकारण्यात आलेले असले तरी, ती मोटारकॅब यांचा समावेश होतो.

(८) "व्यापारी" या संज्ञेत पुढील धंद्यात गुंतलेल्या व्यक्तीचा समावेश होतो :—

[2][ * * * * ]

---

१. स्थायी आदेश ७२८ (ई) दिनांक ६ ऑक्टोबर, १९९४ याद्वारे १४ नोव्हेंबर, १९९४ पासून अंमलात येईल.

२. १९९४ चा अधिनियम, ५४ कलम २ (एक) द्वारे वगळण्यात आला (स्थायी आदेश ७२८(ई) दिनांक ६ ऑक्टोबर, १९९४ अन्वये १४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(ख) वाहनाच्या न्याधाराला जोडण्याकरिता सांगाडे बांधणे; किंवा

(ग) मोटार वाहनांची दुरुस्ती; किंवा

(घ) मोटार वाहन जंगम गहाण ठेवण्याचा, भाडेपट्टयाने देण्याचा किंवा भाडे-खरेदीचा धंदा ;

(९) दुसऱ्या मोटार वाहनाकडून खेचून नेल्या जाणाऱ्या मोटार वाहनाच्या संबंधात "चालक" यात खेचून नेल्या जाणाऱ्या वाहनाचे स्टीअरमन म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीचा समावेश होतो ;

(१०) "चालन लायसन" याचा अर्थ, सक्षम प्राधिकरणाने, दुसऱ्या प्रकरणाखाली दिलेल्या, ज्या लायसनामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिकाऊ व्यक्तीव्यतिरिक्त अन्य व्यक्तीस मोटार वाहन किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट प्रकारचे किंवा वर्णनाचे मोटार वाहन चालविण्यास प्राधिकृत करण्यात येते ते लायसन, असा आहे ;

(११) "शैक्षणिक संस्थेची बस" याचा अर्थ, जी बस महाविद्यालय, शाळा, किंवा इतर शैक्षणिक संस्था यांच्या मालकीची आहे आणि शैक्षणिक संस्थेच्या, कोणत्याही कार्यक्रमांच्या संबंधात तिच्या कर्मचारीवर्गाची किंवा विद्यार्थ्यांची ने-आण करण्याच्या प्रयोजनासाठीच केवळ जिचा वापर करण्यात येतो, अशी बस, असा आहे ;

(१२) "प्रवासभाडे" यात मुदती तिकिटांकरिता किंवा संविदा गाडीच्या भाड्यादाखल द्याव्या लागणाऱ्या रकमांचा समावेश आहे ;

(१३) "माल" यामध्ये वाहनाने ने-आण केले जाणारे असे, जिवंत व्यक्ती खेरीजकरून पशुधन व (वाहनासाठी सामान्यपणे उपयोगात आणल्या जाणाऱ्या साधनसामग्रीहून अन्य) कोणतीही वस्तू यांचा समावेश आहे, पण मोटार गाडीमधून किंवा मोटार गाडीला जोडलेल्या अनुवाहनातून वाहून नेल्या जाणाऱ्या प्रवासी सामानाचा किंवा वैयक्तिक चीजवस्तूंचा किंवा वाहनातून प्रवास करणाऱ्या उतारूंच्या वैयक्तिक सामानाचा त्यात समावेश नाही ;

(१४) "मालगाडी" याचा अर्थ, केवळ माल वाहून नेण्याच्या उपयोगासाठी बनवलेली किंवा तदनुकूल बदल करून घेतलेली मोटार गाडी किंवा जेव्हा माल वाहून नेण्यासाठी त्याचा उपयोग केला जात असेल तेव्हा माल वाहून नेण्याच्या उपयोगासाठी न बनविलेले किंवा तदनुकूल बदल करून घेतलेले कोणतेही मोटार वाहन, असा आहे ;

(१५) "एकूण वाहन वजन" याचा अर्थ, कोणत्याही वाहनाच्याबाबतीत, त्या वाहनाचे एकूण वजन आणि त्या वाहनासाठी अनुज्ञेय म्हणून नोंदणी प्राधिकरणाने प्रमाणित केलेला व नोंदलेला भार, असा आहे ;

(१६) "अवजड मालवाहन" याचा अर्थ, ज्या कोणत्याही मालवाहू वाहनाचे एकूण वाहन वजन किंवा कोणत्याही कर्षित्राचे किंवा रोड-रोलरचे भाररहित वजन १२,००० किलोग्रॅमपेक्षा अधिक असेल असे कोणतेही वाहन, असा आहे ;

(१७) "अवजड प्रवासी मोटार वाहन" याचा अर्थ, कोणतेही लोक सेवा वाहन किंवा खाजगी सेवा वाहन किंवा शैक्षणिक संस्थेची बस किंवा ओम्नी बस यापैकी ज्या कोणत्याही वाहनाचे एकूण वाहन वजन किंवा ज्या मोटार गाडीचे भाररहित वजन १२,००० किलोग्रॅमपेक्षा अधिक असेल असे कोणतेही वाहन, असा आहे ;

(१८) "अपंगगाडी" याचा अर्थ, काही शारीरिक दोषामुळे किंवा विकलांगतमुळे पीडित अशा व्यक्तीच्या उपयोगासाठी नुसता बदल करून नव्हे तर मुद्दाम तशी योजना करून बनवलेले आणि फक्त अशाच व्यक्तीकडून किंवा तिच्याकरिता उपयोगात आणले जाणारे वाहन, असा आहे ;

(१९) "शिकाऊ व्यक्ती लायसन" याचा अर्थ, सक्षम प्राधिकरणाने प्रकरण दोन खाली दिलेल्या ज्या लायसनाद्वारे त्यात विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तीस, मोटार वाहन किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट प्रकारचे किंवा वर्णनाचे मोटार वाहन शिकाऊ व्यक्ती म्हणून चालवण्यास प्राधिकृत करण्यात येते ते लायसन, असा आहे ;

(२०) "लायसन प्राधिकरण" याचा अर्थ, दुसऱ्या किंवा, प्रकरणपरत्वे, तिसऱ्या प्रकरणाखाली लायसन देण्याबाबतची शक्ती ज्यास प्रदान करण्यात आलेली आहे असे प्राधिकरण, असा आहे ;

(२१) "हलके मोटार वाहन" याचा अर्थ, परिवहन वाहनाचे किंवा ओम्नी बसचे एकूण वाहन वजन किंवा मोटार कार किंवा कर्षित्र किंवा रोडरोलर ( Road Roller ) यांपैकी कोणत्याही वाहनाचे भाररहित वजन [१][७,५००] किलोग्रॅम पेक्षा अधिक नाही असे वाहन, असा आहे ;

[२][(२१क) "निर्माणक" याचा अर्थ, मोटार वाहनांच्या निर्मिती व्यवसायात गुंतलेली व्यक्ती, असा आहे; ]

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम २ (दोन) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातला (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २ (तीन) द्वारे '२१क' हा खंड नव्याने दाखल केला (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(२२) "मॅक्सीकॅब" याचा अर्थ, चालक वगळून किमान सहा परंतु बारापेक्षा जास्त नसतील इतक्या उतारूंची भाड्यादाखल किंवा बक्षिसीदाखल ने-आण करण्यासाठी बनलेले किंवा त्यात तदनुकूल बदल करून घेतलेले कोणतेही मोटार वाहन, असा आहे ;

(२३) "मध्यम मालवाहू वाहन" याचा अर्थ, हलके मोटार वाहन किंवा अवजड मालवाहू वाहन यांच्याव्यतिरिक्त इतर कोणतेही मालवाहू वाहन, असा आहे ;

(२४) "मध्यम प्रवासी मोटार वाहन" याचा अर्थ, मोटार सायकल, अंपगगाडी, हलके मोटार वाहन किंवा अवजड प्रवासी मोटार वाहन यांव्यतिरिक्त कोणतेही लोक सेवा वाहन किंवा खाजगी सेवा वाहन किंवा शैक्षणिक संस्थेची बस, असा आहे ;

(२५) "मोटार कॅब" याचा अर्थ, चालक वगळता जास्तीत जास्त सहा उतारूंची भाडे किंवा बक्षिसी घेऊन ने-आण करण्यासाठी बनवलेले किंवा तदनुकूल बदल करून घेतलेले कोणतेही मोटार वाहन असा आहे ;

(२६) "मोटार गाडी" याचा अर्थ, परिवहन वाहन बस, ओम्नी बस, रोड रोलर, मोटार सायकल किंवा अपंगयान यांव्यतिरिक्त अन्य कोणतेही मोटार वाहन, असा आहे ;

(२७) "मोटार सायकल" याचा अर्थ, मोटार वाहनास जोडलेल्या पण अलग करता येण्यासारखा एक जादा चाक असलेल्या कोणत्याही जोड यानांसह असे दुचाकी मोटार वाहन, असा आहे;

(२८) "मोटार वाहन किंवा वाहन" याचा अर्थ, रस्त्यावर उपयोग करण्यासाठी बनवलेले किंवा तदनुकूल बदल करून घेतलेले कोणतेही यंत्रचालित वाहन असा आहे. मग त्याच्या ठायी आलेली चालनशक्ती त्याच्याकडे बाह्य साधनाद्वारे वा अंतर्गत साधनाद्वारे संक्रमित करण्यात आलेली असो आणि त्यात, जिला सांगाडा जोडलेला नाही अशी न्याधार व अनुवाहन यांचा समावेश आहे; पण त्यात ठरीव रुळांवरून धावणारे वाहन किंवा फक्त एखाद्या कारखान्यातच किंवा अन्य कोणत्याही बंदिस्त जागेतच उपयोग करण्यासाठी तदनुकूल बदल करून घेतलेले विशेष प्रकारचे वाहन किंवा ज्याला [1][पंचवीस घन सेंटीमीटर्सपेक्षा] जास्त क्षमता नसलेल्या अशा इंजिनासह चार चाकांपेक्षा कमी चाके जोडलेली नाहीत असे वाहन यांचा समावेश नाही ;

(२९) "ओम्नी बस" याचा अर्थ, चालक वगळून सहापेक्षा अधिक व्यक्तींची ने-आण करण्यासाठी बनवलेले किंवा तदनुकूल बदल करून घेतलेले कोणतेही मोटार वाहन, असा आहे;

(३०) "मालक" याचा अर्थ, जिच्या नावावर मोटार वाहनांची नोंदणी झालेली आहे अशी व्यक्ती आणि अशी व्यक्ती अज्ञान असेल त्याबाबतीत अशा अज्ञान व्यक्तीचा पालक आणि भाडे खरेदी करार किंवा भाडेपट्ट्याचा करार किंवा तारण गहाणाचा करार यांचा विषय असलेल्या मोटार वाहनाच्या संबंधात, त्या करारान्वये त्या वाहनाची कब्जेदार असलेली व्यक्ती, असा आहे;

(३१) "परवाना" याचा अर्थ, राज्य किंवा प्रादेशिक परिवहन प्राधिकरण किंवा या अधिनियमान्वये याबाबत विहित करण्यात आलेले प्राधिकरण यांच्याकडून परिवहन वाहन म्हणून मोटार वाहनाच्या उपयोगास प्राधिकृत करण्यासाठी देण्यात येणारा परवाना, असा आहे;

(३२) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांनी विहित केलेला, असा आहे;

(३३) "खाजगी सेवा वाहन" याचा अर्थ, चालक वगळता सहापेक्षा जास्त उतारूंची ने-आण करण्यासाठी बनविलेले किंवा तदनुकूल बदल करून घेतलेले मोटार वाहन आणि अशा वाहनाच्या मालकाकडून किंवा त्याच्या वतीने भाड्याशिवाय किंवा बक्षिसाशिवाय त्याच्या स्वतःच्या व्यापारासाठी किंवा धंद्यासाठी किंवा त्या संबंधात व्यक्तींची ने-आण करण्याच्या प्रयोजनासाठी ज्या वाहनाचा सामान्यतः उपयोग केला जातो असे मोटार वाहन असा होतो, परंतु त्यात सार्वजनिक प्रयोजनासाठी उपयोगात येणाऱ्या मोटार वाहनाचा समावेश असणार नाही ;

(३४) "सार्वजनिक ठिकाण" याचा अर्थ, जेथे जनतेस प्रवेश करण्याचा अधिकार आहे असा मार्ग, रस्ता, वाट किंवा इतर ठिकाण, असा आहे, मग ते रहदारीचे असो वा नसो आणि त्या संज्ञेत, उतारूंना जेथे टप्पेगाडीत घेतले जाते किंवा उतरवले जाते अशा कोणत्याही ठिकाणांचा किंवा विरामस्थानाचा समावेश आहे ;

(३५) "सार्वजनिक सेवा वाहन" याचा अर्थ, भाडे किंवा बक्षिसी घेऊन उतारूंची ने-आण करण्यासाठी वापरले जाणारे किंवा तदनुकूल बदल करून घेतलेले कोणतेही मोटार वाहन असा आहे, आणि त्यात मॅक्सीकॅब, मोटार कॅब, कंत्राटी गाडी व टप्पेगाडी यांचा समावेश आहे ;

(३६) "नोंदलेले अक्षल वजन" याचा कोणत्याही वाहनाच्या अक्षलाच्या संबंधातील अर्थ, त्या अक्षलासाठी अनुज्ञेय म्हणून नोंदणी प्राधिकरणाने प्रमाणित केलेले व नोंदलेले अक्षल वजन, असा आहे ;

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम २ (चार) मूळ मजकुराऐवजी घातला (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(३७) "नोंदणी प्राधिकरण" याचा अर्थ, चौथ्या प्रकरणाखाली मोटार वाहनांची नोंदणी करण्याची शक्ती ज्याला प्रदान करण्यात आलेली आहे असे प्राधिकरण, असा आहे ;

(३८) "नियत मार्ग" याचा अर्थ, दोन अंतिम स्थानांच्या (टर्मिनस) दरम्यान कोणता महामार्ग मोटार वाहनास आक्रमिता येईल ते विनिर्दिष्ट करणारा प्रवासाचा मार्ग, असा आहे ;

[1][(३९) "अर्ध अनुवाहन" (सेमी ट्रेलर) याचा अर्थ, यंत्राचालित नसलेले (अनुवाहना-व्यतिरिक्त अन्य) जे वाहन एखाद्या मोटार वाहनाला जोडण्याचा उद्देश असतो आणि ज्याची रचना अशाप्रकारे केलेली असते की, त्याचा एखादा भाग त्या मोटार वाहनाच्या वर बसवलेला असतो व त्याच्या वजनाचा काही भाग त्या मोटार वाहनात अंतर्भूत केलेला असतो असे एखादे वाहन, असा आहे; ]

(४०) "टप्पेगाडी" याचा अर्थ, संपूर्ण प्रवासाबद्दल किंवा प्रवासातील काही टप्प्यांबद्दल एकेकटच्या उतारुने किंवा उतारुंसाठी वेगवेगळ्या प्रवास-भाड्याच्या रुपाने दिलेले भाडे किंवा बक्षीसी घेऊन जे मोटार वाहन उतारुंची ने-आण करते असे, चालक वगळता सहापेक्षा अधिक व्यक्तींची ने-आण करणारे किंवा तदनुकूल बदल करून घेतलेले मोटार वाहन, असा आहे ;

(४१) "राज्य शासन" याचा संघराज्यक्षेत्राच्या संबंधातील अर्थ, संविधानाच्या अनुच्छेद २३९ खाली नियुक्त केलेला त्याचा प्रशासक, असा आहे ;

(४२) "राज्य परिवहन उपक्रम" याचा अर्थ, असा उपक्रम जो—

(एक) केन्द्र शासन किंवा राज्य शासन ;

(दोन) मार्ग परिवहन निगम अधिनियम, १९५० (१९५० चा ६४) याच्या कलम ३ खाली स्थापन करण्यात आलेले कोणतेही मार्ग परिवहन निगम ;

(तीन) केंद्र शासनाकडून किंवा एका किंवा अधिक राज्य शासनांकडून नियंत्रित करण्यात आलेली किंवा त्यांच्या मालकीची असलेली कोणतीही नगरपालिका किंवा निगम किंवा कंपनी ;

[2][(चार) जिल्हा परिषद किंवा अन्य तत्सम स्थानिक संस्था].

यांच्याकडून चालविण्यात येतो आणि मार्ग परिवहन सेवा पुरवितो असा कोणताही उपक्रम, असा आहे ;

**स्पष्टीकरण**—या खंडाच्या प्रयोजनार्थ, "मार्ग परिवहन सेवा" याचा अर्थ, भाडे किंवा बक्षीशीच्या बदल्यात रस्त्यावरून उतारु किंवा माल किंवा दोन्हीही यांची ने-आण करणाऱ्या मोटार वाहनाची सेवा, असा आहे.

(४३) "पर्यटन वाहन" याचा अर्थ, याबाबत विहित करण्यात येईल अशा विनिर्देशांस अनुसरून बनविलेली किंवा तदनुकूल बदल करून घेतलेली आणि सुसज्ज केलेली व राखलेली आहे अशी कंत्राटी गाडी, असा आहे ;

(४४) "कर्षित्र" याचा अर्थ, जे मोटार वाहन त्यामधून (चालनाच्या प्रयोजनासाठी उपयोगात आणलेल्या साधनसामग्रीहून अन्य) कोणताही भार वाहून नेण्यासाठी मुद्दाम बनवलेले नाही असे मोटार वाहन, असा आहे; परंतु त्यातून रोड रोलर वगळलेला आहे ;

(४५) "वाहतूक संकेत चिन्ह" यात, सर्व संकेत, संकेत चिन्हांचे स्तंभ, दिशादर्शक स्तंभ, मोटार वाहन चालकांच्या माहितीसाठी, मार्गदर्शनासाठी किंवा निदेशनासाठी असलेले रस्त्यावरील चिन्हांकन किंवा इतर साधने यांचा समावेश आहे ;

(४६) "अनुवाहन" याचा अर्थ, मोटार वाहनाने ओढले जाणारे किंवा ओढले जाण्यासाठी उद्देशित असे अर्ध अनुवाहन व जोड यान याहून अन्य असे कोणतेही वाहन, असा आहे ;

(४७) "परिवहन वाहन" याचा अर्थ, लोक सेवा वाहन, मालवाहू वाहन, शैक्षणिक संस्थेची बस किंवा खाजगी सेवा वाहन, असा आहे ;

(४८) "भाररहित वजन" याचा अर्थ, वाहन किंवा अनुवाहन चालू असताना त्याच्या-बरोबर सामान्यपणे उपयोगात आणली जाणारी सर्व साधनसामग्री धरून, परंतु त्यातून चालकाचे किंवा परिचराचे वजन वगळून, त्या वाहनाचे किंवा अनुवाहनाचे वजन असा आहे आणि जथे पर्यायी भाग किंवा सांगाडे उपयोगात आणले जातात तेथे वाहनाचे भाररहित वजन याचा अर्थ सर्वात अवजड अशा पर्यायी भागांसहित किंवा सांगाडयांसहित वाहनाचे वजन, असा आहे ;

(४९) "वजन" याचा अर्थ, ज्यावर वाहन उभे आहे अशा पृष्ठभागावर वाहनाच्या चाकांद्वारे त्या त्यावेळी पडणारे एकूण वजन, असा आहे.

---

१. १९९४ चा अधिनियम ५४ कलम २ (पाच) द्वारे मूळ खंडाऐवजी घातला, (१४ नोव्हेंबर १९९४, रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २ (सहा) अन्वये उपखंड (चार) नव्याने दाखल करण्यात आला (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

## प्रकरण दोन

### मोटारवाहनांच्या चालकांना लायसन देणे

**चालन लायसनाची आवश्यकता.**

३. (१) कोणतीही व्यक्ती, तिला मोटार वाहन चालविण्यास प्राधिकार देणारे खुद्द तिला देण्यात आलेले परिणामक चालन लायसन धारण करीत असल्याशिवाय, तिला कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी ते वाहन चालवता येणार नाही आणि कोणतीही व्यक्ती (कलम ७५ च्या पोट-कलम (२) अन्वये तयार करण्यात आलेल्या कोणत्याही योजनेखाली तिच्या स्वत:च्या उपयोगासाठी भाड्याने घेतलेल्या किंवा भाड्याने दिलेल्या [१][मोटारकॅब किंवा मोटार सायकल] व्यतिरिक्त), परिवहन वाहन चालवण्यास आपल्या चालन लायसनाद्वारे विनिर्दिष्टरीत्या हक्कदार झाली असल्याशिवाय, तिला परिवहन वाहन चालविता येणार नाही.

(२) कोणत्या शर्ती पाळल्यास मोटार वाहन चालवण्याचे शिक्षण घेणाऱ्या व्यक्तींस पोट कलम (१) लागू होणार नाही, ते केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल.

**मोटार वाहने चालविण्यासंबंधी वयोमर्यादा.**

४. (१) अठरा वर्षे वयाखालील कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी मोटार वाहन चालवता येणार नाही :

परंतु, वयाची १६ वर्षे पूर्ण केल्यानंतर, कोणतीही व्यक्ती, सार्वजनिक ठिकाणी [२][५० सीसी पेक्षा अधिक नसेल इतकी इंजिन क्षमता असलेली] मोटार सायकल चालवू शकेल.

(२) कलम १८ च्या उपबंधांच्या अधीनतेने, वीस वर्षे वयाखालील कोणत्याही व्यक्तीला, कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी परिवहन वाहन चालविता येणार नाही.

(३) कोणत्याही व्यक्तीला, तिने ज्या वर्गाचे वाहन चालविण्यासाठी अर्ज केला असेल त्या वर्गाचे वाहन चालविण्यास ती या कलमाखाली पात्र असल्याशिवाय, शिकाऊ लायसन किंवा चालन लायसन देण्यात येणार नाही.

**कलमे ३ व ४ यांच्या व्यक्तिक्रमणाबद्दल मोटार वाहनाच्या मालकांची जबाबदारी.**

५. कोणत्याही मोटार वाहनाचा मालक किंवा वाहनावर ताबा असलेली व्यक्ती, कलम ३ किंवा कलम ४ च्या उपबंधांची पूर्तता न करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, वाहन चालवावयास लावू शकणार नाही किंवा परवानगी देऊ शकणार नाही.

**चालन लायसने धारण करण्यावरील निर्बंध.**

६. (१) कोणत्याही व्यक्तीला, ती त्या त्या काळी अंमलात असलेले कोणतेही चालन लायसन धारण करीत असताना, कलम १८ च्या उपबंधानुसार दिलेले चालन लायसन किंवा शिकाऊ लायसन किंवा कलम १३९ खाली तयार केलेल्या नियमानुसार जो दस्तऐवज त्या विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तीस मोटार वाहन चालवण्यास प्राधिकृत करतो तो दस्तऐवज खेरीजकरून अन्य कोणतेही चालन लायसन धारण करता येणार नाही.

(२) चालन लायसन किंवा शिकाऊ लायसन धारण करणारा कोणीही अन्य कोणत्याही व्यक्तीला त्या लायसनचा उपयोग करण्यास परवानगी देणार नाही.

(३) चालन लायसनद्वारे धारकाला ज्या वर्गातील वाहने चालवण्यास प्राधिकृत केले जाते त्या वर्गाच्या संख्येत वाढ करण्यास या कलमातील कोणतीही गोष्ट, कलम ९, पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिलेली अधिकारिता असलेल्या लायसन प्राधिकरणाला प्रतिबंधक होणार नाही.

**विवक्षित वाहनांकरिता शिकाऊ लायसन देण्यावरील निर्बंध.**

७. [३][(१) कोणत्याही व्यक्तीस, हलके मोटार वाहन चालविण्याचे कमीत कमी एक वर्षाचे चालन लायसन तिने धारण केलेले असल्याखेरीज, परिवहन वाहन चालविण्याचे शिकाऊ लायसन दिले जाणार नाही.]

(२) अठरा वर्षाखालील कोणत्याही व्यक्तीला, ती ज्या व्यक्तीच्या जोपासनेत राहत असेल तिच्याकडून लेखी स्वरुपात परवानगी आणल्याशिवाय चक्रण नसलेली मोटार सायकल चालवण्याचे शिकाऊ लायसन दिले जाणार नाही.

---

१. १९९४ चा अधिनियम ५४ कलम ३ अन्वये मूळ मजकूराऐवजी घातला (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ४ अन्वये मूळ मजकुराऐवजी घातला (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ५ अन्वये मूळ मजकुरा ऐवजी घातला, (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

शिकाऊ लायसन मंजूर करणे.

८. (१) मोटार वाहन चालवण्यास कलम ४ खाली जी निरर्ह नाही आणि त्या त्या वेळी चालन लायसन धारण करण्यास किंवा मिळवण्यास जी निरर्ह नाही अशा कोणत्याही व्यक्तीला, कलम ७ च्या उपबंधाच्या अधीनतेने, आपणास चालन लायसन देण्यात यावे, यासाठी—

(एक) ती सर्वसामान्यपणे जेथे राहात असेल किंवा कामधंदा करीत असेल, किंवा

(दोन) कलम १२ मध्ये निर्देशलेल्या, ज्या शाळेत किंवा आस्थापनेत मोटार वाहन चालवण्याचे शिक्षण घेत असेल किंवा तिने घेतले असेल ती शाळा किंवा आस्थापना जेथे असेल, त्या क्षेत्रामध्ये अधिकारिता असलेल्या लायसन प्राधिकरणाकडे अर्ज करता येईल.

(२) पोटकलम (१) खालील प्रत्येक अर्ज हा, केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा नमुन्यात असेल आणि त्यासोबत विहित करण्यात येईल अशी फी व असे दस्तऐवज जोडलेले असतील.

(३) पोटकलम (१) खालील प्रत्येक अर्जाला, केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा नमुन्यातील व राज्य शासन किंवा राज्य शासनाकडून याबाबतीत प्राधिकृत करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या प्रयोजनार्थ नियुक्त करील अशा नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीची स्वाक्षरी असलेले वैद्यकीय प्रमाणपत्र जोडावे लागेल :

[1][परंतु, परिवहन वाहनाव्यतिरिक्त अन्य वाहनचालनासाठी अशा वैद्यकीय प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.]

(४) अर्जदार, त्याने ज्यासाठी अर्ज केला असेल त्या शिकाऊ लायसनद्वारे, ज्या प्रकारचे मोटार वाहन चालवण्यास तो प्राधिकृत होऊ शकेल ते वाहन त्याने चालवल्यास, ते जनतेला किंवा उतारूंना ज्यामुळे धोकादायक ठरण्याचा संभव आहे अशा अन्य कोणत्याही रोगाने किंवा निःसमर्थतेने पीडित आहे असे जर अर्जावरून किंवा पोटकलम (३) मध्ये निर्देशिलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्रावरून दिसून आले तर, लायसन प्राधिकरण शिकाऊ लायसन देण्यास नकार देईल :

परंतु, जर अर्जदार अपंगयान चालवण्यास योग्य आहे अशी लायसन प्राधिकरणाची खात्री झाली तर, अर्जदाराला, असे अपंगयान चालविण्यापुरते मर्यादित असलेले शिकाऊ लायसन देता येईल.

(५) कोणताही अर्जदार, केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा चाचणीमध्ये लायसन प्राधिकरणाचे समाधान होईल अशा रीतीने उत्तीर्ण झाल्याशिवाय, त्याला कोणतेही शिकाऊ लायसन दिले जाणार नाही.

(६) जेव्हा समुचित लायसन प्राधिकरणाकडे रीतसर अर्ज करण्यात आला असेल आणि अर्जदाराने, पोटकलम (३) खाली आपल्या शारीरिक पात्रतेबाबत अशा प्राधिकरणाची खात्री पटवून दिली असेल आणि पोटकलम (५) मध्ये निर्देशिलेल्या चाचणीमध्ये लायसन प्राधिकरणाचे समाधान होईल अशारीतीने तो उत्तीर्ण झाला असेल तेव्हा, अर्जदार जर मोटार वाहन चालविण्यास कलम ४ खाली निरर्ह नसेल किंवा तो त्या त्यावेळी मोटार वाहन चालविण्यास, लायसन धारण करण्यास किंवा मिळविण्यास निरर्ह नसेल तर, लायसन प्राधिकरण, कलम ७ च्या उपबंधांच्या अधीनतेने अर्जदारास शिकाऊ लायसन मंजूर करील :

परंतु, लायसन प्राधिकरण हे जरी समुचित लायसन प्राधिकरण असले तरी समुचित लायसन प्राधिकरणाकडे अर्ज करण्यास अर्जदार असमर्थ असल्यास सबळ कारण आहे अशी लायसन प्राधिकरणाची खात्री झाली तर ते मोटार सायकल किंवा हलके मोटार वाहन चालविण्यासाठी शिकाऊ लायसन देऊ शकेल.

(७) जेव्हा केंद्र शासनाचे असे करणे आवश्यक किंवा इष्ट आहे याबाबत समाधान झाले असेल तेव्हा केंद्र शासन याबाबतीत केलेल्या नियमांद्वारे पोटकलम (३) किंवा पोटकलम (५) किंवा दोन्हीही पोटकलमांच्या उपबंधांमधून, कोणत्याही व्यक्तींच्या वर्गाला एकतर पूर्णतः किंवा नियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटींच्या अधीनतेने, सर्वसाधारणपणे सूट देऊ शकेल.

(८) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेले मोटार सायकल चालविण्याचे कोणतेही शिकाऊ लायसन हे अशा प्रारंभानंतर, गिअर असलेली किंवा नसलेली मोटार सायकल चालविण्यासाठी परिणामक असल्याचे मानण्यात येईल.

चालन लायसन मंजूर करणे.

९. (१) त्या त्या वेळी चालन लायसन धारण करण्यास किंवा मिळविण्यास निरर्ह नाही अशी कोणतीही व्यक्ती आपणास चालन लायसन देण्यात यावे यासाठी—

(एक) ती सर्वसामान्यपणे जेथे राहत असेल किंवा कामधंदा करीत असेल, किंवा

(दोन) कलम १२ मध्ये निर्देशिलेल्या ज्या शाळेत किंवा आस्थापनेत मोटार चालविण्याचे शिक्षण ती घेत असेल किंवा तिने घेतले असेल ती शाळा किंवा आस्थापना जेथे असेल त्या क्षेत्रामध्ये अधिकारिता असलेल्या लायसन प्राधिकरणाकडे अर्ज करू शकेल.

(२) पोटकलम (१) खालील प्रत्येक अर्ज, केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा नमुन्यात असेल आणि त्यासोबत विहित करण्यात येईल अशी फी व असे दस्तऐवज जोडलेले असतील.

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम ६ अन्वये परंतुक जादा दाखल करण्यात आले, (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

[1][(३) केंद्र सरकारकडून विहित करण्यात येईल अशा वाहन चालविण्याच्या चाचणीमध्ये अर्जदार उत्तीर्ण झाला तरच त्याला चालन लायसन देण्यात येईल;

परंतु, खालील गोष्टी सिद्ध करणारे पुरावे सादर करणाऱ्या अर्जदाराला अशी चाचणी देण्याची गरज असणार नाही,—

(क) (एक) अर्जदाराने यापूर्वी त्यावर्गातील वाहन चालविण्याचे चालन लायसन धारण केले होते आणि त्या लायसनच्या समाप्तीचा दिनांक आणि अर्जाचा दिनांक यामधील कालावधी पाच वर्षांपेक्षा अधिक नाही, किंवा

(दोन) अर्जदार अशा वर्गातील वाहन चालविण्यासाठी कलम १८ अन्वये देण्यात येणारे चालन लायसन धारण करीत आहे किंवा त्याने ते पूर्वी धारण केलेले होते, किंवा

(तीन) भारताबाहेरील कोणत्याही देशाच्या सक्षम प्राधिकरणाने दिलेले अशा वर्गातील वाहन चालविण्याचे चालन लायसन अर्जदाराने धारण केले आहे. मात्र, कलम ८ पोट-कलम (३) च्या उपबंधांचे त्याने अनुपालन केले पाहिजे अशी शर्त राहील.

(ख) ज्या नि:समर्थतेमुळे अर्जदाराने वाहन चालविल्यास ते जनतेला धोकादायक ठरण्याचा संभव असेल अशा कोणत्याही नि:समर्थतेने तो पीडित नाही; आणि त्या प्रयोजनार्थ लायसन प्राधिकरण, अर्जदाराला कलम ८ च्या पोटकलम (३) मध्ये निर्देशिलेल्या नमुन्यात व त्या रीतीने वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करण्यास फर्मावू शकेल :

परंतु, आणखी असे की, जेव्हा मोटार वाहन (परिवहन वाहन नसलेले) चालविण्याचे चालन लायसन मिळवण्याकरिता अर्ज करण्यात आला असेल तेव्हा, राज्य शासनाने यासंबंधात मान्यता दिलेल्या कोणत्याही संस्थेने दिलेले चालन प्रमाणपत्र अर्जदाराकडे असेल तर, लायसन प्राधिकरण या पोटकलमाखाली विहित केलेल्या वाहन केलेल्या वाहन चालविण्याच्या क्षमता चाचणीमधून अर्जदारास सूट देऊ शकेल.]

(४) जेव्हा परिवहन वाहन चालविण्याच्या लायसनाकरिता अर्ज केला असेल तेव्हा कोणत्याही अर्जदाराला, केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशी किमान अर्हता तो धारण करीत असल्याशिवाय, आणि त्याच्याकडे कलम १२ मध्ये निर्देशिलेल्या शाळेकडून किंवा आस्थापनेकडून देण्यात येणारे चालन प्रमाणपत्र असल्याशिवाय, असे प्राधिकारपत्र देण्यात येणार नाही.

[2][(५) अर्जदार वाहन चालविण्याच्या चाचणीमध्ये उत्तीर्ण झाला नसेल त्याबाबतीत त्याला सात दिवसांच्या कालावधीनंतर पुन्हा वाहन चालविण्याच्या चाचणीसाठी उपस्थित राहण्यास परवानगी देण्यात येईल;

परंतु, अर्जदार, त्या चाचणी नंतरच्या तीन चाचण्यांमध्ये देखील उत्तीर्ण होऊ शकला नाही तर शेवटच्या चाचणीच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या कालावधीसाठी पुन्हा अशा चाचणीसाठी तो पात्र ठरणार नाही.]

(६) अर्जामध्ये ज्या प्रकारच्या वाहनांचा निर्देश करण्यात आला असेल त्या प्रकारच्या वाहनामधून वाहन चालविण्याची क्षमता चाचणी घेतली जाईल :

परंतु, जी व्यक्ती गिअर असलेली मोटार सायकल चालविण्याच्या चाचणीमध्ये उत्तीर्ण होईल ती व्यक्ती गिअर नसलेली मोटार सायकल चालविण्याच्या चाचणीमध्ये उत्तीर्ण झाली आहे असे मानण्यात येईल.

(७) जेव्हा समुचित लायसन प्राधिकरणाकडे रीतसर अर्ज करण्यात आला असेल आणि अर्जदाराने आपल्या वाहन चालविण्याच्या क्षमतेबाबत अशा प्राधिकरणाचे समाधान केले असेल तर, लायसन प्राधिकरण अर्जदार त्या त्या वेळी चालन लायसन धारण करण्यास किंवा मिळविण्यास निरर्ह नसेल तर त्या अर्जदाराला चालन लायसन मंजूर करील :

परंतु, लायसन प्राधिकरण हे जरी समुचित लायसन प्राधिकरण असले तरी, समुचित लायसन प्राधिकरणाकडे अर्ज करण्यास अर्जदार असमर्थ असण्यास सबळ कारण आहे अशी लायसन प्राधिकरणाची खात्री झाली तर, ते प्राधिकरण मोटार सायकल किंवा हलके मोटार वाहन चालवण्यासाठी चालन लायसन देऊ शकेल :

परंतु, आणखी असे की, अर्जदाराने जर चालन लायसन यापूर्वी धारण केलेले असेल तर त्यास आपल्या पूर्वीच्या लायसनाची दुसरी प्रत मिळवण्यास तो असमर्थ असण्यास सबळ व पुरेसे कारण आहे अशी आपली खात्री झाल्याशिवाय, लायसन प्राधिकरण नवीन चालन लायसन देणार नाही.

(८) लायसन प्राधिकरणाने अर्जदाराला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, तो,—

(क) एक सराईत गुन्हेगार आहे किंवा एक अट्टल दारुबाज आहे; किंवा

(ख) अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रेरक पदार्थ अधिनियम, १९८५ यातील अर्थाप्रमाणे ज्याला कोणतेही औषधिद्रव्य किंवा मन:प्रेरक पदार्थ यांचे व्यसन आहे ; किंवा

(ग) जिचे कोणतेही मोटार वाहन चालविण्याचे लायसन यापूर्वी कोणत्याही वेळी प्रत्याहृत करण्यात आलेले आहे, अशी व्यक्ती आहे ;

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम ७ (क) अन्वये मूळ मजकुराऐवजी घालण्यात आला (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ७ (ख) अन्वये मूळ मजकुराऐवजी घालण्यात आला (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून.)

---यासंबंधात लायसन प्राधिकरणाची खात्री झालेली असेल तर, लायसन प्राधिकरण, त्याबाबतची कारणे लेखी नमूद करून अशा व्यक्तीला चालन लायसन देण्यास नकार देणारा आदेश देऊ शकेल आणि लायसन प्राधिकरणाकडून या पोटकलमाखाली देण्यात आलेल्या आदेशामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती, आदेश मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत, विहित प्राधिकरणाकडे अपील करू शकेल.

(९) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेले मोटार सायकल चालविण्याचे कोणतेही शिकाऊ व्यक्ती लायसन हे, अशा प्रारंभानंतर, गिअर असलेली किंवा गिअर नसलेली मोटार सायकल चालविण्यासाठी परिणामक असल्याचे मानण्यात येईल.

**चालन लायसनाचा नमुना व मजकूर.**

१०. (१) कलम १८ खाली देण्यात आलेले चालन लायसन खेरीजकरून प्रत्येक शिकाऊ व्यक्ती लायसन व चालन लायसन हे, केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा नमुन्यात असेल व त्यात अशा माहितीचा अंतर्भाव असेल.

(२) शिकाऊ व्यक्ती लायसन किंवा प्रकरणपरत्वे, चालन लायसन यात लायसनधारक पुढे दिलेल्यापैकी एक किंवा अधिक वर्गातील मोटार वाहने चालवण्यास हक्कदार करणारे आहे असे व्यक्त करण्यात येईल, ते वर्ग असे :---

(क) गिअर नसलेली मोटार सायकल ;
(ख) गिअर असलेली मोटार सायकल;
(ग) अपंगगाडी ;
(घ) हलके मोटार वाहन ;
[1][(ङ) परिवहन वाहन;
* * *]
(झ) रोड रोलर,
(ञ) विनिर्दिष्ट वर्णनाचे मोटार वाहन.

**चालन लायसनामध्ये आणखी वाहने दाखल करणे.**

११. (१) कोणत्याही अन्य वर्गाची किंवा वर्णनाची मोटा वाहने चालविण्यासाठी चालन लायसन धारण करण्यास किंवा मिळविण्यास त्या वेळी जी निरर्ह ठरलेली नाही अशी, कोणत्याही वर्गाचे किंवा वर्णनाचे मोटार वाहन चालविण्याचे चालन लायसन धारण करणारी व्यक्ती, ती जेथे राहत असेल किंवा कामधंदा करीत असेल त्या क्षेत्रात अधिकारिता असलेल्या लायसन प्राधिकरणाकडे, अशी अन्य वर्गाची किंवा अन्य वर्णनाची मोटार वाहने लायसनमध्ये आणखी दाखल करण्यात येण्याबाबतचा अर्ज केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा फीसह व असे दस्तऐवज जोडून करू शकेल.

(२) केंद्र शासनाकडून विहित करण्यात येतील अशा नियमांच्या अधीनतेने, कलम ९ चे उपबंध हे, या कलमाखालील अर्ज हा, जणू काही, अर्जदार, ज्या वर्गाचे किंवा वर्णनाचे मोटार वाहन, आपल्या लायसनमध्ये दाखल करून घेऊ इच्छित आहे त्या वर्गाचे किंवा वर्णनाचे मोटार वाहन चालविण्यासाठी त्या कलमाखाली लायसन मिळण्याकरिता करण्यात आलेला अर्ज असावा त्याप्रमाणे, त्या अर्जास लागू होतील.

**मोटार वाहने चालविण्याचे शिक्षण देणाऱ्या शाळा किंवा आस्थापना यांना लायसन देणे व त्यांचे नियमन करणे.**

१२. (१) मोटार वाहन चालविण्याचे आणि त्याच्याशी संबंधित बाबींचे शिक्षण देणाऱ्या शाळा किंवा आस्थापना (मग त्या कोणत्याही नावाने संबोधल्या जात असोत) यांना, राज्य शासनाकडून लायसन देण्याच्या व त्यांचे नियमन करण्याच्या प्रयोजनासाठी केंद्र शासन नियम करू शकेल.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तीच्या सर्वसाधारणतेला बाध न येता, पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींच्या संबंधात असे नियम करता येतील :---

(क) अशा शाळांनी किंवा आस्थापनांनी लायसन देणे, यात असे लायसन देणे, त्यांचे नूतनीकरण करणे व ते प्रत्याहृत करणे यांचाही समावेश आहे;
(ख) अशा शाळा किंवा आस्थापना यांचे पर्यवेक्षण करणे;
(ग) अर्जाचा नमुना व लायसनचा नमुना व त्यात अंतर्भूत करावयाचा तपशील;
(घ) अशा लायसनच्या अर्जाबरोबर भरावयाची फी;
(ङ) ज्या शर्तीच्या अधीनतेने असे लायसन देता येईल अशा शर्ती;
(च) असे लायसन देण्यास किंवा त्याचे नूतनीकरण करण्यास नकार देणाऱ्या आदेशांविरूद्धची अपीले आणि असे लायसन प्रत्याहृत करण्याच्या आदेशाविरूद्धची अपीले;
(छ) एखादी व्यक्ती, ज्या शर्तींच्या अधीनतेने मोटार वाहने चालविण्याचे शिक्षण देणाऱ्या अशा कोणत्याही शाळा किंवा आस्थापना स्थापन करू शकेल व चालवू शकेल त्या शर्ती;
(ज) कोणतेही मोटारवाहन चालविण्याचे कार्यक्षम शिक्षण देणारा एक शिक्षणक्रम किंवा अनेक शिक्षणक्रम, त्यांचे स्वरूप, पाठ्यक्रम व कालावधी;
(झ) असे शिक्षण देण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असणारे (दुहेरी नियंत्रणाने जोडलेल्या मोटार वाहनांच्या समावेशासह) उपकरण संच व साधनसामग्री;

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम ८ अन्वये खंड (ङ) ते (ज) या ऐवजी घालण्यात आले (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(ञ) अशा शाळा किंवा आस्थापना स्थापन करता येतील किंवा चालू ठेवता येतील अशी योग्य जागा व त्यात देण्यात येणाऱ्या सुविधा;

(ट) मोटार वाहने चालविण्याचे शिक्षण देणाऱ्या व्यक्तीने धारण करावयाची, (अनुभवासह) शैक्षणिक व व्यावसायिक दोन्हीही अर्हता;

(ठ) अशा शाळांचे व आस्थापनांचे निरीक्षण, (यात त्यांच्याकडून देण्यात येणाऱ्या सेवांचा व असे शिक्षण देण्यासाठी त्यांच्याकडून चालविण्यात येणारी उपकरणे, साधनसामग्री व मोटार वाहने यांचा समावेश आहे);

(ड) अशा शाळा किंवा आस्थापना यांच्याकडून ठेवण्यात येणारे अभिलेख;

(ढ) अशा शाळांचे किंवा संस्थांचे वित्तीयहस्थैर्य;

(ण) अशा शाळांकडून किंवा आस्थापनांकडून कोणतीही चालन प्रमाणपत्रे देण्यात येत असल्यास ती चालन प्रमाणपत्रे आणि अशी चालन प्रमाणपत्रे ज्या नमुन्यात देण्यात येतील ते नमुने आणि अशी प्रमाणपत्रे देण्याच्या प्रयोजनासाठी पूर्ण करावयाच्या आवश्यक बाबी;

(त) या कलमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक असतील अशा इतर बाबी.

(३) जेव्हा केंद्र शासनाची तसे करणे आवश्यक किंवा इष्ट आहे याबाबत खात्री झाली असेल तेव्हा, केंद्र शासन, याबाबत केलेल्या नियमांद्वारे, मोटार वाहने चालविण्याचे किंवा त्याच्याशी संबंधित असलेल्या बाबींचे शिक्षण देणाऱ्या शाळांच्या किंवा आस्थापनांच्या कोणत्याही वर्गाला, एकतर पूर्णपणे किंवा नियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने या कलमाच्या उपबंधांपासून सर्वसाधारणपणे सूट देऊ शकेल.

(४) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी, मोटार वाहन चालविण्याचे किंवा त्याच्याशी संबंधित बाबींचे शिक्षण मग ते लायसनखाली असो किंवा नसो देणारी शाळा किंवा आस्थापना अशा प्रारंभापासून एक महिन्याच्या कालावधीसाठी, या अधिनियमान्वये देण्यात येणाऱ्या लायसनाशिवाय, असे शिक्षण देणे चालू ठेवू शकेल, आणि त्या शाळेने किंवा आस्थापनेने एका महिन्याच्या उक्त कालावधीमध्ये या अधिनियमाअन्वये अशा लायसनाकरिता विहित नमुन्यात विहित तपशील समाविष्ट असलेला आणि विहित फी सोबत असलेला असा अर्ज, केला असल्यास तो अर्ज लायसन प्राधिकरणाकडून निकालात काढण्यात येत नाही, तोपर्यंत ती शाळा किंवा आस्थापना असे शिक्षण देणे चालू ठेवील.

**मोटार वाहने चालविण्यासाठी लायसनाच्या परिणामकारकतेची व्याप्ती.**

१३. या अधिनियमाखाली देण्यात येणारे शिकाऊ लायसन किंवा चालन लायसन, भारतात सर्वत्र परिणामक असेल.

**मोटार वाहने चालवीण्यासाठी चालन-लायसने चालू राहण्याचा अवधी.**

१४. (१) या अधिनियमाखाली दिलेले शिकाऊ व्यक्ती लायसन, या अधिनियमाच्या इतर उपबंधाच्या अधीनतेने, लायसन दिल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीपर्यंत परिणामक असेल.

(२) या अधिनियमाखाली दिलेल्या किंवा नूतनीकरण केलेल्या चालन लायसनच्या बाबतीत—

(क) परिवहन वाहन चालविण्याच्या लायसनाच्या संबंधात, ते तीन वर्षांच्या कालावधीपुरते परिणामक राहील; [१][आणि]

[२][परंतु, धोकादायक किंवा जोखमीच्या स्वरुपाच्या मालाची वाहतूक करणारे वाहनाच्या चालवण्याचे लायसन हे एक वर्षाच्या कालावधीसाठी परिणामक राहील आणि त्यांच्या नूतनीकरण हे त्या वाहन चालकास विहित पाठ्यक्रमातील एक दिवसाचा उजळणी पाठ्यक्रम पूर्ण करण्याच्या तिच्या अधीन असेल; आणि]

(ख) अन्य कोणत्याही लायसनाच्या बाबतीत—

(एक) जर एखाद्या व्यक्तीला एकतर मूळ स्वरुपात किंवा त्याचे नूतनीकरण करून लायसन मिळत असताना, ते लायसन देण्याच्या किंवा प्रकरणपरत्वे त्याच्या नूतनीकरणाच्या तारखेस त्या व्यक्तीने वयाची [३][पन्नास] वर्षे पूर्ण केलेली नसतील तर—

(क) असे लायसन मिळण्याच्या किंवा नूतनीकरणाच्या तारखेपासून २० वर्षांचा कालावधी; किंवा

(ख) अशी व्यक्ती वयाची [३][पन्नास] वर्षे ज्या तारखेस पूर्ण करील ती तारीख यापैकी जे अगोदर घडेल त्या तारखेपर्यंत परिणामक राहील.

---

१. १९९४ चा अधिनियम ५४ कलम ९ द्वारे गाळले (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून)

२. १९९४ चा अधिनियम ५४ कलम ९ (एक) अन्वये परंतुक दाखल करण्यात आले (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ९ (दोन) (क) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकुर घालण्यात आला (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून).

[1][(दोन) पोटकलम (एक) मध्ये निर्देशिलेली व्यक्ती जर लायसन देण्याच्या किंवा प्रकरण-परत्वे त्याच्या नूतनीकरणाच्या तारखेस वयाची ५० वर्षे पूर्ण करीत असेल तर विहित करण्यात येईल अशा फी चे प्रदान केल्यानंतर त्या व्यक्तीला लायसन देण्याच्या किंवा प्रकरणपरत्वे त्याच्या नूतनीकरणाच्या तारखेपासून ५ वर्षांच्या कालावधीसाठी ते लायसन परिणामकारक राहील :]

परंतु, प्रत्येक लायसन, या पोटकलमाखाली त्याची मुदत समाप्त झाली असतानासुद्धा, अशा समाप्ती दिनांकानंतर तीस दिवसांच्या कालावधीपर्यंत परिणामक असण्याचे चालू असेल.

**चालन लायसनाचे नूतनीकरण.**

१५. (१) कोणत्याही लायसन प्राधिकरणाकडे अर्ज करण्यात आल्यावर याला, या अधिनियमाच्या उपबंधाखाली देण्यात आलेल्या चालन लायसनचे, त्याच्या समाप्तीच्या दिनांकापासून नूतनीकरणकरता येईल :

परंतु, जेथे लायसनाच्या नूतनीकरणाचा अर्ज त्याच्या समाप्ती दिनांकानंतर तीस दिवसांहून अधिक काळानंतर करण्यात आला असेल तर अशा कोणत्याही बाबतीत चलन लायसनाचे नूतनीकरण त्याच्या नूतनीकरणाच्या दिनांकापासून परिणामक होईल :

परंतु, आणखी असे की, परिवहन वाहन चालविण्याच्या लायसनाचे नूतनीकरण करण्याकरता अर्ज केलेला असेल त्याबाबतीत किंवा जेथे अर्जदाराने वयाची चाळीस वर्षे पूर्ण केलेली असतील, अशा कोणत्याही अन्य बाबतीत त्या अर्जासोबत कलम ८ च्या पोटकलम (३) मध्ये निर्देश केल्याप्रमाणे त्याच रीतीने आणि त्याच नमुन्यातील वैद्यकीय प्रमाणपत्र सोबत जोडावे लागेल आणि कलम ८ च्या, पोटकलम (४) चे उपबंध हे, शिकाऊ व्यक्ती लायसनाच्या संबंधात ज्याप्रमाणे लागू होतात त्याप्रमाणेच अशा प्रत्येक बाबतीत, शक्य होईल तितपत लागू होतील.

(२) चालन लायसनाच्या नूतनीकरणासाठी केलेला अर्ज हा, केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व विहित करण्यात येतील असे दस्तऐवज सोबत जोडून करण्यात येईल.

(३) जेथे चालन लायसनाच्या नूतनीकरणासाठी त्याच्या समाप्ती दिनांकापूर्वी किंवा समाप्ती दिनांकानंतर, तीस दिवसांहून अधिक नसेल अशा कालावधीत अर्ज करण्यात आला असेल तेथे, अशा नूतनीकरणासाठी द्यावयाची फी, याबाबत केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल तेवढ्या रकमेइतकी असेल.

(४) जेथे चालन लायसनाच्या नूतनीकरणासाठी त्याच्या समाप्ती दिनांकानंतर तीस दिवसांहून अधिक काळाने अर्ज करण्यात आला असेल तेथे, अशा नूतनीकरणासाठी द्यावयाची फी केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल तेवढी असेल :

परंतु, पोटकलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत, अर्जदाराला उचित व पुरेशा कारणामुळे अर्ज करण्यास प्रतिबंध झाला होता अशी जर लायसन प्राधिकरणाची खात्री झाली तर, या पोटकलमाखाली करण्यात आलेल्या चालन लायसनाच्या नूतनीकरणाच्या अर्जाच्या संबंधात लायसन प्राधिकरणाला, पोटकलम (३) मध्ये उल्लेखिलेली फी स्वीकारता येईल :

परंतु, आणखी असे की, चालन लायसनची परिणामकता संपल्यानंतर पाच वर्षांहून अधिक काळाने अर्ज करण्यात आला असेल तेथे, कलम ९ च्या पोटकलम (३) मध्ये निर्देशिलेली चालन-क्षमतेची चाचणी देऊन लायसन प्राधिकरणाचे समाधान होईल अशा रीतीने अर्जदार तीमध्ये उत्तीर्ण न झाल्यास, लायसन प्राधिकरण, चालन लायसनाचे नूतनीकरण करण्यास नकार देऊ शकेल.

(५) जेथे नूतनीकरणाचा अर्ज नाकारण्यात आला असेल तेथे देण्यात आलेली फी, केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा मर्यादेपर्यन्त व अशा रीतीने परत करण्यात येईल.

(६) जेव्हा चालन लायसनाचे नूतनीकरण करणारे प्राधिकरण हे ज्याने असे चालन लायसन दिले ते प्राधिकरण नसेल तेव्हा, ते प्राधिकरण नूतनीकरणाबाबतची वस्तुस्थिती, चालन लायसन देणाऱ्या प्राधिकरणास कळवील.

**रोग किंवा निःसमर्थता या कारणावरुन चालन लायसनाचे प्रत्याहरण.**

१६. पूर्ववर्ती कलमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर चालन लायसनधारक, कोणत्याही रोगामुळे किंवा निःसमर्थतेमुळे, मोटार वाहन चालविण्यास अयोग्य आहे असे समजण्यास, कोणत्याही लायसन प्राधिकरणास वाजवी कारणे असतील तर, ते लायसन प्राधिकरण, कोणत्याही वेळी चालन लायसन प्रत्याहृत करू शकेल किंवा असे चालन लायसन धारण करण्याचे चालू ठेवण्याबद्दलची शर्त म्हणून, त्याच्या धारकाने कलम ८ पोटकलम (३) मध्ये निर्देशिलेल्या त्याच नमुन्यातील व त्याच रीतीने वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे असे फर्मावू शकेल आणि जेथे चालन लायसन प्रत्याहृत करणारे प्राधिकरण म्हणजे ज्याने असे लायसन दिले आहे ते प्राधिकरण नसेल तेथे, ते प्राधिकरण प्रत्याहरणाचे, वृत्त लायसन प्राधिकरणास कळवील.

**चालन लायसन नाकारणारे किंवा प्रत्याहृत करणारे आदेश व त्यावरील अपीले.**

१७. (१) जेव्हा एखादे लायसन प्राधिकरण, कोणतीही शिकाऊ व्यक्ती लायसन देण्यास किंवा कोणतेही चालन लायसन देण्यास किंवा त्याचे नूतनीकरण करण्यास किंवा ते प्रत्याहृत करण्यास नकार देईल किंवा कोणत्याही चालन लायसनामध्ये, मोटार वाहनांचा आणखी एखादा वर्ग किंवा वर्णनाचे वाहन दाखल करण्यास नकार देईल तेव्हा ते प्राधिकरण अशा नकाराच्या किंवा प्रत्याहरणाच्या लेखी कारणांसहित आदेश काढून, अर्जदाराला किंवा, प्रकरणपरत्वे, धारकाला ते कळवून तसे करील.

---

१. १९९४ चा अधिनियम ५४ कलम ९ (दोन) (ख) अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून).

(२) पोटकलम (१) खाली काढलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, असा आदेश तिच्यावर बजावण्यात आल्यापासून तीस दिवसांच्या आत, विहित प्राधिकरणाकडे अपील करता येईल आणि ते प्राधिकरण अशा व्यक्तींना व आदेश काढणाऱ्या प्राधिकरणाला आपापले म्हणणे मांडण्याची संधी देऊन, त्यानंतर अशा अपिलावर निर्णय देईल आणि अपील प्राधिकरणाचा निर्णय आदेश काढणाऱ्या प्राधिकरणावर बंधनकारक असेल.

**केंद्र शासनाच्या मालकीची मोटार वाहने चालवण्यासाठी चालन लायसने.**

१८. (१) केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल असे प्राधिकरण, वयाची अठरा वर्षे पूर्ण झालेल्या व्यक्तींना, केंद्र शासनाच्या मालकीची किंवा त्या त्या वेळी सर्वस्वी त्याच्याच नियंत्रणाखाली असलेली आणि कोणत्याही वाणिज्यक उद्यमाशी संबंध नसलेल्या कामांसाठी वापरली जाणारी मोटार वाहने चालविण्यासाठी संपूर्ण भारतात विधिग्राह्य अशी चालन लायसने देऊ शकेल.

(२) या कलमाखाली देण्यात आलेल्या चालन लायसनामध्ये धारक कोणत्या वर्गातील किंवा वर्णनाची वाहने चालविण्यास हक्कदार आहे आणि तो याप्रमाणे किती मुदतीकरिता हक्कदार आहे ते विनिर्दिष्ट करण्यात येईल.

(३) या कलमाखाली देण्यात आलेल्या चालन लायसनामुळे, पोटकलम (१) मध्ये निर्देश केलेल्या मोटार वाहनाखेरीज अन्य कोणतेही मोटार वाहन चालविण्यास धारक हक्कदार ठरणार नाही.

(४) या कलमाखाली कोणतेही चालन लायसन देणारे प्राधिकरण, कोणत्याही राज्य शासनाने विनंती केली असता, जिला चालन लायसन देण्यात आलेले आहे अशा कोणत्याही व्यक्तीसंबंधीची, त्या शासनाला कोणत्याही वेळी आवश्यक असेल ती माहिती पुरवील.

**चालन लायसन धारण करण्यास निरर्ह ठरवण्याची किंवा असे लायसन प्रत्याहृत करण्याची लायसन प्राधिकरणाची शक्ती.**

१९. (१) चालन लायसनधारकाला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर जर लायसन प्राधिकरणाची अशी खात्री झाली असेल की,—

(क) ती व्यक्ती सराईत गुन्हेगार किंवा अट्टल दारूबाज आहे ; किंवा

(ख) त्या व्यक्तीला अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रेरक पदार्थ अधिनियम, १९८५ यात दिलेल्या अर्थानुसार कोणत्याही अंमली औषधिद्रव्याचे किंवा मन:प्रेरक पदार्थाचे व्यसन आहे ; किंवा

(ग) ती व्यक्ती दखली गुन्हा करण्याच्या कामी ते मोटार वाहन वापरीत आहे, किंवा तिने तसे ते वापरले होते ; किंवा

(घ) मोटार वाहनाचा चालक म्हणून तिने पूर्वी केलेल्या वर्तनावरून तिने वाहन चालवल्यामुळे लोकांना धोका पोचण्याचा संभव आहे, हे दाखवून दिले आहे ; किंवा

(ङ) त्या व्यक्तीने, कपटाने किंवा अपवेदनाने, विशिष्ट वर्गाचे किंवा वर्णनाचे मोटार वाहन चालविण्याचे लायसन किंवा कोणतेही चालन लायसन मिळविलेले आहे ; किंवा

(च) त्या व्यक्तीने, या अधिनियमाची उद्दिष्टे लक्षात घेता, केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशी, जीमुळे लोकांना उपद्रवकारक किंवा धोकादायक ठरण्याचा संभव आहे, अशी कृती केलेली आहे ; किंवा

(छ) ती व्यक्ती, कलम २२ चे पोटकलम (३) च्या परंतुकामध्ये निर्देशिलेल्या चाचण्यांस उपस्थित राहिली नाही किंवा तीमध्ये उत्तीर्ण झालेली नाही ; किंवा

(ज) लायसनधारकाची काळजी घेणाऱ्या व्यक्तीच्या लेखी संमतीने शिकाऊ व्यक्ती लायसन किंवा चालन लायसन जिला देण्यात आले आहे आणि त्या व्यक्तीने अशी काळजी घेण्याचे बंद केले आहे;

—अशी अठरा वर्षांपेक्षा कमी वयाची व्यक्ती आहे ;

—तर, त्याबाबतीत कारणे लेखी नमूद करून ते प्राधिकरण,—

(एक) त्या व्यक्तीस लायसनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा कोणत्याही वर्गाची किंवा वर्णनाची वाहने चालविण्यासाठी कोणतेही चालन लायसन धारण करण्यास किंवा मिळविण्यास विनिर्दिष्ट कालावधीपुरते निरर्ह करणारा ;

(दोन) कोणतेही असे लायसन रद्द करणारा ;

आदेश काढू शकेल.

(२) पोटकलम (१) खाली असा आदेश काढला असेल त्याबाबतीत चालन लायसनधारक, आपले चालन लायसन, जर त्याने अगोदरच ते चालन लायसन स्वाधीन केले नसेल तर, आदेश काढणाऱ्या लायसन प्राधिकरणाच्या तात्काळ स्वाधीन करील, आणि लायसन प्राधिकरण—

(क) जर ते चालन लायसन म्हणजे या अधिनियमाखाली देण्यात आलेले चालन लायसन असेल तर, निरर्हता संपेपर्यंत किंवा निरर्हता दूर करण्यात येईपर्यंन्त ते लायसन ठेवून घेईल ; किंवा

(ख) जर ते या अधिनियमाखाली देण्यात आलेले चालन लायसन नसेल तर, त्यावर निरर्हतेचे पृष्ठांकन करील व ज्या लायसन प्राधिकरणाने ते लायसन दिले असेल त्याच्याकडे ते पाठवील ;

(ग) कोणतेही लायसन प्रत्याहृत केले असेल त्या बाबतीत, त्यावर प्रत्याहृत करण्यात आल्याबाबत पृष्ठांकित करील आणि ते प्राधिकरण जर ते लायसन देणारे प्राधिकरण नसेल तर, ते लायसन ज्या प्राधिकरणाने दिलेले आहे त्या प्राधिकरणाला ते प्रत्याहृत करण्यात आल्याबाबत कळवील :

परंतु, एखाद्या व्यक्तीच्या चालन लायसनानुसार त्या व्यक्तीला एकाहून अधिक वर्गांची किंवा वर्णनांची मोटार वाहने चालवण्यास प्राधिकृत करण्यात आले असेल आणि पोटकलम (१) खाली काढलेल्या आदेशाने तिला एखाद्या विनिर्दिष्ट वर्गाचे किंवा वर्णनाचे मोटार वाहन चालविण्यास निरर्ह ठरवले असेल तेथे, लायसन प्राधिकरण चालन. लायसनावर निरर्हतेबाबत पृष्ठांकन करून ते लायसन-धारकास परत करील.

(३) लायसन प्राधिकरणाने पोटकलम (१) खाली काढलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, आदेश मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत, विहित प्राधिकरणाकडे अपील करता येईल आणि असे अपील प्राधिकरण, लायसन प्राधिकरणास नोटीस देईल आणि कोणत्याही पक्षाने तसे फर्मावल्यास त्याचे म्हणणे ऐकून घेईल आणि त्याबाबतीत स्वतःला योग्य वाटेल असा आदेश देईल आणि अशा कोणत्याही अपील प्राधिकरणाने काढलेला आदेश अंतिम असेल.

**निरर्ह ठरविण्याची न्यायालयाची शक्ती.** २०. (१) जेथे एखाद्या व्यक्तीला या अधिनियमाखालील अपराधाबद्दल किंवा तो अपराध करताना मोटार वाहन वापरण्यात आले होते अशा एखाद्या अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आले असेल तेथे, अशा व्यक्तीस ज्याने दोषी ठरविले ते न्यायालय, या अधिनियमाच्या उपबंधाच्या अधीनतेने, कायद्याने प्राधिकृत केलेली अन्य कोणतीही शिक्षा देऊन त्याशिवाय आणखी, याप्रमाणे दोषी ठरलेली व्यक्ती, न्यायालय विनिर्दिष्ट करील अशा कालावधीपुरती, अशा लायसनमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे सर्व वर्गांची किंवा वर्णनाची किंवा कोणत्याही विशिष्ट वर्गाची किंवा वर्णनाची अशी वाहने चालविण्याचे कोणतेही चालन लायसन धारण करण्यास निरर्ह असल्याचे घोषित करू शकेल :

परंतु, कलम १८३ खाली शिक्षापात्र असलेल्या अपराधाच्या संबंधात, पहिल्या किंवा दुसऱ्या अपराधासाठी असा आदेश काढण्यात येणार नाही.

(२) जेव्हा कलम १३२, याचे पोटकलम (२) खंड (ग्), कलम १३४ किंवा कलम १८५ खालील अपराधाबद्दल एखाद्या व्यक्तीला दोषी ठरविले असेल आणि न्यायालयाने पोटकलम (१) खाली निरर्हतेचा आदेश देऊन अशा कोणत्याही अपराधाबद्दल कोणत्याही व्यक्तीला दोषी ठरविले असेल आणि कलम १३२ पोटकलम (१) खंड (ग्) किंवा कलम १३४ च्या संबंधात जर कोणता अपराध असेल तर अशी निरर्हता एका महिन्यापेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीकरिता राहील आणि जर कलम १८५ च्या संबंधातील अपराध असेल तर अशी निरर्हता किमान सहा महिने इतक्या मुदतीपर्यंत असेल.

(३) जी व्यक्ती,—

(क्) कलम १८४ खाली शिक्षापात्र असलेल्या अपराधाबद्दल दोषी ठरलेली असून त्या कलमाखाली शिक्षापात्र असलेल्या अपराधाबद्दल पुन्हा दोषी ठरली असेल,

(ख्) कलम १८९ खाली शिक्षापात्र असलेल्या अपराधाबद्दल दोषी ठरली असेल , किंवा

(ग्) कलम १९२ खाली शिक्षापात्र असलेल्या अपराधाबद्दल दोषी ठरली असेल,

तर, न्यायालय अशा व्यक्तीला निरर्ह ठरवण्याबाबत आदेश देईल, मात्र विशेष कारणांमुळे अन्य प्रकारचा आदेश देणे त्याला योग्य वाटेल तर, ते ती कारणे लेखी नमूद करील:

परंतु , निरर्हतेचा कालावधी खंड (क्) मध्ये निर्देशिलेल्या प्रकरणामध्ये पाच वर्षांहून किंवा खंड (ख्) मध्ये निर्देशिलेल्या प्रकरणामध्ये दोन वर्षांहून किंवा खंड (ग्) मध्ये निर्देशिलेल्या प्रकरणामध्ये एक वर्षाहून अधिक असणार नाही.

(४) कलम १८४ खाली शिक्षापात्र असलेल्या अपराधाबद्दल दोषी ठरलेल्या अशा व्यक्तीला निरर्ह करण्याचा आदेश देताना न्यायालय असे निदेशित करू शकेल की, ती व्यक्ती, कलम ९, पोटकलम (३) मध्ये निर्देशिल्याप्रमाणे चालन क्षमतेची चाचणी पूर्वीच उत्तीर्ण झालेली असो किंवा नसो—निरर्हतेचा आदेश काढण्यात आल्यानंतर, लायसन प्राधिकरणाचे समाधान होईल अशा प्रकारे ती चाचणीमध्ये उत्तीर्ण होईपर्यंत निरर्ह राहील.

(५) पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाच्या अपराधाबद्दलच्या दोषसिद्धीविरुद्ध ज्याच्याकडे अपील होऊ शकते असे न्यायालय, ज्या दोषसिद्धीच्या संबंधात असा निरर्हता आदेश काढण्यात आला त्याविरुद्ध अपील होऊ शकत नसले तरीही, या पोटकलमाखाली काढलेला कोणताही निरर्हता-आदेश, रद्द ठरवू शकेल किंवा त्यात बदल करू शकेल.

**विवक्षित प्रकरणांमध्ये चालन लायसनाचे निलंबन.** २१. (१) ज्या व्यक्तीला कलम १८४ खाली शिक्षापात्र अपराधाबद्दल पूर्वी सिद्धदोष ठरवण्यात आले होते तिच्या संबंधात , उक्त कलम १८४ मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे, अशी व्यक्ती धोकादायक रीतीने वाहन चालवून , एका व्यक्तीच्या किंवा अनेक व्यक्तींच्या मृत्यूस किंवा तिला किंवा त्यांना जबर दुखापत होण्यास, कोणत्याही वर्गाचे किंवा वर्णनाचे मोटार वाहन कारणीभूत झाले आहे असे अभिकथन करून एखाद्या पोलीस अधिकाऱ्याने प्रकरण नोंदविले असेल त्याबाबतीत, अशा वर्गाच्या किंवा वर्णनाच्या संबंधात अशा व्यक्तीकडून धारण करण्यात आलेले चालन लायसन पुढील कालावधीपर्यंत निलंबित केले जाईल —

(क्) ज्या दिनांकास प्रकरण नोंदविले गेले त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधी-पर्यंत, किंवा

(ख) जर अशा व्यक्तीला उक्त कालावधी संपण्यापूर्वी विनादोषारोप सोडून देण्यात आले असेल किंवा दोषमुक्त करण्यात आले असेल तर अशी विनादोषारोप सुटका होईपर्यंत किंवा, प्रकरणपरत्वे, दोषमुक्ती होईपर्यंत.

(२) जेव्हा एखाद्या व्यक्तीने धारण केलेले चालन लायसन पोटकलम (१) च्या उपबंधाच्या आधारे, निलंबित होईल तेव्हा ज्या पोलीस अधिकाऱ्याने पोटकलम (१) मध्ये निर्दशिलेला असा अपराध नोंदवला असेल तो अधिकारी, अशा निलंबनाविषयी अशा अपराधाची दखल घेण्यास सक्षम असणाऱ्या न्यायालयाच्या निदर्शनास आणून देईल आणि त्यानंतर, ते न्यायालय असे चालन लायसन आपल्या कब्जात घेईल, त्यावर निलंबनाचा शेरा पृष्ठांकित करील आणि ज्या प्राधिकरणाने ते दिले होते किंवा लगतपूर्वी त्याचे नूतनीकरण केले होते त्याला अशा पृष्ठांकनाबद्दल खबर देईल.

(३) जेव्हा पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेली व्यक्ती दोषमुक्त केली जाईल किंवा तिची विनादोषारोप सुटका होईल तेव्हा न्यायालय अशा चालन लायसनाच्या निलंबनासंबंधातील त्यावरचे पृष्ठांकन रद्द करील.

(४) जेव्हा एखाद्या विशिष्ट वर्गाची किंवा वर्णनाची मोटार वाहने चालविण्याबद्दलचे चालन लायसन पोटकलम (१) खाली निलंबित केले असेल तेव्हा त्या चालन लायसनाचे निलंबन अंमलात असे तो पर्यंत, अशा लायसनधारक व्यक्तीला अशा विशिष्ट वर्गाची किंवा वर्णनाची मोटार वाहने चालवण्या-बद्दलचे कोणतेही चालन लायसन धारण करण्यास किंवा मिळवण्यास मनाई असेल.

**दोषसिद्धी झाल्यावर चालन लायसन निलंबित करणे किंवा ते रद्द करणे.**

२२. (१) कलम २०, पोटकलम (३) च्या उपबंधांना बाध येऊ न देता कलम २१, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेली एखादी व्यक्ती, जेव्हा कलम १८४ मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे धोकादायक रीतीने वाहन चालवून एका किंवा अधिक व्यक्तींच्या मृत्यूस किंवा त्यांना जबर दुखापत होण्यास, कोणत्याही वर्गाचे किंवा वर्णनाचे मोटार वाहन कारणीभूत होण्याच्या अपराधाबद्दल सिद्धदोष ठरविण्यात आली असेल तेव्हा, न्यायालय, सिद्धदोष व्यक्तीचे, त्या वर्गाच्या किंवा वर्णनाच्या मोटार वाहनाच्या संबंधात असेल असे त्या व्यक्तीकडून धारण करण्यात आलेले चालन लायसन रद्द करू शकेल किंवा स्वतःला योग्य वाटेल तितक्या कालावधीपर्यंत निलंबित करू शकेल.

(२) कलम २०, पोटकलम (२) च्या उपबंधांना बाध येऊ न देता, कलम १८५ खाली शिक्षापात्र असलेल्या अपराधाबद्दल पूर्वी दोषी ठरवलेले असताना पुन्हा त्या कलमाखाली शिक्षापात्र असणाऱ्या अपराधाबद्दल दोषी ठरवण्यात आले तर, न्यायालय, अशी नंतरची दोषसिद्धी करताना, अशा व्यक्तीने धारण केलेले चालन लायसन आदेशाद्वारे रद्द करील.

(३) जर एखादे चालन लायसन या कलमाखाली रद्द केलेले असेल किंवा निलंबित केलेले असेल तर, न्यायालय ते चालन लायसन आपल्या अभिरक्षेत घेईल, त्यावर ते रद्द केल्याचे किंवा, प्रकरणपरत्वे निलंबन केल्याचे पृष्ठांकन करील आणि ज्या प्राधिकरणाने असे लायसन दिले होते किंवा लगतपूर्वी त्याचे नूतनीकरण केले होते त्या प्राधिकरणाकडे असे पृष्ठांकित केलेले चालन लायसन पाठवील आणि असे प्राधिकरण ते लायसन मिळाल्यावर आपल्या सुरक्षित अभिरक्षेत ठेवील आणि निलंबित लायसनाच्या बाबतीत, निलंबनाचा कालावधी संपल्यानंतर लायसनधारकाने ते लायसन परत मिळण्यासाठी अर्ज केल्यावर त्याला परत करील :

परंतु, असा कालावधी संपल्यावर, लायसनधारकाने, ज्या लायसन प्राधिकरणाने लायसन दिले होते किंवा लगतपूर्वी त्याचे नूतनीकरण केले होते त्या प्राधिकरणाचे समाधान होईल अशा प्रकारे नव्याने कलम ९, पोटकलम (३) मध्ये निर्देशिलेली चालन क्षमतेची चाचणी देऊन ती उत्तीर्ण झाल्याशिवाय आणि कलम ८, पोटकलम (३) मध्ये निर्देशिलेल्या अशा त्याच नमुन्यातील आणि त्याच रीतीने वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय, असे कोणतेही लायसन परत केले जाणार नाही.

(४) जेव्हा एखाद्या विशिष्ट वर्गाची किंवा वर्णनाची मोटार वाहने चालविण्याबद्दलचे लायसन या कलमाखाली निलंबित किंवा रद्द केलेले असेल तेव्हा, ते चालन लायसन रद्द असेल किंवा त्याचे निलंबन हे जोपर्यंत अंमलात असेल तोपर्यंत अशा लायसनधारकाला अशा विशिष्ट वर्गाची किंवा वर्णनाची मोटार वाहने चालवण्याबद्दलचे कोणतेही लायसन धारण करण्यास किंवा मिळवण्यास मनाई असेल.

**निरर्हता आदेशाचा परिणाम.**

२३. (१) जिच्या संबंधात, कलम १९ किंवा कलम २०, खाली कोणताही निरर्हता आदेश काढण्यात आला असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या मर्यादे-पर्यंत व कालावधीपर्यंत चालन लायसन धारण करण्यास किंवा मिळवण्यास मनाई राहील आणि त्या आदेशाच्या दिनांकास अशा व्यक्तीने कोणतेही चालन लायसन धारण केलेले असल्यास, ते लायसन अशा मर्यादेपर्यंत व अशा कालावधीत परिणामक राहणार नाही.

(२) कलम २० खाली काढण्यात आलेल्या निरर्हता आदेशाविरुद्ध किंवा ज्याचा परिणाम म्हणून असा आदेश देण्यात आला त्या दोषसिद्धीविरुद्ध केलेले अपील प्रलंबित असताना, न्यायालयाने तसा निदेश दिल्याशिवाय, अशा आदेशाचे प्रवर्तन निलंबित ठेवण्यात येणार नाही, किंवा पुढे ढकलण्यात येणार नाही.

(३) जिच्या बाबतीत कोणताही निरर्हता आदेश काढण्यात आला असेल अशा कोणत्याही व्यक्तीस आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांची मुदत संपल्यानंतर कोणत्याही वेळी, ज्याने आदेश दिला होता त्या न्यायालयाकडे किंवा अन्य प्राधिकरणाकडे निरर्हता दूर करण्यासाठी अर्ज करता येईल, आणि न्यायालयास, किंवा प्रकरणपरत्वे, प्राधिकरणास, सर्व परिस्थिती विचारात घेऊन निरर्हता आदेश रद्द करता येईल किंवा त्यात बदल करता येईल :

परंतु, जेव्हा न्यायालय किंवा अन्य प्राधिकरण, या कलमाखालील कोणताही निरर्हता आदेश, रद्द करण्यास किंवा त्यात काही बदल करण्यास नकार देईल तेव्हा, अशा नकाराच्या तारखेपासून तीन महिन्यांचा कालावधी समाप्त होण्यापूर्वी, त्याखालील दुसरा अर्ज विचारार्थ स्वीकारला जाणार नाही.

पृष्ठांकन. २४. (१) निरर्हता आदेश देणारे न्यायालय किंवा प्राधिकरण, निरर्ह व्यक्तीने कोणतेही चालन लायसन धारण केले असल्यास, त्यावर निरर्हता आदेशाचा आणि ज्याच्या संबंधात निरर्हता आदेश देण्यात आला असेल अशा कोणत्याही अपराधाबद्दलच्या दोषसिद्धीचा तपशील पृष्ठांकित करील किंवा पृष्ठांकित करवील ; आणि कलम २३, पोटकलम (३) खाली दिलेला निरर्हता आदेश रद्द करण्यात आल्यास किंवा त्यात बदल करण्यात आल्यास त्याचाही तपशील त्याचप्रमाणे पृष्ठांकित करण्यात येईल.

(२) या अधिनियमाची उद्दिष्टे लक्षात घेता, केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा या अधिनियमाखालील अपराधाबद्दल ज्याने कोणत्याही व्यक्तीस दोषी ठरवले असेल ते न्यायालय, दोषी व्यक्तीने धारण केलेल्या कोणत्याही चालन लायसनावर अशा दोषसिद्धीचा तपशील पृष्ठांकित करील किंवा करवील मग अशा दोषसिद्धीबाबत निरर्हता आदेश देण्यात आलेला असो वा नसो.

(३) पोटकलम [(२) खाली विहित केलेल्या अपराधाचा आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीला न्यायालयामध्ये उपस्थित राहताना, तिचे चालन लायसन जर तिच्या कब्जात असेल तर ते स्वतःबरोबर घेऊन यावे लागेल.

(४) जेव्हा या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाबद्दल, कोणत्याही व्यक्तीस दोषी ठरवले असेल आणि तीन महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी कारावासाची शिक्षा देण्यात आली असेल तेव्हा, शिक्षा देणारे न्यायालय, संबंधित व्यक्तीच्या चालन लायसनावर अशा शिक्षादेशाची वस्तुस्थिती पृष्ठांकित करून शिक्षादेश देईल आणि खटला चालविणारे प्राधिकरण, ज्या लायसन प्राधिकरणाने लायसन दिले होते किंवा लगतपूर्वी त्याचे नूतनीकरण केले होते त्या प्राधिकरणाला अशा पृष्ठांकनाबाबतची वस्तुस्थिती कळवील.]

(५) जेव्हा कोणतेही न्यायालय, चालन लायसन पृष्ठांकित करील किंवा पृष्ठांकित करवील तेव्हा असे न्यायालय, ज्या लायसन प्राधिकरणाने लायसन दिले होते किंवा लगतपूर्वी त्याचे नूतनीकरण केले होते त्या लायसन प्राधिकरणांकडे पृष्ठांकनाबाबतचा तपशील पाठवील.

(६) जेथे चालन लायसनावर नमूद करण्यात आलेल्या कोणत्याही दोषसिद्धीविरुद्ध किंवा न्यायालयीन आदेशांविरुद्ध केलेल्या अपीलावर न्यायालय दोषसिद्धीत किंवा आदेशात बदल करील किंवा ते रद्द ठरवील तेथे, ज्याने लायसन दिले होते किंवा त्याचे मागच्यावेळी नूतनीकरण केले होते त्या लायसन प्राधिकरणास ते वृत्त कळवील आणि असे प्राधिकरण, अशा दोषसिद्धीबाबत किंवा आदेशाबाबत दुरुस्ती करील किंवा दुरुस्ती करवील.

पृष्ठांकनाचा नोंदबदल करणे आणि पृष्ठांकन रहित चालन लायसन देणे.

२५. (१) कोणत्याही चालन लायसनावरील पृष्ठांकन त्याच्या धारकाने नवे चालन लायसन किंवा त्याची दुसरी प्रत मिळवली तर तो या कलमाच्या उपबंधाखाली पृष्ठांकनरहित असे चालन लायसन मिळण्यास हक्कदार होईपर्यंत, त्या नवीन किंवा दुसऱ्या चालन लायसनावर पृष्ठांकन केले जाईल.

(२) चालन लायसनावर पृष्ठांकन करण्याची आवश्यकता असून ते चालन लायसन ज्याने पृष्ठांकन करावयाचे त्या न्यायालयाच्या किंवा प्राधिकरणाच्या कब्जात त्यावेळी नसेल तेथे,---

(क) जिच्या बाबतीत पृष्ठांकन करावयाचे ती व्यक्ती त्यावेळी चालन लायसनाची धारक असेल तर, तिला पाच दिवसांच्या आत अथवा न्यायालय किंवा प्राधिकरण ठरवील अशा त्याहून दीर्घ मुदतीच्या आत न्यायालयाकडे किंवा प्राधिकरणाकडे चालन लायसन हजर करावे लागेल; किंवा

(ख) जर ती त्यावेळी चालन लायसनाची धारक नसेल आणि मागाहून तिने चालन लायसन मिळविले असेल तर, तिला चालन लायसन मिळाल्यानंतर पाच दिवसांच्या आत न्यायालयाकडे किंवा प्राधिकरणाकडे ते लायसन हजर करावे लागेल आणि जर विनिर्दिष्ट मुदतीत चालन लायसन हजर करण्यात आले नाही तर, अशी मुदत संपल्यावर ते पृष्ठांकनासाठी हजर करण्यात येईपर्यंत निष्परिणामक राहील.

(३) जिच्या चालन लायसनवर पृष्ठांकन करण्यात आले आहे अशी व्यक्ती, असे पृष्ठांकन करण्यात आल्यापासून सतत तीन वर्षांच्या कालावधीमध्ये, तिच्याविरुद्ध पृष्ठांकन करण्याबाबत आणखी कोणताही आदेश देण्यात आला नसेल तर, तिने आपले चालन लायसन स्वाधीन केल्यावर आणि पाच रुपये इतकी फी दिल्यावर पृष्ठांकनरहित असे नवीन चालन लायसन मिळण्यास हक्कदार असेल :

परंतु, जर हे पृष्ठांकन, कलम ११२ मध्ये निर्देशिलेली वेग मर्यादा ओलांडण्याच्या अपराधाच्या बाबतीत असेल तर, अशी व्यक्ती, अशा पृष्ठांकनाच्या दिनांकापासून एक वर्षाची मुदत संपल्यावर पृष्ठांकनरहित असे नवीन चालन लायसन मिळण्यास हक्कदार असेल :

परंतु, आणखी असे की, अनुक्रमे तीन वर्षांच्या आणि एक वर्षाच्या उक्त कालावधीची गणना करताना, चालन लायसन धारण करण्यास किंवा मिळविण्यास उक्त व्यक्तीस ज्या कालावधीपुरते निरर्ह करण्यात आले होते तो कोणताही कालावधी वगळण्यात येईल.

२६. (१) प्रत्येक राज्य शासन हे, केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, राज्य शासनाच्या लायसन प्राधिकरणाने दिलेल्या व नूतनीकरण केलेल्या चालन लायसनाच्या संबंधात, "चालन लायसनची राज्य नोंदवही" म्हणून ओळखली जाणारी अशी एक नोंदवही ठवील. तीत पुढील तपशीलाचा अंतर्भाव असेल :— चालन लायसनाची राज्य नोंदवही ठेवणे.

(क) चालन लायसन धारकांची नावे व पत्ते;

(ख) लायसन क्रमांक ;

(ग) लायसने दिल्याच्या किंवा त्यांच्या नूतनीकरणाच्या तारखा;

(घ) लायसन समाप्तीची तारीख;

(ङ) ज्या वर्गाची आणि प्रकारची वाहने चालविण्यास अधिकृत करण्यात येईल त्या वाहनांचे वर्ग व प्रकार ;

(च) केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल असा इतर तपशील.

(२) प्रत्येक राज्य शासन, चालन लायसनाच्या राज्य नोंदवहीची [१][छापील प्रत किंवा केंद्र शासनाला आवश्यक वाटेल अशा अन्य नमुन्यातील प्रत] केंद्र शासनाला पुरवील आणि अशा नोंदवहीत वेळोवेळी जादा दाखल करण्यात आलेला मजकूर आणि इतर दुरुस्त्या विलंब न करता, केंद्र शासनाला कळवील.

(३) राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल अशा रीतीने, चालन लायसनांची राज्य नोंदवही ठेवण्यात येईल.

२७. केंद्र शासनाला पुढील बाबींसंबंधात नियम करता येतील :— केंद्र शासनाची नियम करण्याची शक्ती.

(क) कलम ३, पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेल्या शर्ती;

(ख) ज्या नमुन्यात शिकाऊ व्यक्ति लायसनासाठी अर्ज करता येईल तो नमुना व त्यात अंतर्भूत करावयाची माहिती आणि कलम ८, पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेल्या अर्जासह सादर करावयाचे दस्तऐवज यांबाबत उपबंध करणे;

(ग) कलम ८, पोटकलम (३) मध्ये निर्देशिलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्राच्या नमुन्याबाबत उपबंध करणे;

(घ) कलम ८, पोटकलम (५) मध्ये निर्देशिलेल्या चाचणीच्या तपशीलाबाबत उपबंध करणे;

(ङ) ज्या नमुन्यात चालन लायसनासाठी अर्ज करता येईल तो नमुना व त्यात अंतर्भूत करावयाची माहिती आणि कलम ९, पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेल्या अर्जासह सादर करावयाच्या दस्तऐवजांबाबत उपबंध करणे;

(च) कलम ९, पोटकलम (३) मध्ये निर्देशिलेल्या वाहन चालविण्याच्या क्षमता-चाचणीच्या संबंधातील तपशिलाबाबत उपबंध करणे;

(छ) या अधिनियमाअन्वये ज्या व्यक्तींना परिवहन वाहने चालविण्याकरिता लायसने द्यावयाची त्या व्यक्तींची किमान शैक्षणिक अर्हता आणि अशा व्यक्तीने ज्या मुदतीत अशी अर्हता प्राप्त करावयाची ती मुदत विनिर्दिष्ट करणे ;

(ज) कलम १०, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या लायसनांचा नमुना व त्यातील मजकूर याबाबत उपबंध करणे;

(झ) कलम ११, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या अर्जाचा नमुना व त्यातील मजकूर आणि अर्जासोबत सादर करावयाचे दस्तऐवज व त्याबाबत आकारावयाची फी याबाबत उपबंध करणे;

(ञ) कलम ११ खाली करण्यात आलेल्या अर्जाला, ज्या शर्तींच्या अधीनतेने कलम ९ लागू होईल त्या शर्तींबाबत उपबंध करणे ;

(ट) कलम १५, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या अर्जाचा नमुना व त्यातील मजकूर याबाबत आणि कलम १५, पोटकलम (२) खालील अशा अर्जासोबतचे दस्तऐवज याबाबत उपबंध करणे ;

(ठ) कलम १८, पोटकलम (१) खाली लायसन देणाऱ्या प्राधिकरणाबाबत उपबंध करणे ;

(ड) शिकाऊ व्यक्ति लायसन देण्यासाठी आणि चालन लायसन देण्यासाठी व त्याच्या नूतनीकरणासाठी व मोटार वाहने चालविण्याचे शिक्षण देणाऱ्या शाळा किंवा आस्थापना यांचे नियमन करण्याच्या प्रयोजनासाठी असलेली लायसने देण्यासाठी कलम ८, पोटकलम (२), कलम ९, पोटकलम (२) आणि कलम १५, ची पोटकलमे (३) व (४) यांखाली देय असलेली फी विनिर्दिष्ट करणे ;

(ढ) कलम १९, पोटकलम (१), खंड (च) च्या प्रयोजनासाठी कृती विनिर्दिष्ट करणे ;

(ण) कलम २४, पोटकलम (२) च्या प्रयोजनासाठी या अधिनियमाखालील अपराध विनिर्दिष्ट करणे ;

(त) कलम २६, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या सर्व किंवा कोणत्याही बाबींच्या संबंधात उपबंध करणे ;

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम १० अन्वये मूळ मजकुराऐवजी घालण्यात आला. (१४ नोव्हेंबर १९९४ व तेव्हापासून).

(थ्) केंद्र शासनाकडून विहित करण्यात यावयाची किंवा करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब.

राज्य शासनाची नियम करण्याची शक्ती.

२८. (१) राज्य शासनास कलम २७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींच्या व्यतिरिक्त, या प्रकरणाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्यासाठी नियम करता येतील.

(२) पूर्ववर्ती शक्तीच्या सर्वसाधारणतेला बाध न येता, अशा नियमांमध्ये पुढील गोष्टींकरता उपबंध करता येतील त्या अशा :—

(क्) लायसन प्राधिकरणांची आणि अन्य विहित प्राधिकरणांची नियुक्ती, अधिकारिता, नियंत्रण व कार्ये ;

(ख्) या प्रकरणाखाली दाखल करण्यात येतील अशा अपिलांची कार्यवाही व सुनावणी, अशा अपिलांच्या संबंधात द्यावयाची फी आणि फीचा परतावा :

परंतु, याप्रमाणे निश्चित करण्यात येईल ती फी पंचवीस रुपयांहून अधिक असणार नाही ;

(ग्) गहाळ झालेल्या, नष्ट झालेल्या किंवा जीर्णशीर्ण झालेल्या लायसनाऐवजी लायसनाची दुसरी प्रत देणे, जुनाट छायाचित्रांच्या जागी नवी छायाचित्रे देणे व त्याकरता आकारावयाची फी ;

(घ्) परिवहन वाहनाच्या चालकांनी लावावयाचे बिल्ले व परिधान करावयाचा गणवेष आणि बिल्ल्यांच्या संबंधात द्यावयाची फी ;

(ङ्) कलम ८, पोटकलम (३) खाली वैद्यकीय प्रमाणपत्र देण्यासाठी देय असलेली फी ;

(च्) या प्रकरणाखाली देय असलेली सर्व फी किंवा फीचा कोणताही भाग देण्यापासून विहित व्यक्तींना किंवा विहित व्यक्तिवर्गांना सूट देणे;

(छ्) एका लायसन प्राधिकरणाने दिलेल्या लायसनाचा तपशील दुसऱ्या लायसन प्राधिकरणांना कळविणे;

(ज्) ज्यांना परिवहन वाहने चालविण्यासाठी लायसने दिलेली आहेत अशा व्यक्तींची कर्तव्ये, कार्ये व वर्तणूक;

(झ्) या प्रकरणाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही उपबंधांपासून रोड-रोलर चालवणाऱ्या चालकांना सूट देणे;

(ण्) कलम २६ खाली ज्या रीतीने चालन लायसनांची राज्य नोंदवही ठेवण्यात येईल ती रीत;

(ट्) विहित करण्यात यावयाची किंवा करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब.

## प्रकरण तीन

### टप्पेगाड्यांच्या वाहकांना लायसने देणे

वाहक लायसनाची आवश्यकता.

२९. (१) कोणत्याही व्यक्तीने टप्पेगाडीचा वाहक म्हणून काम करण्यास तिला प्राधिकृत करण्यासाठी तिला देण्यात आलेले परिणामक असे वाहक लायसन घेतल्याशिवाय त्या व्यक्तीला असा वाहक म्हणून काम करता येणार नाही आणि जिच्याकडे असे लायसन नाही अशा कोणत्याही व्यक्तीला कोणीही व्यक्ती टप्पेगाडीचा वाहक म्हणून कामे करण्यासाठी नेमणार नाही किंवा ते काम करू देणार नाही.

(२) टप्पेगाडीचा जो चालक वाहकाची कामे करत असेल त्याला किंवा जास्तीत जास्त एक महिना इतक्या कालावधीपुरते वाहक म्हणून काम करण्यासाठी नेमलेल्या व्यक्तीला पोटकलम (१) लागू न होण्याबाबत ज्या शर्ती राहतील त्या शर्ती राज्य शासन विहित करू शकेल.

वाहक लायसन देणे.

३०. (१) कलम ३१, पोटकलम (१) खाली जी निरर्ह नाही आणि राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल अशी किमान शैक्षणिक अर्हता जी धारण करीत आहे अशी कोणतीही व्यक्ती आणि वाहक लायसन धारण करण्यास किंवा मिळवण्यास जिला त्यावेळी निरर्ह करण्यात आलेले नाही अशा कोणत्याही व्यक्तीला, आपणास वाहक लायसन देण्यात यावे यासाठी, ती ज्या क्षेत्रात सर्वसामान्यपणे राहत असेल किंवा कामधंदा करीत असेल अशा क्षेत्रात अधिकारिता असलेल्या लायसन प्राधिकरणाकडे अर्ज करता येईल.

(२) पोटकलम (१) खालील प्रत्येक अर्ज, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात असेल आणि त्यात अशी माहिती अंतर्भूत करावी लागेल.

(३) वाहक लायसनासाठी केलेल्या प्रत्येक अर्जासोबत, विहित करण्यात येईल अशा नमुन्यानुसार असलेले व नोंदलेल्या वैद्यक व्यवसायी द्वारे स्वाक्षरित असे वैद्यकीय प्रमाणपत्र जोडावे लागेल आणि तसेच अर्जदाराच्या अलिकडील छायाचित्रांच्या दोन स्वच्छ प्रतीही जोडाव्या लागतील.

(४) या प्रकरणाखाली देण्यात आलेले वाहक लायसन विहित करण्यात येईल अशा नमुन्यानुसार असेल आणि तसा विहित तपशील त्यात समाविष्ट असेल आणि ते लायसन ज्या राज्यात देण्यात आलेले आहे त्या संपूर्ण राज्यभर परिणामक असेल.

(५) वाहक लायसनाची व त्याच्या प्रत्येक वेगळ्या नूतनीकरणाची फी चालन लायसन फीच्या दीडपट असेल.

वाहक लायसन देण्याबाबतच्या निरर्हता.

३१. (१) अठरा वर्षे वयाखालील कोणत्याही व्यक्तीला वाहक लायसन धारण करता येणार नाही किंवा तिला ते देण्यात येणार नाही.

(२) (क) अर्जदाराकडे किमान शैक्षणिक अर्हता नसेल तर ;

(ख) अर्जदाराने हजर केलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्रावरून, वाहक म्हणून काम करण्यास तो शारीरिकदृष्टया अपात्र आहे असे जर दिसून येत असेल तर ; आणि

(ग) अर्जदाराकडे असलेले आधीचेच कोणतेही वाहक लायसन प्रत्याहृत केले असेल तर;

——लायसन प्राधिकरण वाहक लायसन देण्याचे नाकारू शकेल.

निःसमर्थता या कारणावरुन वाहक लायसनाचे प्रत्याहरण.

३२. वाहक लायसनाचा धारक, ज्यामुळे असे लायसन धारण करण्यास कायमचा अपात्र ठरण्याचा रोग किंवा संभव आहे अशा कोणत्याही रोगामुळे किंवा निःसमर्थतेमुळे तो पीडित आहे असे समजण्यास लायसन प्राधिकरणास वाजवी कारणे असतील तर, कोणत्याही वेळी, कोणत्याही लायसन प्राधिकरणाला अशा वाहक लायसनाचे प्रत्याहरण करता येईल आणि वाहक लायसन प्रत्याहृत करणारे प्राधिकरण म्हणजे ज्याने लायसन दिले ते प्राधिकरण नसेल तेथे, ते लायसन देणाऱ्या त्या प्राधिकरणास प्रत्याहरणाबाबत कळवील :

परंतु, कोणत्याही लायसनाचे प्रत्याहरण करण्यापूर्वी लायसन प्राधिकरण, असे लायसन धारण करणाऱ्या व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देईल.

वाहक लायसने नाकारणे, इ. आदेश व त्यावरील अपिले.

३३. (१) जेथे लायसन प्राधिकरण कोणतेही वाहक लायसन देण्यास किंवा त्याचे नूतनीकरण करण्यास नकार देईल किंवा कोणत्याही वाहक लायसनाचे प्रत्याहरण करील तेथे, ते अशा नकाराच्या किंवा प्रत्याहरणाच्या लेखी कारणांसहित आदेश काढून अर्जदाराला किंवा, प्रकरणपरत्वे, धारकाला तो आदेश कळवून तसे करील.

(२) पोटकलम (१) खाली काढलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, असा आदेश तिच्यावर बजावण्यात आल्यापासून तीस दिवसांच्या आत, विहित प्राधिकरणाकडे अपील करता येईल आणि ते प्राधिकरण अशा व्यक्तीला व आदेश काढणाऱ्या प्राधिकरणाला आपापले म्हणणे मांडण्याची संधी देऊन नंतर अशा अपिलावर निर्णय देईल आणि अपील प्राधिकरणाचा निर्णय आदेश काढणाऱ्या प्राधिकरणावर बंधनकारक असेल.

लायसन प्राधिकरणाची निरर्ह ठरविण्याची शक्ती.

३४. (१) वाहक लायसनाच्या धारकाने असा वाहक म्हणून पूर्वी केलेल्या वर्तनामुळे असे लायसन धारण करण्यास किंवा मिळविण्यास त्याला निरर्ह ठरवणे आवश्यक आहे असे जर कोणत्याही लायसन प्राधिकरणाचे मत असेल तर, एक वर्षापेक्षा जास्त नसेल इतक्या विनिर्दिष्ट कालावधीपुरते त्या व्यक्तीस वाहक लायसन धारण करण्यास किंवा मिळविण्यास निरर्ह ठरवणारा आदेश त्या प्राधिकरणाला कारणे नमूद करून काढता येईल:

परंतु, लायसन धारकाला निरर्ह करण्यापूर्वी, लायसन प्राधिकरण असे लायसन धारण करणाऱ्या व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देईल.

(२) असा कोणताही आदेश काढण्यात आल्यावर, वाहक लायसनाचा धारक ते लायसन अगोदरच स्वाधीन करण्यात आले नसेल तर, ते लायसन, आदेश देणाऱ्या प्राधिकरणाच्या ताबडतोब स्वाधीन करील आणि ते प्राधिकरण निरर्हता संपेपर्यंत किंवा दूर करण्यात येईपर्यंत लायसन ठेवून घेईल.

(३) जेथे वाहक लायसनाच्या धारकाला या कलमाखाली निरर्ह करणारे प्राधिकरण म्हणजे ज्याने लायसन दिले ते प्राधिकरण नसेल तेथे, ते अशा निरर्हतेचे वृत्त लायसन देणाऱ्या प्राधिकरणास कळवील.

(४) पोटकलम (१) खाली काढलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, असा आदेश तिच्यावर बजावण्यात आल्यापासून तीस दिवसांच्या आत, विहित प्राधिकरणाकडे अपील करता येईल आणि ते प्राधिकरण अशा व्यक्तीला व आदेश काढणाऱ्या प्राधिकरणाला आपापले म्हणणे मांडण्याची संधी देऊन नंतर, अशा अपिलांवर निर्णय देईल आणि अपील प्राधिकरणाचा निर्णय, आदेश काढणाऱ्या प्राधिकरणावर बंधनकारक असेल.

न्यायालयाची निरर्ह करण्याची शक्ती.

३५. (१) जेथे वाहक लायसन धारण करणारी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाखालील अपराधाबद्दल दोषी ठरलेली असेल तेथे, ज्याने अशा व्यक्तीस दोषी ठरविले ते न्यायालय, कायद्याने प्राधिकृत केलेली अन्य कोणतीही शिक्षा देऊन त्याशिवाय, न्यायालय विनिर्दिष्ट करील अशा कालावधीपुरते, याप्रमाणे दोषी ठरलेली व्यक्ती वाहक लायसन धारण करण्यास निरर्ह असल्याचे घोषित करू शकेल.

(२) या अधिनियमाखालील अपराधाच्या दोषसिद्धीबाबत ज्याच्याकडे अपील दाखल केले असेल असे न्यायालय, खालच्या न्यायालयाने काढलेला निरर्हतेचा कोणताही आदेश रद्द ठरवू शकेल किंवा त्यात बदल करू शकेल आणि खालच्या न्यायालयाकडून ज्याच्याकडे सर्वसामान्यत: अपील होऊ शकते असे न्यायालय ज्या दोषसिद्धीच्या संबंधात असा आदेश काढण्यात आला त्याविरुद्ध अपील होऊ शकत नसेल तरीही, त्या खालच्या न्यायालयाने काढलेला निरर्हतेचा आदेश रद्द ठरवू शकेल किंवा त्यात बदल करू शकेल.

दुसऱ्या प्रकरणाचे विवक्षित उपबंध वाहक-लायसनाला लागू असणे.

३६. कलम ६ चे पोटकलम (२), कलमे १४, १५ आणि २३, कलम २४ चे पोटकलम (१) आणि कलम २५ यांचे उपबंध, चालन लायसनाच्या संबंधात ज्याप्रमाणे लागू होतात त्याप्रमाणे ते, होईल तेथवर, वाहक लायसनाच्या संबंधात लागू होतील.

व्यावृत्ती.

३७. जर टप्पेगाडीचा वाहक म्हणून (मग त्यास कोणत्याही नावाने संबोधलेले असो) काम करण्याचे कोणतेही लायसन कोणत्याही राज्य शासनाने दिलेले असेल आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी परिणामक असेल तर, जर हा अधिनियम पारित झाला नसता तर, जितक्या कालावधीसाठी ते लायसन परिणामक राहिले असते तितक्या कालावधीपर्यंत, असा प्रारंभ झाला तरीही परिणामक असण्याचे चालू राहील आणि असे प्रत्येक लायसन ज्या दिनांकास ते देण्यात आले होते त्या दिनांकास हे प्रकरण जणू काही अंमलात असावे असे समजून या प्रकरणाखाली देण्यात आलेले लायसन आहे, असे मानण्यात येईल.

राज्य शासनाची नियम करण्याची शक्ती.

३८. (१) राज्य शासनाला या प्रकरणाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्यासाठी नियम करता येतील.

(२) पूर्वगामी शक्तीच्या सर्वसाधारणतेला बाध न येता, अशा नियमांमध्ये पुढील बाबींकरिता उपबंध करता येतील, त्या अशा,—

(क) लायसन प्राधिकरणांची व या प्रकरणाखालील अन्य विहित प्राधिकरणांची नियुक्ती, अधिकारिता, नियंत्रण व कार्ये ;

(ख) वाहक म्हणून कर्तव्ये पार पाडणाऱ्या अशा टप्पेगाड्यांच्या चालकांना व वाहक म्हणून कृती करण्यासाठी तात्पुरते नेमलेल्या व्यक्तींना, ज्या शर्तींच्या अधीनतेने, कलम २९ पोटकलम १ च्या उपबंधांपासून सूट देता येईल त्या शर्ती;

(ग) वाहकांची किमान शैक्षणिक अर्हता, त्यांची कर्तव्ये व कार्ये आणि ज्यांना वाहक लायसने देण्यात येतात अशा व्यक्तींचे वर्तन ;

(घ) वाहकांच्या लायसनाच्या अर्जाचा किंवा अशा लायसनाच्या नूतनीकरणाचा नमुना व त्यात समाविष्ट असेल तो तपशील ;

(ङ) ज्या नमुन्यात वाहक लायसन देता येतील किंवा त्यांचे नूतनीकरण करता येईल तो नमुना त्यात समाविष्ट असेल तो तपशील ;

(च) गहाळ झालेल्या, नष्ट झालेल्या किंवा जीर्णशीर्ण झालेल्या लायसनाच्या ऐवजी लायसनाची दुसरी प्रत देणे, जुनाट झालेल्या छायाचित्रांच्या जागी नवीन छायाचित्रे देणे व त्याकरता आकारावयाची फी ;

(छ) या प्रकरणाखाली दाखल करण्यात येतील अशा अपिलांची कार्यवाही व सुनावणी, अशा अपिलांच्या संबंधात द्यावयाची फी आणि अशा फीचा परतावा :

परंतु, याप्रमाणे निश्चित करण्यात येणारी कोणतीही फी पंचवीस रुपयांहून अधिक असणार नाही ;

(ज) टप्पेगाड्यांच्या वाहकांनी लावावयाचे बिल्ले व परिधान करावयाचा गणवेश व अशा बिल्ल्यांच्या संबंधात द्यावयाची फी ;

(झ) नोंदलेल्या वैद्यकीय व्यवसायींनी, कलम ३० पोटकलम (३) मध्ये निर्दिष्ट अशी प्रमाणपत्रे देणे व अशा प्रमाणपत्रांचा नमुना ;

(ञ) इतर राज्याकडून देण्यात आलेले वाहक लायसन, ज्या शर्तींच्या अधीनतेने आणि ज्या मर्यादेपर्यंत राज्यात परिणामक होईल त्या शर्ती आणि ती मर्यादा ;

(ट) वाहक लायसनांचा तपशील एका प्राधिकरणाने दुसऱ्या प्राधिकरणांना कळवणे ; आणि

(ठ) विहित करण्यात यावयाची किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

## प्रकरण चार

### मोटार वाहनांची नोंदणी

नोंदणीची आवश्यकता.

३९. एखाद्या मोटार वाहनाची या प्रकरणानुसार नोंदणी करण्यात आली आहे व त्या मोटार वाहनाच्या नोंदणीचे प्रमाणपत्र निलंबित किंवा रद्द करण्यात आलेले नाही आणि वाहनावर विहित रीतीने नोंदणीचे चिन्ह दाखवण्यात आले आहे असे झाल्याशिवाय, कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी किंवा अन्य कोणत्याही ठिकाणी कोणत्याही व्यक्तीला ते मोटार वाहन चालवता येणार नाही आणि कोणताही मोटार वाहन मालक ते चालवावयास लावू शकणार नाही किंवा तशी परवानगी देऊ शकणार नाही :

परंतु, केंद्र शासनाकडून विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने विक्रेत्याच्या कब्जात असलेल्या मोटार वाहनाला या कलमातील काहीही लागू होणार नाही.

४०. कलम ४२, कलम ४३ व कलम ६० यांच्या उपबंधांच्या अधीनतेने, प्रत्येक मोटार वाहन मालक ते वाहन सर्वसामान्यत: जेथे ठेवण्यात येते असे त्याचे राहण्याचे ठिकाण व त्याची कामधंद्याची जागा ज्याच्या अधिकारितेत येत असेल त्या नोंदणी प्राधिकरणाकडे वाहनाची नोंदणी करवून घेईल. नोंदणी कोठे करावयाची.

४१. (१) मोटार वाहन मालकाने किंवा त्याच्या वतीने, नोंदणीसाठी करावयाचा अर्ज, केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा स्वरुपात असेल आणि त्याप्रमाणे दस्तऐवज, तपशील व महिती त्या सोबत जोडण्यात येईल आणि विहित करण्यात येईल अशा कालावधीत तो करण्यात येईल : नोंदणी कशी करावयाची.

परंतु, जेथे एखादे मोटार वाहन एकाहून अधिक व्यक्तींच्या संयुक्त मालकीचे असेल तेथे एक व्यक्ती सर्व मालकांच्या वतीने अर्ज करील आणि या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी असा अर्जदार त्या मोटार वाहनाचा मालक असल्याचे मानण्यात येईल.

(२) पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या अर्जासोबत केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशी फी असेल.

(३) नोंदणी प्राधिकरण, त्याने नोंदणी केलेल्या मोटार वाहनांच्या मालकाला, केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा स्वरुपात आणि असा तपशील व अशी माहिती अंतर्भूत असलेले आणि अशा रीतीने नोंदणी प्रमाणपत्र देईल.

(४) नोंदणी प्रमाणपत्रामध्ये समाविष्ट करावयाच्या इतर तपशिलाखेरीज त्यामध्ये मोटार वाहनाचा प्रकारही विनिर्दिष्ट करण्यात येईल व तो प्रकार म्हणज मोटार वाहनाचे संकल्पचित्र, रचना व उपयोग या गोष्टी विचारात घेऊन, केंद्र शासनाने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील असा असेल.

(५) नोंदणी प्राधिकरण, केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा स्वरुपात व रीतीने ठेवावयाच्या नोंदवहीत पोटकलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रमाणपत्राच्या तपशिलाची नोंद करील.

(६) नोंदणी प्राधिकरण, त्या वाहनाला, त्यावर दाखविण्यासाठी केंद्र शासनाने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे त्या त्या राज्यास वेळोवेळी नेमून देईल अशा अक्षरांच्या समूहांपैकी एक अक्षर समूह व त्यापुढे अशी अक्षरे व आकडे यांनी बनवलेले एक विभेदक चिन्ह (या अधिनियमात नोंदणी चिन्ह म्हणून निर्देशिलेले) नेमून देईल. आणि केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा स्वरुपात व अशा रीतीने मोटार वाहनावर ते प्रदर्शित करण्यात व दर्शविण्यात येईल.

(७) परिवाहनाव्यतिरिक्त इतर एखाद्या मोटार वाहनाच्या संबंधात पोटकलम (३) अन्वये देण्यात आलेले नोंदणी प्रमाणपत्र – मग ते या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी वा नंतर दिलेले असो – या अधिनियमात समाविष्ट असलेल्या उपबंधांच्या अधीनतेने, ते दिल्याच्या दिनांकापासून फक्त पंधरा वर्षांच्या कालावधीपुरते विधिग्राह्य असेल आणि ते नूतनीकरणपात्र असेल.

(८) परिवाहनाव्यतिरिक्त इतर एखाद्या मोटार वाहनाच्या मालकाने किंवा त्याच्या वतीने नोंदणी प्रमाणपत्राच्या नूतनीकरणासाठी करावयाचा अर्ज केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा कालावधीत आणि अशा स्वरुपात आणि अशा तपशिलासह व माहितीसह करण्यात येईल.

(९) पोटकलम (८) मध्ये उल्लेखिलेल्या अर्जासोबत केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशी फी असेल.

(१०) कलम ५६ च्या उपबंधांच्या अधीनतेने, पोटकलम (८) खालील अर्ज मिळाल्यानंतर, नोंदणी प्राधिकरणाला नोंदणी प्रमाणपत्राचे पाच वर्षांच्या कालावधीसाठी नूतनीकरण करता येईल आणि ही गोष्ट ते मूळ नूतनीकरण प्राधिकरण नसल्यास, मूळ नूतनीकरण प्राधिकरणाला कळवील.

(११) पोटकलम (१) किंवा, प्रकरणपरत्वे पोटकलम (८) अन्वये मालकाने विहित कालावधीत अर्ज केला नाही तर, नोंदणी प्राधिकरणाला प्रकरणांची परिस्थिती लक्षात घेऊन, मालकाविरुद्ध कलम १७७ अन्वये करता येईल अशा कोणत्याही कारवाई ऐवजी, कलम १३ अन्वये विहित करण्यात येईल अशी शंभर रुपयांहून अधिक नसेल इतकी रक्कम भरण्यास त्याला फर्मावता येईल :

परंतु, उक्त रक्कम भरण्यास मालक कसूर करील त्या बाबतीत, मालकाविरुद्ध कलम १७७ अन्वये कारवाई केली जाईल.

(१२) पोटकलम (११) खालील रक्कम, मालकाने भरली असेल त्या बाबतीत, त्याच्याविरुद्ध कलम १७७ अन्वये कोणतीही कारवाई केली जाणार नाही.

(१३) पोटकलम (११) च्या प्रयोजनांसाठी पोटकलम (१) किंवा पोटकलम (८) अन्वये अर्ज करण्यात मालकाकडून झालेल्या विलंबाचा कालावधी लक्षात घेऊन राज्य शासनाला निरनिराळ्या रकमा विहित करता येतील.

(१४) नोंदणी प्रमाणपत्राच्या दुसऱ्या प्रतीसाठी [1][अखेरच्या नोंदणी प्राधिकरणाकडे] केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा प्रपत्रात तसा तपशील व माहिती अंतर्भूत असलेला आणि विहित करण्यात येईल अशा फीसह, अर्ज करण्यात येईल.

**राजनैतिक अधिकारी इ. च्या मोटार वाहनांच्या नोंदणीसाठी विशेष उपबंध.**

४२. (१) जर मोटार वाहनांच्या नोंदणीसाठी कोणताही राजनैतिक अधिकारी किंवा वाणिज्यिक अधिकारी यांनी किंवा त्यांच्या वतीने कलम ४१ च्या पोटकलम (१) खाली अर्ज केला असेल तर त्या कलमाच्या पोटकलम (३) किंवा पोटकलम (६) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, नोंदणी प्राधिकरण, केंद्र शासनाने यासंबंधात पोटकलम (३) अन्वये केलेल्या नियमांखाली उपबंधित केले असेल अशा रीतीने व अशा प्रक्रियेनुसार वाहनाची नोंदणी करील आणि त्या नियमांमध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांनुसार त्या वाहनाला त्यावर दाखवावयाचे असे एक विशेष नोंदणीचिन्ह नेमून देईल आणि त्या वाहनाची या कलमाखाली नोंदणी करण्यात आली आहे अशा अर्थाचे एक प्रमाणपत्र (या कलमात यापुढे नोंदणी प्रमाणपत्र म्हणून निर्देशिलेले) देईल ; आणि त्याप्रमाणे नोंदणी करण्यात आलेले कोणतेही वाहन हे, जोवर राजनैतिक अधिकाऱ्याचे किंवा वाणिज्यिक अधिकाऱ्याचे असेल तोवर, या अधिनियमाखाली त्याची अन्यथा नोंदणी करणे आवश्यक असणार नाही.

(२) जर या कलमाखाली नोंदणी केलेले कोणतेही वाहन राजनैतिक अधिकाऱ्याचे किंवा वाणिज्यिक अधिकाऱ्याचे राहिले नाही तर, या कलमाखाली दिलेले प्रमाणपत्रही परिणामक राहणार नाही आणि कलम ३९ व ४० चे उपबंध त्यानंतर लागू होतील.

(३) केंद्र शासनाला, राजनैतिक अधिकारी व वाणिज्यिक अधिकारी यांच्या मोटार वाहनांच्या नोंदणीसाठी, अशा वाहनांची नोंदणी करताना, नोंदणी प्राधिकरणाने अनुसरावयाची प्रक्रिया, अशा वाहनांच्या नोंदणीची प्रमाणपत्रे कोणत्या नमुन्यानुसार द्यावयाची, वाहनांच्या मालकांना नोंदणीची प्रमाणपत्रे कशा रीतीने पाठवावयाची व अशा वाहनांना नेमून द्यावयाची विशेष नोंदणी चिन्हे यासंबंधात नियम करता येतील.

(४) या कलमाच्या प्रयोजनार्थ, "राजनैतिक अधिकारी" व "वाणिज्यिक अधिकारी" याचा अर्थ, अशी कोणीही व्यक्ती जिला केंद्र शासनाकडून असा अधिकारी म्हणून मान्यता दिलेली आहे, आणि एखादी व्यक्ती असा अधिकारी आहे किंवा नाही याविषयी कोणताही प्रश्न उद्भवल्यास, केंद्र शासनाचा त्यावरील निर्णय अंतिम राहील.

**तात्पुरती नोंदणी**

४३. (१) कलम ४० मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मोटार वाहनाच्या मालकास, वाहनाची विहित रीतीने नोंदणी करून मिळावी आणि विहित रीतीने तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र व तात्पुरते नोंदणी चिन्ह मिळावे यासाठी, कोणत्याही नोंदणी प्राधिकरणाकडे किंवा अन्य विहित प्राधिकरणाकडे अर्ज करता येईल.

(२) या कलमाखाली केलेली नोंदणी जास्तीत जास्त एक महिना एवढ्या कालावधीपुरती विधिग्राह्य असेल आणि ती नूतनीकरणपात्र असणार नाही:

परंतु, जेथे याप्रमाणे नोंदणी केलेले मोटार वाहन म्हणजे ज्यास सांगाडा जोडलेला नाही असा न्याधार असून [2][त्याला सांगाडा जोडण्यासाठी किंवा मालकांच्या नियंत्रणा बाहेरील अन्य कोणत्याही अकल्पित परिस्थितीमुळे] ते एक महिन्याच्या उक्त कालावधीहून अधिक काळ कार्यशाळेत अडकून पडली असेल तेथे, कोणतीही फी विहित केलेली असल्यास, ती भरण्यात आल्यावर असा कालावधी, नोंदणी प्राधिकरण किंवा, प्रकरणपरत्वे, अन्य विहित प्राधिकरण परवानगी देईल अशा आणखी कालावधीने किंवा कालावधींनी वाढविण्यात येईल.

[3][(३) मोटार वाहन, भाडे खरेदी करार, भाडेपट्टा किंवा तारण गहाण यावर घेण्यात आले असेल अशा प्रकरणात मालकाकडून ज्या व्यक्तीच्या नावे असा करारनामा करून देण्यात आला असेल त्यानुसार नोंदणी प्राधिकरण किंवा अन्य विहित प्राधिकरण त्या व्यक्तीचे संपूर्ण नाव व कायमस्वरूपी पत्ता सुवाच्य व ठळक अक्षरात लिहून अशा वाहनाचे तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र देईल.]

**नोंदणीच्या वेळी वाहन हजर करणे.**

४४. मोटार वाहनाची नोंदणी करण्यास किंवा परिवाहनाव्यतिरिक्त अन्य मोटार वाहनाच्या संबंधातील नोंदणी प्रमाणपत्राचे नूतनीकरण करण्यास सुरूवात करण्यापूर्वी नोंदणी प्राधिकरण, अर्जात अंतर्भूत असलेला तपशील खरा आहे आणि ते वाहन अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या आवश्यकतेनुसार आहे अशी नोंदणी प्राधिकरणास स्वतःची खात्री करुन घेता यावी म्हणून वाहनाच्या नोंदणीसाठी किंवा, प्रकरणपरत्वे, नोंदणी प्रमाणपत्राच्या नूतनीकरणासाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तीने आपणापुढे किंवा राज्य शासन आदेशाद्वारे नियुक्ती करील अशा प्राधिकरणापुढे ते वाहन हजर करण्यास फर्मावील.

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम ११ अन्वये मूळ मजकूराऐवजी घालण्यात आला (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १२ (क) अन्वये मूळ मजकूराऐवजी हा मजकूर घालण्यात आला (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १२ (ख) अन्वये पोटकलम (३) नव्याने हा मजकूर दाखल करण्यास आला (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

४५. जर एखादे मोटार वाहन हे चोरलेले मोटार वाहन आहे असे मानण्यास नोंदणी प्राधिकरणाकडे पुरेसे कारण असेल किंवा वाहन यांत्रिकदृष्ट्या सदोष असेल किंवा या अधिनियमाच्या वा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या आवश्यकतानुरुप नसेल अथवा अर्जदार त्या वाहनाच्या कोणत्याही पूर्वनोंदणीचा तपशील पुरवण्यास चुकला अथवा त्याने अशा वाहनाच्या नोंदणीसाठी किंवा, प्रकरणपरत्वे, नोंदणी प्रमाणपत्राच्या नूतनीकरणासाठी वा नोंदणीसाठी केलेल्या अर्जात चुकीचा तपशील पुरवला तर नोंदणी प्राधिकरण, अशा कोणत्याही मोटार वाहनाची नोंदणी करण्यास किंवा ह्या मोटार वाहनाच्या (परिवहनाव्यतिरिक्त अन्य) नोंदणी प्रमाणपत्राचे नूतनीकरण करण्यास आदेशाद्वारे नकार देऊ शकेल आणि ज्याच्या वाहनाची नोंदणी करण्यास नकार देण्यात आला असेल किंवा नोंदणी प्रमाणपत्राच्या नूतनीकरणासाठी केलेला ज्याचा अर्ज नाकारण्यात आला असेल त्या अर्जदाराला नोंदणी प्राधिकरण अशा आदेशाची एक प्रत, अशा नकाराच्या कारणांसह देईल. **नोंदणी करण्यास किंवा नोंदणी प्रमाणपत्राचे नूतनीकरण करण्यास नकार.**

४६. कलम ४७ च्या उपबंधांच्या अधीनतेने, या प्रकरणानुसार कोणत्याही राज्यात नोंदणी केलेल्या मोटार वाहनाची भारतात अन्यत्र नोंदणी करण्याची आवश्यकता असणार नाही आणि अशा वाहनाच्या संबंधात या अधिनियमाखाली देण्यात आलेले किंवा अंमलात असलेले नोंदणी प्रमाणपत्र भारतामध्ये सर्वत्र परिणामक असेल. **नोंदणी भारतात परिणामक असणे.**

४७. (१) एका राज्यात नोंदणी केलेले मोटार वाहन बारा महिन्यांहून अधिक काळ अन्य राज्यात ठेवण्यात येते तेव्हा त्या वाहनाचा मालक, वाहन त्यावेळी ज्याच्या अधिकारितेत असेल त्या नोंदणी प्राधिकरणाकडे, नवीन नोंदणी चिन्ह नेमून देण्यासाठी केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा कालावधीत आणि तशा नमुन्यात तसा तपशील असलेला अर्ज करील आणि त्या नोंदणी प्राधिकरणाकडे नोंदणी प्रमाणपत्र सादर करील : **वाहन अन्य राज्यात हलवल्यावर त्यास नवीन नोंदणी चिन्ह नेमून देणे.**

परंतु, या पोटकलमाखालील अर्जासोबत,—

(एक) कलम ४८ अन्वये मिळवलेले नाहरकत प्रमाणपत्र; किंवा

(दोन) असे प्रमाणपत्र मिळवलेले नसेल त्या बाबतीत—

(क) कलम ४८ च्या पोटकलम (२) अनुसार मिळवलेली पावती; किंवा

(ख) वाहनाच्या मालकाने कलम ४८ मध्ये उल्लेखिलेल्या नोंदणी प्राधिकरणाकडे या संबंधातील अर्ज पोच देय नोंदणी डाकेने पाठवला असल्यास त्याला डाक कार्यालयाकडून मिळालेली डाक पोच पावती

—जोडावी लागेल, तसेच आपणास असे प्रमाणपत्र देण्याचे नाकारल्याविषयी किंवा ज्याच्या अधीनतेने असे प्रमाणपत्र देण्यात येईल अशा कोणत्याही निदेशाचे पालन करण्याविषयी अशा प्राधिकरणाकडून काहीही कळवण्यात आलेली नाही, अशा अर्थाचे प्रतिज्ञापत्रही त्या अर्जासोबत करून द्यावे लागेल :

परंतु, आणखी असे की, जेव्हा एखादे मोटार वाहन हे भाडेखरेदी, भाडेपट्टा किंवा तारणगहाण करारानुसार ठेवले असेल त्या बाबतीत, असा करार ज्या व्यक्तीबरोबर करण्यात आला तिच्याकडील ना-हरकत प्रमाणपत्र या पोटकलमाखालील अर्जासोबत जोडण्यात येईल आणि असा करार ज्या व्यक्तीबरोबर करण्यात आला असेल तिच्याकडून असे प्रमाणपत्र मिळण्यासंबंधीचे कलम ५१ मधील उपबंध शक्य असतील तेथवर लागू होतील.

(२) पोटकलम (१) खाली ज्याच्याकडे अर्ज करण्यात आला असेल ते नोंदणी प्राधिकरण, कलम ६२ अन्वये कोणतीही विवरणपत्रे आलेली असल्यास, त्याला योग्य वाटेल अशी त्यांची पडताळणी केल्या नंतर, कलम ६२ च्या पोटकलम (६) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे वाहनावर त्यानंतर लावण्यासाठी व दाखविण्यासाठी नोंदणी चिन्ह नेमून देईल आणि नोंदणी प्रमाणपत्र अर्जदाराला परत करण्यापूर्वी ते चिन्ह त्यावर नोंदवील आणि यापूर्वी ज्या नोंदणी प्राधिकरणाकडून अशा वाहनाची नोंदणी करण्यात आली असेल त्याच्याशी संपर्क साधून त्या नोंदणी प्राधिकरणाच्या अभिलेखातून अशा वाहनाची नोंदणी स्वतःच्या अभिलेखाकडे वर्ग करण्याची व्यवस्था करील.

(३) एखादे मोटार वाहन भाडेखरेदी, भाडेपट्टा किंवा तारणगहाण कराराने ठेवले असेल तेव्हा नोंदणी प्राधिकरण, त्या वाहनाला पोटकलम (२) खाली नोंदणी चिन्ह नेमून देऊन नंतर नोंदलेल्या मालकाने-भाडेखरेदी किंवा भाडेपट्टा किंवा तारणगहाण करार ज्या व्यक्तीबरोबर केलेला आहे ती व्यक्ती म्हणून जिचे नाव नोंदणी प्रमाणपत्रात नमूद केलेले असेल त्या व्यक्तीस (नोंदणी प्रमाणपत्रात अशा व्यक्तीचा जो पत्ता दिलेला असेल त्या पत्त्यावर पोच देय नोंदणी डाकेने नोटीस पाठवून) उक्त नोंदणी चिन्ह त्या वाहनास देण्यात आल्याचे कळवील.

(४) एखादे राज्य शासन, त्या राज्यात नोंदणी न झालेले जे मोटार वाहन त्या राज्यात आणण्यात आले असेल किंवा त्यावेळी त्या राज्यात असेल अशा मोटार वाहनाच्या मालकाने मोटार वाहनाच्या व त्याच्या नोंदणीच्या संबंधात विहित करण्यात येईल अशी माहिती, राज्यातील विहित प्राधिकरणाला फर्मावण्याबाबत कलम ६५ अन्वये नियम करू शकेल.

(५) मालकाने विहित कालावधीत पोटकलम (१) अन्वये अर्ज करण्यात कसूर केल्यास, नोंदणी प्राधिकरण, प्रकरणाची परिस्थिती लक्षात घेऊन, मालकाला, त्याच्या विरुद्ध कलम १७७ अन्वये करता येईल अशा कोणत्याही कारवाईऐवजी पोटकलम (७) मध्ये विहित करण्यात येईल अशी कमीत कमी शंभर रुपये इतकी रक्कम भरण्यास भाग पाडू शकेल :

परंतु, उक्त रक्कम भरण्यात मालक कसूर करील त्याबाबतीत त्याच्याविरुद्ध कलम १७७ खाली कारवाई करण्यात येईल.

(६) मालकाने पोटकलम (५) अन्वये रक्कम भरली असेल त्याबाबतीत, त्याच्याविरुद्ध कलम १७७ अन्वये कोणतीही कारवाई केली जाणार नाही.

(७) पोटकलम (५) च्या प्रयोजनांसाठी, राज्य शासनाला, पोटकलम (१) अन्वये अर्ज करण्यात मालकाने केलेला विलंब कालावधी लक्षात घेऊन, निरनिराळ्या रकमा विहित करता येतील.

**ना हरकत प्रमाणपत्र.** ४८. मोटार वाहनाच्या मालकाला कलम ४७ च्या पोटकलम (१) अन्वये नवीन नोंदणी चिन्ह नेमून देण्यासंबंधी अर्ज करावयाचा असेल तेव्हा, किंवा मोटार वाहनाचे हस्तांतरण, त्याची नोंदणी ज्या राज्यात झाली त्याव्यतिरिक्त अन्य राज्यात करावयाची असेल तेव्हा, कलम ५० च्या पोटकलम (१) अन्वये अशा वाहनाचे हस्तांतरण करणाऱ्या हस्तांतरकाला केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने अशा अर्थाचे प्रमाणपत्र (या कलमात यापुढे "ना हरकत प्रमाणपत्र" म्हणून निर्देशिलेले) मिळण्याविषयी अर्ज करावा लागेल की, वाहनाला नवीन नोंदणी चिन्ह नेमून देण्यास किंवा, प्रकरणपरत्वे, नोंदणी प्रमाणपत्रात मालकीच्या हस्तांतरणाचा तपशील नमूद करण्यास त्या नोंदणी प्राधिकरणाची काहीही हरकत नाही.

(२) पोटकलम (१) अन्वये केलेला अर्ज मिळाल्यावर नोंदणी प्राधिकरण, केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा नमुन्यानुसार पावती देईल.

(३) पोटकलम (१) खालील अर्ज मिळाल्यावर, नोंदणी प्राधिकरण, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर आणि त्याला योग्य वाटतील अशा निदेशांचे पालन करण्यास अर्जदाराला फर्मावल्यानंतर आणि अर्ज मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत, लेखी आदेशाद्वारे, अर्जदाराला ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे की नाकारण्यात आले आहे, ते कळवील :

परंतु, ना-हरकत प्रमाणपत्र नाकारावयाचे झाल्यास नोंदणी प्राधिकरण, तसे करण्याची कारणे लेखी नमूद केल्याशिवाय व त्याची एक प्रत अर्जदाराला पाठवल्याशिवाय ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे नाकारणार नाही.

(४) पोटकलम (३) मध्ये उल्लेखिलेल्या तीस दिवसांच्या कालावधीत नोंदणी प्राधिकरणाने ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचे नाकारले नाही किंवा अर्जदाराला तसा नकार कळवला नाही तर, नोंदणी प्राधिकरणाने ना-हरकत प्रमाणपत्र दिले असल्याचे मानण्यात येईल.

(५) ना हरकत प्रमाणपत्र देण्यापूर्वी किंवा ते देण्याचे नाकारण्यापूर्वी, नोंदणी प्राधिकरण, संबंधित मोटार वाहनाच्या चोरीसंबंधी कोणतीही तक्रार नोंदवण्यात आलेली नाही अथवा त्यासंबंधीचे प्रकरण प्रलंबित नाही असा लेखी अहवाल पोलिसांकडून मिळवील, त्या मोटार वाहनासंबंधातील पथकरासह सर्व देणी चुकती करण्यात आली असल्याची खातरजमा करील आणि केंद्र शासन नियमांद्वारे विहित करील अशा अन्य गोष्टीही लक्षात घेईल.

[1][(६) त्याचप्रमाणे, वाहन मालकाने वाहन चोरीस गेल्यावर त्या वाहनाचा मालक देखील, वाहन चोरीस गेल्याची तक्रार ज्या पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली त्या पोलीस ठाण्याच्या नावासह, नोंदणी प्राधिकरणाला शक्य तितक्या लवकर लेखी कळवील आणि नोंदणी प्राधिकरण, ना हरकत प्रमाणपत्र, मालकी हस्तांतरण नोंदणी किंवा नोंदणी प्रमाणपत्राची दुसरी प्रत देणे, या बाबतचा कोणताही अर्ज निकालात काढताना असा अहवाल विचारात घेईल.]

**राहण्याची जागा किंवा कामधंद्याची जागा बदलणे.** ४९. (१) मोटार वाहनाचा मालक वाहनाच्या नोंदणीपत्रात नमूद केलेल्या जागेत राहिनासा झाला किंवा ती त्याची कामधंद्याची जागा राहिली नाही तर, पत्त्यात असा कोणताही बदल झाल्यापासून तीस दिवसांच्या आत तो आपला नवीन पत्ता केंद्र शासनाकडून विहित करण्यात आले असेल अशा नमुन्यात आणि अशा कागदपत्रांसह, ज्याने नोंदणी प्रमाणपत्र दिले त्या नोंदणी प्राधिकरणास किंवा नवीन पत्ता हा जर अन्य नोंदणी प्राधिकरणाच्या अधिकारितेत असेल तर अशा अन्य नोंदणी प्राधिकरणास कळवील. आणि त्याचवेळी, नवीन पत्ता नोंदणी प्रमाणपत्रात नमूद व्हावा यासाठी ते नोंदणी प्रमाणपत्र तो नोंदणी प्राधिकरणाकडे पाठवील.

---

१. १९९४ चा अधिनियम ५४ कलम १३ अन्वये पोटकलम (६) नव्याने दाखल करण्यात आले. (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(२) मोटार वाहनाच्या मालकाने आपला नवा पत्ता पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत नोंदणी प्राधिकरणास कळविण्यात कसूर केली तर, त्या प्रकरणाची परिस्थिती लक्षात घेऊन नोंदणी प्राधिकरण मालकाविरुद्ध कलम ११२ अन्वये जी कारवाई करता येईल त्याऐवजी त्या मालकास पोटकलम (४) अन्वये विहित करण्यात येईल त्याप्रमाणे जास्तीत जास्त शंभर रुपये इतकी रक्कम भरण्यास फर्मावू शकेल :

परंतु, मालकाने उक्त रक्कम भरण्यास कसूर केल्यास कलम १७७ अन्वये त्याच्याविरुद्ध कारवाई करण्यात येईल.

(३) एखाद्या व्यक्तीने पोट कलम (२) अन्वये रक्कम भरली असेल तेव्हा तिच्याविरुद्ध कलम १७७ अन्वये कोणतीही कारवाई केली जाणार नाही.

(४) पोट कलम (२) च्या प्रयोजनांसाठी, राज्य शासन, त्या व्यक्तीच्या नवीन पत्त्यातील बदल कळविण्याबाबत झालेल्या विलंबाचा कालावधी लक्षात घेऊन वेगवेगळ्या रकमा विहित करू शकेल.

(५) पोटकलम (१) अन्वये माहिती मिळाल्यानंतर, नोंदणी प्राधिकरण, त्याला योग्य वाटेल अशी पडताळणी केल्यानंतर, नवीन पत्ता नोंदणी प्रमाणपत्रात नोंदवून घेण्याची व्यवस्था करू शकेल.

(६) अशी कोणतीही नोंद करणारे मूळ नोंदणी प्राधिकरणाहून अन्य असे नोंदणी प्राधिकरण मूळ नोंदणी प्राधिकरणास बदललेला पत्ता कळवील.

(७) नोंदणी प्रमाणपत्रात नमूद केलेल्या पत्त्यात, जी अनुपस्थिती सहा महिन्यांहून अधिक काळ टिकण्याचे उद्देशित नाही अशा तात्पुरत्या अनुपस्थितीमुळे बदल व्हावयाचा असेल किंवा मोटार वाहन वापरण्यात आले नसेल व नोंदणी प्रमाणपत्रात नमूद केलेल्या पत्त्याच्या ठिकाणाहून हलविण्यातही आले नसेल तर, पोट कलम (१) मधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

**मालकीचे हस्तांतरण.**

५०. (१) या प्रकरणाखाली नोंदणी करण्यात आलेल्या कोणत्याही मोटार वाहनाची मालकी हस्तांतरित करण्यात आली असेल तर—

(क) हस्तांतरकाला,—

(एक) त्याच राज्यात वाहनाची नोंदणी झाली असेल त्याबाबतीत ज्याच्या अधिकारितेत हस्तांतरण घडून यावयाचे असेल त्या नोंदणी प्राधिकरणाकडे, हस्तांतरण झाल्यापासून चौदा दिवसांच्या आत, हस्तांतरणाचे वृत्त, केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा रीतीने अशा दस्तऐवजांसह कळवावे लागेल आणि त्याचवेळी सदर वृत्ताची एक प्रत हस्तांतरितीकडे पाठवावी लागेल.

(दोन) राज्याबाहेर वाहनांची नोंदणी झाली असेल त्याबाबतीत, हस्तांतरण झाल्यापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत उपखंड (एक) मध्ये नमूद केलेल्या नोंदणी प्राधिकरणाकडे,—

(क) कलम ४८ खाली मिळवलेले ना-हरकत प्रमाणपत्र; किंवा

(ख) जेव्हा असे प्रमाणपत्र मिळालेले नसेल तेव्हा,—

(एक) कलम ४८ च्या पोटकलम २ अन्वये मिळवलेली पावती ; किंवा

(दोन) हस्तांतरकाने याबाबतीतील आपला अर्ज कलम ४८ मध्ये उल्लेखिलेल्या नोंदणी प्राधिकरणाकडे नोंदणी पोचदेय डाकेने पाठवला असेल तर, डाक कार्यालयाकडून स्वतःला मिळालेली डाक पोच पावती सादर करावी लागेल.

तसेच आपणास प्रमाणपत्र देण्याचे नाकारण्यात आल्याविषयी किंवा ज्याच्या अधीनतेने असे प्रमाणपत्र दिले जाईल अशा कोणत्याही निदेशाचे पालन करण्याविषयी अशा प्राधिकरणाकडून काहीही कळलेले नाही अशा अर्थाचे प्रतिज्ञापत्रही त्यासोबत करून द्यावे लागेल.

(ख) हस्तांतरिती, हस्तांतरण झाल्यापासून तीस दिवसांच्या आत, ज्याच्या अधिकारितेत त्याचे निवासस्थान किंवा, प्रकरणपरत्वे, जेथे सर्वसाधारणतः वाहन ठेवले जाते ते कामधंद्याचे ठिकाण असेल त्या नोंदणी प्राधिकरणास हस्तांतरणाचे वृत्त कळवील आणि त्या नोंदणी प्राधिकरणाकडे नोंदणी प्रमाणपत्र आणि त्यासोबत विहित फी व मालकीच्या हस्तांतरणाचा तपशील तो नोंदणी प्रमाणपत्र नमूद करता यावा यासाठी हस्तांतरकाकडून आपणास मिळालेल्या तपशिलाची प्रत पाठवील.

(२) ज्यावेळी—

(क) मोटार वाहन ज्या व्यक्तीच्या नावे नोंदवण्यात आले आहे ती व्यक्ती मरण पावते; किंवा

(ख) शासनाकडून किंवा शासनाच्यावतीने आयोजित केलेल्या जाहीर लिलावात मोटार वाहन खरेदी करण्यात किंवा मिळवण्यात आले असेल, तेव्हा

वाहनाच्या मालकाची उत्तराधिकारी असणारी व्यक्ती किंवा, प्रकरणपरत्वे, मोटार वाहन खरेदी करणारी वा मिळवणारी व्यक्ती, वाहनाची मालकी तिच्या नावे हस्तांतरित व्हावी म्हणून, ज्याच्या अधिकारितेत तिचे निवासस्थान किंवा वाहन सर्वसाधारणतः जेथे ठेवले जाते ती कामधंद्याची जागा असेल त्या नोंदणी प्राधिकरणाकडे केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, अशा फी सह आणि अशा कालावधीत अर्ज करील.

(३) हस्तांतरकाने किंवा हस्तांतरितीने पोटकलम (१) च्या खंड (क) किंवा, प्रकरणपरत्वे, खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत, हस्तांतरणाचे वृत्त नोंदणी प्राधिकरणाला कळविण्यात कसूर केली तर, किंवा पोटकलम (२) अन्वये (या कलमात यापुढे अन्य व्यक्ती म्हणून निर्देशिलेल्या) ज्या व्यक्तीने अर्ज करणे आवश्यक आहे तिने विहित कालावधीत असा अर्ज करण्यात कसूर केली तर नोंदणी प्राधिकरण, त्या प्रकरणाची एकूण परिस्थिती लक्षात घेऊन हस्तांतरकाला, हस्तांतरितीला किंवा, प्रकरणपरत्वे, अन्य व्यक्तीला तिच्याविरुद्ध कलम १७७ अन्वये जी कारवाई केली जाऊ शकेल त्याऐवजी पोटकलम (५) अन्वये विहित करण्यात येईल त्याप्रमाणे जास्तीत जास्त शंभर रुपये इतकी रक्कम भरण्यास फर्मावू शकेल :

परंतु, हस्तांतरकाने किंवा हस्तांतरितीने किंवा, प्रकरणपरत्वे, अन्य व्यक्तीने उक्त रक्कम भरण्यात कसूर केली तर, तिच्याविरुद्ध कलम १७७ अन्वये कारवाई करता येईल.

(४) एखाद्या व्यक्तीने पोटकलम (३) अन्वये रक्कम भरली असेल तेव्हा, तिच्याविरुद्ध कलम १७७ अन्वये कोणतीही कारवाई केली जाणार नाही.

(५) पोटकलम (३) च्या प्रयोजनार्थ, राज्य शासन, मोटार वाहनाच्या मालकीच्या हस्तांतरणाचे वृत्त कळविण्यात हस्तांतरकाने किंवा हस्तांतरितीने अथवा अन्य व्यक्तीने पोटकलम (२) अन्वये अर्ज करण्यात केलेल्या विलंबाचा कालावधी लक्षात घेऊन वेगवेगळ्या रकमा विहित करू शकेल.

(६) पोटकलम (१) अन्वये वृत्त मिळाल्यानंतर किंवा पोटकलम (२) अन्वये अर्ज आल्यानंतर नोंदणी प्राधिकरणाला मालकी हस्तांतरणाची नोंदणी प्रमाणपत्रात नोंद करवून घेता येईल.

(७) अशी कोणतीही नोंद करणारे, मूळ नोंदणी प्राधिकरणाहून अन्य असे नोंदणी प्राधिकरण हस्तांतरकास व मूळ नोंदणी प्राधिकरणास मालकीच्या हस्तांतरणाबाबत कळवील.

**भाडे-खरेदी इ. करारास अधीन असलेल्या मोटार वाहनांच्या संबंधातील विशेष उपबंध.**

५१. (१) भाडे-खरेदी, भाडेपट्टा किंवा गहाण कराराने (या कलमात यापुढे उक्त करार असा ज्याचा निर्देश केलेला आहे) धारण केलेल्या मोटार वाहनाच्या नोंदणीसाठी अर्ज करण्यात येईल तेव्हा नोंदणी प्राधिकरण सदर करार अस्तित्वात असल्याबद्दल नोंदणी प्रमाणपत्रात नोंद करील.

(२) या प्रकरणाखाली नोंदणी केलेल्या मोटार वाहनाची मालकी हस्तांतरित करण्यात आली असेल आणि हस्तांतरितीने कोणत्याही व्यक्तीबरोबर उक्त करार केला असेल तेव्हा, [1][अखेरचे नोंदणी प्राधिकरण] केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा नमुन्यात उक्त करारातील पक्षाकडून अर्ज आल्यानंतर, उक्त करार अस्तित्वात असल्याबद्दल नोंदणी प्रमाणपत्रात नोंद करील [2][आणि त्याबाबतची सूचना अखेरचे नोंदणी प्राधिकरण हे मूळ नोंदणी प्राधिकरण नसले तरी, मूळ नोंदणी प्राधिकरणास कळविण्यात येईल :]

(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये केलेली कोणतीही नोंद, केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा नमुन्यात अर्ज करण्यात आल्यानंतर, संबंधित पक्षांनी उक्त करार समाप्त केला असल्याचे शाबीत झाल्यास, [3][अखेरच्या नोंदणी प्राधिकरणास] रद्द करता येईल [4][आणि त्याबाबतची सूचना अखेरचे नोंदणी प्राधिकरण हे मूळ नोंदणी प्राधिकरण नसले तरी, मूळ नोंदणी प्राधिकरणास कळविण्यात येईल.]

(४) उक्त कराराखाली धारण केलेल्या मोटार वाहनाच्या मालकीच्या हस्तांतरणासंबंधीची नोंद, नोंदलेल्या मालकाने ज्या व्यक्तीबरोबर उक्त करार केला ती व्यक्ती म्हणून जिचे नाव नोंदणी प्रमाण पत्रात विनिर्दिष्ट करण्यात आले असेल अशा व्यक्तीच्या लेखी संमतीशिवाय नोंदणी प्रमाणपत्रात नमूद करण्यात येणार नाही.

(५) नोंदलेल्या मालकाने जिच्याबरोबर उक्त करार केला असेल ती व्यक्ती म्हणून जिचे नाव नोंदणी प्रमाणपत्रात विनिर्दिष्ट करण्यात आले असेल त्या व्यक्तीने जर, नोंदलेल्या मालकाने केलेल्या कसुरीमुळे उक्त कराराच्या उपबंधाअन्वये [5][नोंदणीकृत मालकाकडून] आपण वाहनाचा कब्जा घेतला आहे आणि नोंदलेला मालक नोंदणी प्रमाणपत्र सुपूर्द करण्यास नकार देत आहे किंवा तो परागंदा झालेला आहे अशी नोंदणी प्राधिकरणाची खात्री करून दिली तर, नोंदलेल्या मालक जसे अभिवेदन करू इच्छित असेल तसे करण्याची त्याला (नोंदणी प्रमाणपत्रात नमूद केलेल्या त्याच्या पत्त्यावर पोचदेय नोंदणी डाकेने त्याला नोटीस पाठवून) संधी दिल्यानंतर आणि त्याच्यापुढे नोंदणी प्रमाणपत्र सादर करण्यात आले नसले तरीही, असे प्राधिकरण प्रमाणपत्र रद्द करू शकेल आणि नोंदणी केलेल्या मालकाने जिच्याशी उक्त करार केला असेल त्या व्यक्तीच्या नावे नवीन नोंदणी प्रमाणपत्र देऊ शकेल :

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम १४ (क) (एक) अन्वये मूळ मजकुराऐवजी घातले, (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १४ (क) (दोन) अन्वये जादा दाखल केले, (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १४ (ख) (एक) अन्वये मूळ मजकुराऐवजी घातले, (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम १४ (ख) (दोन) अन्वये जादा दाखल केले, (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम १४ (ग) अन्वये मूळ मजकुराऐवजी घातला, (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

परंतु, त्या व्यक्तीने विहित फी भरल्याखेरीज, तिला त्या मोटार वाहनाच्या बाबतीतील नवीन नोंदणी प्रमाणपत्र दिले जाणार नाही :

परंतु आणखी असे की, परिवहनाव्यतिरिक्त अन्य एखाद्या मोटार वाहनाच्या बाबतीत दिलेले नवीन नोंदणी प्रमाणपत्र हे, या पोटकलमानुसार रद्द करण्यात आलेले प्रमाणपत्र जेवढ्या उर्वरित कालावधी-पुरते अंमलात राहिले असते तेवढ्या कालावधीपुरतेच विधिग्राह्य राहील.

(६) कलम ८१ अन्वये परवान्याच्या नूतनीकरणासाठी किंवा कलम ४१ च्या पोटकलम (१४) अन्वये नोंदणी प्रमाणपत्राची दुसरी प्रत द्यावी म्हणून किंवा कलम ४७ अन्वये नवीन नोंदणी चिन्ह नेमून द्यावे [1][यासाठी किंवा दुसऱ्या राज्यात वाहन हलवण्यासाठी किंवा वाहनाचे परिवर्तन एका वर्गामधून दुसऱ्या वर्गात करण्यासाठी किंवा कलम ४८ अन्वये ना-हरकत प्रमाणपत्र मिळविण्यासाठी किंवा कलम ४९ अन्वये रहिवासाचे किंवा कामधंद्याचे ठिकाणातील बदलासाठी किंवा कलम ५२ अन्वये वाहनात फेरबदल करण्यासाठी] म्हणून समुचित प्राधिकरणाकडे अर्ज करण्यापूर्वी नोंदणी केलेल्या मालकाला, ज्या व्यक्तीशी त्या मालकाने उक्त करार केलेला असेल (अशा व्यक्तीचा या कलमात यापुढे "वित्तदाता" म्हणून निर्देश केलेला आहे) त्या व्यक्तीकडे ना-हरकत प्रमाणपत्रासाठी (या कलमात यापुढे "प्रमाणपत्र" म्हणून निर्देशिलेले) अर्ज करावा लागेल.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या आणि पोटकलमे (८) व (९) यांच्या प्रयोजनार्थ, "समुचित प्राधिकरण" याचा कोणत्याही परवान्याच्या संबंधातील अर्थ, या अधिनियमाद्वारे अशा परवान्याचे नूतनी-करण करण्यास प्राधिकृत केलेले प्राधिकरण आणि नोंदणी संबंधात, नोंदणी प्रमाणपत्राची दुसरी प्रत देण्यास किंवा नवीन नोंदणी चिन्ह नेमून देण्यास या अधिनियमान्वये प्राधिकृत केलेले प्राधिकरण असा आहे.

(७) पोटकलम (६) अन्वये अर्ज मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत वित्तदाता, ज्यासाठी अर्ज करण्यात आला आहे ते प्रमाणपत्र देऊ शकेल किंवा देण्याचे नाकारू शकेल, मात्र नकाराची कारणे लेखी नमूद करून अर्जदाराला कळवावी लागतील आणि जर वित्तदात्याने उक्त सात दिवसांच्या आत प्रमाणपत्र दिले नाही आणि प्रमाणपत्र देण्यास नकार देण्यामागची कारणे अर्जदाराला कळवण्यात कसूर केली तर ज्यासाठी अर्ज करण्यात आला होता ते प्रमाणपत्र वित्तदात्याने दिले आहे असे मानण्यात येईल.

(८) नोंदणी केलेल्या मालकाला, एखाद्या परवान्याच्या नूतनीकरणासाठी कलम ८१ अन्वये किंवा कलम ४१ च्या पोटकलम (१४) अन्वये नोंदणी प्रमाणपत्राच्या दुसऱ्या प्रतीसाठी शासनाकडे अर्ज करताना किंवा कलम ४७ अन्वये नवीन नोंदणी चिन्ह नेमून देण्यासाठी अर्ज करताना, अशा अर्जासोबत, पोटकलम (७) अन्वये एखादे प्रमाणपत्र मिळवलेले असल्यास ते अथवा, असे प्रमाणपत्र मिळवलेले नसेल तेव्हा त्या पोटकलमान्वये वित्तदात्याकडून मिळालेली संसूचना किंवा प्रकरणपरत्वे, वित्तदात्याकडून त्या पोटकलमात विनिर्दिष्ट केलेल्या सात दिवसांच्या कालावधीत काहीही कळविण्यात आलेले नाही अशा अर्थाचे प्रतिज्ञा-पन, सादर करावे लागेल.

(९) उक्त करारानुसार धारण केलेल्या वाहनाच्या बाबतीत कोणत्याही परवान्याच्या नूतनी-करणासाठी किंवा नोंदणी प्रमाणपत्राची दुसरी प्रत देण्यासाठी किंवा नवीन नोंदणी चिन्ह नेमून देण्यासाठी केलेला अर्ज मिळाल्यानंतर, समुचित प्राधिकरण, या अधिनियमाच्या इतर उपबंधाच्या अधीनतेने,—

(क) जेव्हा अर्जाद्वारे मागितलेले प्रमाणपत्र देण्यास वित्तदात्याने नकार दिलेला असेल त्याबाबतीत, अर्जदारास आपले म्हणणे मांडण्याची संधी देऊन नंतर, एकतर—

(एक) त्या परवान्याचे नूतनीकरण करू शकेल किंवा नूतनीकरणास नकार देऊ शकेल, अथवा;

(दोन) नोंदणी प्रमाणपत्राची दुसरी प्रत देईल किंवा देण्यास नकार देईल, अथवा;

(तीन) नवीन नोंदणी चिन्ह नेमून देईल किंवा नेमून देण्याचे नाकारील ;

(ख) अन्य कोणत्याही बाबतीत,—

(एक) परवान्याचे नूतनीकरण करील, किंवा

(दोन) नोंदणी प्रमाणपत्राची दुसरी प्रत देईल, किंवा

(तीन) नवीन नोंदणी चिन्ह नेमून देईल.

(१०) नोंदणी प्रमाणपत्रात नोंदी करणारे नोंदणी प्राधिकरण,—

(क) मोटार वाहनाचा भाडे-खरेदी, भाडेपट्टा किंवा तारण-गहाण करार, किंवा

(ख) पोटकलम (३) अन्वये रद्द झालेली नोंद, किंवा

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम १४ (घ) अन्वये मूळ मजकुराऐवजी घालण्यात आला, (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(ग्) मोटार वाहनाच्या मालकीचे हस्तांतरण अभिलिखित करणे, किंवा

(घ्) मोटार वाहनातील कोणताही फेरबदल, किंवा

(ङ्) मोटार वाहनाच्या नोंदणीचे निलंबन किंवा ते रद्द करणे, किंवा

(च्) पत्त्यातील बदल.

या संबंधात अशा नोंद करण्यात आला असल्याचे वित्त दात्याला [1][पोच देय नोंदणाकृत डाकेने] कळवील.

[2][(११) नवीन वाहनाचा नोंदणी करणारे किंवा नोंदणी प्रमाणपत्राची दुसरी प्रत देणारे किंवा ना-हरकत प्रमाणपत्र देणारे किंवा तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र देणारे किंवा क्षमता प्रमाणपत्र देणारे किंवा त्याचे नुतनीकरण करणारे किंवा परवान्यामध्ये आधीच्या नोंदीच्या जागी दुसऱ्या मोटार वाहना संबंधातील नोंदी घेणारे नोंदणी प्राधिकरण अशा व्यवहाराबाबत वित्तदात्याला कळवील.

(१२) नोंदणी प्राधिकरण हे मूळ नोंदणी प्राधिकरण नसेल त्याबाबतीत पोटकलमे (१) किंवा (२) अन्वये नोंद करतेवेळी किंवा पोटकलम (३) अन्वये उक्त नोंद करतेवेळी किंवा पोटकलम (५) अन्वये नोंदणी प्रमाणपत्र देतेवेळी त्याबाबत मूळ नोंदणी प्राधिकरणाला कळवील.]

**मोटार वाहनात फेरबदल करणे.** ५२. (१) मोटार वाहनात ज्या प्रकारचा फेरबदल करण्याने नोंदणी प्रमाणपत्रात अंतर्भूत असलेला तपशील मुळाशी तंतोतंत जुळता राहणार नाही अशा प्रकारचा कोणताही फेरबदल करावयाचे असल्यास मोटार वाहनाच्या मालकाने,—

(क्) ज्याच्या अधिकारितेत त्याचे निवासस्थान किंवा, प्रकरणपरत्वे, जेथे त्याचे वाहन सामान्यतः ठेवले जाते ते कामधंद्याचे ठिकाण असेल त्या नोंदणी प्राधिकरणाला आपण करू इच्छिता असलेल्या फेरबदलाची नोटीस दिल्याशिवाय; आणि

(ख्) असा फेरबदल करण्यास नोंदणी प्राधिकरणाची मान्यता मिळविल्याशिवाय, त्याला त्याला असा फेरबदल करता येणार नाही :

परंतु, जोडसामग्री किंवा उपसाधन बसविल्याने किंवा काढून टाकल्याने परिणामी मोटार वाहनाच्या भाररहित वजनात होणारा कोणताही बदल नोंदणी प्रमाणपत्रात नमूद केलेल्या वजनाच्या दोन टक्क्यांहून अधिक नसेल तर, असा बदल करण्यासाठी अशी मान्यता मिळण्याची आवश्यकता असणार नाही.

[3][परंतु आणखी असे की, वेगळ्या प्रकारचे इंधन किंवा बॅटरी, संपीडित नैसर्गिक वायू, सौर बीज किंवा इतर प्रकारचे इंधन किंवा द्रवरूप पेट्रोलियम वायू यांसह वेगळ्या प्रकारचे इंधन किंवा उर्जास्त्रोत याद्वारे वाहन चालवणे सुकर करण्यासाठी वाहनाच्या इंजिनात किंवा त्याच्या कोणत्याही भागात केलेला फेरबदल हा फेरफार असल्याचे मानण्यात येईल आणि तो विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीन असेल.]

(२) नोंदणी प्राधिकरणास पोटकलम (१) खाली नोटीस मिळाली असेल तेथ, ती मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत ते प्रस्तावित फेरबदलास आपली मान्यता आहे किंवा कसे ते वाहनाच्या मालकास डाकेने सूचित करील :

परंतु, मोटार वाहनाच्या मालकास उक्त सात दिवसांच्या कालावधीत अशी कोणतीही सूचना मिळाली नसेल तेथे, प्रस्तावित फेरबदलास अशा प्राधिकरणाने मान्यता दिली असल्याचे मानण्यात येईल.

(३) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन, शासकिय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे किमान दहा परिवहन वाहनांचे मालक असलेल्या व्यक्तींना त्यांच्या मालकीच्या कोणत्याही वाहनाचे इंजिन बदलण्याच्या स्वरूपाचा असा फेरबदल नोंदणी प्राधिकरणाच्या मान्यतेशिवाय करण्यास अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, प्राधिकृत करू शकेल.

(४) एखाद्या मोटार वाहनात पोटकलम (२) खाली नोंदणी प्राधिकरणाची मान्यता घेऊन किंवा त्याची मान्यता असल्याचे मानले जाऊन अथवा पोटकलम (३) खाली अशा मान्यतेशिवाय त्याचे इंजिन बदलण्यात आल्यामुळे कोणताही फेरबदल करण्यात आला असेल तेव्हा, तो फेरबदल केल्यापासून चौदा दिवसांच्या आत मोटार वाहनाचा मालक ज्याच्या अधिकारितेत तो राहत असेल त्या नोंदणी प्राधिकरणास फेरबदलाविषयी कळवील आणि फेरबदलाचा तपशील नोंदणी प्रमाणपत्रात नमूद करता यावा म्हणून ते नोंदणी प्रमाणपत्र व सोबत विहित फी त्या प्राधिकरणाकडे पाठवील.

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम १४ (ङ्) अन्वये मूळ मजकुराऐवजी घातला (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १४ (च्) अन्वये मूळ मजकुराऐवजी घातला, (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १५ (एक) अन्वये परंतुक दाखल करण्यात आले (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(५) अशी कोणतीही नोंद करणारे मूळ नोंदणी प्राधिकरणाहून अन्य असे नोंदणी प्राधिकरण नोंदीचा तपशील मूळ नोंदणी प्राधिकरणास कळवील.

१(६) भाडे खरेदी करारान्वये वाहन धारण करणारी कोणतीही व्यक्ती ज्यासाठी पोट-कलम (१) अन्वये नोंदणी प्राधिकरणाची लेखी संमती मिळवणे आवश्यक आहे असा कोणताही फेरफार नोंदलेल्या मालकाची लेखी संमती घेतल्याखेरीज करणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ "फेरफार" याचा अर्थ ज्याच्या परिणामी वाहनाच्या मूलभूत वैशिष्ट्यामध्ये होत असेल, असा वाहनाच्या संरचनेतील बदल असा आहे.']

**५३.** (१) जर कोणत्याही नोंदणी प्राधिकरणास किंवा अन्य विहित केलेल्या प्राधिकरणास, त्याच्या अधिकारितेत असलेले कोणतेही मोटार वाहन,— **नोंदणीचे निलंबन.**

(क) सार्वजनिक ठिकाणी त्याचा उपयोग करणे लोकांना धोकादायक ठरेल अशा स्थितीत आहे, अथवा ते या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या आवश्यकतेनुसार नाही, किंवा.

(ख) भाडे किंवा बक्षीस याकरिता त्याचा उपयोग करण्याचा विधिग्राह्य परवाना नसताना असे उपयोगात आणले आहे किंवा उपयोगात आणण्यात येत आहे.

असे समजण्यास कारण असेल तर, मालकास जे कोणतेही अभिवेदन करण्याची इच्छा असेल ते करण्याची त्याला (मालकास नोंदणी प्रमाणपत्र नमूद केलेल्या त्याच्या पत्त्यावर पोचदेय नोंदणी डाकेने नोटीस पाठवून) संधी दिल्यानंतर, ते प्राधिकरण कारणे लेखी नमूद करून वाहनाच्या नोंदणीचे प्रमाणपत्र,—

(एक) खंड (क) खाली येणाऱ्या कोणत्याही प्रकरणी त्याचे समाधान होईल इतपत दोष सुधारण्यात येईपर्यंत ; आणि

(दोन) खंड (ख) खाली येणाऱ्या कोणत्याही प्रकरणी, जास्तीत जास्त चार महिने इतक्या काळापर्यंत ;

निलंबित करू शकेल.

(२) नोंदणी प्राधिकरणाहून अन्य प्राधिकरण, पोटकलम (१) खाली निलंबन आदेश देताना निलंबन वृत्त व त्याची कारणे, निलंबनाच्या वेळी वाहन ज्याच्या अधिकारितेत असेल त्या नोंदणी, प्राधिकरणास लेखी कळवील.

(३) मोटार वाहनाची नोंदणी किमान एक महिना इतक्या सलग कालावधीपुरती पोटकलम (१) खाली निलंबित करण्यात आली असेल तर, नोंदणी निलंबित करण्यात आली तेव्हा वाहन ज्याच्या अधिकारितेत होते असे नोंदणी प्राधिकरण, ते मूळचे नोंदणी प्राधिकरण नसल्यास, त्या मूळच्या प्राधिकरणास, निलंबनाची माहिती कळवील.

(४) या कलमाखाली मोटार वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्र ज्याने निलंबित केले असेल त्या नोंदणी प्राधिकरणाने किंवा विहित केलेल्या अन्य प्राधिकरणाने मागणी केल्यास, वाहनाच्या मालकाला नोंदणी प्रमाणपत्र स्वाधीन करावे लागेल.

(५) पोट-कलम (४) खाली स्वाधीन केलेले नोंदणी प्रमाणपत्र नोंदणी निलंबित करणारा आदेश विखंडित होईल तेव्हा मालकास परत करण्यात येईल, त्यापूर्वी नव्हे.

**५४.** कलम ५३ खाली वाहनाची निलंबित केलेली नोंदणी किमान सहा महिन्यांच्या कालावधीपर्यंत विनाव्यत्यय चालू राहिली असेल तेव्हा, नोंदणी निलंबित झाली त्यावेळी वाहन ज्याच्या अधिकारितेत होते ते नोंदणी प्राधिकरण, ते मूळ प्राधिकरण असेल तर, नोंदणी रद्द करील आणि ते मूळ प्राधिकरण नसेल तर, जे प्राधिकरण नोंदणी रद्द करू शकेल त्या प्राधिकरणाकडे ते नोंदणी प्रमाणपत्र पाठवील. **कलम ५३ अन्वये निलंबित केलेली नोंदणी रद्द करणे.**

**५५.** (१) जर एखादे मोटार वाहन नष्ट झाले असेल किंवा कायमचे निरुपयोगी झाले असेल तर, मालकाला, ज्याच्या अधिकारितेत तो रहात असेल किंवा, प्रकरणपरत्वे, वाहन सर्वसाधारणतः जेथे ठेवले जाते ते व्यवसायाचे ठिकाण ज्याच्या अधिकारितेत असेल त्या नोंदणी प्राधिकरणाकडे ते वृत्त चौदा दिवसांच्या आत किंवा होईल तितक्या लवकर कळवावे लागेल आणि वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्र त्या प्राधिकरणाकडे पाठवावे लागेल. **नोंदणी रद्द करणे.**

(२) एखादे नोंदणी प्राधिकरण हे मूळ नोंदणी प्राधिकरण असेल तर ते नोंदणी व नोंदणी प्रमाणपत्र रद्द करील किंवा जर ते तसे नसेल तर, ते मूळ नोंदणी प्राधिकरणाकडे तो अहवाल आणि नोंदणी प्रमाणपत्र पाठवील आणि ते प्राधिकरण नोंदणी आणि नोंदणी प्रमाणपत्र रद्द करील.

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम १५ (दोन) अन्वये पोटकलम ६ व स्पष्टीकरण नव्याने घालण्यात आले (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून).

(३) कोणतेही नोंदणी प्राधिकरण, आपल्या अधिकारतेतील मोटार वाहनाची, राज्य शासन आदेशाद्वारे नियुक्ती करील अशा प्राधिकरणाकडून तपासणी करण्यात यावी असा आदेश देऊ शकेल आणि अशी तपासणी झाल्यावर आणि मालक जे कोणतेही अभिवेदन करु इच्छित असेल ते करण्याची त्याला (मालकाला नोंदणी प्रमाणपत्रात नमूद असलेल्या त्याच्या पत्त्यावर पोचदेय नोंदणी डाकेने नोटीसा पाठवून) संधी दिल्यानंतर, जर वाहन अशा स्थितीत आहे कीं, त्याचा उपयोग करणे अशक्य आहे किंवा सार्वजनिक ठिकाणी त्याचा उपयोग करणे लोकांना धोकादायक होईल आणि ते वाजवी दुरुस्तीच्या पलिकडे गेलेले आहे अशी नोंदणी प्राधिकरणाची खात्री झाली तर त्याला वाहनाची नोंदणी रद्द करता येईल.

(४) एखादे मोटार वाहन भारतातून कायमचे हलवण्यात आले आहे अशी जर नोंदणी प्राधिकरणाची खात्री झाली तर, नोंदणी प्राधिकरण नोंदणी रद्द करील.

(५) एखाद्या महत्त्वाच्या तपशिलाबाबत खोट्या असलेल्या दस्तऐवजांच्या आधारे किंवा अशा तपशिलाबाबत खोट्या गोष्टींचे अभिवेदन करून एखाद्या मोटार वाहनाची नोंदणी करवून घेतलेली आहे अथवा त्यावर उमटरेखित केलेला इंजिन क्रमांक वा न्याधार क्रमांक हे नोंदणी प्रमाणपत्रात नमूद केलेल्या अशा क्रमांकापेक्षा वेगळे आहेत अशी नोंदणी प्राधिकरणाची खात्री पटली तर नोंदणी प्राधिकरण (मालकाला नोंदणी प्रमाणपत्रात नमूद केलेल्या त्याच्या पत्त्यावर पोचदेय नोंदणी डाकेने नोटीस पाठवून) मालकाला जर काही अभिवेदन करण्याची इच्छा असेल तर अशी त्यास संधी देऊन आणि कारणे लेखी नमूद करून त्या वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द करील.

(६) कलम ५४ खाली किंवा या कलमाखाली एखाद्या मोटार वाहनाची नोंदणी रद्द करणारे नोंदणी प्राधिकरण, असे वृत्त वाहनाच्या मालकास लेखी कळविल आणि वाहनाचा मालक वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्र या प्राधिकरणाच्या तात्काळ स्वाधीन करील.

(७) कलम ५४ खाली किंवा या कलमान्वये नोंदणी रद्द करण्याचा आदेश देणारे नोंदणी प्राधिकरण हे मूळ नोंदणी प्राधिकरण असेल तर, नोंदणी प्रमाणपत्र व वाहनासंबंधीच्या आपल्या अभिलेखात असलेली नोंद ते रद्द करील आणि जर ते मूळ नोंदणी प्राधिकरण नसेल तर, नोंदणी प्रमाणपत्र त्या मूळ प्राधिकरणाकडे पाठवील आणि ते प्राधिकरण नोंदणी प्रमाणपत्र व मोटार वाहना संबंधीची त्याच्या अभिलेखात असलेली नोंद रद्द करील.

(८) या कलमातील आणि कलमे ४१, ४९, ५०, ५१, ५२, ५३ व ५४ यातील "मूळ नोंदणी प्राधिकरण" या शब्दप्रयोगाचा अर्थ, ज्याच्या अभिलेखात वाहनाची नोंदणी नमूद करण्यात आली आहे ते नोंदणी प्राधिकरण, असा आहे.

(९) या कलमातील "नोंदणी प्रमाणपत्र" या संज्ञेत या अधिनियमाच्या उपबंधान्वये नूतनीकरण केलेल्या नोंदणी प्रमाणपत्राचा समावेश आहे.

**परिवाहनाचे योग्यता प्रमाणपत्र.** ५६. (१) कलम ५९ व ६० च्या उपबंधाच्या अधीनतेने, एखाद्या परिवहन वाहनाला ते त्या त्या वेळी या अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या सर्व आवश्यकतांनुरुप आहे अशा आशयाचे केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल असा तपशील व माहिती असलेले, विहित प्राधिकरणाने किंवा पोटकलम (२) मध्ये उल्लेखिलेल्या प्राधिकृत चाचणी केंद्राने दिलेले योग्यता प्रमाणपत्र मिळालेले नसेल तर कलम ३९ च्या प्रयोजनार्थ ते मोटारवाहन वैधरितीने नोंदलेले असल्याचे मानले जाणार नाही :

परंतु, विहित प्राधिकरण किंवा प्राधिकृत चाचणी केंद्र असे प्रमाणपत्र देण्याचे नाकारील तेथे, ते वाहनाच्या मालकाला अशा नकाराची कारणे लेखी कळवील.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेले "प्राधिकृत चाचणी केंद्र" याचा अर्थ, अशी चाचणी केंद्रे किंवा दुरुस्ती कक्ष यांचे विनियमन व नियंत्रण यासाठी केंद्र शासनाने केलेल्या नियमांनुसार, राज्य शासन, एखाद्या चाचणी केंद्राच्या वा दुरूस्ती कक्षाच्या चालकाचा अनुभव, त्याचे प्रशिक्षण व कार्यक्षमता आणि त्यातील चाचणीची साधनसामग्री व चाचणी कर्मचारीवर्ग या सर्व गोष्टी विचारात घेऊन विनिर्दिष्ट करील असे वाहन संधारण केंद्र किंवा सरकारी वा खाजगी दुरुस्ती कक्ष असा आहे.

(३) पोटकलम (४) च्या उपबंधाच्या अधीनतेने, योग्यता प्रमाणपत्र केंद्र शासनाने या अधिनियमाची उद्दिष्टे लक्षात घेऊन विहित केले असेल त्या कालावधीपुरते परिणामक राहील.

(४) विहित प्राधिकरण, कोणत्याही वेळी एखादे योग्यता प्रमाणपत्र ते ज्याच्याशी संबधीत आहे असे वाहन या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या सर्व आवश्यकतानुरुप राहिलेले नाही अशी त्याची खात्री झाली तर, कारणे लेखी अभिलिखीत करुन रद्द करू शकेल. आणि ते रद्द झाल्यावर, वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्र आणि त्या वाहनाच्या संबधात प्रकरण पाच खाली देण्यात आलेला कोणताही परवाना नवीन योग्यता प्रमाणपत्र मिळेपर्यंत निलंबित असल्याचे मानले जाईल:

[1][परंतु, विहित करण्यात येईल अशी तांत्रिक अर्हता असे विहित प्राधिकरण धारण करीत असल्याखेरीज किंवा विहित प्राधिकरणाकडे अशी कोणतीही तांत्रिक अर्हता नसेल, तर अशा बाबतीत अशी अर्हता असलेल्या अधिकाऱ्याच्या अहवालावर आधारित असेल त्याखेरीज विहित प्राधिकरण असे कोणतेही प्रमाणपत्र रद्द करणार नाही.]

---

१. १९९४ चा अधिनियम ५४ कलम १६ अन्वये परंतुक दाखल करण्यात आले (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(५) या अधिनियमाखाली देण्यात आलेले योग्यता प्रमाणपत्र ते परिणामक असेतोवर, संपूर्ण भारतात विधिग्राह्य असेल.

५७. [1][(१) नोंदणी प्राधिकरणाने, कलमे ४१, ४२, ४३, ४५, ४७, ४८, ४९, ५०, ५२, ५३, ५५ किंवा ५६ अन्वये काढलेल्या आदेशामुळे पीडित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, तिला अशा आदेशाची नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत त्या आदेशाविरुद्ध विहित प्राधिकरणाकडे अपील करता येईल.] अपिले.

(२) अपील प्राधिकरण मूळ प्राधिकरणास अपिलाची नोटीस देईल आणि मूळ प्राधिकरणास व अपीलकर्त्यास आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर ते आपणास योग्य वाटतील असे आदेश देईल.

५८. (१) (मोटार कॅब सोडून) अन्य परिवहन वाहनाच्या चाकांना लावलेल्या टायरांची संख्या, स्वरूप व आकारमान आणि त्यांची बनावट, मॉडेल व अन्य संबद्ध विचारार्ह बाबी लक्षात घेऊन केंद्र शासनाला, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, परिवहन वाहनाच्या प्रत्येक बनावटीच्या व मॉडेलच्या संबंधात अशा वाहनाचे [2][कमाल एकूण वाहन वजन] अशा वाहनाच्या प्रत्येक अक्षलाचे कमाल सुरक्षित अक्षल वजन विहित करता येईल. परिवहन वाहना-संबंधी विशेष उपबंध.

(२) मोटार कॅब सोडून अन्य परिवहन वाहनाची नोंदणी करताना नोंदणी प्राधिकरण नोंदणी अभिलेखात व वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्रामध्येही पुढील तपशील नमूद करील, तो असा—

(क) वाहनाचे भाररहित वजन;

(ख) प्रत्येक चाकाला लावलेल्या टायरांची संख्या, स्वरूप व आकारमान;

(ग) वाहनाचे एकूण वाहन वजन आणि त्याच्या वेगवेगळ्या अक्षलासंबंधीचे नोंदलेले अक्षलवजन; आणि

(घ) जर वाहन फक्त उतारुंची ने-आण करण्यासाठीच किंवा मालाबरोबर उतारुंची ने-आण करण्यासाठी उपयोगात आणण्यात येत असेल किंवा तसा उपयोग करण्याच्या दृष्टीने अनुकूल बदल करून घेतलेला असेल तर, जितक्या उतारुंची सोय करण्यात आली असेल ती संख्या,—

आणि वाहनाच्या मालकाला, तो तपशील वाहनावर विहित रीतीने प्रदर्शित करावा लागेल.

(३) अशा कोणत्याही वाहनाची बनावट व मॉडेल आणि त्याच्या चाकांना लावलेल्या टायरांची संख्या, स्वरूप व आकारमान यासंबंधात पोटकलम (१) खालील अधिसूचनेत जे विनिर्दिष्ट केले असेल त्यापेक्षा भिन्न असे कोणतेही एकूण वाहन वजन किंवा अशा त्याच्या कोणत्याही अक्षलाचे नोंदलेले अक्षल वजन नोंदणी प्रमाणपत्रात नमूद करता येणार नाही :

परंतु, जेथे विशिष्ट प्रकारच्या असलेल्या वाहनांसाठी एखाद्या विशिष्ट स्थानिक भागात पोटकलम (१) खालील अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्यापेक्षा अधिक अवजड वजनभारांना मुभा देण्यात यावी असे केंद्र शासनास वाटेल तेथे शासकीय राजपत्रातील आदेशाद्वारे केंद्र शासन, या पोटकलमाचे उपबंध, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा फेरफारांसह लागू होतील असे निर्देशित करू शकेल.

(४) जेव्हा अशा वाहनात, त्याच्या टायरांची संख्या, स्वरूप व आकारमान यामधील फेरबदलासह केलेल्या कोणत्याही फेरबदलामुळे वाहनाचे एकूण वाहन वजन किंवा त्याच्या कोणत्याही अक्षलाचे नोंदलेले अक्षलवजन पोटकलम (३) च्या उपबंधानुसार राहिले नसेल तेव्हा, कलम ५२ चे उपबंध लागू होतील आणि नोंदणी प्राधिकरण उक्त पोटकलमानुरूप असलेल्या अशा सुधारित नोंदलेल्या वजनाची वाहनाच्या नोंदणीपत्रात नोंद करील.

(५) वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्रात नमूद केलेले एकूण वाहन वजन पोटकलम (३) च्या उपबंधानुसार सुधारण्यात यावे यासाठी, नोंदणी प्राधिकरण विहित करण्यात येईल अशा प्रक्रियेनुसार परिवहन वाहनाच्या मालकाने नोंदणी प्राधिकरणाकडून विहित करण्यात येईल अशा मुदतीत नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे असे फर्मावू शकेल.

५९. (१) सार्वजनिक सुरक्षितता, सोय आणि अधिनियमाची उद्दिष्टे लक्षात घेऊन, केंद्र शासनाला, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, मोटार वाहनाची निर्मिती झाल्या दिवसापासून मोजले जाणारे त्याचे आयुर्मान विनिर्दिष्ट करता येईल आणि ती मुदत संपल्यानंतर मोटार वाहन या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या आवश्यकतानुरूप असल्याचे मानले जाणार नाही : मोटार वाहनांचे आयुर्मान निश्चित करण्याची शक्ती.

परंतु, केंद्र शासनाला, निरनिराळ्या वर्गाच्या किंवा निरनिराळ्या प्रकारच्या मोटार वाहनांसाठी वेगवेगळे आयुर्मान विनिर्दिष्ट करता येईल.

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम १७ अन्वये मूळ मजकुराऐवजी घालण्यात आला (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १८ अन्वये मूळ मजकुराऐवजी घालण्यात आला (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही असले तरी, केंद्र शासनाला, प्रदर्शनात मांडणे किंवा कोणत्याही प्रदर्शनात प्रात्यक्षिकासाठी उपयोगात आणणे किंवा तांत्रिक संशोधनासाठी उपयोग करणे वा व्हिंटेज कार रॅलीमध्ये भाग घेणे यांसारखी मोटार वाहनांची प्रयोजने लक्षात घेऊन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे; अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने सर्वसाधारणपणे वा विशेष आदेशाद्वारे, कोणत्याही वर्गाच्या वा प्रकाराच्या मोटार वाहनाला, अधिसूचनेत प्रयोजने नमूद करून पोटकलम (१) च्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

(३) कलम ५६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, कोणतेही विहित प्राधिकरण किंवा प्राधिकृत चाचणी केंद्र, पोटकलम (१) अन्वये काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेच्या उपबंधांचे उल्लंघन करून एखाद्या मोटार वाहनाला योग्यता प्रमाणपत्र देणार नाही.

**केंद्र शासनाच्या मालकीच्या वाहनांची नोंदणी.**

६०. (१) केंद्र शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा प्राधिकरणाला केंद्र शासनाची मालमत्ता असलेल्या किंवा त्या त्या वेळी केवळ त्याच्या एकटयाच्याच नियंत्रणाखाली असलेल्या आणि देशाच्या संरक्षणाशी संबंधित शासकीय प्रयोजनासाठी उपयोगात आणलेल्या व कोणत्याही वाणिज्यिक उपक्रमाशी संबंधित नसलेल्या अशा कोणत्याही मोटार वाहनाची नोंदणी करता येईल आणि अशा प्रकारे नोंदवण्यात आलेले कोणतेही वाहन, ते केंद्र शासनाची मालमत्ता असेपर्यंत किंवा पूर्णपणे केंद्र शासनाच्या नियंत्रणाखाली असेपर्यंत, या अधिनियमान्वये अन्यथा त्याची नोंदणी करण्याची आवश्यकता असणार नाही.

(२) पोटकलम (१) खाली वाहनाची नोंदणी करणारे प्राधिकरण, केंद्र शासनाने यासंबंधात केलेल्या नियमांमध्ये समाविष्ट असलेल्या उपबंधानुसार नोंदणी चिन्ह नेमून देईल आणि असे वाहन त्या त्या वेळी या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या आवश्यकतानुरूप आहे व ते वाहन या कलमान्वये नोंदण्यात आले आहे अशा आशयाचे प्रमाणपत्र त्या वाहनासंबंधात देईल.

(३) या कलमाखाली नोंदणी केलेल्या वाहनासोबत पोटकलम (२) अन्वये दिलेले प्रमाणपत्र असेल.

(४) या कलमाखाली नोंदणी केलेले वाहन केंद्र शासनाच्या मालकीचे किंवा त्याच्या एकटयाच्याच नियंत्रणाखाली राहिले नाही तर, कलमे ३९ व ४० चे उपबंध त्यानंतर लागू होतील.

(५) पोटकलम (१) खाली वाहनाची नोंदणी करणारे प्राधिकरण हे वाहनाचे सर्वसाधारण स्वरूप एकंदर आकारमान आणि त्याचे अक्षलवजन यासंबंधी कोणत्याही राज्य शासनाला, त्याला कोणत्याही वेळी लागेल अशी सर्व माहिती पुरवील.

**अनुवाहनांना हे प्रकरण लागू करणे.**

६१. (१) या प्रकरणाचे उपबंध ते ज्याप्रमाणे, अन्य कोणत्याही मोटार वाहनाच्या नोंदणीला लागू होतात त्याचप्रमाणे अनुवाहनाच्या नोंदणीला लागू होतील.

(२) अनुवाहनाला नेमून दिलेले नोंदणी चिन्ह, केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा रीतीने, अनुवाहन ओढून नेणाऱ्या वाहनाच्या बाजूवर दाखवले जाईल.

(३) अनुवाहन किंवा अनुवाहने जोडून जे मोटार वाहन चालवले जात असेल त्याचे नोंदणी चिन्ह केंद्र शासनाकडून विहित करण्यात आलेल्या रीतीने अनुवाहनावर किंवा साखळीतील शेवटच्या अनुवाहनावर दाखवण्यात आल्याशिवाय, कोणत्याही व्यक्तीला याप्रमाणे ते मोटार वाहन चालवता येणार नाही.

**चोरीस गेलेल्या आणि पुन्हा ताब्यात घेतलेल्या मोटार वाहनांसंबंधातील माहिती पोलिसांनी राज्य परिवहन प्राधिकरणाला देणे.**

६२. राज्य शासनाला, लोकहिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक व इष्ट वाटले तर, चोरीस गेलेली वाहने व चोरीस गेलेल्यांपैकी जी वाहने पुन्हा ताब्यात घेतली असल्याचे पोलीसांना माहीत आहे त्या वाहनासंबंधीची माहिती अंतर्भूत असलेली अशी विवरणपत्रे पोलीस महानिरीक्षक (कोणत्याही पदनामाने संबोधिले जात असो) आणि राज्य शासन यासंबंधात विहित करील असे इतर पोलीस अधिकारी यांनी राज्य परिवहन प्राधिकरणाला सादर करण्याविषयी निर्देशित करता येईल आणि अशी विवरणपत्रे कोणत्या नमुन्यात आणि किती कालावधीत तयार केली जावी ते विहित करता येईल.

**मोटार वाहनांच्या राज्य नोंदवह्या ठेवणे.**

६३. (१) प्रत्येक राज्य शासन, त्या राज्यातील मोटार वाहनाच्या संबंधात, केंद्र सरकारकडून विहित करण्यात येईल अशा नमुन्यात मोटार वाहनांची राज्य नोंदवही असे म्हटले जाणारी नोंदवही ठेवील, तीमध्ये खालील तपशील असेल, तो असा :—

(क) नोंदणी क्रमांक,

(ख) निर्मितीची वर्षे,

(ग) वर्ग व प्रकार,

(घ) नोंदणीकृत मालकांची नावे व पत्ते,

(ङ) केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल असा अन्य तपशील.

(२) प्रत्येक राज्य शासन, केंद्र शासनाला [1][त्याची तशी इच्छा असेल तर] मोटार वाहनांच्या नोंदवहीची मुद्रित प्रत पुरवील आणि अशा नोंदवहीमध्ये वेळोवेळी घातलेली अधिक सर्व माहिती व इतर दुरुस्त्यादेखील केंद्र शासनाला विनाविलंब कळवील.

(३) मोटार वाहनांची राज्य नोंदवही राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल अशा रीताने ठेवली जाईल.

६४. केंद्र शासनाला खालील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी उपबंध करण्याकरिता नियम करता येतील :— नियम करण्याची केंद्र शासनाची शक्ती.

(क) अर्ज किती कालावधीत आणि कशा नमुन्यात करता येईल आणि कलम ४१ च्या पोटकलम (१) अन्वये त्यासोबत जोडावयाचे दस्तऐवज, तपशील व माहिती ;

(ख) नोंदणी प्रमाणपत्र कोणत्या नमुन्यात तयार करता येईल आणि त्यामध्ये अंतर्भूत करावयाचा तपशील व माहिती आणि कलम ४१ च्या पोटकलम (३) अन्वये ते देण्याची पद्धती ;

(ग) कलम ४१ च्या पोटकलम (५) अन्वये नोंदणी प्राधिकरणाच्या अभिलेखात नोंदणी प्रमाणपत्राच्या तपशीलाची नोंद करण्याचा नमुना व रीत ;

(घ) कलम ४१ च्या पोटकलम (६) मध्ये निर्देशिलेले नोंदणी चिन्ह, अक्षरे, आकडे व इतर तपशील प्रदर्शित व दर्शित करावयाची रीत व नमुना ;

(ङ) अर्ज किती कालावधीत आणि कशा नमुन्यात करता येईल आणि कलम ४१ च्या पोटकलम (८) अन्वये त्यामध्ये अंतर्भूत करावयाचा तपशील व माहिती ;

(च) कलम ४१ च्या पोटकलम (१४) मध्ये निर्देशिलेल्या अर्जाचा नमुना आणि त्यातील तपशील व माहिती आणि आकारावयाची फी ;

(छ) कलम ४७ च्या पोटकलम (१) मध्ये निर्देशिल्या अर्जाचा नमुना आणि तो करावयाचा कालावधी आणि त्यात अंतर्भूत करावयाचा तपशील ;

(ज) कलम ४८ च्या पोटकलम (१) अन्वये "ना-हरकत" प्रमाणपत्रासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना व रीत आणि कलम ४८ च्या पोटकलम (२) अन्वये द्यावयाच्या पावतीचा नमुना ;

(झ) कलम ४८ अन्वये ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येण्यापूर्वी अर्जदाराने अनुपालन करावयाच्या बाबी ;

(ञ) कलम ४९ च्या पोटकलम (१) अन्वये पत्त्यातील बदल कळविण्याचा नमुना आणि अर्जासह सादर करावयाचे दस्तऐवज ;

(ट) कलम ५० च्या पोटकलम (१) अन्वये अथवा कलम ५० च्या पोटकलम (२) अन्वये मालकी हस्तांतरणासंबंधी सूचना नमुना व रीत आणि अर्जासह सादर करावयाचे दस्तऐवज;

(ठ) कलम ५१ च्या पोटकलम (२) वा पोटकलम (३) अन्वये करावयाच्या अर्जाचा नमुना ;

(ड) कलम ५६ च्या पोटकलम (१) अन्वये द्यावयाच्या योग्यता प्रमाणपत्राचा नमुना आणि त्यामध्ये अंतर्भूत करावयाचा तपशील व माहिती ;

(ढ) कलम ५६ अन्वये देण्यात आलेल्या वा नूतनीकरण केलेल्या योग्यता प्रमाणपत्राचा परिणामकता कालावधी ;

(ण) नोंदणी प्रमाणपत्र देण, किंवा त्याचे नूतनीकरण करणे किंवा त्यात फेरबदल करणे, नोंदणी प्रमाणपत्रावर मालकी हस्तांतरणाची नोंद करणे, भाडे खरेदी किंवा भाडे पट्टा किंवा तारण गहाण तत्त्वावरील करारासंबंधात नोंदणी प्रमाणपत्रावर पृष्ठांकन करणे किंवा ते रद्द करणे, नोंदणी चिन्हांसाठी योग्यता प्रमाणपत्रे देणे आणि मोटार वाहनाची पाहणी आणि तपासणी करणे, यासाठी आकारावयाची फी आणि अशा फीचा परतावा ;

(त) केंद्र शासनाने विहित करावयाची किंवा त्याला विहित करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

६५. (१) कलम ६४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींव्यतिरिक्त या प्रकरणाच्या इतर उपबंधांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाला नियम करता येतील. नियम करण्याची राज्य शासनाची शक्ती.

(२) पूर्ववर्ती शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांमध्ये पुढील गोष्टींकरता उपबंध करता येतील :—

(क) या प्रकरणाखाली दाखल करता येतील अशा अपिलांची कार्यवाही व सुनावणी (अशा अपिलांच्या संबंधात द्यावयाची फी व अशा फीचा परतावा) ;

(ख) नोंदणी प्राधिकरणाची व इतर विहित प्राधिकरणांची नियुक्ती, कार्ये व अधिकारिता ;

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम १९ अन्वये नव्याने दाखल करण्यात आला (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून).

(ग) रोड-रोलर, ग्रेडर्स आणि रस्ते बांधण्यासाठी, दुरुस्त करण्यासाठी व साफ करण्यासाठी केवळ तशी योजना करून बनवलेली व उपयोगात आणली जाणारी इतर वाहने यांना या प्रकरणाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या सर्व किंवा कोणत्याही उपबंधांपासून सूट देणे आणि अशी सूट देण्याबाबतच्या नियामक शर्ती ;

(घ) नोंदणी व योग्यता प्रमाणपत्रे आणि हरवलेल्या, नष्ट झालेल्या किंवा जीर्णशीर्ण झालेल्या प्रमाणपत्रांच्या बदली अशा प्रमाणपत्रांच्या दुसऱ्या प्रती देणे किंवा त्यांचे नूतनीकरण करणे ;

(ङ) नोंदलेल्या एकूण वाहन वजनभारासंबंधी नोंदणी प्रमाणपत्रांत असलेल्या तपशिलाच्या नोंदी पुनर्विलोकनासाठी नोंदणी प्राधिकरणापुढे हजर करणे ;

(च) मोटार वाहनांची तात्पुरती नोंदणी करणे आणि तात्पुरती नोंदणी प्रमाणपत्रे व चिन्हे देणे ;

(छ) कलम ५८ च्या पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेला तपशील आणि इतर विहित तपशील कोणत्या रीतीने प्रदर्शित करता येईल ;

(ज) या प्रकरणान्वये देय असलेली सर्व फी किंवा त्यापैकी काही भाग भरण्यातून विहित व्यक्तींना किंवा विहित व्यक्तीवर्गांना सूट देणे ;

(झ) या प्रकरणाच्या प्रयोजनासाठी उपयोगात आणावयाचे, केंद्र शासनाकडून विहित करण्यात आले असतील त्याव्यतिरिक्त इतर नमुने ;

(ञ) नोंदणी प्रमाणपत्रांचा तपशील नोंदणी प्राधिकरणांनी परस्परांना कळवणे आणि राज्याच्या बाहेर नोंदलेल्या वाहनांच्या मालकांनी अशा वाहनांचा व त्याच्या नोंदणीचा तपशील कळवणे ;

(ट) कलम ४१ चे पोटकलम (१३) किंवा कलम ४७ चे पोटकलम (७) किंवा कलम ४९ चे पोटकलम (४) अथवा कलम ५० चे पोटकलम (५) खालील रक्कम किंवा रकमा ;

(ठ) योग्यता प्रमाणपत्रांच्या नूतनीकरणाकरता आलेल्या अर्जांवर विचार होईपर्यंत त्यांच्या विधिग्राह्यतेची मुदत वाढवणे ;

(ड) विक्रेत्यांच्या ताब्यातील मोटार वाहनांना या प्रकरणाच्या उपबंधांपासून सूट देणे आणि सूट देण्याबद्दलच्या शर्ती व फी ;

(ढ) कलम ६२ खालील विवरण कोणत्या नमुन्यात आणि किती कालावधीत पाठवायचे ;

(ण) कलम ६२ खाली मोटार वाहनांची राज्य नोंदवही ठेवण्याची रीत ;

(त) विहित करावयाची किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

## प्रकरण पाच

## परिवहन वाहनांचे नियंत्रण

परवान्यांची आवश्यकता.

६६. (१) कोणताही मोटार मालक कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी ते वाहन ज्या रीतीने उपयोगात आणले जात असेल त्या रीतीने ते त्या ठिकाणी उपयोगात आणण्यास प्राधिकृत करणारा प्रादेशिक किंवा राज्य परिवहन प्राधिकरणाने किंवा अन्य विहित प्राधिकरणाने मंजूर केलेला किंवा प्रतिस्वाक्षरित केलेला जो परवाना असेल त्याच्या शर्तींचे अनुसरण न करता अन्यथा ज्या ठिकाणी त्याचा उपयोग करू शकणार नाही किंवा उपयोग करण्यास परवानगी देऊ शकणार नाही. मग अशा वाहनातून उतारूंची किंवा मालाची प्रत्यक्षपणे वाहतूक केली जात असो वा नसो :

परंतु, टप्पेगाडीच्या परवान्याद्वारे वाहनाना कंत्राटी गाडी म्हणून उपयोग करण्यास, परवान्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा कोणत्याही शर्तींच्या अधीनतेने, प्राधिकृत केले जाईल :

परंतु आणखी असे की, टप्पेगाडीच्या परवान्याद्वारे वाहनाचा मग ते उतारू वाहून नेणारे असो वा नसो. दोन्ही बाबतीत माल वाहन म्हणून उपयोग करण्यास परवान्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा कोणत्याही शर्तींच्या अधीनतेने, प्राधिकृत केले जाईल :

परंतु आणखी असे की, माल वाहन परवान्याद्वारे धारकास त्याने चालवलेला उदीम किंवा धंदा यासाठी किंवा त्याच्या संबंधात माल वाहून नेण्यासाठी त्या वाहनाचा उपयोग करण्यास, परवान्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, प्राधिकृत केले जाईल.

(२) माल वाहन परवानाधारकाला, विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, त्या वाहनाचा उपयोग, त्याच्या मालकीचे नसलेले असे कोणतेही लोकवाहन किंवा अर्ध अनुवाहन (सेमी ट्रेलर) ओढून नेण्यासाठी करता येईल.

[1][परंतु, कोणत्याही सांधीव वाहनाच्या परवानाधारकाला, कोणत्याही अर्ध अनुवाहना (सेमी ट्रेलर) साठी सांधीव वाहनाच्या मूळ गतीदायकाचा उपयोग करता येईल.]

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम २० (एक) अन्वये नव्याने दाखल करण्यात आला (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून).

(३) पोट-कलम (१) चे उपबंध खालील बाबतीत लागू होणार नाहीत :—

(क) केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या मालकीचे व कोणत्याही वाणिज्यिक उपक्रमाशी संबंधित नसलेल्या सरकारी कामासाठी उपयोगात आणले जाणारे कोणतेही परिवहन वाहन;

(ख) स्थानिक प्राधिकरणाच्या मालकीचे किंवा स्थानिक प्राधिकरणाबरोबर केलेल्या संविदेअन्वये काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या मालकीचे व केवळ रस्तासफाई, रस्त्यावर पाणी मारणे किंवा मैलासफाई या प्रयोजनासाठी उपयोगात आणले जाणारे कोणतेही परिवहन वाहन;

(ग) केवळ पोलीस, अग्निशामक दल किंवा रुग्णवाहिका यांच्या कामासाठी उपयोगात आणले जाणारे कोणतेही परिवहन वाहन;

(घ) केवळ प्रेते वाहून नेण्यासाठी व त्यासोबत असणाऱ्या शोकाकुल व्यक्तींना नेण्यासाठी उपयोगात आणले जाणारे कोणतेही परिवहन वाहन;

(ङ) नादुरुस्त वाहन ओढून नेण्यासाठी किंवा नादुरुस्त वाहनातील माल तेथून हलवून सुरक्षित ठिकाणी नेण्यासाठी उपयोगात आणले जाणारे कोणतेही परिवहन वाहन;

(च) याबाबतीत राज्य शासनाकडून विहित केलेल्या अन्य कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी उपयोगात आणले जाणारे कोणतेही परिवहन वाहन;

(छ) जी व्यक्ती मोटार वाहनाची निर्मिती करते किंवा मोटार वाहनाचा व्यापार करते किंवा न्यायधारांना जोडावयाच्या सांगाड्याची बांधणी करते अशा व्यक्तीने, केंद्र शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा प्रयोजनांसाठीच व अशा शर्तीनुसारच केवळ उपयोगात आणलेले कोणतेही परिवहन वाहन;

(ज) जिला केंद्र शासनाने वा राज्य शासनाने मान्यता दिलेली आहे अथवा जिची व्यवस्थापन समिती ही संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) याखाली किंवा भारताच्या कोणत्याही भागात अंमलात असलेल्या त्या अधिनियमानुरुप असणाऱ्या कोणत्याही कायद्याखाली नोंदणी करण्यात आलेली संस्था आहे अशा कोणत्याही शैक्षणिक संस्थेच्या मालकीचे आणि केवळ तिच्या कामासाठीच उपयोगात आणले जाणारे कोणतेही परिवहन वाहन;

(झ) ज्यांचे भारसहित वजन ३,००० किलोग्रॅमहून अधिक नाही असे कोणतेही मालवाहन;

(ञ) केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा शर्तींच्या अधीनतेने, एका राज्यात खरेदी केलेले व कोणताही उतारु वा माल न घेता, त्याच राज्यातील किंवा अन्य कोणत्याही राज्यातील एखाद्या ठिकाणी जाणारे कोणतेही परिवहन वाहन;

(ट) कलम ४३ खाली ज्याची तात्पुरती नोंदणी करण्यात आलेली असून वाहनाची नोंदणी करण्यासाठी कोणत्याही ठिकाणी रिकामे जात असलेले कोणतेही परिवहन वाहन;

[1][(ठ) विद्युत बॅटरी, संपीडित नैसर्गिक वायू किंवा सौर उर्जा याद्वारे चालविण्यात येणारे कोणतेही मोटार वाहन].

(ड) पूर, भूकंप किंवा अन्य कोणतीही नैसर्गिक आपत्ती, रस्त्यावरील अडथळा किंवा अकल्पित घटना यामुळे आपल्या इच्छित ठिकाणी पोहोचण्याच्या दृष्टीने रस्ता बदलून अन्य कोणत्याही मार्गावरून न्यावे लागते असे कोणतेही परिवहन वाहन मग ते राज्यातील असो वा राज्याबाहेरील असो;

(ढ) केंद्र शासन किंवा राज्य शासन आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा प्रयोजनांसाठी उपयोगात आणले जाणारे कोणतेही परिवहन वाहन;

(ण) भाडे-खरेदी, भाडेपट्टा किंवा तारणगहाण कराराधीन असलेले आणि मालकाच्या कसुरीमुळे, मालकाने अशा ज्या व्यक्तीबरोबर असा करार केलेला असेल त्या व्यक्तीने किंवा तिच्या वतीने अशा मोटार वाहनाचा, ते इच्छित ठिकाणी जावे यासाठी, कब्जा घेतला असेल असे कोणतेही परिवहन वाहन; किंवा

(त) दुरुस्तीसाठी कोणत्याही ठिकाणी रिकामे जात असलेले कोणतेही परिवहन वाहन;

(४) पोटकलम (३) च्या उपबंधांच्या अधीनतेने, पोट कलम (१) हे, राज्य शासनाने कलम ९२ अन्वये केलेल्या नियमाद्वारे तसे विहित केले तर, चालक सोडून नऊपेक्षा अधिक व्यक्ती वाहून नेण्यासाठी अनुकूल बदल करून घेतलेल्या कोणत्याही मोटार वाहनास लागू होईल.

**मार्ग परिवहनाचे नियंत्रण करण्याची राज्य शासनाची शक्ती.**

६७. (१) राज्य शासन,—

(क) मोटार परिवहनाच्या विकासामुळे जनतेचे, व्यापार उदीमाचे किंवा उद्योगधंद्याचे होणारे फायदे,

(ख) रस्ते परिवहन व रेल्वे परिवहन यांचे समन्वयन करण्याची इष्टता,

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम २० (दोन) अन्वये मूळ मजकूराऐवजी घालण्यात आला (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(ग) रस्ते व्यवस्थेच्या ऱ्हासास प्रतिबंध करण्याची इष्टता, आणि

(घ) परवानाधारकांमध्ये आपसात चालणाऱ्या गैरकिफायतीशीर स्पर्धेत प्रतिबंध घालण्याची इष्टता

या गोष्टी विचारात घेऊन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे राज्य परिवहन प्राधिकरण व प्रादेशिक परिवहन प्राधिकरण या दोन्ही प्राधिकरणांना पुढील बाबींविषयी वेळोवेळी निदेश देऊ शकेल :—

(एक) टप्पेगाडया, कंत्राटी गाडया व मालगाडया यांच्यासाठी प्रवासभाडे व वाहणावळ (त्या संबंधातील कमाल व किमान मर्यादा धरून) ठरवणे :

[1][परंतु, अशा टप्पे गाडया, कंत्राटी गाडया व मालगाड्या याजर बॅटरी, संपीडित नैसर्गिक वायु किंवा सौर उर्जा यावर चालविण्यात येत असतील तर त्यांचे भाडे व वाहनतळ ही मालक किंवा चालक यांच्याकडून निश्चित करण्यात येईल.]

(दोन) सर्वसाधारणपणे निदेशांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, मालवाहनांमधून दूर अंतरावर वाहून न्यावयाच्या माल वाहतुकीस किंवा मालवाहनातून विनिर्दिष्ट वर्गातील माल वाहून नेण्यास प्रतिबंध करणे किंवा त्यावर निर्बंध घालणे ;

(तीन) सर्वसाधारणपणे मोटार वाहनांचे नियमन करण्याच्या संबंधात आणि विशेषत: त्याच्या परिवहनाच्या इतर साधनांशी व दूर अंतरावरील माल वाहतुकीच्या संबंधात केंद्र शासन, किंवा अन्य कोणतेही राज्य शासन किंवा अन्य कोणत्याही देशाचे शासन यांच्याबरोबर केलेला कोणताही करार परिणामक करण्यासाठी राज्य शासनाला आवश्यक किंवा समयोचित वाटेल अशी अन्य कोणतीही बाब :

परंतु, प्रस्तावित निदेशांचा मसुदा **शासकीय राजपत्रात** प्रकाशित करून, ज्या दिनांकास किंवा दिनांकानंतर तो मसुदा विचारात घेतला जाणार असेल असा दिनांक त्यात विनिर्दिष्ट केलेला आहे, तो दिनांक अशा प्रकाशानानंतरच्या एक महिन्याच्या आतला असणार नाही आणि जी कोणतीही हरकत किंवा सूचना येईल ती बाधित हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करणाऱ्यांना आपली बाजू मांडण्याची संधी देऊन नंतर राज्य परिवहन प्राधिकरणाशी सल्लामसलत करून विचारात घेतली आहे असे झाल्याशिवाय खंड (२) व खंड (३) मध्ये निर्देशिलेल्या बाबींसंबंधी अशी कोणतीही अधिसूचना काढण्यात येणार नाही.

(२) टप्पे गाडया, कंत्राटी गाडया आणि मालवाहने यांसाठी प्रवासभाडे व वाहतूक आकार या संबंधातील पोटकलम (१) खालील कोणत्याही निदेशामध्ये असे उपबंधित करता येईल की, टप्पा गाडया, कंत्राटी गाडया किंवा मालवाहने चालवणाऱ्या व्यक्तींना, प्रवासी किंवा, प्रकरणपरत्वे, मालप्रेषक यांनी, प्रवासी व माल यांच्यावरील करारासंबंधातील त्या काळापुरत्या अस्तित्वात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये देय असलेल्या कराचा असे प्रवासभाडे व वाहतूक आकार यामध्ये समावेश असेल.

**परिवहन प्राधिकरण.** ६८. (१) राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे पोटकलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शक्ती वापरण्यासाठी व कार्ये पार पाडण्यासाठी त्या राज्याकरता एक राज्य परिवहन प्राधिकरण घटित करील आणि तशाच रीतीने ते प्रादेशिक परिवहन प्राधिकरणे घटित करील व अशा प्रादेशिक परिवहन प्राधिकरणांना त्या अधिसूचनेत प्रत्येक प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या बाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा क्षेत्रांमध्ये (या प्रकरणात "प्रदेश" म्हणून निर्देशिलेल्या) सर्वत्र, या प्रकरणाद्वारे किंवा त्याखाली अशा प्राधिकरणांना प्रदान केलेल्या शक्ती वापराव्या लागतील व त्यांच्यावर सोपवलेली कार्ये पार पाडावी लागतील :

परंतु, संघराज्यक्षेत्रात, प्रशासकास कोणतेही प्रादेशिक परिवहन घटित करण्याचे वर्जिता येईल.

(२) राज्य परिवहन प्राधिकरण किंवा प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, न्यायिक अनुभव असलेला किंवा कोणत्याही कायद्याखालील अपील किंवा पुनरीक्षण प्राधिकारी म्हणून अथवा कोणताही आदेश देण्याचा किंवा कोणताही निर्णय घेण्यास सक्षम असा अभिनिर्णयन प्राधिकारी असलेला असा अध्यक्ष आणि राज्य परिवहन प्राधिकरणाच्या बाबतीत, चारहून अधिक नाहीत अशा (मग त्या सरकारी असोत वा नसोत) व्यक्ती आणि प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या बाबतीत, राज्य शासनाला ज्यांची नियुक्ती करणे योग्य वाटेल अशा दोनपेक्षा अधिक नाहीत इतक्या व्यक्ती (मग त्या सरकारी असोत वा नसोत) यांचे मिळून बनलेले असेल ; पण ज्या व्यक्तीचा कोणत्याही परिवहन उपक्रमात मालक म्हणून, कर्मचारी म्हणून किंवा अन्यथा कोणताही आर्थिक हितसंबंध असेल अशी कोणतीही व्यक्ती राज्य किंवा प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाचा सदस्य म्हणून नियुक्त करण्यात येणार नाही किंवा तिचे सदस्यत्व चालू राहणार नाही आणि अशा कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य असलेल्या कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही परिवहन उपक्रमामध्ये आर्थिक हितसंबंध संपादित केला तर, तसे केल्यापासून चार आठवड्यांच्या आत, असा हितसंबंध संपादित केल्याची लेखी नोटीस राज्य शासनाला देऊन तिला ते पद रिकामे करावे लागेल:

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम २१ अन्वये परंतुक नव्याने दाखल करण्यात आले. (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

परंतु, राज्य परिवहन प्राधिकरणाच्या किंवा, प्रकरणपरत्वे, प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या सदस्यांपैकी कोणासही अशा प्राधिकरणाच्या सभेत अध्यक्ष अनुपस्थित असेल तेव्हा, अशा सदस्यास न्यायिक अनुभव नसला किंवा अपील वा पुनरीक्षण प्राधिकरण म्हणून अनुभव नसला अथवा कोणत्याही कायद्या-खाली कोणताही आदेश देणारे वा कोणताही निर्णय घेण्यास सक्षम असणारे अभिनिर्णयन प्राधिकरण म्हणून अनुभव नसला तरीही, अध्यक्ष म्हणून काम चालवण्यास या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होणार नाही :

परंतु आणखी असे की, राज्य शासनाला—

(एक) तसे करणे त्यास आवश्यक किंवा समयोचित वाटल्यास कोणत्याही प्रदेशासाठी केवळ एकाच सदस्याचे राज्य परिवहन प्राधिकरण किंवा प्रादेशिक परिवहन प्राधिकरण घटित करता येईल मात्र तो न्यायिक किंवा अपील वा पुनरीक्षण प्राधिकारी म्हणून अनुभव असलेला किंवा कोणत्याही कायद्याखालील कोणताही आदेश देण्यास वा कोणताही निर्णय घेण्यास सक्षम असणारा अभिनिर्णयन अधिकारी असावा लागेल ;

(दोन) या बाबतीत केलेल्या नियमांमध्ये अध्यक्षाच्या किंवा अन्य कोणत्याही सदस्याच्या अनुपस्थितीत अशा प्राधिकरणाचे कामकाज चालवण्याबाबत उपबंध करता येईल आणि कोणत्याही स्वरूपाचे कामकाज कोणत्या परिस्थितीत व कोणत्या रीतीने ते चालवता येईल ते विनिर्दिष्ट करता येईल :

परंतु आणखी असे देखील की, (परिवहन उपक्रमाचे व्यवस्थापन किंवा चालन यांच्याशी प्रत्यक्षपणे संबंधित असलेला शासकीय कर्मचारी सोडून अन्य) एखादा कर्मचारी ज्या शासनाच्या नोकरीत आहे त्या शासनाच्या परिवहन उपक्रमात कोणताही आर्थिक हितसंबंध आहे किंवा ह्याने तो संपादन केलेला आहे एवढ्याच कारणावरून त्या शासकीय कर्मचाऱ्याला अशा कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य म्हणून नियुक्त होण्यास किंवा त्याचे सदस्यत्व चालू राहण्यास या पोट कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे मनाई होते असा अर्थ लावला जाणार नाही.

(३) राज्य परिवहन प्राधिकरण आणि असे प्रत्येक प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कलम ६७ खाली केलेल्या कोणत्याही निदेशाची अंमलबजावणी करील आणि राज्य परिवहन प्राधिकरण या अधि-नियमाद्वारे वा त्याखाली अन्यथा उपबंधित केले असेल ते खेरीजकरून एरव्ही, राज्यात सर्वत्र पुढील शक्ती वापरील आणि पुढील कार्ये पार पाडील, ती अशी :—

(क) राज्यात काही प्रादेशिक परिवहन प्राधिकरणे असल्यास, त्यांच्या कार्यांचा व धोरणांचा समन्वय करणे व त्यांचे विनियमन करणे ;

(ख) जेथे असे कोणतेही प्राधिकरण नसेल तेथे, प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाची कार्ये पार पाडणे आणि जर त्यास योग्य वाटले तर किंवा प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने तशी मागणी केली तर, दोन किंवा अधिक प्रदेशांना सामायिक असलेल्या कोणत्याही नियतमार्गाच्या संबंधात ती कार्ये पार पाडणे ;

(ग) प्रादेशिक परिवहन प्राधिकरणामधील सर्व तंटे मिटवणे व ज्यांच्या बाबतीत मतभेद होतील अशा सर्व बाबींचा निर्णय करणे;

[1][ (गक्) शासनाने टप्पेगाड्या चालविण्यासाठीचे मार्ग निश्चित करणे; आणि]

(घ) विहित करण्यात येतील अशी इतर कार्ये पार पाडणे.

(४) पोटकलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शक्ती वापरण्याच्या व कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ, राज्य परिवहन प्राधिकरण, विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने कोणत्याही प्रादेशिक परिवहन प्राधिकरणास निदेश देऊ शकेल आणि प्रादेशिक परिवहन प्राधिकरण अशा निदेशांचा या अधिनियमाखालील आपली कार्ये पार पाडताना अंमलबजावणी करील आणि त्यावेळी ते निदेश त्याला मार्गदर्शक ठरतील.

(५) राज्य परिवहन प्राधिकरण व कोणतेही प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, कलम ९६ खाली केलेल्या नियमांद्वारे या बाबतीत प्राधिकृत करण्यात आले असेल तर, उक्त नियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा आपल्या शक्ती व कार्यही, याप्रमाणे विहित असे निर्बंध, मर्यादा व शर्ती यांच्या अधीनतेने अशा विहित प्राधिकरणाकडे किंवा व्यक्तीकडे प्रत्यायुक्त करू शकेल.

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम २२ अन्वये खंड (गक्) नव्याने दाखल करण्यात आला, (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून).

**परवान्यांसाठी करावयाच्या अर्जासंबंधातील सर्वसाधारण उपबंध.**

६९. (१) परवान्यासाठी करावयाचा प्रत्येक अर्ज, वाहन किंवा वाहने यांचा ज्या प्रदेशात उपयोग करण्याचे प्रस्तावित केले असेल अशा प्रदेशाच्या प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे करावा लागेल :

परंतु, जर एकाच राज्याच्या दोन किंवा अधिक प्रदेशात वाहन किंवा वाहने यांचा उपयोग करण्याचे प्रस्तावित असेल तर, नियोजित नियतमार्गाचा किंवा क्षेत्राचा अधिकांश भाग ज्या प्रदेशात येतो त्या प्रदेशाच्या प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे आणि नियोजित नियतमार्गाचा किंवा क्षेत्राचा प्रत्येक प्रदेशातील भाग हा जवळजवळ सारखाच असेल त्याबाबतीत जेथे वाहन किंवा वाहने ठेवण्याचे योजलेले असेल अशा प्रदेशाच्या प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज करावा लागेल :

परंतु आणखी असे की, जर वेगवेगळ्या राज्यांमध्ये मोडणाऱ्या दोन किंवा अधिक प्रदेशांमध्ये वाहन किंवा वाहने उपयोगात आणण्याचे प्रस्तावित असेल तर, अर्जदार जेथे राहात असेल किंवा जेथे त्याच्या कामधंद्याची मुख्य जागा असेल त्या प्रदेशाच्या प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज करावा लागेल.

(२) पोट कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असे निदेशित करू शकेल की, वेगवेगळ्या राज्यांमध्ये मोडणाऱ्या दोन किंवा अधिक प्रदेशात उपयोगात आणावयाचे प्रस्तावित केलेल्या कोणत्याही वाहनाच्या किंवा वाहनांच्या बाबतीत, त्या पोट कलमाखालील अर्ज, अर्जदार जेथे राहात असेल किंवा जेथे त्याच्या धंद्याची मुख्य जागा असेल अशा प्रदेशाच्या राज्य परिवहन प्राधिकरणाकडे करण्यात यावा.

**टप्पेगाडीच्या परवान्यासाठी अर्ज.**

७०. (१) एखाद्या टप्पेगाडीच्या संबंधात किंवा राखीव टप्पेगाडी म्हणून उपयोगात आणल्या जाणाऱ्या टप्पेगाडीच्या संबंधात, परवाना (यात यापुढे टप्पेगाडी परवाना असा ज्याचा निर्देश केला आहे.) मिळवण्यासाठी करावयाच्या अर्जात पुढील तपशील अंतर्भूत असेल, उदा. —

(क) अर्ज ज्याच्याशी संबंधित असेल तो किंवा ते नियतमार्ग किंवा क्षेत्र वा क्षेत्रे ;

(ख) अशा प्रत्येक वाहनाचा प्रकार व आसनक्षमता ;

(ग) दिवसाकाठी कमीत कमी व जास्तीत जास्त किती फेऱ्या टाकण्याचे प्रस्तावित केले आहे आणि सर्वसामान्यतः फेऱ्यांचे वेळापत्रक.

**स्पष्टीकरण.**—हे कलम व कलम ७२, कलम ८०, कलम १०२ यांच्या प्रयोजनांसाठी "फेरी" याचा अर्थ, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणापर्यंत एकेरी प्रवास असा आहे आणि प्रत्येक परतीचा प्रवास ही वेगळी फेरी असल्याचे मानण्यात येईल.

(घ) ही सेवा चालती ठेवण्यासाठी व विशेष प्रसंगी उपलब्ध करून देण्यासाठी किती वाहने राखीव म्हणून ठेवण्याचा विचार आहे ती संख्या ;

(ङ) वाहने ठेवण्याच्या जागेची सोय, त्यांची देखभाल व दुरुस्ती यांसाठी आणि उतारूंना आराम लाभावा व त्यांची सोय व्हावी यासाठी आणि सामान साठवण्याची सोय व त्याचा सुरक्षित सांभाळ यासाठी कोणती व्यवस्था करण्याचे उद्देशित आहे ;

(च) विहित करण्यात येतील अशा इतर बाबी ;

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या अर्जासोबत, विहित करण्यात येतील असे दस्तऐवज जोडलेले असतील.

**टप्पेगाडीच्या परवान्यासाठी करण्यात आलेला अर्ज विचारात घेताना प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने अनुसरावयाची कार्यपद्धती.**

७१. (१) प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, टप्पेगाडीच्या परवान्यासाठी करण्यात आलेला अर्ज विचारात घेताना, या अधिनियमाची उद्दिष्टे लक्षात घेईल :

[1][ * * * * * *]

(२) ज्या वेगाने वाहने चालवता येतील त्याच्याशी संबंधित असतील अशा या अधिनियमाच्या उपबंधाचे व्यतिक्रमण होण्याचा संभव आहे असे जर पुरवलेल्या कोणत्याही वेळापत्रकावरून दिसून आले तर, प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, टप्पेगाडीचा परवाना देण्यास नकार देईल :

परंतु, असा नकार देण्यापूर्वी उक्त उपबंधानुसार वेळापत्रकात दुरुस्ती करण्याची अर्जदारास संधी देण्यात येईल.

(३) (क) राज्य शासन, वाहनांची संख्या, रस्त्यांची स्थिती आणि इतर संबद्ध बाबी लक्षात घेऊन केंद्र शासनाकडून तसे निदेशित करण्यात आले तर शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, पाच लाखांहून कमी लोकसंख्या नसेल अशा शहरांतील शहरी रस्त्यांवर चालवल्या जाणाऱ्या सर्वसाधारण टप्पेगाड्या किंवा अधिसूचनेत निश्चित व विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा कोणत्याही प्रकारच्या टप्पेटप्पेगाड्या यांची संख्या मर्यादित ठेवण्याचा राज्य परिवहन प्राधिकरण किंवा प्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांना निदेश देईल ;

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम २३ (क) अन्वये परंतुक वगळण्यात आले, (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(ख) टप्पेगाड्यांची संख्या खंड (क) अन्वये निश्चित केलेली असेल तेथे, त्या राज्याचे शासन, राज्यामध्ये, अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्यासाठी, राज्यातील सार्वजनिक सेवांमध्ये थेट भरतीद्वारे केल्या जाणाऱ्या नियुक्तीच्या बाबतीत जे गुणोत्तर असेल त्याच गुणोत्तरात टप्पेगाड्यांचे परवाने विवक्षित टक्केवारीत राखीव ठेवील ;

(ग) टप्पेगाड्यांची संख्या खंड (क) अन्वये निश्चित केलेली असेल तेथे, प्रादेशिक परिवहन प्राधिकरण राज्य शासनाकडून खंड (ख) अन्वये निश्चित करण्यात येईल इतके परवाने अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्यासाठी राखून ठेवील ;

(घ) खंड (ग) मध्ये निर्देशिलेल्या प्रमाणात परवाने राखून ठेवल्यानंतर, प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, अर्जाचा विचार करतेवेळी खालील बाबी लक्षात घेईल, त्या अशा :—

(एक) अर्जदाराचे वित्तीय स्थैर्य;

(दोन) टप्पेगाडी प्रचालक म्हणून केलेले समाधानकारक काम ;

त्याचबरोबर अर्जदार टप्पेगाडी सेवेत प्रचालक होता किंवा असेल तर त्याने, करही भरलेला असला पाहिजे; आणि

(तीन) राज्य शासन विहित करील अशा अन्य बाबी :

परंतु असे की, इतर परिस्थिती समान असेल तर,—

(एक) राज्य परिवहन उपक्रम,

(दोन) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमिती अन्वये नोंदणी झालेल्या किंवा नोंदणी झाली असल्याचे मानण्यात आलेल्या सहकारी संस्था, [1]* * *

(तीन) माजी सैनिक, [2]* * * [किंवा]

[2][(चार) राज्य शासनास कारणे लेखी नमूद करून, व्यक्तींचा इतर कोणताही वर्ग किंवा प्रवर्ग आवश्यक वाटेल त्याप्रमाणे व्यक्तींचा इतर कोणताही वर्ग किंवा प्रवर्ग]

यांच्याकडून परवान्यासाठी करण्यात आलेल्या अर्जाचा प्रथम विचार केला जाईल.

[3] * * * * *

* * * * *

**स्पष्टीकरण.**—या कलमांच्या प्रयोजनार्थ, "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगम निकाय असा असून त्यामध्ये व्यक्तींच्या पेढीचा किंवा अन्य व्यक्ति अधिसंघाचा समावेश होतो, आणि पेढीच्या संबंधात "संचालक" याचा अर्थ, पेढीतील भागीदार, असा आहे.

७२. (१) कलम ७१ च्या उपबंधाच्या अधीनतेने, प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, कलम ७० अन्वये त्याच्याकडे अर्ज करण्यात आल्यावर, अर्जानुसार किंवा त्यास योग्य वाटतील अशा फेरफारांसह टप्पेगाडी परवाना देऊ शकेल किंवा असा परवाना देण्याचे नाकारू शकेल : टप्पेगाडी परवाने देणे.

परंतु, अर्जात विनिर्दिष्ट न केलेल्या कोणत्याही नियत मार्गाच्या किंवा क्षेत्राच्या बाबतीत असा कोणताही परवाना देण्यात येणार नाही.

(२) प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने टप्पेगाडी परवाना देण्याचे ठरवल्यास, ते विनिर्दिष्ट वर्णनाच्या टप्पेगाड्यांच्या वाहतूक सेवेकरता परवाना मंजूर करू शकेल आणि या अधिनियमाखाली करण्यात येतील अशा कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, परवान्यास पुढीलपैकी कोणतीही एक किंवा अनेक शर्ती जोडू शकेल, त्या अशा :—

(एक) फक्त विनिर्दिष्ट क्षेत्रातच किंवा विनिर्दिष्ट नियतमार्गावर किंवा नियत मार्गावरच वाहनांचा किंवा वाहनाचा उपयोग करावा लागेल,

(दोन) टप्पेगाडीची वाहतूक सेवा विनिर्दिष्ट दिनांकापासून सुरू करावी लागेल,

(तीन) कोणत्याही मार्गाच्या किंवा क्षेत्राच्या संबंधात सर्वसाधारणतः किंवा विनिर्दिष्ट दिवशी व प्रसंगी दिवसाकाठी वाहनाच्या कमीत कमी व जास्तीत जास्त अमुक इतक्या फेऱ्या होण्याची व्यवस्था करावी लागेल,

(चार) प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने मान्यता दिल्यानुसार टप्पेगाड्यांच्या वेळापत्रकाच्या प्रती वाहनांवर आणि नियतमार्गावरील किंवा क्षेत्रामधील विनिर्दिष्ट विरामस्थानांवर किंवा थांब्यावर लावाव्या लागतील,

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम २३ (ख) (एक) द्वारे वगळण्यात आले (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २३ (ख) (दोन) द्वारे नव्याने घालण्यात आले (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम २३ (ग) द्वारे वगळण्यात आले (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी तेव्हापासून).

(पाच) मान्य वेळापत्रकापेक्षा वेगळा बदल करावयाचा झाल्यास, प्रादेशिक परिवहन प्राधिकरण वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा मर्यादेपर्यंतच तसा बदल करून टप्पेगाडी वाहतूक सेवा चालवावी लागेल,

(सहा) नगरपालिका सीमा आणि विहित करण्यात येतील अशा अन्य क्षेत्रांमध्ये व ठिकाणी, विनिर्दिष्ट जागांव्यतिरिक्त अन्य जागी उतारू किंवा माल चढवता किंवा उतरवता येणार नाही,

(सात) टप्पेगाडीतून सर्वसाधारणपणे किंवा विनिर्दिष्ट प्रसंगी किंवा विनिर्दिष्ट वेळी आणि हंगामामध्ये जास्तीत जास्त अमुक उतारू व जास्तीत जास्त अमुक इतक्या वजनाचे सामान वाहून नेता यईल,

(आठ) उतारुचे जे सामान विनाशुल्क वाहून नेण्यात येईल अशा सामानाचे वजन व स्वरूप, प्रत्येक उतारुगणिक वाहून नेता येईल असे सामानाचे एकूण वजन व उतारुंची गैरसोय होऊ न देता सामान वाहून नेण्यासाठी करण्यात येईल अशी व्यवस्था,

(नऊ) उतारुंचे जितके सामान मोफत नेण्याची सवलत आहे त्यापेक्षा जादा असलेल्या सामानाबद्दल जितके शुल्क आकारण्यात येणार असेल त्याचा दर,

(दहा) मान्य विनिर्देशानुरुप असलेला सांगाडा जोडलेल्या विनिर्दिष्ट प्रकारच्या वाहनांचा उपयोग करावा लागेल :

परंतु, परवान्यास ही शर्त जोडल्यामुळे त्या दिनांकास चालवण्यात येत असलेल्या कोणत्याही वाहनाचा उपयोग मान्य विनिर्देश प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून दोन वर्षापर्यंत चालू राहण्यास प्रतिबंध होणार नाही,

(अकरा) वाहनांमध्ये आरामाची सोय व स्वच्छता याबाबतीत विनिर्दिष्ट दर्जा राखावा लागेल,

(बारा) कोणत्याही टप्पेगाडीतून उतारुंच्या जोडीला किंवा उतारु नसताना ज्या शर्तींवर माल वाहून नेता येईल त्या शर्ती,

(तेरा) मान्य भाडेपत्रिकेनुसार प्रवास भाडे आकारावे लागेल,

(चौदा) प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने मान्य केलेल्या भाडेपत्रिकेची प्रत किंवा त्यातील उतारा व विशिष्ट प्रसंगासाठी याप्रमाणे मान्य केलेल्या कोणत्याही विशेष प्रवासभाडयांचा किंवा भाडेदारांचा तपशील प्रत्येक टप्पेगाडीवर आणि विनिर्दिष्ट विरामस्थानांवर व थांब्यावर दर्शनी लावावा लागेल,

(पंधरा) विनिर्दिष्ट तपशील नमूद असलेली तिकिटे उतारुंना द्यावी लागतील आणि त्यावर प्रत्यक्षात आकारण्यात आलेले प्रवासभाडे दर्शवण्यात येईल आणि देण्यात आलेल्या तिकिटांचे अभिलेख विनिर्दिष्ट रीतीने ठेवावे लागतील,

(सोळा) कोणत्याही वाहनामधून विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने डाक वाहून न्यावी लागेल (ज्या वेळात डाक वाहून नेण्यात येईल ती वेळ व आकारण्यात येतील अशी शुल्के या संबंधातील शर्ती धरून),

(सतरा) वाहतूक सेवा चालती ठेवण्यासाठी व विशेष प्रसंगासाठी परवानाधारकाने राखीव म्हणून ठेवावयाची वाहने,

(अठरा) कोणत्याही वाहनाचा ज्या शर्तींच्या अधीनतेने कंत्राटी वाहन म्हणून उपयोग करता येईल त्या शर्ती,

(एकोणीस) वाहने ठेवण्याची सोय, त्यांची देखभाल व दुरूस्ती यांसाठी विनिर्दिष्ट व्यवस्था करावी लागेल,

(वीस) शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या देखभालीत असलेले कोणतेही विनिर्दिष्ट बस स्थानक किंवा छप्परबंदी यांचा उपयोग करावा लागेल आणि अशा उपयोगाबद्दल कोणतेही विनिर्दिष्ट भाडे किंवा फी द्यावी लागेल,

(एकवीस) प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या मान्यतेशिवाय परवान्याच्या शर्तींना सोडून वर्तन करता येणार नाही,

(बावीस) किमान एक महिन्याची नोटीस देऊन नंतर प्रादेशिक परिवहन प्राधिकरणास,—

(क) परवान्याच्या शर्ती बदलता येतील,

(ख) परवान्यास आणखी शर्ती जोडता येतील :

परंतु, खंड (एक) ला अनुसरून विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींमध्ये, ज्यायोगे मूळ नियतमार्गाच्या अंतरात २४ कि.मी. हून अधिक अंतराचा बदल होईल अशा प्रकारे फेरफार केला जाणार नाही आणि अशा मर्यादेतील कोणत्याही फेरफारामुळे जनतेची सोय होईल आणि याप्रमाणे फेरफार केलेल्या अशा मूळ नियतमार्गाच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या बाबतीत वेगळा परवाना देणे समयोचित नाही अशी प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाची खात्री झाल्यानंतरच असा फेरफार करण्यात येईल,

(तेवीस) राज्य शासन वेळोवेळी विहित करील अशी नियतकालिक प्रतिवेदने, आकडेवारी व इतर माहिती परवानाधारक प्रादेशिक परिवहन प्राधिकरणास पुरवील,

(चोवीस) विहित करण्यात येतील अशा अन्य कोणत्याही शर्ती.

७३. कंत्राटी गाडीच्या परवान्यासंबंधात (या प्रकरणात कंत्राटी गाडीचा परवाना म्हणून निर्देशिलेला) केलेल्या अर्जात पुढील तपशील अंतर्भूत असेल तो असा,— **कंत्राटी गाडीच्या परवान्यासाठी अर्ज.**

(क्) वाहनाचा प्रकार व आसन क्षमता ;

(ख्) कोणत्या क्षेत्रासाठी परवाना हवा आहे ते ;

(ग्) विहित करण्यात येतील असे अन्य तपशील.

७४. (१) पोटकलम (३) च्या उपबंधांच्या अधीनतेने, प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, कलम ७३ खाली त्याच्याकडे अर्ज करण्यात आल्यावर, अर्जानुसार किंवा त्यास योग्य वाटतील अशा फेरफारां-सह कंत्राटी गाडी परवाना देऊ शकेल किंवा असा परवाना देण्याचे नाकारु शकेल : **कंत्राटी गाडी परवाने देणे.**

परंतु, अर्जात विनिर्दिष्ट न केलेल्या कोणत्याही क्षेत्राच्या बाबतीत, असा कोणताही परवाना देण्यात येणार नाही.

(२) प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने कंत्राटी गाडी परवाना देण्याचे ठरवल्यास, ते या अधि-नियमाखाली करण्यात येतील अशा कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, परवान्यास पुढीलपैकी कोणतीही एक किंवा अधिक शर्ती जोडू शकेल, त्या अशा—

(एक) वाहनाचा उपयोग फक्त विनिर्दिष्ट क्षेत्रातच अथवा विनिर्दिष्ट नियत मार्गावर किंवा नियत मार्गांवर करावा लागेल ;

(दोन) विद्यमान संविदेचे विस्तारित किंवा बदललेले रुप म्हणून करावयाची संविदा सोडून अन्य कोणतीही भाडे संविदा विनिर्दिष्ट शर्ती अनुसरल्याखेरीज अन्यथा विनिर्दिष्ट क्षेत्राच्या बाहेर करता येणार नाही ;

(तीन) कोणत्याही वाहनामधून सर्वसाधारणपणे किंवा विनिर्दिष्ट प्रसंगी किंवा विनिर्दिष्ट वेळी हंगामात जास्तीत जास्त अमुक इतके उतारु व जास्तीत जास्त किती वजनाचे सामान वाहून नेता येईल ;

(चार) कोणत्याही कंत्राटी गाडीतून उतारुंच्या जोडीला किंवा उतारु नसताना ज्या शर्तीवर माल वाहून नेता येईल त्या शर्ती ;

(पाच) मोटार कॅबच्या बाबतीत विनिर्दिष्ट प्रवासभाडी किंवा प्रवासभाड्याचे दर आकारावे लागतील आणि प्रवास भाडेपत्रिकेची एक प्रत वाहनावर प्रदर्शित करावी लागेल ;

(सहा) मोटार कॅब सोडून अन्य वाहनांच्या बाबतीत, विनिर्दिष्ट कमाल मर्यादांहून अधिक होणार नाहीत असे विनिर्दिष्ट भाडेदर आकारावे लागतील ;

(सात) मोटार कॅबच्या बाबतीत, विनिर्दिष्ट वजनाइतके उतारुंचे सामान विनाशुल्क वाहून न्यावे लागेल आणि त्याहून अधिक असलेल्या कोणत्याही सामानाबद्दल काही शुल्क आकारावयाचे झाल्यास ते विनिर्दिष्ट दराने आकारावे लागेल ;

(आठ) मोटार कॅबच्या बाबतीत, विहित करण्यात आले तर, टॅक्सी मीटर जोडावा लागेल व तो सुरळीत चालेल अशा प्रकारे ठेवावा लागेल ;

(नऊ) किमान एक महिन्याची नोटीस देऊन नंतर, प्राधिकरणास—

(क्) परवान्याच्या शर्ती बदलता येतील,

(ख्) परवान्यास आणखी शर्ती जोडता येतील.

(दहा) प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या मान्यतेशिवाय परवान्याच्या शर्तींना सोडून वर्तन करता येणार नाही ;

(अकरा) वाहनामध्ये आरामाची सोय व स्वच्छता या बाबतीत विनिर्दिष्ट दर्जा राखावा लागेल ;

(बारा) अपवादात्मक स्वरूपाच्या परिस्थितीखेरीज करून वाहन चालवण्यास किंवा उतारु नेण्यास नकार दिला जाणार नाही ;

(तेरा) विहित करण्यात येतील अशा अन्य कोणत्याही शर्ती.

(३) (क्) राज्य शासन, केंद्र शासनाने तसे निदेशित केल्यास, वाहनांची संख्या, रस्त्यांची स्थिती आणि इतर संबद्ध बाबी लक्षात घेऊन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, राज्य परिवहन प्राधिकरण किंवा प्रादेशिक परिवहन प्राधिकरणास, किमान पाच लाख लोकसंख्या असलेल्या शहरातील नियत-मार्गांवर चालवल्या जाणाऱ्या सर्वसाधारणतः कंत्राटी गाड्यांची किंवा अधिसूचनेत निश्चित व विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कोणत्याही विनिर्दिष्ट प्रकारच्या गाड्यांची संख्या मर्यादित करण्याचा निदेश देईल.

(ख्) कंत्राटी गाड्यांची संख्या खंड (क्) अन्वये निश्चित करण्यात आली असेल तेथे, प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, अशा कोणत्याही कंत्राटी गाडीसंबंधातील परवाना देण्यासाठी आलेल्या अर्जांचा विचार करताना खालील गोष्टी लक्षात घेईल, त्या अशा—

(एक) अर्जदाराचे वित्तीय स्थैर्य;

(दोन) कंत्राटी गाडीचा चालक म्हणून त्याने केलेले समाधानकारक काम, अर्जदार कंत्राटी गाडीचा चालक होता किंवा असेल तर त्याने करही भरलेला असला पाहिजे ; आणि

(तीन) राज्य शासनाकडून विहित करण्यात येतील अशा इतर बाबी :

परंतु, इतर शर्ती समान असल्यास,—

(एक) भारतीय पर्यटन विकास निगम ;

(दोन) राज्य पर्यटन विकास निगम ;

(तीन) राज्य पर्यटन विभाग ;

(चार) राज्य परिवहन उपक्रम ;

(पाच) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमितीअन्वये नोंदणी केलेल्या किंवा नोंदणी केली असल्याचे मानण्यात आलेल्या सहकारी संस्था ;

(सहा) माजी सैनिक;

यांच्याकडून परवान्यासाठी करण्यात आलेल्या अर्जांचा प्रथम विचार केला जाईल.

मोटार कॅब्ज भाड्याने देण्या-संबंधातील योजना.

७५. (१) केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे स्वतःच्या उपयोगासाठी [1][स्वतःच किंवा चालकामार्फत मोटार कॅब्ज किंवा मोटार सायकली चालू इच्छिणाऱ्या व्यक्तींना मोटार कॅब्ज किंवा मोटार सायकली] भाड्याने देण्याच्या धंद्याचे आणि त्यांच्याशी संबंधित विनियमन करण्याच्या प्रयोजनार्थ योजना तयार करील.

(२) पोटकलम (१) अन्वये तयार केलेल्या योजनेमध्ये खालील सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येईल, त्या अशा—

(क) अशी लायसने देणे, त्याचे नूतनीकरण करणे आणि ती प्रत्याहृत करणे यासकट या योजनेखाली चालकांना लायसन देणे ;

(ख) अर्जाचा नमुना आणि लायसनांचा नमुना व त्यात अंतर्भूत करावयाचा तपशील ;

(ग) अशा लायसनांच्या अर्जासोबत भरावयाची फी ;

(घ) अर्ज कोणाकडे करावयाचा ती प्राधिकरणे ;

(ङ) जिच्या अधीनतेने अशी लायसने देता येतील, त्यांचे नूतनीकरण करता येईल किंवा ती प्रत्याहृत करता येतील ती शर्त ;

(च) अशी लायसने देण्यास किंवा त्यांचे नूतनीकरण करण्यास दिलेल्या नकाराविरुद्ध अपीले आणि अशी लायसने प्रत्याहृत करण्याच्या आदेशांविरुद्ध अपिले ;

(छ) ज्यांच्या अधीनतेने मोटारकॅब्ज भाड्याने देता येतील त्या शर्ती ;

(ज) अभिलेख ठेवणे व अशा अभिलेखांचे निरीक्षण करणे ;

(झ) या कलमाची उद्दिष्टये पार पाडण्यासाठी आवश्यक असतील अशा अन्य बाबी.

खाजगी सेवा वाहनाच्या परवान्यासाठी अर्ज.

७६. (१) प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, त्याच्याकडे अर्ज करण्यात आल्यानंतर, अर्जानुसार किंवा त्याला योग्य वाटतील अशा फेरफारांसह निजी सेवा वाहन परवाना देऊ शकेल किंवा असा परवाना देण्याचे नाकारू शकेल :

परंतु, अर्जामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आले नसेल अशा कोणत्याही क्षेत्राच्या किंवा नियतमार्गाच्या बाबतीत असा परवाना दिला जाणार नाही.

(२) एखादी मोटार वाहन निजी सेवा वाहन म्हणून उपयोगात आणावयाच्या परवान्यासाठी करावयाच्या अर्जात खालील तपशील असेल, तो असा—

(क) वाहनाचा प्रकार व आसन क्षमता ;

(ख) अर्ज ज्याच्याशी संबंधित आहे ते क्षेत्र किंवा एक वा अनेक नियतमार्ग ;

(ग) भाड्याने किंवा मोबदला घेऊन किंवा अर्जदाराकडून करण्यात येत असलेला उद्योग वा धंदा यासंबंधात असेल ते खेरीजकरून व्यक्तींची ने-आण करण्याचे प्रयोजन या वाहनाद्वारे ज्या रीतीने साध्य करण्याचा दावा केला असेल ती रीत ;

(घ) विहित करता येईल असा अन्य तपशील.

(३) प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने परवाना द्यावयाचे ठरवले तर, या अधिनियमाखाली करता येतील अशा कोणत्याही नियमांच्या अधीनतेने ते परवान्याला खालील पैकी कोणतीही एक शर्त किंवा अधिक शर्ती जोडू शकेल, त्या अशा—

(एक) वाहनाचा उपयोग विनिर्दिष्ट क्षेत्रात अथवा नियत मार्गावर किंवा नियतमार्गांवर करण्यात यावा ;

(दोन) वाहन नेता येईल अशी व्यक्तींची कमाल संख्या आणि सामानाचे कमाल वजन ;

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम २४ अन्वये मूळ मजकुराऐवजी घालण्यात आले, (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(तीन) किमान एक महिन्याची नोटीस दिल्यानंतर, प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाला—

(क) परवान्याच्या शर्तीमध्ये बदल करता येईल ;

(ख) परवान्याला अधिक शर्ती जोडता येतील.

(चार) प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या मान्यतेशिवाय परवान्याच्या शर्तींना सोडून वर्तन करता येणार नाही ;

(पाच) वाहनामध्ये आरामाची सोय व स्वच्छता याबाबतीत विनिर्दिष्ट दर्जा राखावा लागेल ;

(सहा) राज्य शासन वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशी नियतकालिके, प्रतिवेदने, आकडेवारी व इतर माहिती परवानाधारक प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाला सादर करील ;

(सात) विहित करण्यात येतील अशा अन्य शर्ती.

**मालवहन परवान्यासाठी अर्ज.**

७७. एखादे मोटार वाहन मालवहनासाठी भाड्याने किंवा मोबदल्याने उपयोगात आणावयाच्या अथवा अर्जदाराकडून करण्यात येणारा उदीम वा धंदा यासाठी किंवा यासंबंधात मालवहनासाठी उपयोगात आणावयाच्या परवान्यासाठी (या प्रकरणात "मालवहन परवाना" असा निर्देश करण्यात आलेल्या) केलेल्या अर्जात शक्यतोवर खालील तपशील असेल, तो असा—

(क) अर्ज ज्याच्याशी संबंधित असेल ते क्षेत्र अथवा तो किंवा ते नियतमार्ग ;

(ख) वाहनाचा प्रकार व क्षमता ;

(ग) जो माल वाहून नेण्याचे प्रस्तावित केले असेल त्या मालाचे स्वरूप ;

(घ) वाहन ठेवण्याची सोय, त्याची देखभाल व दुरुस्ती आणि मालाचा साठा व सुरक्षित सांभाळ यासाठी केलेली व्यवस्था ;

(ङ) अर्ज करण्यापूर्वी अर्जदाराने कोणत्याही वेळी भाड्यापोटी किंवा मोबदल्यापोटी मालवाहन म्हणून केलेल्या कोणत्याही धंद्याच्या संबंधात आणि अर्जदाराने आकारलेले दर यासंबंधी प्रादेशिक परिवहन प्राधिकरण मागवील असा कोणताही तपशील ;

(च) प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या प्रदेशात भाडे किंवा मोबदला या बदल्यात मालाची वाहतूक करण्यासाठी उपलब्ध केलेल्या सुविधांवर कोणत्याही महत्त्वाच्या बाबतीत परिणाम होईल अशा प्रकारे जर अर्जदाराने त्या प्रदेशात किंवा प्रदेशाबाहेर अशा सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या अन्य व्यक्तीबरोबर कोणताही करार किंवा व्यवस्था केलेली असल्यास त्याचा तपशील ;

(छ) विहित करण्यात येईल असा अन्य कोणताही तपशील.

**मालवहन परवान्यासाठी करण्यात आलेला अर्ज विचारात घेणे.**

७८. प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, मालवहन परवान्यासाठी करण्यात आलेला अर्ज विचारात घेताना, पुढील बाबी लक्षात घेईल, त्या अशा—

(क) वाहून न्यावयाच्या मालाचे स्वरूप, विशेषतः मानवी जीविताच्या दृष्टीने त्याचे धोकादायक व जोखमी स्वरूप ;

(ख) वाहून न्यावयाची रसायने व स्फोटके यांचे विशेषतः मानवी जीवनाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून स्वरूप.

**माल परिवहन परवाना देणे.**

७९. (१) प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, कलम ७७ अन्वये त्याच्याकडे अर्ज करण्यात आल्यानंतर राज्यभर विधिग्राह्य असेल असा किंवा अर्जानुसार किंवा त्यास योग्य वाटतील अशा फेरफारांसह मालवहन परवाना देऊ शकेल किंवा असा परवाना देण्याचे नाकारू शकेल :

परंतु, अर्जात विनिर्दिष्ट न केलेल्या कोणत्याही क्षेत्राच्या किंवा नियत मार्गाच्या बाबतीत असा परवाना देता येणार नाही.

(२) प्रादेशिक परिवहनाने परवाना देण्याचे ठरवल्यास ते परवाना देऊ शकेल आणि या अधिनियमाखाली करण्यात येतील अशा कोणत्याही नियमांच्या अधीनतेने परवान्यास पुढीलपैकी कोणतीही एक शर्त किंवा अधिक शर्ती जोडू शकेल, त्या अशा—

(एक) वाहनांचा उपयोग फक्त विनिर्दिष्ट क्षेत्रातच अथवा विनिर्दिष्ट नियत मार्गावर किंवा नियत मार्गांवर करावा लागेल ;

(दोन) उपयोगात आणावयाच्या कोणत्याही वाहनाचे भारसहित वजन विनिर्दिष्ट कमाल वजनापेक्षा अधिक होता कामा नये ;

(तीन) विनिर्दिष्ट स्वरूपाच्या मालाची वाहतूक करता येणार नाही ;

(चार) विनिर्दिष्ट दर आकारून मालाची वाहतूक करावी लागेल ;

(पाच) वाहने ठेवण्याच्या जागेची सोय, त्यांची देखभाल व दुरुस्ती आणि वाहून नेण्यात येणाऱ्या मालाचा साठा करण्यासाठी व त्याचा सुरक्षित सांभाळ करण्यासाठी विनिर्दिष्ट व्यवस्था करावी लागेल ;

(सहा) राज्य शासन वेळोवेळी विहित करील अशी नियतकालिक प्रतिवेदने, आकडेवारी व इतर माहिती परवानाधारक, प्रादेशिक परिवहन प्राधिकरणास पुरवील ;

(सात) प्रादेशिक परिवहन प्राधिकरणास किमान एक महिन्याची नोटीस देऊन नंतर—

(क) परवान्याच्या शर्ती बदलता येतील ;

(ख) परवान्यास आणखी शर्ती जोडता येतील ;

(आठ) प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या मान्यतेशिवाय परवान्याच्या शर्तींना सोडून वर्तन करता येणार नाही ;

(नऊ) विहित करण्यात येतील अशा आणखी शर्ती.

(३) पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेल्या शर्तींमध्ये मानवी जीवितास धोकादायक किंवा जोखमी स्वरूपाच्या मालाचे वेष्टन व वहन यासंबंधीच्या शर्तींचा समावेश करता येईल.

**परवान्यासाठी अर्ज करण्याची व ते देण्याची कार्यपद्धती.**

८०. (१) कोणत्याही प्रकारच्या परवान्यासाठी कोणत्याही वेळी अर्ज करता येईल.

(२) कोणत्याही प्रकारच्या परवान्यासाठी या अधिनियमान्वये कोणत्याही वेळी करण्यात आलेला अर्ज देण्यास प्रादेशिक परिवहन प्राधिकरण [1][कलम ६६, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेले प्रादेशिक किंवा राज्य परिवहन प्राधिकरण किंवा कोणतेही अन्य विहित प्राधिकरण] सामान्यत: नकार देणार नाही:

परंतु, अर्जानुसार कोणताही परवाना मंजूर करण्यामुळे शासकीय राजपत्रातील कलम ७१ च्या पोटकलम (३) च्या खंड (क) खालील अधिसूचनेत निश्चित केलेल्या व विनिर्दिष्ट केलेल्या टप्पेगाड्यांच्या संख्येत वाढ होत असेल किंवा शासकीय राजपत्रातील कलम ७४ च्या पोटकलम (३) च्या खंड (क) खालील अधिसूचनेत निश्चित केलेल्या व विनिर्दिष्ट केलेल्या कंत्राटी गाड्यांच्या संख्येत वाढ होत असेल तर, प्रादेशिक परिवहन प्राधिकरण [1][कलम ६६, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेले प्रादेशिक किंवा राज्य परिवहन प्राधिकरण किंवा कोणतेही अन्य विहित प्राधिकरण] विनासोपस्कार अर्जास नकार देऊ शकेल :

परंतु आणखी असे की, या अधिनियमाखालील कोणत्याही प्रकारचा परवाना देण्यासाठी केलेल्या अर्जास प्रादेशिक परिवहन प्राधिकरण [1][कलम ६६, पोटकलम (१) मध्य निर्देशिलेले प्रादेशिक किंवा राज्य परिवहन प्राधिकरण किंवा कोणतेही अन्य विहित प्राधिकरण] नकार देईल तेव्हा ते त्याच्या नकाराची कारणे अर्जदाराला लेखी कळवील आणि त्यासंबंधात त्याचे म्हणणे ऐकून घेण्याची त्याला संधी देईल.

(३) तात्पुरत्या परवान्याखेरीज अन्य कोणत्याही परवान्याच्या शर्तींमध्ये, एका किंवा अनेक नवीन नियतमार्गांचा किंवा नवीन क्षेत्रांचा अंतर्भाव करून किंवा एका किंवा अनेक नियत मार्गांत किंवा क्षेत्रांत बदल करून अथवा टप्पेगाडी परवान्याच्या बाबतीत फेऱ्यांची संख्या विनिर्दिष्ट कमाल मर्यादेपेक्षा अधिक वाढवून अथवा परवान्यात विनिर्दिष्ट केलेल्या एका किंवा अनेक नियत मार्गांत किंवा क्षेत्रांत बदल करून, विस्तार करून किंवा त्यात कपात करून त्याद्वारे बदल करण्या-साठी केलेला अर्ज हा नवीन परवान्यासाठी केलेला अर्ज आहे असे समजण्यात येईल :

परंतु, टप्पेगाडी परवाना धारण करणाऱ्या व्यक्तीने पुरवलेली वाहतूक सेवा एखाद्या नियत मार्गा-वरील तीच तेवढी वाहतूक सेवा असेल तेव्हा, वाहनांची संख्या न वाढवता त्यांच्या फेऱ्यांची संख्यावाढ करण्यासाठी त्या परवानाधारकाने केलेला अर्ज पूर्वोक्ताप्रमाणे असल्याचे समजण्याची आवश्यकता नाही :

परंतु, आणखी असे की, —

(एक) बदल करण्यात आल्यास, अंतिम स्थानकांमध्ये बदल होणार नाही आणि बदलामुळे ठरवून दिलेले अंतर चोवीस किलोमीटरहून अधिक असणार नाही ;

(दोन) विस्ताराच्या बाबतीत, विस्तारापोटी वाढणारे अंतर अंतिम स्थानकांपासून चोवीस किलोमीटर्सहून अधिक असणार नाही ;

आणि अशा मर्यादांमधील कोणताही असा बदल किंवा विस्तार हा, अशा बदलामुळे जनतेची सोय होईल अशी परिवहन प्राधिकरणाची खात्री झाली तर आणि मूळ नियत मार्गाच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या बाबतीत अशा तऱ्हेने बदल करण्यात किंवा विस्तार करण्यात आल्यानंतर वेगळा परवाना देणे इष्ट नाही असे वाटले तर, त्यानंतरच केला जाईल.

(४) प्रादेशिक परिवहन प्राधिकरण [1][कलम ६६, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेले प्रादेशिक किंवा राज्य परिवहन प्राधिकरण किंवा कोणतेही अन्य विहित प्राधिकरण] ते या बाबतीत विनिर्दिष्ट करील अशा दिनांकापूर्वी, त्याने दिलेल्या कोणत्याही परवान्याऐवजी कलम ७२ किंवा कलम ७४ किंवा कलम ७६ किंवा, प्रकरणपरत्वे कलम ७९ यांच्या उपबंधानुरूप नवीन परवाना देऊ शकेल आणि जुना परवाना जेथे विधिग्राह्य होता त्याच एका किंवा अनेक नियत मार्गांसाठी किंवा क्षेत्रांसाठी नवीन परवाना विधिग्राह्य असेल :

परंतु, जुन्या परवान्यास जी अगोदरच जोडण्यात आली होती किंवा तो परवाना देण्यात आला त्यावेळी अंमलात असलेल्या कायद्याखाली त्यास जोडता आल्या असतील अशा शर्तींखेरीज अन्य कोणतीही शर्त परवानाधारकाच्या लेखी अनुमतीशिवाय नव्या परवान्यास जोडता येणार नाही.

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम २५ अन्वये दाखल करण्यात आले (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(५) कलम ८१ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोटकलम (४) च्या उपबंधान्वये दिलेला कोणताही परवाना, जितका काळ जुना परवाना याप्रमाणे परिणामक राहिला असता त्यापैकी उर्वरित कालावधीपर्यंत नूतनीकरण न करताही, परिणामक होईल.

८१. (१) कलम ८४ खाली दिलेल्या तात्पुरत्या परवान्याखेरीज अन्य असा परवाना किंवा कलम ८८ च्या पोटकलम (८) अन्वये दिलेला विशेष परवाना [1][देण्यात आल्याच्या किंवा नूतनीकरणाच्या तारखेपासून] पाच वर्षांच्या कालावधीसाठी परिणामक राहील : **परवान्याची मुदत व त्यांचे नूतनीकरण.**

परंतु, कलम ८८ च्या पोटकलम (१) अन्वये परवाना प्रतिस्वाक्षरित करण्यात आला असेल त्याबाबतीत अशी प्रतिस्वाक्षरी, प्राथमिक परवान्याच्या विधिग्राह्यतेशी समकालिक ठरेल अशा कालावधीसाठी नूतनीकरणाविना परिणामक असेल.

(२) परवान्याची मुदत संपण्यापूर्वी किमान पंधरा दिवस आधी करण्यात अर्जावरून आलेल्या परवान्याचे नूतनीकरण होऊ शकेल.

(३) पोटकलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रादेशिक परिवहन प्राधिकरणास किंवा, प्रकरणपरत्वे, राज्य परिवहन प्राधिकरणास, विनिर्दिष्ट कालावधीत अर्ज करण्यास योग्य व पुरेशा कारणावरून अर्जदाराला प्रतिबंध करण्यात आला अशी प्राधिकरणाची खात्री झाल्यास, त्या पोटकलमात विनिर्दिष्ट केलेल्या शेवटच्या दिनांकानंतर परवान्याच्या नूतनीकरणासाठी केलेला अर्ज विचारात घेता येईल.

(४) प्रादेशिक परिवहन प्राधिकरण किंवा, प्रकरणपरत्वे, राज्य परिवहन प्राधिकरण परवान्याच्या नूतनीकरणासाठी आलेला अर्ज खालीलपैकी एका किंवा अधिक कारणांसाठी फेटाळू शकेल, ती अशी :—

(क) अर्जावर विचार केला जाण्यापूर्वीच्या दिनांकास असलेली अर्जदाराची नादारी किंवा तीस दिवसांच्या कालावधीपर्यंत कर्जे फेडली न गेल्यामुळे ती फेडण्यासाठी आलेले हुकूमनामे याद्वारे उघड झालेली अर्जदाराची वित्तीय स्थिती ;

(ख) अर्ज विचारात घेण्याच्या दिनांकापूर्वीच्या पंधरा दिवसांपासून मोजलेल्या बारा महिन्यांच्या कालावधीत, अर्जदाराने चालवलेल्या टप्पेगाडी सेवेमुळे अर्जदाराने खालीलपैकी केलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल अर्जदाराला दोनदा किंवा अधिक वेळेला शिक्षा झालेली आहे :—

(एक) कोणतेही वाहन खालीलप्रमाणे चालविणे :—

(१) अशा वाहनांवरील देय असलेला कर न भरणे ;

(२) असा कर भरण्यासाठी दिलेल्या सवलतीच्या मुदतीत कर न भरणे आणि त्यानंतर असे वाहन चालविण्याचे बंद करणे ;

(३) कोणत्याही अनधिकृत नियत मार्गांवर ते चालविणे ;

(दोन) अनधिकृत फेऱ्या करणे :

परंतु, खंड (ख) च्या प्रयोजनार्थ शिक्षांची संख्या मोजताना, अपिलीय प्राधिकरणाकडून तहकूब करण्यात आलेल्या कोणत्याही शिक्षेची गणना केली जाणार नाही :

परंतु, आणखी असे की, अर्जदाराला त्याचे म्हणणे ऐकून घेण्याची संधी दिल्याशिवाय, या पोटकलमाखालील कोणताही अर्ज फेटाळला जाणार नाही.

(५) एखाद्या परवान्याची मुदत संपल्यानंतर या कलमाखाली त्याचे नूतनीकरण करण्यात आले असेल तर, असे नूतनीकरण अशा मुदत समाप्तीच्या दिनांकापासून परिणामक होईल—मग कलम ८७ च्या खंड (घ) द्वारे तात्पुरता परवाना देण्यात आलेला असो वा नसो—आणि तात्पुरता परवाना देण्यात आलेला असेल तर, अशा तात्पुरत्या परवान्याच्या बाबतीत भरलेली फी परत करण्यात येईल.

८२. (१) पोटकलम (२) मध्ये उपबंधित केले आहे त्याव्यतिरिक्त एरव्ही, ज्या परिवहन प्राधिकरणाने परवाना दिला असेल त्याच्या परवानगीखेरीज परवान्याचे हस्तांतरण करता येणार नाही आणि परवान्याच्या कक्षेत येणारे वाहन ज्या व्यक्तीकडे हस्तांतरित करण्यात आले असेल तिला, अशा परवानगीखेरीज, परवान्याद्वारे प्राधिकृत करण्यात आलेल्या रीतीने त्या वाहनाचा उपयोग करण्याचा कोणताही अधिकार प्रदान केला जाणार नाही. **परवान्याचे हस्तांतरण.**

(२) परवानाधारक मरण पावला तर, परवान्याच्या कक्षेत येणाऱ्या वाहनाचा ताबा ज्या व्यक्तीकडे येईल त्या व्यक्तीला, जणू काही तो परवाना तिलाच देण्यात आला असावा त्याप्रमाणे त्याचा तीन महिन्यांच्या कालावधीपर्यंत उपयोग करता येईल :

परंतु, ज्याने परवाना दिला असेल अशा परिवहन प्राधिकरणास, अशा व्यक्तीने धारक मरण पावल्याचे वृत्त तो मरण पावल्यापासून तीस दिवसांच्या आत कळवले असले पाहिजे :

परंतु आणखी असे की, कोणताही परवाना मृत धारकाच्या हाती असता तर ज्या दिनांकास तो नूतनीकरण न केल्यास परिणामक असण्याचे संपुष्टात आले असते त्या दिनांकानंतर याप्रमाणे त्याचा उपयोग करता येणार नाही.

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम २६ अन्वये नव्याने दाखल करण्यात आले (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून).

(३) परवानाधारक मरण पावल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत त्याच्याकडे अर्ज करण्यात आल्यास, परिवहन प्राधिकरण परवान्यात समाविष्ट असलेल्या वाहनांचा ताबा त्यानंतर जिच्याकडे जाईल त्या व्यक्तीकडे परवाना हस्तांतरित करू शकेल :

परंतु, विनिर्दिष्ट कालावधीत अर्जदाराला योग्य व पुरेशा कारणावरून प्रतिबंध करण्यात आला अशी परिवहन प्राधिकरणाची खात्री झाली तर, ते उक्त तीन महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर केलेला अर्ज स्वीकारू शकेल.

वाहने बदली करणे.

८३. ज्याने परवाना दिला असेल त्या प्राधिकरणाच्या परवानगीने, परवानाधारकाला परवान्यात समाविष्ट असलेल्या कोणत्याही वाहनाच्या ऐवजी त्याच स्वरूपाचे दुसरे कोणतेही वाहन बदली करता येईल.

सर्व परवान्यांना संलग्न असलेल्या सर्वसाधारण शर्ती.

८४. प्रत्येक परवान्याच्या शर्ती पुढीलप्रमाणे असतील :—

(क) परवाना ज्याच्याशी संबंधित असेल त्या वाहनासोबत कलम ५६ खाली दिलेले योग्यता प्रमाणपत्र असले पाहिजे आणि हा अधिनियम व त्याखाली केलेले सर्व नियम यांच्या आवश्यकतानुरुप सर्वकाळ त्याची देखभाल केली पाहिजे ;

(ख) परवाना ज्याच्याशी संबंधित असेल ते वाहन, या अधिनियमाखाली अनुज्ञेय असलेल्या वेगाहून अधिक वेगाने चालवले जाता कामा नये ;

(ग) कलम ६७ खाली काढलेल्या अधिसूचनेद्वारे केलेली कोणतीही मनाई किंवा घातलेला कोणताही निर्बंध आणि निश्चित केलेली कोणतीही प्रवास भाडी किंवा वाहणावळ यांचे, परवाना ज्याच्याशी संबंधित असेल अशा कोणत्याही वाहनाच्या संबंधात परिपालन केले पाहिजे ;

(घ) परवाना ज्याच्याशी संबंधित असेल ते वाहन, कलम ५ च्या किंवा कलम ११३ च्या उपबंधाचे व्यतिक्रमण करून चालविण्यात येऊ नये;

(ङ) चालकांच्या कामाच्या तासांवर मर्यादा घालणाऱ्या या अधिनियमातील उपबंधांचे, ते, ज्याच्याशी संबंधित असतील अशा कोणत्याही वाहनाच्या किंवा वाहनांच्या बाबतीत परिपालन करण्यात आले पाहिजे ;

(च) प्रकरण दहा, अकरा व बारा यांचे उपबंध परवानाधारकास जेथवर लागू होत असतील तेथवर त्यांचे परिपालन करण्यात आले पाहिजे ;

(छ) चालकाचे नाव व पत्ता, परवाना ज्याच्याशी संबंधित असेल अशा प्रत्येक वाहनावर रंगवण्यात येईल किंवा अन्यथा त्या वाहनाच्या खिडकीच्या रेषेत खालच्या बाजूला ठळक अक्षरांमध्ये वाहनाच्या बाह्य भागावर दोन्ही बाजूला वाहनाच्या रंगाच्या किंवा रंगाच्या विरुद्ध अशा ठळक रंगाने रंगवण्यात आले पाहिजे.

परवान्याचा सर्वसाधारण नमुना.

८५. या अधिनियमाखाली देण्यात आलेला प्रत्येक परवाना स्वयंपूर्ण असेल आणि त्यामध्ये परवान्याचा सर्व आवश्यक तपशील व त्याच्याशी संलग्न शर्ती समाविष्ट असतील.

परवाने रद्द करणे व निलंबित करणे.

८६. (१) परवाना देणाऱ्या परिवहन प्राधिकरणास,

(क) कलम ८४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही शर्तींचा किंवा परवान्यात समाविष्ट असलेल्या कोणत्याही शर्तीचा भंग करण्यात आला तर ; किंवा

(ख) परवानाधारकाने परवान्याद्वारे प्राधिकृत नसलेल्या कोणत्याही प्रकारे वाहनाचा उपयोग केला किंवा करदून घेतला किंवा तशी मुभा दिली तर ; किंवा

(ग) परवान्यात समाविष्ट असलेल्या वाहनावर परवानाधारकाची मालकी राहिली नाही तर ; किंवा

(घ) परवानाधारकाने कपटाच्या किंवा अपवेदनाच्या मार्गाने परवाना मिळवला असेल तर; किंवा

(ङ) मालवहन परवानाधारकाने ज्यासाठी परवाना देण्यात आला होता त्या प्रयोजनासाठी वाहनाचा उपयोग करण्यात वाजवी कारणाशिवाय कसूर केली तर ; किंवा

(च) परवानाधारकाने कोणत्याही परकीय देशाचे नागरिकत्व संपादन केले तर;

परवाना रद्द करता येईल किंवा आपणास योग्य वाटेल अशा कालावधीपुरता तो निलंबित करता येईल :

परंतु, परवानाधारकास आपले स्पष्टीकरण देण्याची संधी देण्यात आल्याखेरीज कोणताही परवाना निलंबित किंवा रद्द केला जाणार नाही.

(२) कलम ६८ च्या पोटकलम (५) अन्वये यासंबंधात ज्याला शक्ती प्रत्यायोजित करण्यात आल्या आहेत अशा कोणत्याही प्राधिकरणाने किंवा कोणत्याही व्यक्तीने दिलेल्या परवान्यासंबंधात परिवहन प्राधिकरण त्याला पोटकलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्ती, उक्त परवाना जणू काही त्याला परिवहन प्राधिकरणाकडून देण्यात आला असल्याप्रमाणे, वापरू शकेल.

(३) परिवहन प्राधिकरण परवाना रद्द करील किंवा निलंबित करील तेथे, ते केलेल्या कार्यवाही-बद्दल परवानाधारकाला कारणे लेखी देईल.

(४) ज्याने परवाना दिला असेल अशा परिवहन प्राधिकरणाने पोटकलम (१) खाली वापरण्याजोग्या (परवाना रद्द करण्याची शक्ती सोडून अन्य) शक्ती ज्यास कलम ६८ च्या पोटकलम (५) खाली प्रत्यायोजित करण्यात आल्या असतील अशा कोणत्याही प्राधिकरणास किंवा व्यक्तीस, अशा शक्ती वापरता येतील.

(५) पोटकलम (१) चा खंड (क) किंवा खंड (ख) किंवा खंड (ङ) याखाली परवाना रद्द किंवा निलंबित होण्यास पात्र असेल आणि परवानाधारक विवक्षित रक्कम देण्यास कबूल असेल तेव्हा, परवाना याप्रमाणे रद्द करणे किंवा निलंबित करणे आवश्यक किंवा समयोचित होणार नाही असे प्रकरणाची परिस्थिती पाहता परिवहन प्राधिकरणाचे मत झाले तर, परवानाधारक विवक्षित रक्कम देण्यास कबूल असेल तेव्हा पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परिवहन प्राधिकरणास परवाना रद्द किंवा, प्रकरणपरत्वे, निलंबित करण्याऐवजी परवानाधारकाकडून कबूल केलेली रक्कम वसूल करता येईल.

(६) परिवहन प्राधिकरणाला पोटकलम (५) अन्वये वापरता येण्यासारख्या असलेल्या शक्ती कलम ८९ खाली अपील दाखल करण्यात आले असेल तेव्हा, अपील प्राधिकरणासही वापरता येतील.

(७) कलम ८८ च्या पोटकलम (९) मध्ये निर्देशिलेल्या परवान्यासंबंधात, ज्याने परवाना दिला त्या परिवहन प्राधिकरणाकडून पोटकलम (१) खाली वापरता येण्याजोग्या शक्ती (परवाना रद्द करण्याची शक्ती सोडून अन्य) कोणत्याही परिवहन प्राधिकरणाला आणि कलम ६८ च्या पोटकलम (५) अन्वये या संबंधात शक्ती प्रत्यायुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही प्राधिकरणाला किंवा व्यक्तींना, जणू काही जो परवाना असे कोणतेही प्राधिकरण किंवा कोणत्याही व्यक्ती यांच्याकडून देण्यात आला आहे असे समजून, वापरता येतील.

८७. (१) कलम ८० मध्ये घालून दिलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब न करता प्रादेशिक परिवहन प्राधिकरण व राज्य परिवहन प्राधिकरण पुढील कारणांसाठी परिवहन वाहन वापरण्याचा प्राधिकार देणारे व कोणत्याही परिस्थितीस चार महिन्यांपेक्षा अधिक नाही इतक्या मर्यादित कालावधीपुरते परिणाम असणारे परवाने तात्पुरते देऊ शकेल :— **तात्पुरते परवाने.**

(क) जत्रा व धार्मिक मेळावे यासारख्या विशेष प्रसंगी उतारूंची ने-आण करण्यासाठी; किंवा

(ख) हंगामी स्वरूपाच्या धंद्याच्या प्रयोजनार्थ; किंवा

(ग) विशिष्ट तात्पुरती गरज भागवण्यासाठी; किंवा

(घ) परवान्याच्या नूतनीकरणासाठी करण्यात आलेला अर्ज निर्णयार्थ प्रलंबित असेतोवर आणि योग्य वाटेल अशी शर्त अशा कोणत्याही परवान्यास जोडू शकेल :

परंतु, प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, किंवा प्रकरणपरत्वे, राज्य परिवहन प्राधिकरण, मालवाहनांच्या बाबतीत, अपवादात्मक स्वरूपाच्या परिस्थितीस आणि लेखी नमूद करावयाच्या कारणांसाठी चार महिन्यां-हून अधिक परंतु, एक वर्षापेक्षा अधिक नसेल अशा कालावधीसाठी परवाना देऊ शकेल.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(एक) एखाद्या नियत मार्गाच्या किंवा क्षेत्राच्या बाबतीत कलम ७२ किंवा कलम ७४ किंवा कलम ७६ किंवा कलम ७९ खाली कोणताही परवाना देण्यात मनाई करणारा आदेश न्यायालयाने किंवा अन्य सक्षम प्राधिकरणाने दिल्यामुळे असा परवाना देणे शक्य नसेल तर, जितक्या काळापुरती अशी मनाई करण्यात आली असेल त्यापेक्षा अधिक नाही इतक्या काळापुरता, किंवा

(दोन) त्या नियत मार्गाच्या किंवा क्षेत्राच्या बाबतीत न्यायालयाने किंवा अन्य सक्षम प्राधिकरणाने एखाद्या वाहनाचा परवाना निलंबित केल्यामुळे त्या नियत मार्गाच्या किंवा क्षेत्राच्या बाबतीत, विधिग्राह्य परवाना असलेले त्याच वर्गाचे कोणतेही परिवहन राहिलेले नसेल, अथवा त्या नियत मार्गाच्या वा क्षेत्राच्या बाबतीत, अशी पुरेशी वाहने नसतील तर, जास्तीत जास्त अशा निलंबनाच्या काळापुरता, त्या नियत मार्गाच्या किंवा क्षेत्राच्या बाबतीत त्या पोटकलमाखाली तात्पुरता परवाना देता येईल :

परंतु, ज्याच्या बाबतीत याप्रमाणे परवाना देण्यात आला असेल अशा परिवाहनांची संख्या ही ज्यांच्या बाबतीत परवाना देण्यास मनाई करण्यात आली असेल किंवा, प्रकरणपरत्वे, परवाना निलंबित करण्यात आला असेल अशा वाहनांच्या संख्येपेक्षा अधिक असणार नाही.

परवाने ज्या प्रदेशात देण्यात आले असतील त्या प्रदेशाबाहेर त्यांचा उपयोग करता यावा यासाठी ते विधिग्राह्य करणे

८८. (१) अन्यथा विहित करण्यात येईल त्या व्यतिरिक्त एरव्ही, कोणत्याही एका प्रदेशाच्या, प्रादेशिक प्राधिकरणाने दिलेला परवाना अन्य कोणत्याही प्रदेशात त्या अन्य प्रदेशाच्या प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने परवाना प्रतिस्वाक्षरित केल्याखेरीज विधिग्राह्य होणार नाही आणि कोणत्याही एका राज्यात दिलेला परवाना अन्य कोणत्याही राज्यात त्या अन्य राज्याच्या राज्य परिवहन प्राधिकरणाने किंवा संबंधित प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने प्रतिस्वाक्षरित केल्याखेरीज विधिग्राह्य होणार नाही :

परंतु, कोणत्याही एका प्रदेशाच्या प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने दिलेला मालवाहन परवाना, त्याच राज्यातील अन्य कोणत्याही प्रदेशामधील किंवा प्रदेशांमधील कोणत्याही क्षेत्रासाठी त्या अन्य प्रदेशांच्या किंवा संबंधित प्रदेशांपैकी इतर प्रत्येक प्रदेशाच्या प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाची स्वाक्षरी नसली तरी विधिग्राह्य असेल :

परंतु आणखी असेही की, नियत मार्ग जेथे सुरू होतो व जेथे संपतो ते दोन्ही स्थानबिंदू एकाच राज्यात असतील आणि नियत मार्गाचा काही भाग अन्य कोणत्याही राज्यात येत असेल व अशा भागाचे अंतर सोळा किलोमीटरहून अधिक नसेल तर, असा परवाना त्या अन्य राज्याच्या राज्य परिवहन प्राधिकरणाने किंवा त्याच्या प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने प्रतिस्वाक्षरित केला नसला तरी त्या नियत मार्गाचा जो भाग त्या राज्यात येत असेल त्या भागाच्या बाबतीत त्या अन्य राज्यात तो विधिग्राह्य असेल :

परंतु आणखी असेही की,—

(क) एका राज्यात दिलेल्या परवान्याच्या कक्षेत येणाऱ्या एखाद्या मोटार वाहनाचा संरक्षण-विषयक प्रयोजनासाठी इतर कोणत्याही राज्यात वापर करावयाचा झाल्यास, केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा नमुन्यात व अशा प्राधिकरणाने दिलेल्या ज्या प्रमाणपत्रानुसार, त्यात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीपुरते ते वाहन केवळ संरक्षणविषयक प्रयोजनांसाठी उपयोगात आणण्यात येईल अशा आशयाचे निवेदन असेल ते प्रमाणपत्र अशा वाहनावर प्रदर्शित करावे लागेल ; आणि

(ख) असा कोणताही परवाना, त्या अन्य राज्याच्या राज्य परिवहन प्राधिकरणाने किंवा प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने तो प्रतिस्वाक्षरित केलेला नसला तरीही त्या अन्य राज्यात विधि-ग्राह्य असेल.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य परिवहन प्राधिकरणाने दिलेला किंवा प्रतिस्वाक्षरित केलेला परवाना संपूर्ण राज्यात किंवा त्या राज्यातील जे प्रदेश परवान्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा प्रदेशांमध्ये विधिग्राह्य असेल.

(३) प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने स्वत: परवाना दिला असता तर, जी शर्त त्याने लादली असती अशी कोणतीही शर्त ते प्राधिकरण परवाना प्रतिस्वाक्षरित करताना त्या परवान्यास जोडू शकेल आणि त्याचप्रमाणे ज्या प्राधिकरणाने परवाना दिला होता त्याने परवान्यास जोडलेली कोणतीही शर्त बदलू शकेल.

(४) परवाने देणे, ते प्रत्याहृत व निलंबित करणे याबाबतचे या प्रकरणातील उपबंध हे परवान्यां-वर प्रतिस्वाक्षऱ्या देणे, ते प्रत्याहृत व निलंबित करणे यांना लागू होतील :

परंतु, जेथे कोणत्याही एका राज्यात दिलेले परवाने पोटकलम (५) मधील आवश्यक गोष्टींचे पालन करून नंतर राज्याराज्यांमध्ये करण्यात आलेल्या कराराचा परिणाम म्हणून अन्य राज्यांच्या राज्य परिवहन प्राधिकरणाने किंवा संबंधित प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने प्रतिस्वाक्षरित करणे आवश्यक झाले असेल तेथे, परवान्यांवर प्रतिस्वाक्षऱ्या देण्यासाठी कलम ८० मध्ये घालून दिलेली कार्यपद्धती अनुसरण्याची आवश्यकता असणार नाही.

(५) प्रत्येक मार्गाच्या किंवा क्षेत्राच्या बाबतीत जितके परवाने द्यावयाचे किंवा प्रतिस्वाक्षरित करावयाचे त्यांची संख्या निश्चित करण्यासाठी राज्याराज्यांमध्ये करावयाच्या करारासंबंधीचा प्रत्येक प्रस्ताव प्रत्येक संबंधित राज्य शासनाकडून शासकीय राजपत्रात आणि करारामध्ये समाविष्ट होणार असलेल्या क्षेत्रात किंवा मार्गावर प्रसृत होणाऱ्या प्रादेशिक भाषेतील कोणत्याही एका किंवा अधिक वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात येईल आणि त्यासोबत त्यासंबंधातील अभिवेदने कोणत्या दिनांकास सादर करण्यात यावीत आणि प्रस्ताव व त्यासंबंधात आलेली कोणतीही अभिवेदने कोणत्या दिनांकास आणि कोणत्या प्राधिकरणाकडून आणि कोणत्या वेळी व स्थळी विचारात घेतली जातील त्याबद्दलची नोटीस दिली जाईल, मात्र हा दिनांक अशा प्रकाशनापासून तीस दिवसांच्या अलिकडचा नसावा.

(६) राज्याराज्यांमध्ये झालेला प्रत्येक करार, परवान्यांची प्रतिस्वाक्षरी देण्याशी तो संबंधित असेल तेथवर, प्रत्येक संबंधित राज्याला शासकीय राजपत्रात आणि कराराच्या कक्षेत येणाऱ्या राज्यातील क्षेत्रात किंवा मार्गावर प्रसृत होणाऱ्या प्रादेशिक भाषेतील एका किंवा अधिक वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करावा लागेल आणि राज्याचे राज्य परिवहन प्राधिकरण व संबंधित प्रादेशिक परिवहन प्राधिकरण तो परिणामक करील.

(७) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एका प्रदेशाचे प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कलम ८७ खाली, अन्य प्रदेशाच्या प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या किंवा प्रकरणपरत्वे, अन्य राज्याच्या राज्य परिवहन प्राधिकरणाच्या सहमतीने, त्या अन्य प्रदेशात किंवा राज्यात विधिग्राह्य म्हणून चालणारा तात्पुरता परवाना देऊ शकेल. ही सहमती सर्वसाधारण किंवा एखाद्या विशिष्ट प्रसंगापुरती अशीही देता येईल.

(८) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पण या अधिनियमाखाली कोणत्याही, एका प्रदेशाचे प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, किंवा प्रकरणपरत्वे, राज्य परिवहन प्राधिकरण, केंद्र शासनाकडून करण्यात येतील अशा नियमांच्या अधीनतेने, जनतेच्या सोयीसाठी म्हणून स्पष्ट किंवा उपलक्षित संविदेअन्वये भाडे किंवा बक्षिसी याबद्दल एक किंवा अनेक उतारू घेऊन जाण्यासाठी व दरम्यानच्या नियत मार्गावर संविदेत समाविष्ट नसलेल्या उतारूंना घेण्यासाठी किंवा उतरविण्यासाठी न थांबता, संपूर्णत: उपयोग करावयाच्या वाहनांच्या बाबतीत, कलम ७२ (राखीव टप्पे गाडीसह) किंवा कलम ७४ किंवा या कलमाच्या पोटकलम (९) च्या [१][अंतर्गत येणाऱ्या वाहनासहित कोणत्याही सार्वजनिक सेवा वाहनाच्या संबंधात विशेष परवाना देऊ शकेल] आणि असा विशेष परवाना देण्यात आला असेल अशा प्रत्येक बाबतीत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, अशा वाहनास त्यावर दाखविण्यासाठी केंद्र शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यात व तशा पद्धतीने एक विशेष भिन्नतादर्शक चिन्ह नेमून देईल आणि असा विशेष परवाना अन्य कोणत्याही प्रदेशात किंवा राज्यात त्या अन्य प्रदेशाच्या प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाची किंवा, प्रकरण-परत्वे, त्या अन्य राज्याच्या राज्य परिवहन प्राधिकरणाची प्रतिस्वाक्षरी नसली तरी विधिग्राह्य असेल.

(९) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पण केंद्र शासनाकडून पोटकलम (१४) अन्वये करण्यात येतील अशा कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, कोणतेही राज्य परिवहन प्राधिकरण, पर्यटनात वाढ व्हावी म्हणून संपूर्ण भारतासाठी किंवा अर्जात दर्शवलेल्या पसंतीस अनुसरून, परवान्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा ज्या, राज्यात परवाना दिला असेल त्या राज्यासकट लगतच्या किमान तीन राज्यांसाठी विधिग्राह्य असतील असे, पर्यटन वाहनांच्या बाबतीतील परवाने देऊ शकेल, आणि अशा परवान्यांना कलमे ७३, ७४, ८०, ८१, ८२, ८३, ८४, ८५, ८६ [२][८७, पोटकलम (१) याचा खंड (घ)] चे उपबंध शक्य होईल तेथवर लागू होतील.

[३] *　　　*　　　*　　　*　　　*

(११) पोटकलम (९) अन्वये दिलेल्या प्रत्येक परवान्यांच्या शर्ती पुढीलप्रमाणे असतील, त्या अशा :—

(एक) ज्याच्या संबंधात असा परवाना देण्यात आला आहे असे प्रत्येक मोटार वाहन हे, आसनक्षमता, आरामप्रद गोष्टींचा दर्जा, सुखसोयी व इतर बाबी यासंबंधी केंद्र शासन विनिर्दिष्ट करील अशा वर्णनानुरुप व आवश्यकतानुरुप असावे ;

(दोन) असे प्रत्येक मोटार वाहन, केंद्र शासन विनिर्दिष्ट करील अशा अर्हता असणाऱ्या व अशा शर्ती पूर्ण करणाऱ्या व्यक्तीने चालवावे ; आणि

(तीन) केंद्र शासन विहित करील अशा अन्य शर्ती.

(१२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्र शासन पोटकलम (१४) खाली करील अशा नियमांच्या अधीनतेने, दूर अंतराच्या आंतरराज्य मार्ग परिवहनास प्रोत्साहन देण्यासाठी समुचित प्राधिकरण मालवाहनासंबंधात राज्यात राष्ट्रीय परवाने देऊ शकेल आणि कलमे ६९,७७,७९,८०, ८१, ८२, ८३, ८४, ८५, ८६, [४][८७, पोटकलम (१) याचा खंड (घ) व ८९] यांचे उपबंध होईल तेथवर, राष्ट्रीय परवाने देण्यास किंवा देण्यासंबंधात लागू होतील.

[५] *　　　*　　　*　　　*　　　*

(१४) (क) या कलमाच्या उपबंधाची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र शासनाला नियम करता येतील.

(ख) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न आणता, अशा नियमांमध्ये पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येतील, त्या अशा :—

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम २७(क) अन्वये हा मजकूर मूळ मजकुराऐवजी घालण्यात आला. (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. १९९४ चा अधिनियम ५४, कलम २७(ख) अन्वये मूळ मजकुराऐवजी घालण्यात आले (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम २७(ग) अन्वये वगळण्यात आले (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम २७(घ) अन्वये नव्याने घालण्यात आले (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाचे कलम २७(ङ) अन्वये वगळण्यात आले (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(एक) पोटकलमे (९) व (१२) यामध्ये निर्देशिलेला परवाना दिल्याबद्दल द्यावी लागणारी प्राधिकृत फी ;

(दोन) मोटार वाहनाचे भारसहित वजन ठरवून देणे ;

(तीन) मोटार वाहनामध्ये किंवा मोटार वाहनावर विभेदक म्हणून ज्यांची उपाययोजना करावयाची त्या विशिष्ट बाबी किंवा प्रदर्शित करावयाची चिन्हे ;

(चार) कोणत्या रंगाने किंवा रंगांनी मोटार वाहन रंगवायचे ते ;

(पाच) राष्ट्रीय परवाना देताना समुचित प्राधिकरणाला ध्यानात घ्यावी लागेल अशी या अधिनियमात विनिर्दिष्ट न केलेली कोणतीही बाब.

**स्पष्टीकरण.**— या कलमात, —

(क) राष्ट्रीय परवान्याच्या संबंधात "समुचित प्राधिकरण" याचा अर्थ, या अधिनियमान्वये मालवाहन परवाना मंजूर करण्यास प्राधिकृत करण्यात आलेले प्राधिकरण, असा आहे ;

(ख) "प्राधिकृति फी" याचा अर्थ, पोटकलमे (९) व (१२) यामध्ये निर्देशिलेल्या परवान्याच्या कक्षेत येणाऱ्या मोटार वाहनाचा अन्य राज्यांमध्ये उपयोग करणे शक्य व्हावे म्हणून, संबंधित राज्यांकडून आकारण्यात येणारे कोणतेही कर किंवा फी, असल्यास, ती भरण्यात आल्यानंतर, समुचित प्राधिकरणाकडून आकारण्यात येणारी एक हजार रुपयांहून अधिक नसेल अशी वार्षिक फी, असा आहे ;

(ग) "राष्ट्रीय परवाना" याचा अर्थ, भारताच्या संपूर्ण राज्यक्षेत्रात किंवा अर्जात दर्शवलेल्या पसंतीस अनुसरून परवान्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा, ज्या राज्यांत असा परवाना दिला असेल त्या राज्यासकट लगतच्या चार राज्यांत मालवाहने चालविण्यासाठी समुचित प्राधिकरणाने दिलेला परवाना, असा आहे.

अपिले. ८९. (१) जी कोणतीही व्यक्ती, —

(क) राज्य किंवा प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने परवाना देण्यास नकार दिल्यामुळे किंवा तिला देण्यात आलेल्या परवान्यास जोडलेल्या कोणत्याही शर्तीमुळे व्यथित झाली असेल, किंवा

(ख) परवान्यांचे प्रत्याहरण किंवा निलंबन केल्यामुळे किंवा त्याच्या शर्तीमध्ये कोणताही बदल केल्यामुळे व्यथित झाली असेल, किंवा

(ग) कलम ८२ अन्वये परवाना हस्तांतरित करण्यास नकार दिल्यामुळे व्यथित झाली असेल, किंवा

(घ) राज्य किंवा प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने परवान्यावर प्रतिस्वाक्षरी करण्यास नकार दिल्यामुळे किंवा अशा प्रतिस्वाक्षरीस जोडलेल्या कोणत्याही शर्तीमुळे व्यथित झाली असेल, किंवा

(ङ) परवान्याच्या नूतनीकरणास नकार दिल्यामुळे व्यथित झाली असेल, किंवा

(च) कलम ८३ खाली परवानगी देण्यास नकार दिल्यामुळे व्यथित झाली नसेल, किंवा

(छ) विहित करण्यात येईल अशा अन्य कोणत्याही आदेशामुळे व्यथित झाली असेल,

अशा कोणत्याही व्यक्तीला, विहित अवधीत व विहित रीतीने, पोटकलम (२) अन्वये घटित करण्यात आलेल्या राज्य परिवहन अपील प्राधिकरणाकडे अपील करता येईल आणि ते प्राधिकरण अशा व्यक्तीस व मूळ प्राधिकरणास आपली बाजू मांडण्याची संधी देऊन नंतर त्यावर निर्णय देईल व तो अंतिम असेल.

[1][(२) राज्य शासन, राज्याकरिता त्याला योग्य वाटतील तितकी राज्य परिवहन अपील न्यायाधिकरणे घटित करील आणि या न्यायाधिकरणात जो जिल्हा न्यायाधीशाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल किंवा उच्च न्यायालयाचा न्यायाधीश होण्यास जो अर्ह असेल अशा न्यायिक अधिकाऱ्याचा समावेश असेल, आणि ते न्यायाधिकरण राज्य शासन अधिसूचित करील अशा क्षेत्राच्या मर्यादित आपल्या अधिकारितेचा वापर करील.]

(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या प्रारंभकाळी प्रलंबित असलेल्या प्रत्येक अपिलाच्याबाबतीत, जणू काही हा अधिनियम पारित करण्यात आलेला नाही असे समजून कार्यवाही करण्यात येईल आणि ते निकालात काढण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—शंका निरसनासाठी, याद्वारे असे जाहीर करण्यात येते आहे की, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी असल्याप्रमाणे, मोटार वाहन अधिनियम, १९३९ याच्या कलम ६३ क च्या पोटकलम (२) च्या खंड (ग) अन्वये आंतरराज्य परिवहन आयोगाने दिलेल्या निदेशाच्या अनुरोधाने राज्य परिवहन प्राधिकरणाने किंवा प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने कोणताही आदेश दिला असेल आणि हा आदेश अशा निदेशानुरूप नसल्याकारणाने आपण व्यथित झालो आहोत असे एखाद्या व्यक्तीला वाटल्यास, ती पोटकलम (१) अन्वये, अशा आदेशाविरुद्ध, राज्य परिवहन अपील न्यायाधिकरणाकडे अपील करू शकेल. परंतु, अशा दिलेल्या निदेशाविरुद्ध मात्र अपील करता येणार नाही.

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम २८ अन्वये मूळ मजकुरा एवजी घालण्यात आले. (१४ नोव्हेंबर १९९४, रोजी व तेव्हापासून).

९०. ज्या प्रकरणामध्ये राज्य परिवहन प्राधिकरणाने किंवा प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने आदेश दिला असून त्याविरुद्ध अपील होऊ शकत नसेल अशा कोणत्याही प्रकरणाचा अभिलेख राज्य परिवहन अपील प्राधिकरण त्याच्याकडे तसा अर्ज करण्यात आल्यावरून, मागवू शकेल आणि राज्य परिवहन प्राधिकरणाने किंवा प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने दिलेला आदेश अयोग्य किंवा अवैध असल्याचे राज्य परिवहन अपील प्राधिकरणास दिसून आल्यास, राज्य परिवहन अपील प्राधिकरण त्या प्रकरणाच्या संबंधात त्याला योग्य वाटेल असा आदेश देऊ शकेल व असा प्रत्येक आदेश अंतिम असेल : पुनरीक्षण.

परंतु, राज्य परिवहन प्राधिकरणाच्या किंवा प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या व्यक्तीचा कोणताही अर्ज आदेश दिल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत केला असल्याशिवाय, राज्य परिवहन अपील प्राधिकरण असा अर्ज विचारार्थ स्वीकारणार नाही :

परंतु, आणखी असे की, राज्य परिवहन अपील प्राधिकरण, अर्जदार उचित व पुरेशा कारणामुळे वेळेच्या आत अर्ज करू शकला नाही अशी त्याची खात्री पटल्यास, तीस दिवसांच्या उक्त कालावधीनंतर आलेला अर्ज विचारार्थ स्वीकारू शकेल :

परंतु असे की, राज्य परिवहन अपील प्राधिकरण, कोणत्याही व्यक्तीच्याबाबतीत तिला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, तिला बाधक ठरेल असा आदेश या कलमान्वये काढणार नाही.

९१. [1][(१) परिवहन वाहन चालविण्यासाठी कामावर ठेवलेल्या कोणत्याही व्यक्तींचे कामाचे तास हे मोटार परिवहन कामगार अधिनियम, १९६१ (१९६१ चा २७) यामध्ये उपबंधित केल्याप्रमाणे असतील.] चालकांच्या कामाच्या तासांवर निर्बंध घालणे.

(२) जिच्याबाबतीत आगाऊ अंदाज बांधता येत नाही अशा परिस्थितीमुळे जो आणीबाणीचा प्रसंग उद्‌भवतो किंवा खोळंबा होतो तो निभावून नेण्यासाठी राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्यास योग्य वाटेल अशी पोटकलम (१) च्या उपबंधापासून सूट देऊ शकेल.

(३) राज्य शासन, किंवा या बाबतीत कलम ९६ खाली केलेल्या नियमांद्वारे राज्य शासनाने या बाबतीत प्राधिकृत केले असेल तर, राज्य किंवा प्रादेशिक परिवहन प्राधिकरण ज्यांचे काम पोटकलम (१) च्या कोणत्याही उपबंधांच्या अधीन असते अशा कोणत्याही व्यक्तींची नेमणूक करणाऱ्या व्यक्तींना त्या उपबंधानुरूप येईल अशा प्रकारे अशा व्यक्तींच्या कामाच्या वेळा आगाऊ निश्चित करावयास लावू शकेल आणि अशा निश्चित केलेल्या वेळा नमूद करून ठेवण्याची तजवीज करू शकेल.

(४) अशा व्यक्तींच्या कामाकरता पोटकलम (३) खाली निश्चित केलेल्या किंवा नमूद केलेल्या वेळांव्यतिरिक्त एरव्ही, कोणीही व्यक्ती काम करू शकणार नाही किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीस काम करावयास लावू शकणार नाही किंवा तशी मुभा देऊ शकणार नाही.

(५) ज्या परिस्थितीत व ज्या वेळात वाहनाच्या चालकाला तो कामात गुंतलेला नसला तरी, वाहनात किंवा त्याच्या जवळपास थांबावे लागते, ती परिस्थिती व तो काळ हा, पोटकलम (१) च्या अर्थानुसार विश्रांतीचा मध्यंतरकाळ असल्याचे मानण्यात येईल आणि राज्य शासनाला ती परिस्थिती व तो काळ विहित करता येईल.

९२. जिच्याबाबत या प्रकरणाखाली परवाना देण्यात आला आहे अशा एखाद्या टप्पेगाडीतून किंवा कंत्राटी गाडीतून एखाद्या प्रवाशाची वाहतूक करण्याची संविदा झाली असून, वाहनातून प्रवाशाची वाहतूक होत असता किंवा तो वाहनात प्रवेश करत असता किंवा त्यातून उतरत असता, त्याचा मृत्यू झाल्यास किंवा त्याला शारीरिक इजा पोचल्यास एखाद्या व्यक्तीविरुध्द जी हक्कमागणी उद्‌भवेल, त्या संबंधातील त्या व्यक्तीचे दायित्व नाकारणे किंवा मर्यादित करणे हे त्या संविदेला अभिप्रेत असेल अथवा असे कोणतेही दायित्व बजावून घेण्यासंबंधी कोणत्याही शर्ती लादणे हे अभिप्रेत असेल तर, तेवढ्या मर्यादेपर्यंत ती संविदा शून्य होईल. दायित्व मर्यादित करणाऱ्या संविदा शून्य होणे.

९३. (१) कोणतीही व्यक्ती, तिने राज्य शासन विहित करील अशा प्राधिकरणाकडून आणि अशा शर्तीच्या अधीनतेने लायसन मिळवले असल्याशिवाय— अभिकर्ता किंवा प्रचारक याने लायसन मिळवणे.

(एक) सार्वजनिक सेवा वाहनांमधून प्रवास करण्यासाठी द्यावयाच्या तिकिटांची विक्री करणारा किंवा अशा वाहनांसाठी गिऱ्हाईके मिळविणारा अभिकर्ता किंवा प्रचारक म्हणून किंवा ;

(दोन) माल वाहनाद्वारे नेला जाणारा माल ताब्यात घेणे, रवाना करणे किंवा वितरित करणे या कामासंबंधीचा अभिकर्ता म्हणून, काम करू शकणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या शर्तींमध्ये पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींचा समावेश असेल, त्या अशा—

(क) ज्या कालावधीकरता लायसन देता येईल किंवा त्याचे नूतनीकरण करता येईल तो कालावधी;

(ख) लायसन देण्याबद्दल किंवा त्याचे नूतनीकरण करण्याबद्दल द्यावी लागणारी फी ;

(ग) (एक) माल गाडीतून वाहून नेला जाणारा माल संग्रहित करणे, रवाना करणे किंवा वितरित करणे या धंद्यामध्ये असलेल्या अभिकर्त्यांच्या बाबतीत जास्तीत जास्त पन्नास हजार रुपये इतकी रक्कम ;

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम २९ अन्वये मूळ मजकुराऐवजी घालण्यात आले (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(दोन) अन्य कोणत्याही अभिकर्त्याच्या किंवा प्रचारकाच्या बाबतीत जास्तीत जास्त पाच हजार रुपये इतकी रक्कम प्रतिभूती म्हणून ठेवणे आणि ज्या परिस्थितीत प्रतिभूतीची रक्कम जप्त करता येईल ती परिस्थिती ;

(घ) अभिकर्त्याने मार्गस्थ मालाच्या विक्रयाची तरतूद करणे ;

(ङ) लायसनाचे निलंबन किंवा प्रत्याहरण ज्या प्राधिकरणास आणि ज्या परिस्थितीत करता येईल ते प्राधिकरण व ती परिस्थिती ;

(च) राज्य शासनाकडून विहित करण्यात येतील अशा इतर शर्ती.

(३) प्रत्येक लायसनाची अशी शर्त राहील की, ज्याला लायसन दिले आहे असा कोणताही अभिकर्ता किंवा प्रचारक हा वर्तमानपत्र, पुस्तक, सूची वर्गीकृत निर्देशिका किंवा इतर प्रकाशनामध्ये येणाऱ्या जाहिरातीमध्ये लायसन क्रमांक, लायसनाची मुदत संपण्याची तारीख आणि लायसन देणाऱ्या प्राधिकाऱ्याचा तपशील असल्याशिवाय, कोणतेही वर्तमानपत्र, पुस्तक, सूची वर्गीकृत निर्देशिका किंवा इतर प्रकाशनामध्ये जाहिरात करणार नाही.

दिवाणी न्यायालयाच्या अधिकारितेचा रोध.

९४. या अधिनियमान्वये परवाना देण्यासंबंधीचा कोणताही प्रश्न विचारात घेणे दिवाणी न्यायालयाच्या अधिकारितेत असणार नाही, आणि या अधिनियमान्वये रीतसर घटित केलेल्या प्राधिकरणाने परवाना देण्यासंबंधी केलेल्या किंवा करावयाच्या कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधातील व्यादेश दिवाणी न्यायालय विचारात घेणार नाही.

टप्पेगाड्या व कंत्राटी गाड्या यांच्या संबंधात नियम करण्याची राज्य शासनाची शक्ती.

९५. (१) टप्पेगाड्या आणि कंत्राटी गाड्या व अशा वाहनांमधील प्रवाशांच्या वागणुकीच्या संबंधात विनियमन करण्यासाठी राज्य शासन नियम करू शकेल.

(२) पूर्वोक्त उपबंधाच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांद्वारे,—

(क) नियमाचे व्यतिक्रमण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस अशा वाहनाच्या चालकाने किंवा वाहकाने अथवा चालकाच्या किंवा वाहकाच्या किंवा कोणत्याही प्रवाशाच्या विनंतीवरून कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याने अशा वाहनातून बाहेर काढण्यासाठी त्याला प्राधिकृत करता येईल ;

(ख) ज्या प्रवाशाने, नियमांचे व्यतिक्रमण केल्याचा चालकाला किंवा वाहकाला वाजवी संशय असेल, त्या प्रवाशाकडे पोलीस अधिकाऱ्याने किंवा चालकाने किंवा वाहकाने विचारणा केल्यास, त्या प्रवाशाला त्याचे नाव व पत्ता देण्यास फर्मावता येईल ;

(ग) चालकाने किंवा वाहकाने तसे फर्मावल्यास, प्रवाशाने त्या वाहनातून कोठवर प्रवास करण्याचा आपला उद्देश आहे किंवा आपण त्यातून कोठवर प्रवास केलेला आहे ते उघड करण्यास आणि अशा संपूर्ण प्रवासाचे भाडे देण्यास आणि त्याबद्दल जे कोणतेही तिकीट दिलेले असेल ते स्वीकारण्यास भाग पाडता येईल ;

(घ) चालकाने किंवा वाहकाने किंवा वाहनाच्या मालकाकडून प्राधिकृत करण्यात आलेल्या अन्य व्यक्तीने तशी मागणी केल्यास, तिकीटधारकाने आपणास देण्यात आलेले कोणतेही तिकीट, प्रवासात असताना ते बाहेर काढून दाखवण्यास व प्रवासाच्या अखेरीस ते परत करण्यास भाग पाडता येईल ;

(ङ) चालकाने किंवा वाहकाने तशी विनंती केल्यास, प्रवाशाने ज्या प्रवासाकरता भाडे दिले असेल तो प्रवास पुरा होताच त्याला वाहनातून निघून जाण्यास फर्मावता येईल ;

(च) तिकीटधारकाने त्याला देण्यात आलेले तिकीट ज्या अवधीपुरते देण्यात आले असेल तो अवधी संपताच ते परत करण्यास फर्मावता येईल ;

(छ) ज्यामुळे वाहनाच्या चलन कार्यास अडथळा येण्याचा किंवा त्यात हस्तक्षेप होण्याचा अथवा वाहनाच्या कोणत्याही भागास किंवा त्याच्या साधनसामग्रीस नुकसान पोहोचण्याचा अथवा अन्य कोणत्याही प्रवाशास इजा पोहचण्याचा किंवा त्याची गैरसोय होण्याचा संभव आहे अशी कोणतीही गोष्ट करण्याचे प्रवाशाने टाळावे याबद्दल त्याला फर्मावता येईल ;

(ज) ज्या वाहनात धूम्रपानास मनाई करणारी नोटीस लावण्यात आली असेल, अशा कोणत्याही वाहनात प्रवाशाने धूम्रपान न करण्याबद्दल त्याला फर्मावता येईल ;

(झ) टप्पेगाड्यांमध्ये तक्रार नोंदवह्या ठेवण्यास फर्मावता येईल आणि कोणत्या परिस्थितीत प्रवाशांना त्यात कोणत्याही तक्रारी नोंदवता येतील ते विहित करता येईल.

या प्रकरणाच्या प्रयोजनांसाठी नियम करण्याची राज्य शासनाची शक्ती.

९६. (१) या प्रकरणाच्या उपबंधाची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाला नियम करता येतील.

(२) पूर्वोक्त शक्तीच्या व्यापकतेस बाध न येता, पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसंबंधात या कलमान्वये नियम करता येतील, त्या अशा :—

(एक) प्रादेशिक परिवहन व राज्य परिवहन प्राधिकरणाच्या नियुक्तीचा कालावधी व त्यांच्या नियुक्तीच्या अटी आणि त्यांचे कामकाज चालवणे व त्यांनी द्यावयाचे अहवाल ;

(दोन) अशा कोणत्याही प्राधिकरणाने त्याच्या (अध्यक्ष सुद्धा) कोणत्याही सदस्याच्या अनुपस्थितीत कामकाज चालवणे आणि कोणत्या स्वरूपाचे कामकाज करता येईल, कोणत्या परिस्थितीत व कोणत्या रीतीने व याप्रमाणे करता येईल ;

(तीन) या प्रकरणाखाली दाखल करण्यात येतील अशी अपिले चालवणे, अशा अपिलासंबंधात द्यावयाची फी आणि अशा फीचा परतावा ;

(चार) या प्रकरणाच्या प्रयोजनांसाठी उपयोगात आणावयाचे नमुने—यात परवान्याच्या नमुन्यांचा समावेश आहे;

(पाच) गहाळ झालेल्या, नष्ट झालेल्या किंवा जीर्णशीर्ण झालेल्या परवान्यांऐवजी परवान्यांच्या दुसऱ्या प्रती देणे ;

(सहा) परिवहन वाहनासोबत न्यावयाचे दस्तऐवज, पाटया व चिन्हे, ते कशा रीतीने न्यावयाचे आणि असे कोणतेही दस्तऐवज कोणत्या भाषांत व्यक्त करावयाचे ;

(सात) परवाने, परवान्यांच्या दुसऱ्या प्रती व पाटया यासाठी करावयाच्या अर्जाच्या संबंधात द्यावयाची फी ;

(आठ) या प्रकरणाअन्वये देय असलेली सर्व प्रकारची फी किंवा त्यांचा कोणताही भाग यांचा भरणा करण्यापासून विहित व्यक्तींना किंवा विहित व्यक्तींच्या वर्गांना सूट देणे ;

(नऊ) परवान्याचे प्रत्याहरण करण्यात आल्यावर किंवा त्यांची मुदत संपल्यावर त्यांचा सांभाळ करणे, ते हजर करणे व रद्द करणे आणि रद्द केलेले परवाने परत करणे ;

(दहा) एका राज्यात देण्यात आलेला परवाना अन्य राज्यासाठी कोणत्या शर्तींच्या अधीनतेने व कोणत्या मर्यादेपर्यंत प्रतिस्वाक्षरी विना विधिग्राह्य ठरेल, त्या शर्ती ;

(अकरा) एका प्रदेशात देण्यात आलेला परवाना त्या राज्यातील अन्य प्रदेशात कोणत्या शर्तींच्या अधीनतेने व कोणत्या मर्यादेपर्यंत प्रतिस्वाक्षरीविना विधिग्राह्य ठरेल ;

(बारा) कलम ६७, पोटकलम (१), खंड (तीन) मध्ये निर्देश केल्याप्रमाणे असलेल्या कोणत्याही कराराची अंमलबजावणी करण्यासाठी परवान्यास जोडावयाच्या शर्ती ;

(तेरा) कोणत्या प्राधिकरणांकडे, किती मुदतीत व कोणत्या रीतीने अपिले करता येतील ;

(चौदा) टप्पेगाडया व कंत्राटी गाडया यांची बांधणी व जोडसामग्री आणि त्यांनी बरोबर बाळगावयाची साधनसामग्री मग ते सर्वसाधारणत: असो वा विनिर्दिष्ट क्षेत्रातच असो ;

(पंधरा) टप्पेगाडया किंवा कंत्राटी गाडया किती प्रवासी नेण्यासाठी अनुकूल करावयाच्या ती संख्या व त्यातून किती प्रवासी नेता येतील ती संख्या ठरवणे ;

(सोळा) टप्पेगाडयांतून किंवा कंत्राटी गाडयांतून कोणत्या शर्तींच्या अधीनतेने प्रवाशांच्या ऐवजी अंशत: किंवा पूर्णत: माल वाहून नेता येईल ;

(सतरा) टप्पेगाडया किंवा कंत्राटी गाडया यांमध्ये राहून गेलेल्या मालमत्तेची सुरक्षित अभिरक्षा व विल्हेवाट;

(अठरा) परिवहन वाहनास रंग देणे किंवा ती चिन्हांकित करणे व त्यावर जाहिरातीचा मजकूर प्रदर्शित करणे याबाबत नियमन करणे आणि विशेष करून ते वाहन डाक वाहून नेण्यासाठी वापरण्यात येते असा कोणत्याही व्यक्तीचा समज होईल अशा रंगाने किंवा अशा रीतीने परिवहन वाहन रंगवण्यास किंवा चिन्हांकित करण्यास मनाई करणे ;

(एकोणीस) प्रेते किंवा कोणत्याही संसर्गजन्य किंवा स्पर्शजन्य रोगाची बाधा झालेल्या व्यक्ती किंवा ज्यामुळे प्रवाशांची गैरसोय होईल किंवा त्यांना इजा पोहचण्याचा संभव असेल, अशा माल टप्पेगाडया किंवा कंत्राटी गाडया यांमधून वाहून नेणे आणि अशा कामांसाठी त्या वापरण्यात आल्यानंतर त्यांची तपासणी करून त्या निर्जंतुक करणे ;

(वीस) मोटार कॅबवर मान्यतेची आवश्यकता असलेले असे टॅक्सीमीटर लावणे किंवा मानक दर्जाचे टॅक्सीमीटर वापरण्याबाबत तरतूद करणे आणि टॅक्सीमीटरांची तपासणी करणे, चाचणी घेणे आणि ते मोहोरबंद करणे ;

(एकवीस) विनिर्दिष्ट ठिकाणी किंवा विनिर्दिष्ट क्षेत्रांमध्ये किंवा रीतसर अधिसूचित केलेली विरामस्थाने किंवा थांबे यांव्यतिरिक्त अन्य ठिकाणी प्रवाशांना, टप्पेगाडयांमध्ये किंवा कंत्राटी गाडयांमध्ये घेण्यास किंवा त्यातून उतरवण्यास मनाई करणे आणि अधिसूचित थांब्यांच्या ठिकाणी ज्याला वाहनात चढावयाचे असेल किंवा त्यातून उतरावयाचे असेल, त्या प्रवाशाने तसे फर्माविले असता तेथे थांबण्यास वाजवी वेळेपर्यंत उभे राहण्यास टप्पेगाडीच्या चालकास फर्मावणे ;

(बावीस) कोणत्याही रीतसर अधिसूचित केलेल्या विरामस्थानाच्या किंवा थांब्यांच्या ठिकाणाचा उपयोग करणाऱ्या सर्वांच्या सोयीकरता पुरेशी साधनसामग्री व सुविधा पुरवणे, या गोष्टींसह अशा विरामस्थानाच्या किंवा थांब्याच्या ठिकाणाचे बांधकाम किंवा वापर करताना कोणत्या आवश्यक गोष्टी पुऱ्या कराव्या लागतील; अशा सुविधांचा फायदा घेतल्याबद्दल आकारता येईल अशी कोणतीही फी असल्यास ती, अशा विरामस्थानी किंवा अशा ठिकाणी ठेवावा लागेल तो अभिलेख, तेथे कामावर ठेवावयाचा कर्मचारीवर्ग आणि अशा कर्मचारीवर्गाची कामे व वर्तन याबाबत आणि सर्वसाधारणपणे असे विरामस्थाने व थांब्याची ठिकाणे उपयोग करण्याजोग्या व स्वच्छ अवस्थेत राखण्याकरता करावयाची तरतूद;

(तेवीस) मोटर कॅब्जच्या दर्जाचे नियमन ;

(चोवीस) पत्त्यात कोणताही बदल झाल्यास त्याची सूचना देणे किंवा भाडे किंवा बक्षिसी या बदल्यात प्रवाशांची ने-आण करण्यासाठी उपयोगात आणलेले कोणतेही वाहन बंद पडल्यास किंवा त्याचे नुकसान झाल्यास ते कळवण्याबाबत परिवहन वाहनाच्या मालकांना फर्मावणे ;

(पंचवीस) परवानाधारक आपल्या कामधंद्याच्या प्रयोजनासाठी वापरत असलेल्या सर्व वास्तूंमध्ये कोणत्याही वाजवी वेळी प्रवेश करून त्या वास्तूचे निरीक्षण करण्यास विनिर्दिष्ट व्यक्तींना प्राधिकृत करणे ;

(सव्वीस) वैध किंवा नेहमीचे भाडे देऊ करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस वाहनातून नेण्यास टप्पेगाडीच्या प्रभारी व्यक्तीला फर्मावणे ;

(सत्तावीस) कोणत्या परिस्थितीत व कोणत्या प्रकारच्या पेटाऱ्यातून किंवा वाहनातून पशु किंवा पक्षी नेता येतील, आणि कोणत्या ऋतूत पशु किंवा पक्षी तसे नेता येतील किंवा नेता येणार नाहीत ;

(अठ्ठावीस) जे सार्वजनिक सेवा वाहनाद्वारे करावयाच्या प्रवासाच्या तिकीट विक्रीचे काम करतात किंवा अन्यथा अशा वाहनांकरता गिऱ्हाईके मिळवण्याचे काम करतात अशा अभिकर्त्यांना किंवा प्रचारकांना लायसने देणे आणि त्यांच्या वर्तनाचे नियमन करणे ;

(एकोणतीस) माल वाहनांद्वारे नेला जाणारा माल संग्रहित करण्याचा किंवा रवाना करण्याचा व वितरित करण्याचा धंदा करणाऱ्या अभिकर्त्यांना लायसन देणे ;

(तीस) परिवहन वाहने व त्यातील जिनसा आणि त्या संबंधीचे परवाने यांचे निरीक्षण करणे ;

(एकतीस) माल वाहनांमधून चालकाव्यतिरिक्त इतर व्यक्तींना नेणे ;

(बत्तीस) परिवहन वाहनांच्या मालकांनी ठेवावयाचा अभिलेख व सादर करावयाची विवरणपत्रे ; आणि

(तेहतीस) विहित करावयाची किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

## प्रकरण सहा

### राज्य परिवहन उपक्रमासंबंधी विशेष उपबंध

व्याख्या.

९७. या प्रकरणात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर, "मार्ग परिवहन सेवा" याचा अर्थ, भाडे किंवा मोबदला याबदल्यात प्रवाशांची किंवा मालाची किंवा दोन्हींची रस्त्यावरून वाहतूक करणारी मोटार वाहन सेवा, असा आहे.

प्रकरण पाच व इतर कायदे यापेक्षा हे प्रकरण अधिभावी करणे.

९८. या प्रकरणाचे उपबंध आणि त्याखाली केलेले नियम व आदेश, यांच्याशी विसंगत असे काहीही या अधिनियमातील पाचव्याप्रकरणामध्ये किंवा त्या त्या काळी अंमलात आलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये किंवा अशा कोणत्याही कायद्याच्या आधारे परिणामक होणाऱ्या कोणत्याही संलेखामध्ये अंतर्भूत असले तरी, परिणामक असतील.

राज्य परिवहन उपक्रमांच्या मार्ग परिवहन सेवा-संबंधीचा प्रस्ताव तयार करणे व प्रसिद्ध करणे.

९९. [1][(१)] कार्यक्षम, पर्याप्त, किफायतशीर आणि योग्य रीत्या समन्वित मार्ग परिवहन सेवा देण्यासाठी कोणत्याही क्षेत्राशी किंवा नियत मार्गाशी किंवा त्याच्या भागाशी संबंधित सर्वसाधारण मार्गसेवा किंवा अशा सेवेचा एखादा वर्ग, लोकहिताच्या दृष्टीने इतर व्यक्तींना अंशत: किंवा पूर्णत: वगळून असो किंवा अन्यथा, राज्य परिवहन उपक्रमाने सुरू करावा व चालवावा असे राज्य शासनाचे मत असल्यास, राज्य शासन, जी सेवा देण्याचे प्रस्तावित केले आहे त्या सेवेचे स्वरूप, तिच्या व्याप्तीचे प्रस्तावित क्षेत्र किंवा नियत मार्ग आणि त्या संबंधीचा इतर तपशील देणाऱ्या योजनेसंबंधीचा प्रस्ताव तयार करू शकेल आणि तो तयार करणाऱ्या राज्याच्या शासकीय राजपत्रात व जे क्षेत्र किंवा नियत मार्ग अशा योजनेच्या व्याप्तीत आणण्याचे प्रस्ताविले आहे तेथे प्रसारित होणाऱ्या प्रादेशिक भाषेतील कमीत कमी एका वर्तमानपत्रात आणि असा प्रस्ताव तयार करणाऱ्या राज्य शासनाला योग्य वाटेल, अशा अन्य पद्धतीने तो त्या राज्य शासनाला प्रसिद्ध करावा लागेल.

[1][(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी त्या पोटकलमान्वये एखादा प्रस्ताव प्रसिद्ध करण्यात आला असेल तेव्हा अशा प्रस्तावाच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून कोणत्याही व्यक्तीला प्रस्ताव प्रलंबित असताना देण्यात आलेल्या तात्पुरत्या परवान्याखेरीज परवाना देण्यात येणार नाही. आणि असा तात्पुरता परवाना देण्यात आल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीसाठी किंवा कलम १०० खालील योजना अंतिमरित्या होण्याच्या तारखेपर्यंत यापैकी जो आधीचा असेल अशा कालावधीपर्यंत वैध राहील].

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम ३० द्वारे कलम ९९ ला त्या कलमाचे पोट कलम (१) असा क्रमांक देण्यात आला व अशा रीतीने पुन्हा क्रमांक दिलेल्या पोटकलमानंतर नवीन पोटकलम समाविष्ट करण्यात आले (१४ नोव्हेंबर. १९९४ रोजी व तेव्हापासून).

१००. (१) योजनेसंबंधीचा कोणताही प्रस्ताव शासकीय राजपत्रात आणि अशा प्रस्तावाने व्याप्त होणाऱ्या क्षेत्रात किंवा नियत मार्गात प्रसारित होणाऱ्या प्रादेशिक भाषेतील कमीत कमी एका वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाल्यानंतर कोणतीही व्यक्ती, असा प्रस्ताव शासकीय राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, प्रस्तावास असलेले आक्षेप राज्य शासनापुढे सादर करू शकेल. **प्रस्तावाला आक्षेप.**

(२) आक्षेप विचारात घेतल्यानंतर व आक्षेप घेणारा किंवा त्याचे प्रतिनिधी व राज्य परिवहन उपक्रमाचे प्रतिनिधी यांना अशी इच्छा असेल तर, याबाबतीत आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर राज्य शासन अशा योजनेस मान्यता देऊ शकेल किंवा तीत फेरबदल करू शकेल.

(३) पोटकलम (२) अन्वये मान्य केलेल्या किंवा फेरबदल केलेल्या अशा प्रस्तावाशी संबंधित योजना, त्यानंतर अशी योजना तयार करणाऱ्या राज्य शासनाच्या शासकीय राजपत्रात व अशा योजनेच्या व्याप्तीमध्ये येणाऱ्या क्षेत्रामध्ये किंवा नियत मार्गामध्ये प्रसारित होणाऱ्या प्रादेशिक भाषेतील कमीत कमी एका वर्तमानपत्रात प्रसिद्ध केली जाईल आणि त्यानंतर शासकीय राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ही योजना अंतिम होईल आणि तिला मान्य योजना म्हटले जाईल आणि तिच्याशी संबंधित असलेले क्षेत्र किंवा नियत मार्ग यांना अधिसूचित क्षेत्र किंवा अधिसूचित नियत मार्ग असे म्हटले जाईल :

परंतु, कोणत्याही आंतरराज्यीय नियत मार्गाशी संबंधित असेल अशी कोणतीही योजना तिला केंद्र शासनाची पूर्व मान्यता असल्याशिवाय मान्य योजना असल्याचे मानण्यात येणार नाही.

(४) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, योजनेसंबंधीचा प्रस्ताव पोटकलम (१) अन्वये शासकीय राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीत ही योजना मान्य म्हणून पोटकलम (३) अन्वये शासकीय राजपत्रात प्रसिद्ध झाली नाही तर हा योजनेसंबंधीचा प्रस्ताव व्यपगत झाल्याचे समजण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—या पोट कलमात निर्देशित केलेला एक वर्षाचा कालावधी मोजताना, कोणत्याही न्यायालयाच्या आदेशाद्वारे आलेल्या तहकुबीमुळे किंवा आदेशांमुळे पोटकलम (३) अन्वये प्रसिद्ध होणारी मान्य योजना, ज्या कालावधीत रोखली गेली असेल असा कोणताही कालावधी किंवा असे कोणतेही कालावधी वगळण्यात येतील.

१०१. कलम ८७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य परिवहन उपक्रम, लोकहिताच्या दृष्टीने, जत्रा आणि धार्मिक मेळावे यांच्या ठिकाणांपासून त्या ठिकाणांपर्यंत ने-आण करण्यासाठी अशा विशेष प्रसंगी प्रवाशांच्या सोयीसाठी अतिरिक्त सेवा चालू करू शकेल : **विवक्षित परिस्थितीत उपक्रमाने अतिरिक्त सेवा चालविणे.**

परंतु, राज्य परिवहन उपक्रम, अशी अतिरिक्त सेवा चालू केल्यासंबंधी माहिती संबंधित परिवहन प्राधिकरणाला विनाविलंब देईल.

१०२. (१) लोकहिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक आहे असे राज्य शासनाला वाटत असल्यास, राज्य शासन, कोणत्याही वेळी— **योजना रद्द करणे किंवा तिच्यात फेरबदल करणे.**

(एक) राज्य परिवहन उपक्रम, आणि

(दोन) राज्य शासनाच्या मते जिच्यावर प्रस्तावातील बदलामुळे परिणाम होण्याची शक्यता आहे अशी कोणतीही इतर व्यक्ती,

यांना प्रस्तावित बदलाच्या बाबतीत त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, कोणत्याही मान्य योजनेत बदल करू शकेल.

(२) राज्य शासन, पोटकलम (१) खालील कोणताही प्रस्तावित फेरबदल शासकीय राजपत्रात आणि अशा फेरबदलाद्वारे व्याप्तीत आणण्याचे प्रस्तावित आहे अशा क्षेत्रात प्रसृत होणाऱ्या प्रादेशिक भाषेतील वर्तमानपत्रांपैकी एका वर्तमानपत्रात प्रसिद्ध करील आणि, त्यात याबाबतीत आलेल्या कोणत्याही अभिवेदनांची सुनावणी राज्य शासन, ज्या तारखेस करील ती, असा बदल शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून तीस दिवसांपेक्षा अगोदरची नसेल अशी तारीख ज्यावेळी व ज्या ठिकाणी ही सुनावणी केली जाईल ती वेळ व ते ठिकाण प्रसिद्ध करील.

१०३. (१) मान्य योजनेस अनुसरून जर कोणत्याही राज्य परिवहन उपक्रमाने अधिसूचित क्षेत्राच्या किंवा अधिसूचित नियत मार्गाच्या संबंधात टप्पेगाडी परवाना किंवा माल वाहन परवाना किंवा कंत्राटी गाडी परवाना मिळण्याकरता याबाबत राज्य शासन विहित करील, अशा रीतीने अर्ज केला असेल तर, उक्त क्षेत्र किंवा नियत मार्ग एकाहून अधिक प्रदेशात येत असेल अशा कोणत्याही बाबतीत राज्य परिवहन प्राधिकरण व अन्य कोणत्याही बाबतीत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण याच्या प्रकरणा-मध्ये विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य परिवहन उपक्रमास असा परवाना देईल. **राज्य परिवहन उपक्रमांना परवाना देणे.**

(२) अधिसूचित क्षेत्राच्या किंवा अधिसूचित नियत मार्गाच्या संबंधात मान्य योजना परिणामक करण्यासाठी संबंधित राज्य परिवहन प्राधिकरण, किंवा, प्रकरणपरत्वे, प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, आदेशाद्वारे,—

(क) अन्य कोणत्याही परवान्याच्या मंजुरीसाठी किंवा नूतनीकरणासाठी करण्यात आलेला कोणताही अर्ज स्वीकारण्याचे नाकारू शकेल किंवा प्रलंबित असेल असा कोणताही अर्ज फेटाळू शकेल ;

(ख) कोणताही विद्यमान परवाना रद्द करू शकेल ;

(ग) (एक) विनिर्दिष्ट दिनांकानंतर परवाना निष्परिणामक करण्यासाठी ;

(दोन) परवान्याअन्वये जितक्या वाहनांचा वापर प्राधिकृत करण्यात आला आहे ती संख्या कमी करण्यासाठी ;

(तीन) असा परवाना अधिसूचित अशा क्षेत्राशी किंवा नियत मार्गाशी संबंधित असेल तेथवर परवान्यात समाविष्ट असलेले क्षेत्र किंवा नियत मार्ग कमी करण्यासाठी,

कोणत्याही विद्यमान परवान्याच्या अटीमध्ये फेरबदल करू शकेल.

(३) शंकानिरसनार्थ याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये राज्य परिवहन प्राधिकरणाने किंवा कोणत्याही प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने केलेल्या कोणत्याही कारवाईविरुद्ध किंवा काढलेल्या आदेशाविरुद्ध अपील करता येणार नाही.

अधिसूचित क्षेत्राच्या किंवा अधिसूचित नियत मार्गाच्या संबंधात परवाने देण्यावर निर्बंध.

१०४. कोणत्याही अधिसूचित क्षेत्राच्या किंवा अधिसूचित नियत मार्गाच्या संबंधात कलम १०० च्या पोटकलम (३) अन्वये एखादी योजना प्रसिद्ध करण्यात आली असेल तर, राज्य परिवहन प्राधिकरण किंवा, प्रकरणपरत्वे, प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, योजनेच्या उपबंधानुसार असेल तेवढे खेरीज करून एरव्ही कोणताही परवाना देणार नाही :

परंतु, मान्य योजनेस अनुसरून कोणत्याही अधिसूचित क्षेत्राच्या किंवा अधिसूचित नियत मार्गाच्या संबंधात राज्य परिवहन उपक्रमाने परवान्याकरता कोणताही अर्ज केला नसेल तर, असा परवाना राज्य परिवहन प्राधिकरण किंवा प्रकरणपरत्वे, प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, अशा अधिसूचित क्षेत्राच्या किंवा अधिसूचित नियत मार्गाच्या संबंधात एखाद्या व्यक्तीला अशा शर्तीवर तात्पुरते परवाने देऊ शकेल की, त्या क्षेत्राच्या किंवा नियत मार्गाच्या बाबतीत राज्य परिवहन उपक्रमास परवाना देण्यात आल्यावर असा परवाना परिणामक असण्याचे बंद होईल.

भरपाई ठरविण्याची तत्त्वे व पद्धती आणि तिचे प्रदान.

१०५. (१) जर कलम १०३, पोटकलम (२) खंड (ख) किंवा (ग) याद्वारे प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करण्यात येऊन कोणताही विद्यमान परवाना रद्द करण्यात आला किंवा त्याच्या अटींमध्ये फेरबदल करण्यात आला तर, राज्य परिवहन उपक्रमाकडून परवानाधारकास भरपाई देण्यात येईल आणि त्या भरपाईचे प्रमाण पोटकलम (४) किंवा प्रकरणपरत्वे, पोटकलम (५) च्या उपबंधानुसार ठरवण्यात येईल.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणताही विद्यमान परवाना रद्द करण्यात आला असताना किंवा त्याच्या अटींमध्ये कोणताही बदल करण्यात आला असताना, जर राज्य परिवहन प्राधिकरणाने किंवा, प्रकरणपरत्वे, प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने त्याच्याऐवजी पर्यायी नियत मार्गाकरता किंवा क्षेत्रांकरता परवाना देऊ केलेला असून, परवानाधारकाने तो स्वीकारला असेल तर, त्याबद्दल कोणतीही भरपाई द्यावी लागणार नाही.

(३) शंकानिरसनार्थ याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, कलम १०३, पोटकलम (२) खंड (क) अन्वये परवान्याचे नूतनीकरण करण्यास नकार दिल्यामुळे कोणतीही भरपाई द्यावी लागणार नाही.

(४) जर कलम १०३, पोट-कलम (२) मधील खंड (ख) किंवा खंड (ग) चा उपखंड (एक) किंवा उपखंड (दोन) याद्वारे प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करण्यात येऊन कोणताही विद्यमान परवाना अशा प्रकारे रद्द करण्यात आला किंवा अशा प्रकारे त्याच्या अटींमध्ये फेरबदल करण्यात आला की, जेणेकरून असा परवाना एरव्ही जेवढ्या कालावधीपर्यंत परिणामक राहिला असता अशा पूर्ण कालावधी-पर्यंत परवानाधारकाला त्याअन्वये त्याचा उपयोग करण्यास प्राधिकृत केलेल्या कोणत्याही वाहनाचा वापर करता येणार नाही, तर अशा रद्द करण्यामुळे किंवा फेरबदल करण्यामुळे परिणाम झालेल्या प्रत्येक वाहनाच्या परवानाधारकास प्रदेय होणारी भरपाई पुढीलप्रमाणे संगणित करण्यात येईल :—

(क) परवान्याच्या उर्वरित कालावधीपैकी प्रत्येक संपूर्ण महिन्याकरता किंवा पंधरा दिवसांहून अधिक इतक्या महिन्याच्या भागाकरिता—दोनशे रुपये;

(ख) परवान्याच्या उर्वरित कालावधीपैकी पंधरा दिवसांहून अधिक इतक्या महिन्याच्या भागाकरता—शंभर रुपये :

परंतु, भरपाईची रक्कम, कोणत्याही बाबतीत चारशे रुपयांहून कमी असणार नाही.

(५) जर कलम १०३, पोटकलम (२) खंड (ग), उपखंड (तीन) द्वारे प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करण्यात येऊन, विद्यमान परवान्याच्या अटींमध्ये फेरबदल करून जेणेकरून त्याखाली ज्याचा वापर प्राधिकृत आहे असे कोणत्याही वाहनाचे क्षेत्र किंवा नियत मार्ग यामध्ये काटछाट होईल तर, अशा काटछाटीमुळे परवानाधारकास प्रदेय होणारी भरपाईची रक्कम पुढील सूत्रानुसार संगणित केलेली रक्कम असेल, ते सूत्र असे :—

$$\frac{म \times क}{ह}$$

**स्पष्टीकरण.**—या सूत्रात,—

(१) "म" याचा अर्थ, परवान्यात समाविष्ट असलेला नियत मार्ग किंवा क्षेत्र जितके कमी करण्यात आले असेल ती लांबी किंवा ते क्षेत्रफळ, असा आहे ;

(२) "क" याचा अर्थ, पोटकलम (४) अनुसार संगणित केलेली रक्कम, असा आहे ;

(३) "द" याचा अर्थ, परवान्यात समाविष्ट असेल त्या नियत मार्गाची एकूण लांबी किंवा ते एकूण क्षेत्रफळ, असा आहे.

(६) या कलमान्वये प्रदेय असलेली भरपाईची रक्कम, ज्या दिनांकास परवाना रद्द करणे किंवा त्यात फेरबदल करणे परिणामक होईल त्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, राज्य परिवहन उपक्रमाकडून त्या रकमेवर हक्क असलेल्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना देण्यात येईल :

परंतु, राज्य परिवहन उपक्रम उक्त एक महिन्याच्या कालावधीत पैसे देण्यास चुकला तर, ज्या दिनांकी ती रक्कम देय असेल त्या दिनांकापासून दरसाल दर शेकडा ७ रुपये या दराने तो व्याज देईल.

**वाहनांमध्ये सापडलेल्या वस्तुंची विल्हेवाट.**

१०६. राज्य परिवहन उपक्रमाद्वारे चालविण्यात येणाऱ्या परिवहन वाहनात सापडलेल्या कोणत्याही वस्तुची मागणी तिच्या मालकाने विहित कालावधीत केली नाही तर, राज्य परिवहन उपक्रम ती वस्तू विहित रीतीने विक्रीस काढील आणि विक्रीपासूनचे उत्पन्न विक्रीचा आनुषंगिक खर्च वजा केल्यानंतर, मालकाने मागणी केल्यास, त्यास देण्यात येईल.

**राज्य शासनाची नियम करण्याची शक्ती.**

१०७. (१) या प्रकरणाचे उपबंध अंमलात आणण्याच्या प्रयोजनाकरिता राज्य शासनाला नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांमध्ये पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येईल :—

(क) कलम ९९ खाली एखाद्या योजनेचा कोणताही प्रस्ताव कोणत्या नमुन्यात प्रसिद्ध करता येईल ;

(ख) कलम १०० च्या पोटकलम (१) खाली कशा रीतीने हरकती दाखल करता येतील ;

(ग) कलम १०० च्या पोटकलम (२) खाली कशा रीतीने हरकती विचारात घेऊन त्या निकालात काढता येतील ;

(घ) कलम १०० च्या पोटकलम (३) खाली कोणतीही मान्य योजना कोणत्या नमुन्यात प्रसिद्ध करता येईल ;

(ङ) कलम १०३ च्या पोटकलम (१) खालील अर्ज कशा रीतीने करता येईल ;

(च) कोणत्याही परिवहन वाहनात राहून गेल्याचे आढळून आलेल्या वस्तुची कलम १०६ खाली मालकास किती कालावधीत मागणी करता येईल आणि अशा वस्तुच्या विक्रीची रीत ;

(छ) या प्रकरणाखाली आदेश बजावण्याची रीत ;

(ज) विहित करावी लागेल किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

**राज्य शासनाच्या विवक्षित शक्तींचा वापर केंद्र शासनाने करणे.**

१०८. ह्या प्रकरणाखाली राज्य शासनास प्रदान केलेल्या शक्तींचा वापर, केंद्र शासनाची अथवा केंद्र शासनास आणि एक किंवा अधिक राज्य शासने याची मालकी अथवा नियंत्रण असलेल्या निगमांच्या किंवा कंपनीच्या संबंधात, आंतरराज्यीय नियत मार्ग, किंवा क्षेत्र याबाबत फक्त केंद्र शासनालाच वापरता येण्यासारख्या असतील.

## प्रकरण सात

## मोटार वाहनांची बांधणी करणे, ती सुसज्ज करणे व त्यांची देखभाल करणे

**वाहनांची बांधणी व देखभाल या संबंधीचा सर्वसाधारण उपबंध.**

१०९. (१) प्रत्येक मोटार वाहन, ते चालवणाऱ्या व्यक्तीचे त्यावर सदैव नियंत्रण राहील अशा रीतीने बांधण्यात येईल व त्याची देखभाल करण्यात येईल.

(२) प्रत्येक मोटार वाहन अशा रीतीने बांधले जाईल की, विहित स्वरूपाचे यांत्रिक किंवा विद्युतचलित संकेतदर्शक उपकरण त्यावर बसवलेले नसेल तर, त्याचे स्टीअरिंग कंट्रोल त्याच्या उजव्या बाजूस राहील.

[1][(३) लोकहिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक किंवा इष्ट आहे असे केंद्र शासनाचे मत असेल, तरते **शासकीय राजपत्रात** आदेश प्रसिद्ध करून असे अधिसूचित करू शकेल की, निर्माणकाने वापरावयाची कोणतीही वस्तू किंवा प्रक्रिया त्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दर्जाशी अनुरुप असली पाहिजे].

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम ३१ द्वारे मूळ कलम १०९ (२) नंतर नवीन पोटकलम (३) घालण्यात आले. (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून).

**केंद्र शासनाची नियम करण्याची शक्ती.** ११०. (१) केंद्र शासन, मोटार वाहने आणि अनुवाहने यांची बांधणी करणे, ती सुसज्ज करणे आणि त्यांची देखभाल करणे याबाबत नियमन करणाऱ्या पुढील सर्व अथवा कोणत्याही बाबींसाठी नियम करील.

त्या बाबी अशा :—

(क) वाहनांची आणि वाहून नेल्या जाणाऱ्या भारांची रुंदी, उंची, लांबी आणि बरपसारा;

[१][(ख) टायरांचे आकारमान, स्वरूप, कमाल किरकोळ किंमत आणि टायरांची स्थिती आणि त्यावर उमटवावयाची निर्मितीची तारीख व वर्ष, आणि वजन वाहून नेण्याची कमाल क्षमता;]

(ग) ब्रेक्स व स्टीअरिंग गीअर ;

(घ) रंगीत संरक्षक काचांच्या वापरावरील प्रतिषेधकासह संरक्षक काचांचा वापर ;

(ङ) संकेतन उपयंत्रे, दिवे व परावर्तक ;

(च) वेग नियामके ;

(छ) धूर, दृश्यमान वाफ, ठिणग्या, राख, रेवाळ, किंवा तेल बाहेर टाकले जाणे ;

(ज) वाहनांतून किंवा वाहनांमुळे निर्माण होणारा आवाज कमी करणे ;

(झ) न्याधार क्रमांक, इंजिन क्रमांक आणि उत्पादनाची तारीख उमटरेखित करणे ;

(ञ) सुरक्षा पट्टे, मोटार सायकलींच्या मुठींचे दांडे, ऑटो डिप्पर आणि वाहनचालक प्रवासी व रस्त्याचा वापर करणाऱ्या इतरांच्या सुरक्षिततेकरता आवश्यक अशी इतर साधने ;

(ट) वाहनात सुरक्षा साधने म्हणून वापरलेल्या घटकांचा दर्जा ;

(ठ) मानवी जीविताच्या दृष्टीने हानीकारक अथवा धोकादायक असेल अशा मालाच्या परिवहनाचे उपबंध ;

(ड) हवा प्रदूषित करणाऱ्या उत्सर्गाकरता मानके :

[२][(ढ) विहित करण्यात येईल त्या वर्गाच्या वाहनात उत्प्रेरण परिवर्तक (कॅटॅलिक कन्व्हर्टर) बसवणे;

(ण) सार्वजनिक वाहनांमध्ये दृकश्राव्य (ऑडियो व्हिज्युअल) किंवा रेडियो अथवा टेप-रेकॉर्डर्स यांसारखी उपकरणे बसविणे;

(त) वाहनाच्या विक्रीनंतरची हमी व त्याबाबतच्या शर्ती : ]

परंतु, पर्यावरणाच्या रक्षणाशी संबंधित अशा बाबींच्या संबंधातील कोणतेही नियम, शक्य होईल तितपत, भारत सरकारच्या पर्यावरण मंत्रालयाशी विचारविनिमयानंतर करण्यात येतील.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या बाबींचे नियमन करण्यासाठी नियम करता येतील आणि त्यामध्ये अशा बाबींचे अनुपालन केले जात आहे याची खात्री करून घेण्याची रीत आणि सरसकट मोटार वाहने किंवा अनुवाहने यांच्यासंबंधात अथवा विशिष्ट वर्गाची मोटार वाहने किंवा अनुवाहने यांच्यासंबंधात किंवा विशिष्ट परिस्थितीत, मोटार वाहनांची देखभाल करणे या बाबींचा समावेश असेल.

(३) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) केंद्र शासन, कोणत्याही वर्गाच्या मोटार वाहनांना या प्रकरणाच्या उपबंधांपासून सूट देऊ शकेल.

(ख) केंद्र शासनाकडून विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, एखादे राज्य शासन, कोणत्याही मोटार वाहनास अथवा कोणत्याही वर्गाच्या अथवा वर्णनाच्या मोटार वाहनास पोटकलम (१) खाली करण्यात आलेल्या नियमांपासून सूट देऊ शकेल.

**राज्य शासनाची नियम करण्याची शक्ती.** १११. (१) कलम ११० च्या पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींखेरीज इतर सर्व बाबींच्या संबंधात, एखादे राज्य शासन, मोटार वाहनांची आणि अनुवाहनांची बांधणी करणे, ती सुसज्ज करणे, आणि त्यांची देखभाल करणे याबाबत नियमन करणारे नियम करू शकेल.

(२) पूर्वगामी शक्तीच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, सरसकट मोटार वाहने अथवा वाहने यांच्या संबंधात अथवा विशिष्ट वर्गाची मोटार वाहने अथवा वाहने यांच्यासंबंधात अथवा विशिष्ट परिस्थितीत पुढीलपैकी सर्व अथवा कोणत्याही बाबींचे नियमन करणारे नियम या कलमाखाली करता येतील. त्याबाबी अशा :—

(क) सार्वजनिक सेवा वाहनातील आसन व्यवस्था आणि प्रवाशांचे हवामानापासून संरक्षण ;

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम ३२ (क) (एक) द्वारे मूळ कलम ११० मधील खंड (ख) ऐवजी हा खंड घालण्यात आला (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ३२ (क) (दोन) द्वारे मूळ कलम ११० (१), खंड (ड) नंतर हे खंड नव्याने घालण्यात आले. (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून).

(ख) विवक्षित वेळी अथवा विवक्षित ठिकाणी श्राव्य संकेतांच्या वापरास मनाई करणे अथवा त्यावर निर्बंध घालणे ;

(ग) ज्यामुळे त्रास किंवा धोका पोहचण्याचा संभव आहे अशी उपयंत्रे बरोबर नेण्यास मनाई करणे ;

(घ) विहित प्राधिकरणाद्वारे वाहनांची नियतकालिक चाचणी व निरीक्षण करणे [1][आणि अशा चाचणीकरिता आकारावयाची फी] ;

(ङ) वाहनांवर नोंदणी चिन्हांव्यतिरिक्त दर्शवावयाचा तपशील व तो कशा रीतीने दर्शवावा लागेल ;

(च) मोटार वाहनांबरोबर अनुवाहनांचा उपयोग करणे ; आणि

[2]* * * * * *

## प्रकरण आठ

### वाहतुकीचे नियमन

**११२.** (१) कोणतीही व्यक्ती, कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी एखादे मोटार वाहन, या अधिनियमाद्वारे अथवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्याखाली त्या वाहनाकरिता निश्चित करण्यात आलेल्या कमाल वेगापेक्षा अधिक अथवा किमान वेगापेक्षा कमी वेगाने चालवू शकणार नाही किंवा चालवावयास लावू शकणार नाही किंवा तशी मुभा देऊ शकणार नाही : **वेगाच्या मर्यादा.**

परंतु, असा कमाल वेग काही झाले तरी, कोणत्याही मोटार वाहनासाठी किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या मोटार वाहनासाठी, केंद्र शासनाने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे निश्चित केलेल्या वेगापेक्षा अधिक असणार नाही.

(२) सार्वजनिक सुरक्षितता किंवा सोय या दृष्टीने अथवा कोणतीही सडक किंवा पूल यांच्या स्वरूपामुळे मोटार वाहनांच्या वेगावर निर्बंध घालणे आवश्यक आहे अशी जर राज्य शासनाची किंवा राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही प्राधिकरणाची खात्री झाली तर, त्यास **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि योग्य ठिकाणी कलम ११६ खाली वाहतूक संकेतचिन्हे स्थापण्याची किंवा उभारण्याची व्यवस्था करून सर्वसाधारणपणे किंवा एखाद्या विशिष्ट क्षेत्रात किंवा एखाद्या विशिष्ट सडकेवर किंवा सडकांवर, मोटार वाहने किंवा मोटार वाहनांचा कोणताही विनिर्दिष्ट वर्ग किंवा ज्यास अनुवाहन जोडलेले असते अशी मोटार वाहने याकरता त्यास योग्य वाटतील अशा कमाल वेगमर्यादा निश्चित करता येतील :

परंतु, जर या कलमाखालील कोणताही निर्बंध जास्तीत जास्त एक महिन्यापर्यंत अंमलात राहावयाचा असेल तर, त्यासंबंधी **शासकीय राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध करण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) कलम ६० खाली नोंदणी केलेले कोणतेही वाहन "युद्धाभ्यास, मैदानी गोळीबार आणि तोफखाना यांचा सराव अधिनियम, १९३८" (१९३८ चा ५) याच्या कलम २ च्या पोटकलम (१) खालील अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रात व कालावधीत सैनिकी डावपेचांची प्रात्यक्षिके करताना वापरण्यात येत असेल तेव्हा, त्यास या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

**११३.** (१) राज्य शासन, राज्य किंवा प्रादेशिक परिवहन प्राधिकरणांद्वारे, [3][अवजड परिवहन वाहनांना] परवाने देण्याकरिता शर्ती विहित करू शकेल आणि कोणत्याही क्षेत्रात अथवा मार्गावर अशा वाहनांच्या वापरास मनाई करू शकेल किंवा त्यावर निर्बंध घालू शकेल. **वजनाच्या मर्यादा व वापरावरील मर्यादा.**

(२) अन्यथा विहित करण्यात येईल त्याव्यतिरिक्त एरव्ही, कोणतीही व्यक्ती, हवेने भरलेले टायर ज्यास जोडलेले नाहीत असे कोणतेही मोटार वाहन कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी चालवू शकणार नाही किंवा चालवावयास लावू शकणार नाही किंवा तशी मुभा देऊ शकणार नाही.

(३) (क) ज्याचे भाररहित वजन वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या भाररहित वजनापेक्षा अधिक असेल, किंवा

(ख) ज्याचे भारसहित वजन नोंदणी प्रमाणपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या एकंदर भारसहित वजनापेक्षा अधिक असेल,

—असे कोणतेही मोटार वाहन किंवा अनुवाहन कोणतीही व्यक्ती कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी चालवू शकणार नाही, किंवा चालवावयास लावू शकणार नाही किंवा तशी मुभा देऊ शकणार नाही.

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम ३३ (क) द्वारे कलम १११ (२) मध्ये हे शब्द घालण्यात आले (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ३३ (ख) द्वारे खंड (छ) वगळण्यात आला. (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ३४ द्वारे मूळ मजकुराऐवजी घालण्यात आला (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(४) पोटकलम (२) किंवा पोटकलम (३) खंड (क्) चे व्यतिक्रमण करून चालवण्यात येणाऱ्या मोटार वाहनाचा किंवा अनुवाहनाचा चालक किंवा प्रभारी व्यक्ती, ही मालक नसेल तर, असा गुन्हा हा, मोटार वाहनाच्या किंवा अनुवाहनाच्या मालकास माहीत असताना किंवा त्यांच्या आदेशानुसार करण्यात आला होता असे न्यायालयास गृहीत धरता येईल.

वाहनाचे वजन करवून घेण्याची शक्ती.

**११४.** (१) [1][राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या मोटार वाहन विभागाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास जर कोणतेही मालवाहू वाहन किंवा अनुयान कलम ११३ चे व्यतिक्रमण करून वापरण्यात येत आहे असे सकारण वाटत असेल तर,] ती व्यक्ती, चालकाला ते वाहन, वजन करण्यासाठी पुढील मार्गावरील कुठल्याही स्थानबिंदूपासून दहा किलोमीटर अंतराच्या आत किंवा वाहनाच्या नियत स्थळापासून वीस किलोमीटर अंतराच्या आत कोणताही वजनकाटा असल्यास तिकडे, नेण्यास सांगू शकेल, आणि असे वजन करण्यात आल्यावर वजना-संबंधीच्या कलम ११३ च्या उपबंधांचे त्या वाहनाने व्यतिक्रमण केले आहे असे आढळून आल्यास, ती व्यक्ती लेखी आदेशाद्वारे त्या चालकाला असे निदेशित करू शकेल की, तो जास्तीचा भार त्याने स्वतःच्या जोखमीवर कमी करावा आणि लादलेला असा माल कमी करेपर्यंत किंवा त्याने कलम ११३ चे अनुपालन होईल अशा प्रकारे वाहनाच्या किंवा अनुवाहनाच्या संबंधात अन्यथा कार्यवाही केल्याखेरीज ते वाहन अथवा अनुयान त्या जागेपासून हलवू नये आणि तशी सूचना मिळाल्यावर चालकाला अशा निदेशांचे पालन करावे लागेल.

(२) पोटकलम (१) खाली प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने, जर उपरोक्त आदेश लेखी दिला असेल तर, तो अशा अधिक भाराचा संबद्ध तपशील मालवाहन परवान्यावर पृष्ठांकितही करील आणि ज्या प्राधिकरणाद्वारे तो परवाना देण्यात आला आहे त्यास अशा पृष्ठांकनाच्या वस्तुस्थिती विषयीदेखील कळवील.

वाहनांच्या वापरावर निर्बंध घालण्याची शक्ती.

**११५.** राज्य शासनाची किंवा राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही प्राधिकरणाची जर सार्वजनिक सुरक्षिततेच्या किंवा सोयीच्या दृष्टीने अथवा कोणत्याही सडकेच्या किंवा पुलाच्या स्वरूपामुळे तसे करणे आवश्यक आहे अशी खात्री पटली तर, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, ते शासन, एखाद्या विनिर्दिष्ट क्षेत्रात सरसकट किंवा एखाद्या विनिर्दिष्ट मार्गावर मोटार वाहने किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट वर्गाची मोटार वाहने चालवण्यास किंवा अनुवाहन वापर करण्यास अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अपवादांच्या व शर्तीच्या अधीनतेने मनाई करू शकेल किंवा त्यावर निर्बंध घालू शकेल आणि जेव्हा अशी कोणतीही मनाई करण्यात येईल किंवा निर्बंध घालण्यात येईल तेव्हा, कलम ११६ अनुसार योग्य ठिकाणी योग्य ती वाहतूक संकेत चिन्हे लावण्याची किंवा उभारण्याची व्यवस्था ते शासन करील :

परंतु, जर या कलमाखाली कोणतीही मनाई किंवा निर्बंध एक महिना इतका काळ अंमलात राहावयाचा नसेल तर, त्याकरता **शासकीय राजपत्रात** अधिसूचना देण्याची आवश्यकता असणार नाही. पण अशा मनाईस किंवा निर्बंधास परिस्थितीनुसार शक्य होईल त्याप्रमाणे स्थानिक प्रसिद्धी देण्यात येईल.

वाहतूक संकेत चिन्हे उभारण्याची शक्ती.

**११६.** (१) (क्) राज्य शासन किंवा राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेले कोणतेही प्राधिकरण, कलम ११२ च्या पोटकलम (२) खाली निश्चित केलेल्या कोणत्याही वेगमर्यादा अथवा कलम ११५ खाली कोणत्याही गोष्टींना केलेली मनाई किंवा निर्बंध लोकांच्या नजरेला आणून देण्यासाठी किंवा सर्वसाधारणपणे, मोटार वाहनांच्या वाहतुकीचे नियमन करण्यासाठी कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी वाहतूक संकेत चिन्हे लावण्याची किंवा उभारण्याची व्यवस्था करू शकेल किंवा तशी परवानगी देऊ शकेल.

(ख्) राज्य शासन किंवा राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेले कोणतेही प्राधिकरण, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे किंवा अनुसूचीच्या विभाग "क" मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या समुचित वाहतूक संकेत चिन्हांची सोईस्कर ठिकाणी उभारणी करून केंद्र शासनाने केलेल्या चालन विनियमांच्या प्रयोजनांकरिता, विवक्षित रस्ते हे मुख्य रस्ते म्हणून संबोधित करू शकेल.

(२) ज्याकरता अनुसूचीत उपबंध केलेला आहे अशा कोणत्याही प्रयोजनार्थ, पोटकलम (१) खाली स्थापित केलेल्या किंवा उभारलेल्या वाहतूक संकेत चिन्हांचे आकारमान, रंग आणि प्रकार अनुसूचीत दिल्याप्रमाणे असतील व त्यांना त्याप्रमाणेच अर्थ असेल, पण राज्य शासन किंवा राज्य शासनाने याबाबतीत शक्ती प्रदान केलेले कोणतेही प्राधिकरण उक्त अनुसूचीत दिलेल्या कोणत्याही चिन्हाच्या जोडीला त्यावरील शब्द, अक्षरे किंवा आकडे राज्य शासनाला योग्य वाटेल अशा लिपीत प्रतिलिखित करू शकेल किंवा तसे करणे प्राधिकृत करू शकेल परंतु अशा प्रति लिखित मजकुरांचे आकारमान व रंग, अनुसूचीत दिलेले शब्द, अक्षरे व आकडे यांच्या सारखेच असतील.

(३) पोटकलम (१) मध्ये जसे उपबंधित केले आहे त्याव्यतिरिक्त, कोणतेही वाहतूक संकेत चिन्ह, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर कोणत्याही मार्गावर किंवा मार्गाजवळ स्थापित करण्यात किंवा उभारण्यात येणार नाही. पण कोणत्याही सक्षम प्राधिकरणाने या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी उभारलेली सर्व वाहतूक संकेत चिन्हे, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, पोटकलम (१) च्या उपबंधाखाली स्थापित केलेली, उभारलेली रहदारी संकेत चिन्हे असल्याचे मानण्यात येईल.

---

१. १९९४ अधिनियम ५४, कलम ३५ द्वारे मूळ मजकुरा ऐवजी घालण्यात आला (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(४) राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, पोलीस अधिक्षकापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास, त्याच्या मते रहदारी संकेत चिन्हे नीट दिसणार नाहीत अशा प्रकारे जी स्थापित करण्यात आली आहेत अशी कोणतीही चिन्हे किंवा जाहिरात अथवा जी त्याच्या मते वाहतूक संकेत चिन्हासारखीच दिसत असून त्यामुळेच दिशाभूल होत आहे असे कोणतेही चिन्ह किंवा, जाहिरात अथवा त्याच्या मते, ज्यामुळे चालकाचे अवधान अथवा एकाग्रता विचलित होत आहे असे कोणतेही चिन्ह किंवा जाहिरात काढून टाकण्याची किंवा काढून टाकायला लावण्याची शक्ती प्रदान करू शकेल.

(५) कोणत्याही व्यक्तीला, या कलमाखाली स्थापित केलेली किंवा उभारलेली कोणतीही वाहतूक संकेत चिन्हे, बुद्धिपुरःसर हलवता येणार नाहीत, किंवा त्यात फेरबदल करता येणार नाही किंवा ती विरुपित करता येणार नाहीत किंवा अन्य कोणत्याही प्रकारे त्यात गैरफेर करता येणार नाही.

(६) एखादे वाहतूक संकेत चिन्ह या कलमाखाली ज्याकरिता स्थापित करण्यात किंवा उभारण्यात आले असेल त्या प्रयोजनाच्या दृष्टीने, ते निरुपयोगी होईल अशा प्रकारे जर कोणत्याही व्यक्तीकडून त्या चिन्हाची अभावितपणे खराबी झाली तर, कोणत्याही परिस्थितीत ती घटना घडली त्याची खबर त्या व्यक्तीने शक्य तितक्या लवकर आणि काही झाले तरी, ती घटना घडल्यापासून चोविस तासांच्या आत, एखाद्या पोलीस अधिकाऱ्याकडे किंवा पोलीस ठाण्यावर दिली पाहिजे.

(७) [१][पहिली अनुसूची] मध्ये घालून दिलेली संकेत चिन्हे, केंद्र शासन त्या त्या वेळी ज्यात सहभागी असेल अशा मोटार वाहतूक विषयक अंतरराष्ट्रीय अभिसंधिनुरुप करण्याच्या प्रयोजनार्थ, केंद्र शासनाला **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे अशा कोणत्याही चिन्हामध्ये भर घालता येईल किंवा फेरबदल करता येईल आणि अशी कोणतीही अधिसूचना काढल्यावर [१][पहिली अनुसूची] त्यानुसार विशोधित झाली आहे असे मानण्यात येईल.

**वाहने उभी करण्याच्या जागा व निश्चित मुक्कामाची ठिकाणे.** **११७.** राज्य शासनास किंवा राज्य शासनाने याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही प्राधिकरणास संबंधित क्षेत्रात अधिकारिता असलेल्या स्थानिक प्राधिकरणाशी विचारविनिमय करून मोटार वाहने अनिश्चित काळपर्यंत किंवा विनिर्दिष्ट कालावधी पुरती जेथे उभी करता येतील अशा जागा निश्चित करता येतील, आणि सार्वजनिक सेवा वाहने, प्रवाशांना आत घेण्यास व उतरविण्यास त्यांना जेवढा वेळ लागतो त्यापेक्षा अधिक वेळ ज्या ठिकाणी थांबविता येतील अशा जागा निश्चित करता येतील.

**चालन विनियम.** **११८.** केंद्र शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, मोटार वाहनांच्या चालनांकरता विनियम करू शकेल.

**वाहतूक संकेत पालन करण्याचे कर्तव्य.** **११९.** (१) मोटार वाहनाचा प्रत्येक चालक, अनिवार्य वाहतूक संकेत चिन्हाद्वारे देण्यात आलेल्या कोणत्याही सूचनेला अनुसरून आणि केंद्र शासनाने केलेल्या चालन विनियमांना अनुसरून वाहन चालविल आणि त्यावेळी कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीच्या विनियमनासाठी काम करीत असलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याने त्यास दिलेल्या सर्व निर्देशांचे पालन तो करेल.

(२) या कलमात "अनिवार्य वाहतूक संकेत चिन्ह" याचा अर्थ कलम ११६ च्या पोटकलम (१) खाली मोटार वाहनांच्या वाहतुकीचे नियमन करण्याच्या प्रयोजनार्थ स्थापित केलेले अथवा उभारलेली असे, अनुसूचीच्या भाग "क" मध्ये समाविष्ट केलेले वाहतूक संकेत चिन्ह किंवा तत्सम स्वरूपाचे (म्हणजेच, एखादे बोधचिन्ह, शब्द किंवा आकडा दाखवणाऱ्या व लाल रंगाचा पृष्ठ भाग किंवा कडा असलेल्या वर्तुळाकार तबकडीचे बनलेले किंवा ती समाविष्ट असलेले) कोणतेही वाहतूक संकेत चिन्ह, असा आहे.

**डाव्या बाजूस नियंत्रण असलेली वाहने.** **१२०.** कोणतीही व्यक्ती डाव्या बाजूस गिअर असलेले कोणतेही मोटार वाहन कोणतेही सार्वजनिक ठिकाणी चालवू शकणार नाही किंवा चालवावयास लावणार नाही किंवा तशी मुभा देऊ शकणार नाही, मात्र जर त्यात विहित स्वरूपाचे यांत्रिक किंवा विद्युत सांकेतीक साधन बसवलेले असून ते सुस्थितीत चालू असेल तर, गोष्ट अलहिदा.

**संकेत व संकेतन साधने.** **१२१.** एखादा मोटार वाहनाचा चालक, केंद्र शासन विहित करील अशा प्रसंगी, व असे संकेत सांकेतीक करील :

परंतु, उजवीकडे किंवा डावीकडे वळण्याच्या किंवा थांबण्याचा उद्देश असल्याचा संकेत त्याच्याकडून,—

(क) उजव्या बाजूस गिअर असलेल्या वाहनांच्या बाबतीत, वाहनास जोडलेल्या विहित स्वरूपाच्या यांत्रिक किंवा विद्युत साधनाद्वारे देण्यात येईल; आणि

(ख) डाव्या बाजूस गिअर असलेल्या वाहनांच्या बाबतीत, वाहनास जोडलेल्या विहित स्वरूपाच्या यांत्रिक किंवा विद्युत साधनांद्वारे देण्यात येईल :

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम ३६ द्वारे मूळ अधिनियमांच्या कलम ११६ (७) यामध्ये जेथे जेथे 'अनुसूची' हा शब्द आला असेल तेथे "पहिली अनुसूची" हा शब्द घालण्यात आला (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

परंतु आणखी असे की, राज्य शासन, एखाद्या क्षेत्रातील किंवा मार्गावरील खडकांची रुंदी व स्थिती लक्षात घेऊन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे तीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, त्या क्षेत्रात किंवा नियतमार्गावर वाहतूक करण्याच्याबाबतीत अशा कोणत्याही मोटार वाहनाला किंवा अशा कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या मोटार वाहनांना सूट देऊ शकेल.

**वाहन धोकादायक स्थितीत ठेवून देणे.** १२२. मोटार वाहनाच्या प्रभारी कोणत्याही व्यक्तीस, मोटार वाहन अथवा कोणतेही अनुवाहन कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी, त्या सार्वजनिक ठिकाणाच्या इतर उपयोगकर्त्यांना किंवा प्रवाशांना धोकादायक होईल किंवा धोकादायक होण्यास कारणीभूत होईल किंवा अडथळा होईल किंवा फार गैरसोयीचे होईल अशा स्थानी किंवा अशा स्थितीत किंवा परिस्थितीत ठेवून देता येणार नाही किंवा तसेच राहू देता येणार नाही.

**पायफळी इत्यादींवर उभे राहून प्रवास करणे.** १२३. (१) मोटार वाहन चालवणारी किंवा तीवर जिचा प्रभार आहे अशी कोणतीही व्यक्ती, जर कोणी पायफळीवर उभे राहिले असेल किंवा वाहनाच्या आतल्या अंगाला नसेल तर, अशा कोणाही व्यक्तीची वाहतूक करू शकणार नाही किंवा तशी वाहतूक करू देणार नाही.

(२) कोणाही व्यक्तीस मोटार वाहनाच्या पायफळीवरून किंवा टपावरून किंवा बॉनेटवरून प्रवास करता येणार नाही.

**पास किंवा तिकीट याविना प्रवास करण्याला मनाई.** १२४. कोणत्याही व्यक्तीला, तिच्याजवळ योग्य तो पास किंवा तिकीट असल्याखेरीज, कोणत्याही टप्पेगाडीमधून प्रवास करण्याच्या इरादाने तीमध्ये शिरता येणार नाही किंवा तेथे थांबून राहता येणार नाही :

परंतु, एखाद्या व्यक्तीस ज्या टप्पेगाडीमधून प्रवास करावयाचा आहे त्या गाडीतच तिकीट पुरवठा करण्याची व्यवस्था असेल त्याबाबतीत, त्या व्यक्तीस अशा गाडीत प्रवेश करता येईल, मात्र त्यात प्रवेश केल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, वाहकाला किंवा वाहकाची कामे पार पाडणाऱ्या चालकाला आपल्या प्रवास भाड्याचे पैसे चुकते करून, त्या व्यक्तीला अशा वाहकाकडून किंवा प्रकरणपरत्वे, चालकाकडून आपल्या प्रवासाचे तिकीट घ्यावे लागेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमात :—

(क) "पास" याचा अर्थ, एखाद्या व्यक्तीला कर्तव्यार्थ, विशेषाधिकार म्हणून किंवा सौजन्य म्हणून देण्यात आलेल्या ज्या पासामुळे टप्पेगाडीमधून निःशुल्क प्रवास करण्याचा हक्क प्राप्त होतो तो पास असा असून त्यामध्ये टप्पेगाडीमधून प्रवास करण्याकरिता पैसे देऊन घेतलेल्या ज्या पासावर त्याची मुदत विनिर्दिष्ट केलेली असते त्या पासाचा समावेश होतो ;

(ख) "तिकीट" या संज्ञेत, एकेरी तिकीट, परतीचे तिकीट किंवा मुदती तिकीट यांचा समावेश होतो.

**चालकाला अडथळा करणे.** १२५. मोटार वाहन चालवणारी कोणतीही व्यक्ती जेणेकरून तिला वाहन चालवताना वाहनाबर नियंत्रण ठेवण्याच्या कामी अडथळा होईल अशा प्रकारे किंवा अशा स्थितीत कोणाही व्यक्तीला उभे राहू किंवा बसू देणार नाही अथवा तशा प्रकारे कोणतीही वस्तू ठेवू देणार नाही.

**स्थिर वाहने.** १२६. मोटार वाहन चालवणाऱ्या किंवा त्यावर प्रभार असलेल्या ज्या कोणाही व्यक्तीला, चालकाच्या जागेवर वाहन चालवण्यास रीतसर लायसन मिळालेली व्यक्ती असल्याशिवाय, अथवा ते यंत्र बंद करून, ब्रेक किंवा ब्रेक्स लावलेले असल्याशिवाय किंवा चालकाच्या गैरहजेरीत वाहन आकस्मिकपणे चालू होणार नाही याची निश्चिती होण्यासाठी आवश्यक ते अन्य उपाय योजल्याशिवाय ते वाहन कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी स्थिर उभे करता येणार नाही किंवा तसे राहू देता येणार नाही.

**सार्वजनिक ठिकाणी परित्यक्त अवस्थेत अथवा लक्ष न देता तशीच सोडलेली मोटार वाहने तेथून हलवणे.** १२७. [1][(१) कोणतेही मोटारवाहन, एखाद्या सार्वजनिक ठिकाणी दहा तास किंवा त्याहून अधिक काळ किंवा परित्यक्त अवस्थेत किंवा लक्ष न देता सोडून दिलेले असेल किंवा कायद्याने प्रतिबंध असलेल्या ठिकाणी उभे करून ठेवण्यात आले असेल अशा बाबतीत, अधिकारिता असणाऱ्या वर्दीधारी पोलीस अधिकाऱ्याने वाहन, खेचून नेण्याच्या सेवेद्वारे ते तेथून हलविणे किंवा चाक खेचून किंवा कोणत्याही प्रकारे ते अचल स्थितीत ठेवणे हे प्राधिकृत असेल.]

(२) जर, कोणत्याही वाहनाच्या उपेक्षेमुळे, ते सोडून दिल्यामुळे, ते भंग पावल्यामुळे, जळल्यामुळे अथवा अंशतः मोडतोड झाल्यामुळे अथवा त्याच्या [2][सार्वजनिक ठिकाणावरील] स्थितीमुळे वाहतुकीस धोका निर्माण होत असेल किंवा याचे प्रत्यक्ष अस्तित्व वाहतुकीस व्यत्यय आणण्यास कारणीभूत होत असेल तर, खेचसेवेद्वारे ते वाहन अशी अधिकारिता असणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याने [2][सार्वजनिक ठिकाणाहून] त्वरित हलवणे हे प्राधिकृत असेल.

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम ३७ (क) द्वारे मूळ अधिनियमातील कलम १२७ (१) ऐवजी नवीन पोटकलम (१) घालण्यात आले. (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ३७ (ख) द्वारे मूळ कलम १२७ (२) मध्ये जेथे जेथे "महामार्ग" हा शब्द आला असेल तेथे "सार्वजनिक ठिकाण" हा शब्द घालण्यात आला. (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(३) एखाद्या पोलीस अधिकाऱ्याने पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) खाली एखादे वाहन हलवणे हे प्राधिकृत केले असल्यास त्या वाहनाचा मालक इतर कोणत्याही शास्तीखेरीज आणखी, खेचकामाकरता आलेला सर्व खर्च देण्यासदेखील जबाबदार असेल.

**१२८.** (१) दुचाकी मोटार सायकलचा कोणताही चालक, स्वत:खेरीज आणखी एकाहून अधिक व्यक्तींना त्या मोटारसायकलवरून घेऊन जाणार नाही, आणि अशी कोणतीही व्यक्ती चालकाच्या आसनामागे मोटारसायकलला योग्य त्या सुरक्षिततेच्या उपायांसह पक्क्या जोडलेल्या आसनावर बसल्याखेरीज अन्यथा तिला मोटार सायकलवरून घेऊन जाता येणार नाही. **चालक व पाठीमागच्या आसनावर बसून प्रवास करण्याकरता सुरक्षिततेचे उपाय.**

(२) पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या सुरक्षिततेच्या उपायांखेरीज केंद्र शासन, दुचाकी मोटार सायकलचा चालक आणि त्याच्या पाठीमागच्या आसनावर बसून प्रवास करणाऱ्या व्यक्ती यांच्यासाठी इतर सुरक्षिततेचे उपाय विहित करू शकेल.

**१२९.** वाहन चालवणाऱ्या अथवा (जोडचाका व्यतिरिक्त कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या मोटार सायकलवर) त्यावर बसून जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस जेव्हा ती सार्वजनिक ठिकाणी असेल तेव्हा [१][भारतीय मानक विभागाच्या मानकांशी अनुरुप असे संरक्षक शिरोवेष्टन घालावे लागेल:] **संरक्षक शिरोवेष्टन वापरणे.**

परंतु, एखादी व्यक्ती शीख असून, तिने सार्वजनिक ठिकाणी मोटार सायकल चालवत असताना किंवा तीवर बसून जात असताना फेटा बांधलेला असेल तर, या कलमाचे उपबंध तिला लागू होणार नाहीत :

परंतु आणखी असे की, राज्य शासन आपणास योग्य वाटतील अशा अपवादांबाबत अशा नियमाद्वारे उपबंध करू शकेल.

**स्पष्टीकरण.**—"संरक्षक शिरोवेष्टन" याचा अर्थ, जे शिरस्त्राण—

(क) त्याचा आकार, सामग्री व बनावट यामुळे मोटार सायकल चालवणाऱ्या किंवा तीवर बसून जाणाऱ्या व्यक्तीला अपघात झाल्यास इजा होण्यापासून काही प्रमाणात संरक्षण देईल अशी वाजवी अपेक्षा करता येते ; व

(ख) त्याला जोडलेल्या पट्ट्याच्या किंवा इतर बंदांच्या सहाय्याने ते परिधान करणाऱ्याच्या डोक्याला पक्के बांधलेले असते;

असे शिरस्त्राण, असा आहे.

**१३०.** (१) मोटार वाहनाच्या चालकाला कोणत्याही सार्वजनिक जागी वर्दीधारी पोलीस अधिकाऱ्याने मागणी केली असता आपले लायसन तपासणीसाठी सादर करावे लागेल : **लायसन व नोंदणी प्रमाणपत्र सादर करण्याचे कर्तव्य.**

परंतु, चालकाने जर ह्या अथवा इतर कोणत्याही अधिनियमाखाली कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा प्राधिकरणास लायसन सादर केलेले असेल किंवा अशा अधिकाऱ्यांकडून किंवा प्राधिकाऱ्याकडून ते जप्त करण्यात आले असेल तर, चालक लायसनाऐवजी अशा अधिकाऱ्याने किंवा प्राधिकरणाने दिलेली पावती अथवा अभिस्वीकृती तो सादर करू शकेल आणि तद्नंतर मागणी करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याला केंद्र शासन विहित करील अशा रीतीने आणि अशा कालावधीत तो ते लायसन सादर करू शकेल.

[२][(२) कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी असलेल्या एखाद्या मोटार वाहनाच्या वाहकाला, याबाबतीत प्राधिकृत करण्यात आलेल्या मोटार वाहन विभागाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने मागणी केली असता, तपासणीसाठी आपले लायसन सादर करावे लागेल.]

[३][(३) (कलम ६० खाली नोंदणी केलेल्या वाहनाव्यतिरिक्त) मोटार वाहनाच्या मालकास, किंवा त्याच्या अनुपस्थितीत त्या वाहनाच्या चालकास, किंवा त्या वाहनाचा प्रभार जिच्याकडे आहे, अशा इतर व्यक्तीस, नोंदणी प्राधिकरणाकडून किंवा याबाबतीत मोटार वाहन विभागाच्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याने मागणी केली असता, वाहनाच्या विम्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल आणि ते वाहन परीवहन वाहन असल्यास त्याबाबतीत, कलम ५६ मध्ये निर्देशिलेले क्षमता प्रमाणपत्र व परवानाही सादर करावा लागेल; आणि कोणतीही किंवा सर्व प्रमाणपत्रे किंवा परवाना त्याच्या ताब्यात नसेल अशा बाबतीत, मागणी करण्यात आल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत त्याच्या साक्षांकित फोटो प्रती मागणी करणाऱ्या अधिकाऱ्याकडे एकतर जातीने सादर कराव्या लागतील किंवा नोंदणीकृत डाकेने पाठवाव्या लागतील.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, "विम्याचे प्रमाणपत्र" याचा अर्थ, कलम १४७ च्या पोटकलम (३) खाली देण्यात आलेले प्रमाणपत्र, असा आहे.]

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम ३८ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर घालण्यात आला (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ३९ (क) द्वारे मूळ कलम १३० ऐवजी नवीन पोटकलम (२) घालण्यात आले (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधियिमाच्या कलम ३९ (ख) द्वारे मूळ कलम १३० (३) ऐवजी नवीन पोटकलम (३) व स्पष्टीकरण घालण्यात आले (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून).

(४) पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेल्या लायसनाची किंवा प्रकरणपरत्वे, पोटकलम (३) मध्ये निर्देशिलेल्या प्रमाणपत्राची किंवा परवान्याची जिच्याकडून मागणी करण्यात आलीआहे त्या व्यक्तीकडे त्यावेळेस ते लायसन किंवा प्रमाणपत्र किंवा परवाना नसेल तर, त्या व्यक्तीने ते लायसन किंवा प्रमाणपत्र किंवा परवाना, केंद्र शासन विहित करील अशा कालावधीत व अशा रीतीने, मागणी करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यास अथवा प्राधिकरणास सादर केल्यास ते या कलमाचे पुरेसे अनुपालन केल्यासारखे होईल:

परंतु, विहित करण्यात येईल अशी व्याप्तीखेरीजकरून व अशा फेरबदलाविना एरव्ही, या पोट-कलमाचे उपबंध, नोंदणी प्रमाणपत्र अथवा परिवहनाचे योग्यता प्रमाणपत्र सादर करण्याविषयी जिला फर्मावण्यात आले असेल अशा कोणत्याही व्यक्तीस लागू होणार नाहीत.

रक्षकरहित रेल्वे ओलांडणी ओलांडित असता किंवा विवक्षित सावधगिरी बाळगण्याविषयी चालकाचे कर्तव्य.

१३१. प्रत्येक मोटार वाहनाच्या चालकाला कोणत्याही रक्षकरहित रेल्वे ओलांडणीच्या जवळ पोहचल्यानंतर वाहन थांबवावे लागेल आणि तो वाहनातील वाहकास किंवा स्वच्छकास किंवा परिचरास किंवा वहानातील इतर कोणत्याही व्यक्तीस रेल्वे ओलांडणीपर्यंत चालत जायला लावील आणि कोणत्याही बाजूने आगगाडी किंवा ढकल गाडी येत नाही याची खात्री करुन घेईल आणि मग मोटार वाहनास अशा रेल्वे ओलांडणीवरून सुरक्षितरित्या पलीकडे जाण्यासाठी मार्ग दर्शविल आणि जर वाहनात वाहक किंवा स्वच्छक किंवा परिचर किंवा इतर कोणतीही व्यक्ती नसेल तर, रेल्वे रूळ ओलांडण्यापूर्वी वाहनाचा चालक वाहनातून खाली उतरून, कोणत्याही बाजूने आगगाडी अथवा ढकलगाडी येत नाही याची स्वतः खात्री करून घेईल.

विवक्षित बाबतींत वाहन थांबविणे हे वाहकाचे कर्तव्य.

१३२. (१) मोटार चालकाला—

[1][ (क) एखादी व्यक्ती, जनावर किंवा वाहन यास अपघात घडवून येण्यात किंवा कोणत्याही मालमत्तेस नुकसान पोचवण्यात ते वाहन गोवले जाण्याच्या प्रकरणी, उपनिरीक्षकापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही वर्दीधारी पोलीस अधिकाऱ्याने त्यास तसे करण्यास फर्माविले असता; किंवा)

(ख) एखादे जनावर ताब्यात असलेल्या व्यक्तीला ते जनावर अनावर झाले असावे किंवा वाहनामुळे भयभित होऊन ते अनावर होईल अशी धास्ती वाटल्यावरून तिने त्या चालकाला तसे सांगितले असता ; किंवा

[2][ (ग) * * * * * ]

ते वाहन थांबवावे लागेल आणि, [3][वाजवीरित्या आवश्यक असेल परंतु चोवीस तासांपेक्षा अधिक असणार नाही अशा कालावधीपर्यंत] स्थिर उभ ठेवावे लागेल, आणि त्याला आपले नाव व पत्ता आणि वाहनाच्या मालकाचे नाव व पत्ता, अशा कोणत्याही अपघाताची किंवा नुकसानाची झळ पोहचलेली जी कोणतीही व्यक्ती मागणी करील तिच्याकडे द्यावे लागेल, मात्र अशा व्यक्तीने देखील आपले नाव व पत्ता दिला पाहिजे.

(२) आपले स्वताचे नाव व पत्ता देणाऱ्या आणि मोटार वाहनाच्या चालकाने कलम १८४ खाली शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे अभिकथन करणाऱ्या व्यक्तीने मागणी केले असता, चालकाला त्या व्यक्तीकडे आपले नाव व पत्ता द्यावा लागेल.

(३) या कलमातील "जनावर" या शब्दप्रयोगाचा अर्थ, कोणताही घोडा, गुरेढोरे, हत्ती, उंट, गाढव, खचर, मेंढी, किंवा बकरा, असा आहे.

माहिती देणे हे मोटार वाहनाच्या मालकाचे कर्तव्य.

१३३. ज्याच्या चालकावर किंवा वाहकांवर या अधिनियमाखाली कोणत्याही अपराधाचा आरोप करण्यात आला आहे अशा मोटार वाहनाच्या मालकाला, राज्य शासनाकडून याबाबतीत प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याने मागणी केली असता, चालकाचे किंवा वाहकाचे नाव व पत्ता आणि त्याने धारण केलेले लायसन यांच्या संबंधात मालकाच्या जवळ जी माहिती असेल किंवा वाजवी तत्परता दाखविल्यास त्याला ज्याबाबत खातरजमा करता यईल अशी सर्व माहिती द्यावी लागेल.

एखाद्या व्यक्तीस अपघात व दुखापत झाल्यास त्या प्रसंगी चालकाचे कर्तव्य.

१३४. ज्या अपघातात एखादे मोटार वाहन गोवलेले आहे अशा अपघातामुळ जेव्हा कोणत्याही व्यक्तीस दुखापत झाली असेल किंवा त्रयस्थ व्यक्तीच्या कोणत्याही मालमत्तेस नुकसान पोहचले असेल तेव्हा, त्या वाहनाच्या चालकाला किंवा वाहनाच्या अन्य ताबाधारक व्यक्तीला—

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम ४० (ख) द्वारे मूळ खंड (क) एवजी नवीन खंड (क) घालण्यात आला. (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या खंड (ग) अन्वये मूळ खंड (ग) वगळण्यात आला (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ४० (क) द्वारे "वाजवीरीत्या आवश्यक असेल तोपर्यंत" या मजकुराऐवजी हा मजकूर घालण्यात आला. (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी तेव्हापासून).

(क्) जमावाच्या प्रक्षोभामुळे किंवा त्याच्या आवाक्याबाहेरील कोणत्याही कारणामुळे असे करणे व्यवहार्य ठरणार नाही असे नसेल तर, दुखापत झालेल्या व्यक्तीस [1][सर्वात जवळच्या वैद्यक व्यवसायीकडे किंवा रुग्णालयात पाठवून] वैद्यकीय मदत मिळवून देण्यासाठी सर्व वाजवी उपाय-योजना करावी लागेल [1][आणि रुग्णालयात कामावर असलेल्या प्रत्येक नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीचे किंवा डॉक्टरचे, कोणत्याही कार्यपद्धती विषयक औपचारिकतेसाठी न थांबता दुखापत झालेल्या व्यक्तीकडे तात्काळ लक्ष देणे व त्याला वैद्यकीय मदत देणे किंवा त्याच्यावर उपचार चालू करणे हे, कर्तव्य असेल.] मात्र दुखापत झालेल्या व्यक्तीची किंवा ती व्यक्ती अज्ञान असल्यास तिच्या पालकाची वेगळी इच्छा असेल तर गोष्ट अलाहिदा;

(ख्) पोलीस अधिकाऱ्याने मागणी केली असता आवश्यक असलेली कोणतीही माहिती द्यावी लागेल किंवा कोणताही पोलीस अधिकारी उपस्थित नसेल तर, खंड (क्) खाली फर्मावण्यात आलेली वैद्यकीय मदत मिळवून देण्यासाठी सर्व वाजवी उपाययोजना केलेल्या नाहीत असे असल्यास अशा परिस्थितीसह घडलेल्या परिस्थितीचे इतिवृत्त, शक्य होईल तितक्या लवकर व कोणत्याही परिस्थितीत घटना घडल्यापासून चोवीस तासांच्या आत सर्वात जवळच्या पोलीस ठाण्यावर कळवावे लागेल.

[2][(ग्) विमा प्रमाणपत्र देणाऱ्या विमाकाराला अपघात घडल्यासंबंधी माहिती लेखी स्वरूपात द्यावी लागेल ती पुढीलप्रमाणे :—

(एक) विमा पॉलीसी क्रमांक व तिच्या वैधतेचा कालावधी,

(दोन) अपघाताची तारीख, वेळ व जागा.

(तीन) अपघातात दुखापत झालेल्या किंवा ठार झालेल्या व्यक्तींसंबंधीचे तपशील.

(चार) चालकाचे नांव व त्याच्या चालन लायसनाचा तपशील.

स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनार्थ "चालक" या शब्दप्रयोगात "वाहनाचा मालक" याचा समावेश आहे.]

**अपघातांच्या तपासणीकरता आणि रस्त्यालगतच्या सुखसोई इत्यादीकरिता तयार करावयाच्या योजना.**

१३५. (१) राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे,—

(क्) मोटार वाहन अपघाताची कारणे व विश्लेषण यावरील सखोल अभ्यास ;

(ख्) महामार्गावर रस्त्यांलगतच्या सुखसोयी करणे ;

(ग्) महामार्गावरील वाहतूक सहाय्य ठाणी ; आणि

(घ्) महामार्गाच्या बाजुने मालमोटारी उभ्या करण्यासाठी वाहनतळ यांची तरतूद करण्याकरता एक किंवा अधिक योजना तयार करू शकेल.

(२) राज्य शासनाने या कलमाखाली केलेली प्रत्येक योजना ती करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर राज्य विधानमंडळासमोर मांडण्यात येईल.

**अपघातात गोवलेल्या वाहनाचे निरीक्षण.**

१३६. एखादा अपघात घडलेला असून त्यामध्ये एखादे मोटार वाहन गोवलेले असेल तेव्हा, राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीला, तशी मागणी झाल्यास तिने आपले प्राधिकारपत्र सादर केल्यावर वाहनाचे निरीक्षण करता येईल, व त्या प्रयोजनासाठी, वाहन जेथे असेल अशा कोणत्याही जागेत कोणत्याही वाजवी वेळी प्रवेश करता येईल व तपासणीसाठी तेथून हलवता येईल :

परंतु, वाहन याप्रमाणे जेथे हलवण्यात आले असेल ती जागा वाहनाच्या मालकास कळवण्यात येईल आणि [3][औपचारिक गोष्टी पूर्ण करण्यात आल्यानंतर चोवीस तासांच्या आत ते वाहन, त्याच्या मालकाकडे, चालकाकडे किंवा ते ताब्यात असणाऱ्या व्यक्तीकडे] परत करण्यात येईल.

**केंद्र शासनाची नियम करण्याची शक्ती.**

१३७. केंद्र शासन पुढीलपैकी सर्व अथवा कोणत्याही बाबींसाठी उपबंध करण्याकरिता नियम करू शकेल, त्या बाबी अशा—

(क्) मोटार वाहनांच्या चालकांकडून ज्या प्रसंगी संकेत करण्यात येतील ते प्रसंग आणि कलम १२१ खालील असे संकेत ;

(ख्) कलम १३० खाली पोलीस अधिकाऱ्यासमोर लायसने अथवा प्रमाणपत्रे ज्या पद्धतीस सादर करण्यात येऊ शकेल ती पद्धती.

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम ४१ (क्) द्वारे खंड (क्) मधील "आणि आवश्यकता असल्यास त्या व्यक्तीला सर्वात जवळच्या रुग्णालयात घेऊन जावे लागेल" या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर घालण्यात आला. (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ४१ (ख्) द्वारे 'खंड (ग्)' घालण्यात आला (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून.)

३. वरील अधिनियमाच्या कलम ४२ द्वारे "वाहन अनावश्यक विलंब न लावता" या मजकुराऐवजी हा मजकूर घालण्यात आला (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

**राज्य शासनाची नियम करण्याची शक्ती.** १३८. (१) कलम १३७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींखेरीज, राज्य शासनाला या प्रकरणाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्यासाठी नियम करता येतील.

(२) पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांमध्ये पुढील गोष्टींसाठी उपबंध करता येईल---

(क) जी वाहने नादुरुस्त होऊन पडली असतील किंवा जी वाहने रस्त्यावर स्थिर उभी करून ठेवण्यात आली असतील किंवा टाकून देण्यात आली असतील तशी वाहने त्यातील बोजा सहित तेथून हलवणे व ती सुरक्षितपणे सांभाळून ठेवणे ;

(ख) वजन करण्याची साधने बसवणे व त्यांचा उपयोग ;

(ग) रस्त्यालगतच्या सुखसोयी केंद्रांची सुस्थिती व व्यवस्था करणे ;

(घ) अग्निशामक पथकाच्या वाहनास, रुग्णवाहिकांस व इतर विशेष वर्गाच्या किंवा वर्णनाच्या वाहनास या प्रकरणाच्या सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही उपबंधापासून विहित करण्यात येतील अशा शर्तीवर सूट देणे ;

(ङ) वाहनतळाच्या जागा व विरामस्थाने सुस्थितीत ठेवणे व त्यांची व्यवस्था पाहणे आणि त्यांच्या उपयोगाबद्दल काही फी आकारावयाची झाल्यास आकारता येतील त्या फीच्या रकमा ;

(च) टेकडीच्या उतारावरून जाताना मोटार वाहन कोणत्याही गिअरमध्ये न टाकता चालवण्यास सर्वसाधारणत: किंवा विनिर्दिष्ट जागी मनाई करणे ;

(छ) गतिमान असलेले मोटार वाहन हाताने पकडण्यास किंवा त्यावर चढण्यास मनाई करणे ;

(ज) मोटार वाहनांना पदपथांचा किंवा फरसबंद रस्त्यांचा उपयोग करण्यास मनाई करणे ;

(झ) सर्वसाधारपणे, जनतेस किंवा कोणत्याही व्यक्तीला धोका, इजा किंवा त्रास होण्यास किंवा मालमत्तेला धोका किंवा क्षती पोचण्यास किंवा वाहतुकीला अडथळा होण्यास प्रतिबंध करणे; आणि

(ञ) विहित करावयाची किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब ;

## प्रकरण नऊ

### भारतातून तात्पुरती बाहेर जाणारी किंवा भारतात भेट देणारी मोटार वाहने

**नियम करण्याची केंद्र शासनाची शक्ती.** १३९. (१) केंद्र शासनाला, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी नियम करता येतील. ती प्रयोजने अशी :---

(क) मोटार वाहन भारतातून भारताबाहेरील कोणत्याही ठिकाणी तात्पुरते घेऊन जाणाऱ्या व्यक्तींना किंवा भारतातून भारताबाहेरील कोणत्याही ठिकाणी तात्पुरते घेऊन जाणाऱ्या आणि भारतातील आपल्या अनुपस्थितीच्या काळात मोटार वाहन चालवू इच्छिणाऱ्या व्यक्तींना प्रवासाचे पास, प्रमाणपत्रे किंवा प्राधिकारपत्रे देणे आणि ती अधिप्रमाणित करणे ;

(ख) भारतात तात्पुरते वास्तव्य करण्याचा उद्देश असलेल्या व्यक्तींनी भारताबाहेरून भारतात तात्पुरती आणलेली मोटार वाहने ज्यांच्या अधीनतेने भारतात कब्जात ठेवून उपयोगात आणता येतील त्या शर्ती विहित करणे ; आणि

(ग) भारतात तात्पुरते वास्तव्य करण्यासाठी भारताबाहेरील कोणत्याही ठिकाणाहून भारतात प्रवेश करणाऱ्या व्यक्तींना ज्यांच्या अधीनतेने भारतात मोटार वाहने चालवता येतील अशा शर्ती विहित करणे.

(२) कोणत्याही अन्योन्य व्यवस्थेअन्वये भारत व अन्य कोणत्याही देशाच्या दरम्यान चालणाऱ्या आणि भाडे किंवा मोबदला याच्या बदल्यात उतारूंची किंवा मालाची किंवा दोन्हींची वाहतूक करणाऱ्या मोटार वाहन सेवा सुकर करण्यासाठी व त्यांचे नियमन करण्यासाठी केंद्र शासनाला **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबीसंबंधी नियम करता येतील, त्या अशा---

(क) अशा सेवा चालवणारी मोटार वाहने ज्या शर्तींवर भारताबाहेरून भारतात आणता येतील व भारतात कब्जात ठेवून वापरता येतील त्या शर्ती ;

(ख) भारतातील कोणत्याही ठिकाणाहून भारताबाहेरील कोणत्याही ठिकाणी मोटार वाहने ज्या शर्तींवर नेता येतील त्या शर्ती ;

(ग) अशा मोटारवाहनांचे चालक किंवा वाहक म्हणून नोकरीस असलेल्या व्यक्तींना ज्या शर्तींवर भारतात प्रवेश करता येईल किंवा भारत सोडून जाता येईल त्या शर्ती ;

(घ) अशा मोटार वाहनांचे चालक व वाहक म्हणून नोकरीस असलेल्या व्यक्तींना प्रवासाचे पास, प्रमाणपत्रे किंवा प्राधिकारपत्रे देणे आणि ती अधिप्रमाणित करणे ;

(ङ) अशा मोटार वाहनांवर प्रदर्शित करावयाचा तपशील (नोंदणी चिन्हाव्यतिरिक्त) आणि असा तपशील कशा रीतीने प्रदर्शित करावयाचा ते ;

(च) अशा मोटार वाहनांबरोबर अनुयाहनांचा उपयोग करणे ;

(छ) अशा मोटार वाहनांना आणि त्यांच्या चालकांना व वाहकांना या अधिनियमाच्या (पोटकलम (४) मध्ये निर्देशिलेल्या व्यतिरिक्त इतर) उपबंधांपासून अथवा त्याखाली केलेल्या नियमांच्या सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही उपबंधांपासून सूट देणे ;

(ज) अशा मोटार वाहनांच्या चालकांची व वाहकांची ओळख पटवणे ;

(झ) प्रवासाचे पास, प्रमाणपत्रे किंवा प्राधिकारपत्रे, परवाने, लायसने किंवा विहित केलेले अन्य कोणतेही दस्तऐवज गहाळ किंवा खराब झाले असता, विहित करण्यात येईल अशी फी भरण्यात आल्यावर ते बदलून देणे ;

(ञ) अशा प्रकारच्या मार्ग परिवहन सेवा सुकर करण्याच्या दृष्टीने, सीमाशुल्क, पोलीस किंवा आरोग्य यांच्याशी संबंधित अशा कायद्याच्या उपबंधांपासून सूट देणे ;

(ट) विहित करावयाची किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) या कलमाखाली केलेला कोणताही नियम जेणेकरून मोटार वाहने किंवा त्यांचे उपयोगकर्ते यांच्यावर एखाद्या राज्यात बसवलेला कोणताही कर भरण्यापासून त्या राज्यातील कोणाही व्यक्तीला सूट मिळेल, अशा प्रकारे प्रवर्तित होणार नाही.

(४) (क) मोटार वाहनांची नोंदणी करणे व ओळख पटवणे ; किंवा

(ख) मोटार वाहनांची बांधणी, देखभाल व सुसज्जता यासंबंधातील आवश्यक गोष्टी ; किंवा

(ग) मोटार वाहनांच्या चालकांना व वाहकांना लायसने देणे आणि त्यांच्या अर्हता, यांच्याशी संबंधित अशी, या अधिनियमातील किंवा राज्य शासनाने त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमातील कोणतीही गोष्ट—

(एक) ज्यास पोटकलम (१) चा खंड (ख) किंवा खंड (ग) याखाली; किंवा पोटकलम (२) खाली केलेले कोणतेही नियम लागू होतात अशा कोणत्याही मोटार वाहनाला किंवा कोणत्याही मोटार वाहनचालकाला ; किंवा

(दोन) ज्यास पोटकलम (२) खाली केलेले कोणतेही नियम लागू होतात अशा कोणत्याही मोटार वाहनाच्या वाहकाला ;

लागू होणार नाही.

## प्रकरण दहा

### विवक्षित प्रकरणात दोष नसतानाचे दायित्व

**१४०.** (१) मोटार वाहनाच्या अथवा मोटार वाहनांच्या वापरातून उद्भवलेल्या अपघातामुळे जर कोणाही व्यक्तीस मृत्यू आला असेल अथवा कायमस्वरूपी विकलांगता आली असेल तर, प्रकरणपरत्वे, वाहनाचा मालक अथवा वाहनांचे मालक, संयुक्तपणे आणि पृथक्‌पणे, या कलमांच्या उपबंधांनुसार असा मृत्यू अथवा विकलांगता याबाबत भरपाई करून देण्यास दायी असतील. **दोष नसण्याच्या तत्त्वावर विवक्षित प्रकरणात भरपाई देण्याचे दायित्व.**

(२) कोणाही व्यक्तीच्या मृत्युच्या बाबतीत पोटकलम (१) खाली देय असलेली भरपाईची रक्कम [१][रुपये पन्नास हजार] इतकी निश्चित करण्यात येईल, आणि कोणाही व्यक्तीचा कायम स्वरूपी विकलांगतेच्या बाबतीत त्या कलमाखालील भरपाईची देय रक्कम [२][रुपये पंचवीस हजार] इतकी निश्चित करण्यात येईल.

(३) पोटकलम (१) खाली भरपाईकरिता केलेल्या कोणत्याही दाव्यात संबंधित वाहनाच्या मालकाची अथवा वाहनांच्या मालकांची अथवा इतर कोणत्याही व्यक्तीची कोणतीही चुकीची कृती, हयगय अथवा कसुरी यामुळे आलेल्या मृत्यूच्या बाबतीत अथवा कायम स्वरूपी विकलांगतेच्या बाबतीत जो दावा दाखल करण्यात आला आहे त्या मृत्यूच्या किंवा विकलांगतेच्या बाबतीत दावाकाराने प्रतिकथन करण्याची अथवा तो मृत्यू किंवा ती विकलांगता प्रस्थापित करण्याची आवश्यकता असणार नाही.

(४) पोटकलम (१) खाली भरपाईकरिता करण्यात आलेला दावा, ज्या व्यक्तीच्या मृत्यूच्या किंवा कायम स्वरूपी विकलांगतेच्या बाबतीत तो करण्यात आला आहे. त्या व्यक्तीच्या कोणत्याही चुकीच्या कृतीच्या, हयगयीच्या अथवा कसुरीच्या कारणावरून, फेटाळण्यात येणार नाही किंवा अशा मृत्यूच्या बाबतीत किंवा कायम स्वरूपी विकलांगतेच्या बाबतीत वसूल करावयाच्या भरपाईचे प्रमाण अशा मृत्यूस किंवा विकलांगतेस जबाबदार असलेल्या अशा व्यक्तीच्या हिश्श्याच्या आधारे कमीही केले जाणार नाही.

---

१. १९९४ चा अधिनियम, ५४ कलम ४३ (क)(एक) द्वारे "रुपये पंचवीस हजार" याऐवजी "रुपये पन्नास हजार" हे शब्द घालण्यात आले. (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ४३ (क) (दोन) द्वारे "रुपये बारा हजार" याऐवजी "रुपये पंचवीस हजार" हे शब्द घालण्यात आले. (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

[1][(५) अनुतोष म्हणून भरपाई देण्यास पात्र असेल अशा कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू किंवा शारीरिक इजा या बाबततीत पोटकलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी वाहनाचा मालक त्यावेळी अंमलात असणाऱ्या कोणत्याही अन्य कायद्याखालील भरपाई देण्यास पात्र असेल :

परंतु, कोणत्याही अन्य कायद्यान्वये देय असलेली अशी भरपाईची रक्कम, या कलमान्वये किंवा कलम १६३क अन्वये देय असलेल्या भरपाईच्या रकमेतून वजा करण्यात येईल.]

मृत्यू अथवा कायम स्वरूपी विकलांगता यांच्या बाबतीत भरपाईसाठी दावा करण्याच्या यापुढे इतर अधिकारासंबंधी उपबंध.

१४१. (१) कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू अथवा कायम स्वरूपी विकलांगता यांच्या बाबतीत कलम १४० खाली भरपाईसाठी दावा करण्याचा अधिकार हा, या अधिनियमाच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या उपबंधांखाली त्या संबंधात भरपाईसाठी दावा करण्याच्या [2][कलम १६३क मध्ये निर्देशिलेल्या योजनेच्या संबंधातील हक्कमागणीच्या अधिकाराखेरीज (अशा इतर अधिकाराचा ] या कलमात दोषाच्या तत्त्वावरील अधिकार म्हणून ज्याचा निर्देश केला आहे) आणखी असेल.

(२) कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू अथवा कायम स्वरूपी विकलांगता यांच्या संबंधात कलम १४० खाली भरपाईसाठी केलेला दावा शक्य तितक्या शीघ्रतेने निकालात काढण्यात येईल, आणि जर कलम १४० खाली, आणि दोषाच्या तत्त्वावरील आणखी कोणत्याही अधिकारानुसार असा मृत्यू अथवा कायम स्वरूपी विकलांगता यांच्या संबंधात भरपाईसाठी दावा दाखल केला असेल त्याबाबतीत, कलम १४० खाली भरपाईसाठी करण्यात आलेला दावा पूर्वोक्ताप्रमाणे प्रथम निकालात काढण्यात येईल.

(३) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू अथवा कायम स्वरूपी विकलांगता यांच्या संबंधात, कलम १४० खाली भरपाई देण्यास पात्र असणारी व्यक्ती, दोषाच्या तत्त्वावरील अधिकारानुसारही भरपाई देण्यास पात्र असेल, आणि अशाप्रकारे पात्र असलेली व्यक्ती प्रथम उल्लेखिलेली भरपाई करील आणि—

(क) प्रथम उल्लेखिलेली भरपाईची रक्कम ही जर, दुसऱ्या वेळी उल्लेखिलेल्या भरपाईच्या रकमेपेक्षा कमी असेल तर केवळ, (प्रथम उल्लेखिलेल्या भरपाईशिवाय आणखी) ज्याद्वारे ती प्रथम उल्लेखिलेल्या भरपाईपेक्षा दुसऱ्या वेळी उल्लेखिलेली भरपाईची रक्कम जेवढ्या रकमेने अधिक असेल केवळ इतकीच रक्कम देण्यास ती व्यक्ती पात्र असेल ;

(ख) जर प्रथम उल्लेखिलेली भरपाईची रक्कम ही दुसऱ्या वेळी उल्लेखिलेल्या भरपाईच्या रकमेपेक्षा जास्त असेल अथवा तेवढीच असेल तर, ती व्यक्ती दुसऱ्यावेळी उल्लेखिलेली भरपाईची रक्कम देण्यास पात्र असणार नाही.

कायम स्वरूपी विकलांगता.

१४२. या प्रकरणाच्या प्रयोजनाकरिता,—

(क) एखाद्या व्यक्तीची दोन्हींपैकी कोणत्याही एका डोळ्याची दृष्टी किंवा कोणत्याही एक कानाची श्रवणशक्ती कायमची गमावणे ; किंवा

(ख) कोणत्याही अवयवाची किंवा सांध्याची शक्ती कायम स्वरूपात कमी होणे किंवा नाहीशी होणे ; किंवा

(ग) डोके किंवा चेहरा कायमचा विद्रूप होणे;

यांचा समावेश असेल अशा प्रकारचा अपघात, कोणतीही इजा किंवा कोणत्याही इजा त्या व्यक्तीला झाल्या असल्यास, कलम १४० च्या पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या स्वरूपाच्या अपघातातून उद्‌भवलेली विकलांगता असल्याचे मानण्यात येईल.

१९२३ च्या अधिनियम क्रमांक ८ खाली विवक्षित संबंधात दाव्यांच्या बाबतीत प्रकरणाची एक भाग असल्याचे प्रयोज्यता.

१४३. या प्रकरणाचे उपबंध हे कलम १४० च्या पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या स्वरूपाच्या अपघातातून उद्‌भवलेल्या कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू अथवा कायम स्वरूपी विकलांगता यांच्या कामगार भरपाई अधिनियम, १९२३ याखालील भरपाईकरिता, केलेल्या कोणत्याही दाव्यासमुद्धा लागू होतील. आणि या प्रयोजनाकरिता उक्त उपबंध, आवश्यक त्या फेरबदलासह, त्या अधिनियमाचा प्रकरणाची एक भाग असल्याचे मानण्यात येईल.

अधिभावी परिणाम.

१४४. या अधिनियमाच्या अथवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या इतर कोणत्याही उपबंधात काहीही अंतर्भूत असले तरी, ह्या प्रकरणातील उपबंध परिणामक असतील.

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम ४३ (ख) द्वारे पोटकलम (४) नंतर पोटकलम (५) व परंतुक घालण्यात आले. (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ४४ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकर दाखल केला.

## प्रकरण अकरा

### त्रयस्थपक्षीय जोखमीबद्दल मोटार वाहनांचा विमा

१४५. या प्रकरणात,— व्याख्या.

(क) "प्राधिकृत विमाकार" याचा अर्थ, आयुर्विमेतर विमा व्यवसायी (राष्ट्रीयीकरण) अधिनियम, १९७२ (१९७२ चा ५७) या खाली भारतात आयुर्विमेतर विमा व्यवसाय, त्या-वेळेपुरता जो करत असेल असा विमाकार आणि त्या अधिनियमाखाली सर्वसाधारण विमा व्यवसाय करण्यास प्राधिकृत केलेला कोणताही शासकीय विमा निधी, असा आहे;

(ख) "विमा प्रमाणपत्र" याचा अर्थ, प्राधिकृत विमाकाराने कलम १४७ च्या पोटकलम (३) ला अनुसरून दिलेले प्रमाणपत्र, असा आहे; आणि त्यात विहित करण्यात येतील अशा आवश्यक गोष्टी पूर्ण करणारी उपरिटिप्पणी आणि विमापत्राच्या संबंधात एकाहून अधिक प्रमाण-पत्रांची प्रत देण्यात आली असेल त्या बाबतीत, ती सर्व प्रमाणपत्रे, किंवा प्रमाणपत्राची प्रत देण्यात आली असेल त्या बाबतीत प्रकरणपरत्वे, ती प्रत यांचा समावेश होतो;

(ग) कोणत्याही व्यक्तीला मृत्यू अथवा शारीरिक इजा यांच्या बाबतीत जेथे जेथे "दायित्व" हा शब्द वापरला जाईल तेथे, त्यात कलम १४० खालील दायित्वाचा समावेश असेल;

(घ) "विमापत्र" यात "विमा प्रमाणपत्राचा" समावेश आहे;

(ङ) "मालमत्ता" यात, मोटार वाहनातून नेला जाणारा माल, रस्ते, पूल, मोऱ्या, सेतूमार्ग, नाले, चौक्या व मैलाचे दगड यांचा समावेश होतो;

(च) "देवाण घेवाण करणारा देश" याचा अर्थ, देवाणघेवाणीच्या तरतावर जो कोणताही देश या प्रकरणाच्या प्रयोजनासाठी देवाणघेवाण करणारा देश म्हणून केंद्र शासनाकडून शासकीय राजपत्रात अधिसूचित करण्यात येईल तो देश, असा आहे;

(छ) "त्रयस्थ पक्ष" या मध्ये शासनाचा समावेश होतो.

१४६. (१) मोटार वाहनाचा उपयोग स्वत:साठी करावयाचा झाल्यास किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला तो कर द्यावयाचा झाल्यास, त्या व्यक्तीकडून किंवा अन्य व्यक्तीकडून त्या वाहनाचा उपयोग केला जाण्याच्या संबंधात या प्रकरणाच्या आवश्यकता पूर्ण करणारे विमापत्र अंमलात असल्याशिवाय, ती व्यक्ती, प्रवासी म्हणून वाहनाचा उपयोग करण्याची बाब खेरीज करून एरव्ही, सार्वजनिक ठिकाणी त्या वाहनाचा उपयोग करू शकणार नाही किंवा, प्रकरणपरत्वे; त्या अन्य व्यक्तीला उपयोग करावयास लावू शकणार नाही किंवा तशी मुभा देऊ शकणार नाही: त्रयस्थपक्षीय जोखमीकरिता विम्याची आवश्यकता.

[१][परंतु, धोकादायक किंवा जोखमीचा माल वाहून नेणाऱ्या किंवा वाहून नेण्यासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या वाहनाच्या बाबतीत सार्वजनिक दायित्व विमा अधिनियम, १९९१ (१९९१ चा ६) खालील विमापत्रसुद्धा असणे आवश्यक असेल].

**स्पष्टीकरण.**—मोटार वाहनाच्या उपयोगासंबंधात या पोटकलमान्वये आवश्यक असलेले असे कोणतेही विमापत्र अंमलात नसताना, केवळ पगारी नोकर म्हणून वाहन चालवणाऱ्या व्यक्तीला असे कोणतेही विमापत्र अंमलात नसल्याचे माहीत नसेल किंवा तसे समजण्यास तिला कारण नसेल तर, ती या पोट-कलमाचे व्यतिक्रमण करून वागत आहे असे मानले जाणार नाही.

(२) केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या मालकीच्या व कोणत्याही वाणिज्यिक उद्यमाशी संबंधित नसलेल्या शासकीय प्रयोजनांसाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या कोणत्याही वाहनास पोटकलम (१) लागू होणार नाही.

(३) पुढीलपैकी कोणत्याही प्राधिकरणाच्या मालकीच्या कोणत्याही वाहनास समुचित शासन आदेशाद्वारे पोटकलम (१) च्या प्रवर्तनापासून सूट देऊ शकेल, ती प्राधिकरणे अशी —

(क) केंद्र शासन किंवा राज्य शासन, जर ते वाहन कोणत्याही वाणिज्यिक उद्यमाशी संबंधित असलेल्या शासकीय प्रयोजनासाठी उपयोगात आणले जात असेल तर;

(ख) कोणतेही स्थानिक प्राधिकरण;

(ग) **कोणताही राज्य परिवहन उपक्रम.**—परंतु, त्या प्राधिकरणाच्या कोणत्याही वाहनाच्या उपयोगातून त्या प्राधिकरणावर किंवा त्याच्या नोकरीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीवर त्रयस्थ-पक्षाप्रत जे कोणतेही दायित्व येईल ते दायित्व निभावण्यासाठी त्या प्राधिकरणाने, त्यासंबंधात करण्यात आलेल्या नियमानुसार निधी स्थापन करून तो राखलेला असल्याखेरीज, अशा कोणत्याही प्राधिकरणाच्या संबंधात असा कोणताही आदेश केला जाणार नाही.

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम ४५ द्वारे कलम १४६ (१) मधील स्पष्टीकरणापूर्वी हे 'परंतुक' घालण्यात आले (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

स्पष्टीकरण.—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, "समुचित शासन" याचा अर्थ केंद्र शासन किंवा प्रकरणपरत्वे, राज्य शासन, असा आहे, आणि—

(एक) केंद्र शासनाच्या किंवा कोणत्याही राज्य शासनांच्या मालकीच्या कोणत्याही निगमाच्या किंवा कंपनीच्या संबंधात त्याचा अर्थ, केंद्र शासन, किंवा ते राज्य शासन, असा आहे ;

(दोन) केंद्र शासनाच्या आणि एका किंवा अधिक राज्य शासनाच्या मालकीच्या कोणत्याही महामंडळाच्या निगमाच्या किंवा कंपनीच्या संबंधात त्याचा अर्थ, केंद्र शासन असा आहे ;

(तीन) अन्य कोणत्याही राज्य परिवहन उपक्रमाच्या किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या संबंधात, त्याचा अर्थ ज्याचे त्या उपक्रमावर किंवा प्राधिकरणावर नियंत्रण असेल ते शासन, असा आहे.

विमापत्राबाबतच्या आवश्यकता व दायित्वाच्या मर्यादा.

१४७. (१) या प्रकरणाच्या आवश्यकता पूर्ण होण्यासाठी, विमापत्र हे—

(क) प्राधिकृत विमाकार असलेल्या अशा व्यक्तीने दिलेले आहे असे; आणि

(ख) विमापत्रात विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तीचा किंवा व्यक्तीवर्गाचा,—

(एक) सार्वजनिक ठिकाणी वाहनाचा उपयोग करण्यामुळे [1][मालाचा मालक किंवा वाहनामधून वाहून नेण्यात येत असेल असा त्याचा प्राधिकृत प्रतिनिधी यांसह कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू घडून येणे किंवा तिला शारीरिक इजा पोहोचणे] अथवा त्रयस्थ पक्षाच्या कोणत्याही मालमत्तेचे नुकसान होणे या संबंधात त्याच्यावर येईल अशा कोणत्याही दायित्वाबद्दल ;

(दोन) सार्वजनिक ठिकाणी वाहनाचा उपयोग करण्यामुळे उद्‌भवलेला अथवा त्या कारणामुळे सार्वजनिक सेवा वाहनातील कोणत्याही प्रवाशाचा मृत्यू अथवा शारीरिक इजा या बद्दल;

पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यन्त, विमा उतरवणारे असे विमापत्र असले पाहिजे :

परंतु, विमापत्रात पुढील गोष्टी आल्या पाहिजेत असे नाही—

(एक) (क) वाहन चालनाचे काम करत असलेल्या, किंवा

(ख) जर ते सार्वजनिक सेवा वाहन असेल तर त्या वाहनाचा वाहक म्हणून किंवा वाहनाची तिकिटे तपासण्याचे काम करत असलेल्या, किंवा

(ग) जर ती मालगाडी असेल तर, त्या गाडीमधून जात असलेल्या, अशा कोणत्याही नोकराच्या मृत्यूच्या किंवा त्याला झालेल्या शारीरिक इजेच्या संबंधात कामगार भरपाई अधिनियम, १९२३ (१९२३ चा ८) याखाली उद्‌भवणाऱ्या दायित्वाव्यतिरिक्त विमापत्राने हमी मिळालेल्या व्यक्तीच्या नोकराचा त्याच्या कामधंद्यामुळे व त्याच्या ओघात मृत्यू घडून आला असता त्या बाबतीत किंवा अशा नोकराला त्याच्या कामधंद्यामुळे व त्याच्या ओघात काही शारीरिक इजा झाली असता त्यामुळे उद्‌भवणारे दायित्व, किंवा

(दोन) कोणतेही संविदाजन्य दायित्व.

स्पष्टीकरण.—शंकानिरसनार्थ याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, ज्या कृतीमुळे अथवा अकृतीमुळे अपघात झाला ती सार्वजनिक ठिकाणी घडून आली असेल तर, त्यायोगे जिचा मृत्यू झाला अथवा जिला शारीरिक इजा झाली अशी कोणतीही व्यक्ती किंवा त्रयस्थ पक्षाच्या ज्या कोणत्याही मालमत्तेचे नुकसान झाले ती मालमत्ता अपघाताच्या वेळी सार्वजनिक ठिकाणी नव्हती असे असले तरीही, त्या व्यक्तीचा मृत्यू किंवा तिला झालेली इजा अगर त्या मालमत्तेचे नुकसान सार्वजनिक ठिकाणी वाहनाचा उपयोग केल्याने घडले किंवा त्यातून ते उद्‌भवले असे मानले जाईल.

(२) पोटकलम (१) च्या परंतुकाच्या अधीनतेने, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या विमापत्राच्या व्याप्तीत कोणत्याही एका अपघाताच्या बाबतचे कोणतेही दायित्व येईल ते असे—

(क) खंड (ख) मध्ये उपबंधित केलेल्या व्यतिरिक्त, उद्‌भवलेल्या दायित्वाची रक्कम;

(ख) त्रयस्थ पक्षाच्या कोणत्याही मालमत्तेच्या नुकसानीसंबंधात सहा हजार रुपयांच्यामर्यादेपर्यंत:

परंतु, कोणतेही मर्यादित दायित्व अंतर्भूत करून देण्यात आलेले आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेले विमापत्र हे, अशा प्रारंभानंतर चार महिन्यांचा कालावधी अथवा असे विमापत्र समाप्त होईल ती तारीख यापैकी अगोदरचा असेल अशा कालावधीपर्यन्त परिणामक असल्याचे चालू राहील.

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम ४६ द्वारे मूळ मजकुराऐवजी घालण्यात आला (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(३) ज्या व्यक्तीने विमापत्र काढले तिच्या नावे विमाकाराने विहित नमुन्यात आणि ज्यांच्या अधीनतेने विमापत्र द्यावयाचे अशा कोणत्याही शर्तीचा व अन्य कोणत्याही विहित बाबींचा विहित तपशील अंतर्भूत असलेले विमाप्रमाणपत्र दिल्याशिवाय व देईपर्यन्त या प्रकरणाच्या प्रयोजनार्थ ते विमापत्र परिणामक होणार नाही, आणि वेगवेगळ्या बाबतीत वेगवेगळे नमुने, तपशील व बाबी विहित करता येतील.

(४) या प्रकरणाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या उपबंधाखाली विमाकाराने दिलेल्या उपरिटिप्पणीच्या पाठोपाठ विहित मुदतीत विमापत्र दिले गेले नाही तर, विमाकार उपरिटिप्पणीच्या विधिग्राह्यतेचा कालावधी समाप्त झाल्यापासून सात दिवसांच्या आत ते तथ्य, उपरिटिप्पणी ज्याच्याशी संबंधित आहे अशा वाहनाची ज्याच्या अभिलेखात नोंदणी करण्यात आली असेल अशा नोंदणी प्राधिकरणाला किंवा राज्य शासन विहित करील अशा अन्य प्राधिकरणाला सूचित करील.

(५) त्यावेळी अंमलात असणाऱ्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमाखाली विमाकार देत असलेले विमापत्र त्या विमापत्रात विनिर्दिष्ट केलेल्या अशा व्यक्तीच्या किंवा अशा वर्गातील व्यक्तींच्या बाबतीत ज्या दायित्वाबाबत क्षतिपूर्ती देण्याचे अभिप्रेत असेल अशा कोणत्याही दायित्वाबाबत त्या व्यक्तीचे किंवा त्या वर्गातील व्यक्तीचे हानीरक्षण करण्यास दायी राहील.

**देवाण-घेवाण करणाऱ्या देशांमध्ये दिलेल्या विमापत्रांची विधिग्राह्यता.**

१४८. भारत आणि कोणताही देवाण-घेवाण करणारा देश यांच्यामधील व्यवस्थेला अनुसरून जेव्हा देवाण-घेवाण करणाऱ्या देशात नोंदणी झालेले कोणतेही मोटार वाहन दोन्ही देशांना सामाईक असलेल्या कोणत्याही मार्गावर अथवा अशा कोणत्याही क्षेत्रात चालवण्यात येत असेल आणि देवाण-घेवाण करणाऱ्या देशामध्ये त्या वाहनाचा उपयोग करण्याच्याबाबत त्या देशात अंमलात असलेल्या विमाविषयक कायद्याच्या आवश्यकता पूर्ण करणारे विमापत्र अंमलात असेल तर, मग कलम १४७ मध्ये काहीही असले तरी, पण कलम १६४ खाली करण्यात येतील अशा नियमांच्या अधीनतेने, असे विमापत्र हे जणूकाही या प्रकरणाच्या आवश्यकतेनुसार असावे त्याप्रमाणे ते ज्या नियतमार्गाच्या किंवा क्षेत्राच्या संबंधात व्यवस्था करण्यात आली असेल तेथे सर्वत्र परिणामक होईल.

**त्रयस्थ पक्षीय जोखमीच्या संबंधात विमेदार व्यक्तीच्या विरुद्ध देण्यात आलेले न्यायनिर्णय आणि निवाडे यांची पूर्तता करण्याचे विमाकारांचे कर्तव्य.**

१४९. (१) विमापत्र ज्या व्यक्तीने काढले अशा व्यक्तीच्या नावे कलम १४७ च्या पोटकलम (३) खाली विमापत्र देण्यात आल्यानंतर जर विमापत्राद्वारे विमा उतरवलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या विरुद्ध, कलम १४७ च्या पोटकलम (१) च्या खंड (ख्) खाली विमापत्राच्या व्याप्तीत येणे आवश्यक असेल अशा कोणत्याही दायित्वाबाबत (विमापत्रांच्या अटींच्या व्याप्तीत आलेले दायित्व असल्यामुळे) [1][किंवा कलम १६३क च्या उपबंधाच्या अधीनतेने] न्यायनिर्णय अथवा निवाडा मिळवण्यात आला असेल तर, विमाकार ते विमापत्र टाळण्यास किंवा रद्द करण्यास हक्कदार असला किंवा त्याने ते टाळले किंवा रद्द केलेले असले तरीही, या कलमाच्या उपबंधाच्या अधीनतेने तो विमाकार जणू काही न्यायनिर्णीत ऋणको असावा त्याप्रमाणे हुकूमनाम्याच्या लाभास हक्कदार असलेल्या व्यक्तीला त्याखाली प्रदेय असलेल्या रकमेपेक्षा अधिक नसेल अशी कोणतीही रक्कम व त्यासोबत दाव्याच्या खर्चापोटी प्रदेय असलेली कोणतीही रक्कम व निर्णीत रकमेवरील व्याजासंबंधीच्या कोणत्याही अधिनियमितींच्या आधारे त्या रकमेवरील व्याज म्हणून प्रदेय असलेली कोणतीही रक्कम देईल.

(२) ज्या कार्यवाहीत तो न्यायनिर्णय अथवा निवाडा देण्यात आला असेल ती कार्यवाही दाखल करण्यात आल्याविषयी कार्यवाहीच्या प्रारंभापूर्वी किंवा त्यानंतर विमाकाराला न्यायालयामार्फत नोटीस मिळालेली नसेल तर, अशा कोणत्याही न्यायनिर्णयासंबंधी अथवा निवाड्यासंबंधी अथवा त्यावर अपील व्हावयाचे असून त्याची अंमलबजावणी स्थगित करण्यात आली असेल तोवर अशा कोणत्याही न्यायनिर्णयासंबंधी अथवा न्यायनिवाड्यासंबंधी पोटकलम (१) खाली विमाकाराला कोणतीही रक्कम द्यावी लागणार नाही, आणि प्रकरणपरत्वे, ज्या विमाकाराला अशी कार्यवाही दाखल करण्यात आल्याविषयी नोटीस देण्यात आली असेल त्याला त्या कार्यवाहीत आपणास पक्षकार करवून घेण्याचा व पुढीलपैकी कोणत्याही कारणावरून त्या कारवाईत बचाव देण्याचा हक्क राहील, ती कारणे अशी :—

(क्) पुढील शर्तींपैकी विमापत्रात विनिर्दिष्ट केलेल्या एखाद्या शर्तीचा भंग झालेला आहे; त्या शर्ती अशा :—

(एक) (क्) वाहन हे विमासंविदेच्या दिनांकास भाडे किंवा मोबदला यांच्या बदल्यात चालवण्यासाठी दिलेल्या परवान्याच्या व्याप्तीत न येणारे वाहन असेल तर, भाडे किंवा मोबदला याच्या बदल्यात; किंवा

(ख्) आयोजित शर्यतीकरता व वेग चाचणीकरिता; किंवा

(ग्) जर वाहन हे एखादे परिवाहन असेल तर ज्या परवान्याअन्वये वाहन वापरण्यात येते त्या परवान्याद्वारे मान्यता न मिळालेल्या प्रयोजनासाठी; किंवा

(घ्) वाहन हे मोटार सायकल असेल तर जोड यान संलग्न न करता, वाहनाचा वापर करण्यास मना करणारी शर्त; किंवा

(दोन) नामनिर्दिष्ट व्यक्तीला अथवा व्यक्तींना अथवा जिला रीतसर लायसन देण्यात आलेले नाही अशा कोणत्याही व्यक्तीला अथवा अनर्ह ठरवण्यात आलेल्या ज्या व्यक्तीला अनर्हतेच्या कालावधीत चालन लायसन धारण करण्यास किंवा मिळवण्यास बंदी आहे अशा कोणत्याही व्यक्तीला वाहन चालवण्यास मना करणारी शर्त; किंवा

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम ४७ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(तीन) युद्ध, यादवी युद्ध, दंगा किंवा नागरी विक्षोभ या परिस्थितीमुळे घडून आलेल्या किंवा अंशतः त्यामुळे घडलेल्या इजेबद्दलचे दायित्व वर्जिणारी शर्त; किंवा

(ख्) महत्त्वाचे तथ्य, उघड न करता किंवा त्यातील काही महत्त्वाचा तपशील खोटा होता असे अभिवेदन करून विमापत्र मिळवण्यात आले होते या आधारावर ते शून्य आहे.

(३) जेव्हा पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्याप्रमाणे असा कोणताही न्यायनिर्णय एखाद्या देवाण-घेवाण करणाऱ्या देशातील न्यायालयाकडून मिळवण्यात आलेला असेल आणि विदेशी न्यायनिर्णयाच्या बाबतीत, "दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८" यामधील कलम १३ च्या उपबंधांच्या आधारे तो, त्याद्वारे अभिनिर्णित केलेल्या बाबीपुरता निर्णायक असेल, तेव्हा, विमाकार (विमा अधिनियम, १९३८ या खाली नोंदलेला असा विमाकार मग तो देवाण घेवाण करणाऱ्या देशातील समनुरुप कायद्याखाली नोंदलेला असो वा नसो) हुकूमनाम्याच्या लाभास हक्कदार असलेल्या व्यक्तीप्रत, जणू काही तो न्यायनिर्णय भारतातील न्यायालयाने दिला असावा त्याप्रमाणे पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने व तेवढ्याच व्याप्ती-पर्यंत दायी राहील :

परंतु, ज्या कार्यवाहात तो न्यायनिर्णय देण्यात आला असेल ती कार्यवाही दाखल करण्यात आल्या-विषयी कार्यवाहीच्या प्रारंभापूर्वी किंवा त्यानंतर विमाकाराला न्यायालयामार्फत सूचना मिळाली नसेल तर अशा कोणत्याही न्यायनिर्णयासंबंधी विमाकाराला कोणतीही रक्कम द्यावी लागणार नाही आणि ज्या विमाकाराला याप्रमाणे सूचना देण्यात आली असेल त्याला देवाणघेवाण करणाऱ्या देशातील समनुरुप कायद्याखाली, त्या कार्यवाहीत आपणास पक्षकार करवून घेण्याचा व पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे तशाच कारणावरून त्या कारवाईत बचाव देण्याचा हक्क राहील.

(४) जिने विमापत्र काढले त्या व्यक्तीस कलम १४७ च्या पोटकलम (३) खाली विमाप्रमाणपत्र देण्यात आले असेल त्या बाबतीत, विमापत्राच्या जेवढ्या भागापुढे त्याद्वारे विमा उतरवलेल्या व्यक्तींचा विमा पोटकलम (२) च्या खंड (ख्) मधील शर्तींहून अन्य कोणत्याही शर्तींना अनुलक्षून मर्यादित होत असल्याचे दिसत असेल तेवढा भाग कलम १४७ पोटकलम (१) खंड (ख्) खाली विमापत्राच्या व्याप्तीत येणे आवश्यक असलेल्या दायित्वाबाबत परिणामक असणार नाही :

परंतु, केवळ या पोटकलमाच्याच आधारे विमापत्राच्या व्याप्तीत आणलेले कोणत्याही व्यक्तीचे कोणतेही दायित्व निभावण्यासाठी किंवा त्यापोटी विमाकाराने दिलेली कोणतीही रक्कम विमाकाराला त्या व्यक्तीकडून वसूल करता येण्यासारखी असेल.

(५) विमापत्राद्वारे विमा उतरवलेल्या व्यक्तीवर ओढवलेल्या दायित्वाच्या बाबतीत जी रक्कम देण्यास विमाकार या कलमाखाली दायी होत असेल अशी रक्कम ही, विमाकार त्या दायित्वाबाबत ज्या रकमेकरता या कलमाच्या उपबंधांच्या व्यतिरिक्त अन्यथा विमापत्राखाली दायी झाला असता अशा रकमेहून अधिक असेल तर, विमाकार अशी जादा रक्कम त्या व्यक्तीकडून वसूल करण्यास हक्कदार असेल.

(६) या कलमात "महत्त्वाचे तथ्य" व "महत्त्वाचा तपशील" या शब्द प्रयोगांचा अर्थ, आपण जोखीम पत्करावी किंवा काय आणि पत्करावयाची झाल्यास किती अधिमूल्याने व कोणत्या शर्तीवर पत्करावी हे निश्चित करताना व्यवहारी विमाकाराच्या निर्णयशक्तीवर प्रभाव पाडू शकेल अशा स्वरूपाचे अनुक्रमे तथ्य किंवा तपशील असा आहे आणि "विमापत्रांच्या अटींच्या व्याप्तीत येणारे दायित्व" या शब्दप्रयोगाचा अर्थ जे दायित्व विमापत्राच्या व्याप्तीत येते अथवा विमाकार विमापत्र शून्य करण्यास किंवा रद्द करण्यास हक्कदार आहे किंवा त्याने ते शून्य किंवा रद्द केलेले आहे अशी गोष्ट घडली नसती तर जे याप्रमाणे त्यांच्या व्याप्तीत आले असते ते दायित्व, असा आहे.

(७) ज्यास पोटकलम (२) किंवा पोटकलम (३) मध्ये निर्देशिलेली नोटीस देण्यात आली आहे असा कोणताही विमाकार पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या अशा कोणत्याही न्यायनिर्णयाच्या अथवा निवाड्याच्या अथवा पोटकलम (३) मध्ये निर्देशिलेल्या अशा न्यायनिर्णयाच्या लाभास हक्कदार असलेल्या कोणत्याही व्यक्तीगत असलेले आपले दायित्व पोटकलम (२) मध्ये अथवा, प्रकरणपरत्वे, देवाणघेवाण करणाऱ्या देशाच्या समनुरुप कायद्यामध्ये उपबंधित केलेले असेल त्याहून अन्य रीतीने टाकण्यास हक्कदार असणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या उपबंधाकरिता "मागणी हक्क अधिकरण" याचा अर्थ, कलम १६५ खाली प्रस्थापित केलेले न्यायाधिकरण आणि "निवाडा" याचा अर्थ, कलम १६८ खाली न्यायाधिकरणाने केलेला निवाडा, असा आहे.

**विमेदार दिवाळेखोर झाला असताना त्रयस्थ पक्षाप्रत तिच्यावर जी दायित्वे येतील अशा दायित्वांबद्दल विमा उतरवण्यास आला असेल त्रयस्थपक्षांना विमाकारांविरुद्ध असलेले अधिकार.**

१५०. (१) या प्रकरणाच्या उपबंधानुसार केलेल्या कोणत्याही विमासंविदेखाली एखाद्या व्यक्तीचा, त्रयस्थ पक्षाप्रत तिच्यावर जी दायित्वे येतील अशा दायित्वांबद्दल विमा उतरवण्यास आला असेल तेव्हा,—

(क्) ती व्यक्ती दिवाळखोर झाली अथवा तिने आपल्या धनकोंबरोबर आपसाती किंवा व्यवस्था केली असता, किंवा

(ख्) विमेदार व्यक्ती ही कंपनी असेल त्या बाबतीत, कंपनीच्या संबंधात परिसमापनाचा आदेश देण्यात आला असताना किंवा स्वेच्छापूर्वक परिसमापन करण्याचा ठराव संमत करण्यात आला असताना अथवा कंपनीच्या धंद्यासाठी किंवा उपक्रमासाठी प्रापक किंवा व्यवस्थापक रीतसर

नियुक्त करण्यात आला असताना, अथवा तरत्या प्रभावाद्वारे प्रतिभूत केलेल्या कोणत्याही ऋणपत्रा-च्या धारकांनी किंवा त्यांच्या वतीने प्रभारांमध्ये समाविष्ट किंवा त्यास अधीन असलेल्या कोणत्याही मालमत्तेचा कब्जा घेतला असताना,

जर अशा प्रसंगापूर्वी किंवा त्यानंतर विमेदार व्यक्तीवर असे कोणतेही दायित्व आले असेल तर, त्या दायित्वासंबंधी संविदेखाली तिला विमाकाराविरुद्ध असलेले अधिकार, कायद्याच्या कोणत्याही उपबंधात काहीही विरुद्ध असले तरी, ज्याच्यासंबंधी याप्रमाणे दायित्व आले अशा त्रयस्थ पक्षाकडे हस्तांतरित होऊन त्याच्यामध्ये निहित होतील.

(२) एखाद्या मृत ऋणकोच्या संपदेच्या प्रशासनाचा आदेश दिवाळखोरी कायद्यानुसार देण्यात आला असेल त्याबाबतीत, त्रयस्थ पक्षासंबंधी यावयाच्या ज्या दायित्वांबद्दल या प्रकरणाच्या उपबंधानुसार विमा संविदेखाली त्याच ऋणकोचा विमा उतरवलेला होता, अशा दायित्वाबाबत मृत व्यक्ती ही दिवाळखोरी कार्यवाहीत शाबीत होण्यासारखे असे कोणतेही ऋण देणे लागत असेल तर, त्या दायित्वाबाबत मृत ऋणकोला विमाकाराविरुद्ध असलेले अधिकार, कायद्याच्या कोणत्याही उपबंधांमध्ये काहीही विरुद्ध असले तरी, ज्याला ते ऋण देणे आहे अशा पक्षाकडे हस्तांतरित होऊन त्याच्यामध्ये निहित होतील.

(३) पोटकलम (१) चा खंड (क्) किंवा खंड (ख्) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्यापैकी कोणतीही घटना किंवा दिवाळखोरी कायद्यानुसार मृत ऋणकोच्या संपदेचे प्रशासन करण्यासाठी आदेश देण्यात आल्यास प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे विमापत्र शून्य करण्याचे किंवा पक्षांना त्याखाली असलेल्या अधिकारां-मध्ये फेरबदल करण्याचे या प्रकरणाखाली देण्यात आलेल्या विमापत्रातील ज्या शर्तीमध्ये अभिप्रेत असेल अशी कोणतीही शर्त परिणामक असणार नाही.

(४) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) खाली हस्तांतरण झाल्यावर, विमाकाराचे विमेदार व्यक्तीप्रत जे दायित्व राहिले असते तेच दायित्व त्रयस्थ पक्षाप्रत राहील, पण—

(क्) जर विमाकाराचे विमेदार व्यक्तीप्रत असलेले दायित्व हे विमेदार व्यक्तीवर त्रयस्थ पक्षाप्रत असलेल्या दायित्वाहून अधिक असेल तर, अतिरिक्त दायित्वाबाबत विमाकाराविरुद्ध विमेदार व्यक्तीस असलेल्या अधिकारांवर या प्रकरणातील कोणत्याही गोष्टीमुळे परिणाम होणार नाही, आणि

(ख्) जर विमाकाराचे विमेदार व्यक्तीप्रत असलेले दायित्व हे विमेदार व्यक्तीवर त्रयस्थ पक्षाप्रत असलेल्या दायित्वाहून कमी असेल तर, शेष दायित्वाबाबत विमेदार व्यक्तीविरुद्ध, त्रयस्थ पक्षास असलेल्या अधिकारांवर या प्रकरणातील कोणत्याही गोष्टीमुळे परिणाम होणार नाही.

**विवादासंबंधी माहिती देण्याचे कर्तव्य.**

१५१. (१) कलम १४७ च्या पोटकलम (१), खंड (ख्) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही दायित्वाबाबत ज्या व्यक्तीविरुद्ध हक्कमागणी दाखल केलेली आहे अशी कोणतीही व्यक्ती, हक्क-मागणी करणाऱ्या व्यक्तीकडून किंवा तिच्या वतीने तशी मागणी करण्यात आली असता, या प्रकरणाच्या उपबंधाखाली काढलेल्या कोणत्याही विमापत्राद्वारे त्या दायित्वासंबंधात तिला विमारक्षण मिळालेले आहे की नाही, अथवा विमाकाराने जर विमापत्र शून्य केले नसते किंवा रद्द केले नसते तर तशा प्रकारे विमारक्षण मिळाले असते की नाही हे निवेदन करण्याचे नाकारु शकणार नाही, तसेच जर ती याप्रमाणे विमारक्षित केलेली असेल किंवा होऊ शकली असती असे असेल तर, त्या विमापत्रासंबंधी दिलेल्या विमा प्रमाणपत्रात त्यासंबंधी विनिर्दिष्ट केलेला असा तपशील देण्याचेही ती नाकारु शकणार नाही.

(२) एखादी व्यक्ती दिवाळखोर झाल्यास अगर तिने आपल्या धनकोशी तडजोड किंवा व्यवस्था केल्यास अथवा दिवाळखोरीच्या कायद्यानुसार मृत व्यक्तींच्या संपदेच्या प्रशासनासाठी आदेश देण्यात आल्यास, अथवा कोणत्याही कंपनीसंबंधात तिच्या परिसमापनाचा आदेश देण्यात आल्यास अगर स्वेच्छा-पूर्वक परिसमापन करण्याचा ठराव संमत करण्यात आल्यास नगर कंपनीच्या धंद्यासाठी किंवा उपक्रमा-साठी प्रापक किंवा व्यवस्थापक रीतसर नियुक्त करण्यात आल्यास, अथवा तरत्या प्रभाराद्वारे प्रतिभूत केलेल्या कोणत्याही ऋणपत्रांच्या धारकांनी किंवा त्यांच्या वतीने प्रभारात समाविष्ट किंवा त्यास अधीन असलेल्या कोणत्याही मालमत्तेचा कब्जा घेतल्यास, दिवाळखोर ऋणको, मृत ऋणको किंवा कंपनी यांच्यावर या प्रकरणाच्या कक्षेत येणारे असे दायित्व आपणाप्रत आहे असा दावा सांगणाऱ्या व्यक्तीने विनंती केली असता, कलम १५० खाली काही अधिकार आपणाकडे हस्तांतरित होऊन निहित झाले आहेत किंवा काय याची खातरजमा करण्यासाठी आणि असे काही अधिकार असल्यास ते बजावण्यासाठी ती वाजवीरीत्या अपेक्षील अशी माहिती देणे हे, दिवाळखोर ऋणको, मृत ऋणकोचा वैयक्तिक प्रतिनिधी किंवा, प्रकरणपरत्वे, कंपनी यांचे अथवा दिवाळखोरी कार्यवाहीतील पदस्थ अभिहस्तांकिती किंवा पापक, विश्वस्त, समापक, प्रापक किंवा व्यवस्थापक किंवा मालमत्तेचा कब्जा असणारी व्यक्ती यांचे कर्तव्य असेल, आणि अशा ज्या विमा संविदेला पूर्वोक्त प्रसंगी अशी माहिती देण्यात आल्याच्या कारणास्तव प्रत्यक्ष-पणे किंवा अप्रत्यक्षपणे ती संविदा शून्य करण्याचे किंवा पक्षांना त्याखाली असलेल्या अधिकारास फेरबदल करण्याचे, अथवा उक्त प्रसंगी अशी माहिती देण्यास अन्यथा मनाई किंवा प्रतिबंध, करण्याचे अभिप्रेत असेल अशी कोणतीही विमा संविदा परिणामकारक असणार नाही.

(३) पोटकलम (२) अनुसार किंवा अन्यथा कोणत्याही व्यक्तीला देण्यात आलेल्या माहितीवरून जर एखाद्या विशिष्ट विमाकाराविरुद्ध असलेले कोणतेही अधिकार या प्रकरणाखाली आपणाकडे हस्तांतरित

झाले आहेत किंवा झाले असण्याची शक्यता आहे असे समजण्यास त्या व्यक्तीला वाजवी कारण मिळाले तर, उक्त पोटकलमाद्वारे त्यात उल्लेखिलेल्या व्यक्तींना जे नेमून देण्यात आले आहे त्याच कर्तव्याला तो विमाकार अधीन असेल.

(४) माहिती देण्याबाबत या कलमाद्वारे नेमून देण्यात आलेल्या कर्तव्यात, जिला असे कर्तव्य नेमून देण्यात आले आहे अशा व्यक्तीच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या सर्व विमासंविदा, विम्याच्या हप्त्याच्या पावत्या, आणि अन्य संबंध दस्तऐवज निरीक्षणास आणि त्यांच्या नकला करून घेण्यास मुभा देण्याचे कर्तव्य अंतर्भूत आहे.

विमाकार व विमेदार यांच्यात समझोता.

१५२. (१) कलम १४७ च्या पोटकलम (१), उपखंड (ख्) मध्ये निर्दिष्ट केलेल्या स्वरूपाच्या कोणत्याही दायित्वाबाबत त्नयस्थ पक्षाला जी कोणतीही हक्कमागणी करता यईल त्याबाबत विमाकाराने केलेल्या कोणत्याही समझोत्यामध्ये असा त्रयस्थ पक्ष हा एक पक्ष असल्याशिवाय, तो समझोता विधिग्राह्य असणार नाही.

(२) या प्रकरणाच्या प्रयोजनांसाठी देण्यात आलेल्या विमापत्नाखाली ज्या व्यक्तीला विमारक्षित केलेले आहे, अशी व्यक्ती दिवाळखोर झालेली असेल त्याबाबतीत, अथवा तशी विमारक्षित व्यक्ती ही कंपनी असेल तर, त्या कंपनीसंबंधी समापनाचा आदेश देण्यात आला असेल किंवा स्वेच्छापूर्वक समापन करण्याचा ठराव संमत करण्यात आला असेल त्याबाबतीत, त्नयस्थ पक्षासंबंधी दायित्व उद्‌भवल्यानंतर आणि दिवाळखोरीस किंवा, प्रकरणपरत्वे, ससापनास प्रारंभ झाल्यानंतर विमाकार व विमेदार व्यक्ती यांच्यामध्ये करण्यात आलेला कोणताही करार, तसेच पूर्वोक्त गोष्टींना प्रारंभ झाल्यानंतर विमाकार व विमेदार व्यक्ती यांच्यामध्ये करण्यात आलेला कोणताही करार, तसेच पूर्वोक्त गोष्टींना प्रारंभ झाल्यानंतर विमेदार व्यक्तीने केलेले कोणतेही हक्कवर्जन, अभिहस्तांकन किंवा अन्य विल्हेवाट अगर तिला करण्यात आलेले प्रदान हे, जेणेकरून या प्रकरणाखाली त्नयस्थ पक्षाकडे हस्तांतरित झालेले अधिकार विफल होतील अशा प्रकारे परिणामक होणार नाही, तर जणू काही असा कोणताही करार, हक्कवर्जन, अभिहस्तांकन किंवा विल्हेवाट किंवा प्रदान हे करण्यात आलेले नसावे त्याप्रमाणे ते अधिकार तसेच राहतील.

कलमे १५०, १५१ व १५२ याबाबतीतील रक्षित असलेल्या व्यक्तींच्या व्यावृत्ती.

१५३. (१) कलम १५०, १५१ व १५२ च्या प्रयोजनाकरिता कोणत्याही विमापत्नाखाली विमा-संबंधात, "त्नयस्थ पक्षाप्रत असलेले दायित्व" असा जो उल्लेख येईल त्यामध्ये अन्य कोणत्याही विमापत्नाखाली विमाकार या नात्याने त्या व्यक्तीवर येणाऱ्या कोणत्याही दायित्वाचा उल्लेख अंतर्भूत असणार नाही.

(२) केवळ पुनर्रचना करणे किंवा दुसऱ्या कंपनीशी एकत्रीकरण करणे एवढ्याच प्रयोजनार्थ एखादी कंपनी समापित झाली असेल त्याबाबतीत, कलम १५०, १५१ व १५२ यांचे उपबंध लागू होणार नाहीत.

विमा उतरवण्यात आलेल्या व्यक्तींच्या दिवाळखोरीमुळे विमारक्षित व्यक्तींच्या दायित्वावर किंवा त्नयस्थपक्षाच्या मागणीहक्कांवर परिणाम न होणे.

१५४. जिने विमापत्र काढले आहे अशा व्यक्तीला विमा प्रमाणपत्र देण्यात आले असेल त्या-बाबतीत कलम १५० च्या पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) मध्ये उल्लेखिलेली अशी कोणतीही घटना विमापत्नाद्वारे विमा उतरविण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या संबंधात घडली तर या प्रकरणात काहीही अंतर्भूत असले तरी, कलम १४७ च्या पोटकलम (१), खंड (ख्) मध्ये निर्देशिलेल्या स्वरूपाचे त्या व्यक्तीवर जे कोणतेही दायित्व असेल त्यावर परिणाम होणार नाही; परंतु, जिच्यावर दायित्व ओढवलेले आहे अशा व्यक्तीला कलमे १५०, १५१ व १५२ च्या उपबंधाखाली विमाकाराविरुद्ध जे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत त्यावर या कलमातील कोणत्याही गोष्टीचा परिणाम होणार नाही.

मृत्यूचा विवक्षित वादकारणांवर परिणाम.

१५५. भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ याच्या कलम ३०६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जिच्या नावे विमाप्रमाणपत्र देण्यात आलेले होते अशा व्यक्तीचा मृत्यू हा या प्रकरणाच्या उपबंधाखालील मागणीहक्क ज्यामुळे निर्माण झाला आहे ती घटना घडल्यानंतर झाला असेल तर त्या मृत्युमुळे तिच्या संपदेविरुद्ध किंवा विमाकाराविरुद्ध उक्त घटनेतून उद्‌भवणारे कोणतेही वादकारण तिच्या-मागे टिकून राहण्यास आडकाठी येणार नाही.

विमा प्रमाणपत्नाचा परिणाम.

१५६. जेव्हा विमाकार व विमेदार यांच्यामधील विमा संविदेच्या संबंधात विमाकाराने विमा प्रमाणपत्न दिले असेल तेव्हा,—

(क्) विमाकाराने विमेदाराला प्रमाणपत्नात वर्णिलेले विमापत्र दिले नसेल तर व तोपर्यंत खुद्द विमाकार व विमेदाराखेरीज अन्य कोणतीही व्यक्ती यांच्यामधील संबंधापुरते, अशा प्रमाण-पत्नात नमूद केलेल्या वर्णनाशी व तपशीलाशी सर्वथा जुळणारे असे विमापत्र विमाकाराने विमेदार व्यक्तीला दिले असल्याचे मानण्यात येईल, आणि

(ख्) जर विमाकाराने विमेदाराला प्रमाणपत्नात वर्णिलेले विमापत्र दिले असेल, पण विमापत्नाखाली किंवा त्याच्या आधारे विमाकाराविरुद्ध प्रत्यक्षपणे किंवा विमेदारामार्फत हक्क सांगणाऱ्या व्यक्तींच्या दृष्टीने विमापत्राच्या प्रत्यक्षातील अटी प्रमाणपत्नात विमापत्नाचा जो तपशील

नमूद असेल त्याच्यापेक्षा कमी अनुकूल असतील तर विमाकार व विमेदाराखेरीज अन्य कोणतीही व्यक्ती यांच्यामधील संबंधापुरते त्या विमापत्राच्या अटी उक्त प्रमाणपत्रात नमूद केलेल्या तपशीलाशी सर्वथा जुळणाऱ्या असल्याचे मानले जाईल.

**विमाप्रमाणपत्राचे हस्तांतरण.**

१५७. (१) या प्रकरणाच्या उपबंधानुसार ज्या व्यक्तीच्या नावे विमाप्रमाणपत्र देण्यात आले आहे अशी व्यक्ती मोटार वाहनाशी संबंधित विमापत्रासह आहे त्या वाहनाची मालकी इतर व्यक्तीकडे हस्तांतरित करील त्याबाबतीत, विमाप्रमाणपत्र व त्या विमाप्रमाणपत्रात वर्णिलेले विमापत्र हे जिच्या नावे मोटार वाहन हस्तांतरित केले आहे त्या व्यक्तीच्या नावे त्या मोटार वाहनाच्या हस्तांतरणाच्या दिनांकापासून हस्तांतरित झाले असल्याचे मानण्यात येईल.

[१][स्पष्टीकरण.—शंकानिरसनार्थ, याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, अशा मानवी हस्तांतरणामध्ये उक्त विमाप्रमाणपत्र आणि विमापत्र यांच्या अधिकारांच्या व दायित्वांच्या हस्तांतरणाचाही समावेश असेल.]

(२) हस्तांतरिती हस्तांतरणाच्या दिनांकापासून चौदा दिवसांच्या आत विमाप्रमाणपत्रात आणि विमाप्रमाणपत्रात वर्णिलेल्या विमापत्रात त्याच्या नावे हस्तांतरण केल्याबद्दलचा आवश्यक तो बदल करण्यासाठी विहित नमुन्यात विमाकाराकडे अर्ज करील आणि विमाकार विमाहस्तांतरणाशी संबंधित प्रमाणपत्रात आणि विमापत्रात आवश्यक ते बदल करील.

**प्रमाणपत्रे, लायसन आणि विवक्षित प्रकरणांमध्ये परवाना सादर करणे.**

१५८. (१) कोणत्याही सार्वजनिक स्थळी मोटार वाहन चालवणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, राज्य शासनाने यासंबंधात प्राधिकृत केलेल्या वर्दीधारी पोलीस अधिकाऱ्याने मागणी केल्यास वाहनाच्या वापराशी संबंधित,—

(क) विमाप्रमाणपत्र ;

(ख) नोंदणी प्रमाणपत्र ;

(ग) चालन लायसन ; आणि

(घ) परिवहन वाहनाच्या बाबतीत, कलम ५६ मध्ये निर्देशिलेले स्वास्थ्य प्रमाणपत्र आणि परवाना;

सादर करावा लागेल.

(२) मोटार वाहन एखाद्या सार्वजनिक स्थळी असताना अपघात होऊन त्यामुळे दुसऱ्या एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाला अथवा त्यास शारीरिक इजा पोहोचली असता त्यावेळी वाहनाच्या चालकाने पोलीस अधिकाऱ्याला पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेले विमाप्रमाणपत्र, चालन लायसन आणि परवाना सादर केला नाही तर, कलम १३४ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे तो ज्या पोलीस ठाण्यावर खबर देईल तेथे त्याला उपरोक्त विमाप्रमाणपत्र, लायसन आणि परवाना सादर करावा लागेल.

(३) पोटकलम (१) खाली ज्या दिनांकास विमाप्रमाणपत्र सादर करणे आवश्यक होते त्या दिनांकापासून किंवा प्रकरणपरत्वे, अपघात घडून आल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत एखाद्या व्यक्तीने जर ते सादर करण्याची मागणी करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याकडून विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या पोलीस ठाण्यावर किंवा, प्रकरणपरत्वे, अपघाताच्या ठिकाणी असलेल्या पोलीस अधिकाऱ्याला किंवा जेथे तिने अपघाताची खबर दिली त्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याला ते प्रमाणपत्र सादर केले तर, विमाप्रमाणपत्र देण्यास चुकल्याच्या कारणास्तव अशी कोणीही व्यक्ती पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) खाली दोषसिद्धीस पात्र असणार नाही :

परंतु, विहित करण्यात येईल अशी व्याप्तीखेरीज करून व तशा आपरिवर्तनाखेरीज, या पोट-कलमाचे उपबंध परिवाहनाच्या चालकाला लागू होणार नाहीत.

(४) मोटार वाहन कलम १४६ चे व्यतिक्रमण करून चालवले जात होते किंवा नव्हते हे ठरविण्याच्या प्रयोजनासाठी, राज्य शासनाने यासंबंधात शक्तीप्रदान केलेल्या पोलीस अधिकाऱ्याकडून किंवा त्याच्यावतीने मोटार वाहनाच्या मालकाला माहिती देण्यास फर्माविण्यात येईल तेव्हा व चालकाला या कलमाखाली आपले विमाप्रमाणपत्र सादर करण्यास सांगण्यात येईल अशा कोणत्याही प्रसंगी त्याला अशी माहिती द्यावी लागेल.

(५) या कलमात, "आपले विमाप्रमाणपत्र सादर करणे" या शब्दप्रयोगाचा अर्थ, विमाप्रमाणपत्र किंवा कलम १४६ चे व्यतिक्रमण करून वाहन चालवण्यात येत नव्हते हे शाबित करण्यासाठी विहित करण्यात येईल असा अन्य पुरावा तपासणीसाठी सादर करणे, असा आहे.

[२][(६) ज्यामध्ये कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू झालेला असेल किंवा तिला शारीरिक इजा झालेली असेल अशा कोणत्याही अपघातासंबंधीची कोणतीही माहिती नोंदवण्यात आल्यावर किंवा पोलीस अधिकाऱ्याने या कलमाखालील अहवाल पूर्ण केल्यावर शक्य तितक्या लवकर पोलीस ठाण्याचा प्रभारी

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम ४८ द्वारे 'स्पष्टीकरण' समाविष्ट करण्यात आले (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ४९ द्वारे मूळ पोटकलम (६) ऐवजी हे पोटकलम घालण्यात आले (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून).

अधिकारी प्रकरणपरत्वे, अशी माहिती नोंदवण्यात आल्याच्या किंवा असा अहवाल पूर्ण करण्यात आल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, त्या माहितीची किंवा अहवालाची प्रत अधिकारिता असलेल्या मागणी-विषयक अधिकरणाकडे आणि एक प्रत संबंधित विमाकाराकडे अग्रेषित करील आणि जेव्हा मालकाला एक प्रत देण्यात येईल, तेव्हा तो त्याला असा अहवाल मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत तो अहवाल अशा मागणीविषयक अधिकरणाकडे व विमाकाराकडे अग्रेषित करील.]

वाहन उपयोगात आणण्याच्या प्राधिकारासाठी अर्ज केल्यावर विमा प्रमाणपत्र सादर करणे.

१५९. राज्य शासनाला नियम करून त्याद्वारे असे आवश्यक करता येईल की, कोणताही मोटार वाहन मालक जेव्हा सार्वजनिक ठिकाणी वाहनाचा वापर करण्याचा प्राधिकार मिळविण्यासाठी कराचा भरणा करून त्याद्वारे किंवा अन्यथा अर्ज करील तेव्हा,—

(क) जेव्हा वाहनांचा उपयोग करण्यासंबंधीचा प्राधिकार अंमलात येईल त्या दिनांकास अर्जदारास किंवा त्याच्या आदेशावरून किंवा त्याच्या परवानगीने अन्य व्यक्तींनी वाहनाचा उपयोग करण्याच्या संबंधात आवश्यक ते विमापत्र अंमलात आलेले असेल, किंवा

(ख) ज्या वाहनाला कलम १४६ लागू नाही असे ते वाहन आहे, हे दाखवून देण्यासाठी त्या नियमांद्वारे विहित करण्यात येईल असा पुरावा त्या मालकाने सादर करावा.

अपघातात गोवल्या गेलेल्या वाहनाचा तपशील देण्याचे कर्तव्य.

१६०. जर मोटार वाहन उपयोगात आणण्यातून उद्भवलेल्या अपघाताबाबत भरपाई मागण्यास आपण हक्कदार आहोत असे अभिकथन करणाऱ्या व्यक्तीने मागणी केल्यास किंवा जर कोणत्याही मोटार वाहनाबाबत ज्याच्याविरुद्ध मागणी करण्यात आली आहे त्या विमाकाराने मागणी केल्यास, नोंदणी प्राधिकरण किंवा पोलीस ठाण्याचा प्रभारी अधिकारी विहित फी भरण्यात आल्यावर त्या व्यक्तीला किंवा, प्रकरणपरत्वे, त्या विमाकाराला, वाहनाची ओळख चिन्हे व इतर तपशील आणि अपघाताच्या वेळी, जी व्यक्ती वाहन उपयोगात आणीत होती किंवा जिला त्यामुळे इजा पोहचली त्या व्यक्तीचे नाव व पत्ता आणि केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा स्वरुपात आणि अशा कालावधीत नुकसान झाले असेल अशी कोणतीही मालमत्ता असल्यास, ती मालमत्ता यासंबंधात उक्त प्राधिकरण किंवा उक्त पोलीस अधिकारी त्यांच्या हाती असेल अशी कोणतीही माहिती पुरवील.

ठोकर मारून व पळून गेलेल्या मोटार वाहनांमुळे घडलेल्या अपघाताच्या प्रकरणांतील भरपाई म्हणून विशेष उपबंध.

१६१. (१) या कलमाच्या, कलम १६२ व कलम १६३ च्या प्रयोजनार्थ,—

(क) "जबर दुखापत" या शब्दाचा अर्थ, भारतीय दंड संहितेत (१८६० चा ४५) त्याचा जो अर्थ असेल त्याप्रमाणे आहे;

(ख) "ठोकर मारून पळून गेलेल्या मोटार वाहनामुळे घडलेला अपघात" याचा अर्थ, जे मोटार वाहन किंवा मोटार वाहने उपयोगात आणल्यामुळे अपघात उद्भवलेला आहे अशा मोटार वाहनांची ओळख या प्रयोजनासाठी वाजवी प्रयत्न करून देखील निश्चित करणे शक्य झालेले नाही, असा आहे ;

(ग) "योजना" याचा अर्थ, कलम १६३ अन्वये तयार करण्यात आलेली योजना, असा आहे.

(२) सर्वसाधारण विमा व्यवसाय (राष्ट्रीयीकरण) अधिनियम, १९७२ (१९७२ चा ५७) किंवा त्यावेळी अंमलात असणारा कोणताही अन्य कायदा किंवा कायद्याचा प्रभाव असणारा कोणताही संलेख यात काहीही अंतर्भूत असले तरी, उक्त अधिनियमाच्या कलम ९ अन्वये घटित करण्यात आलेले भारतीय आयुर्विमेत्तर विमा महामंडळ आणि भारतातील सर्वसाधारण विमा व्यवसाय चालविणाऱ्या त्या-वेळच्या विमा कंपन्या, या अधिनियमाच्या आणि योजनेच्या उपबंधांनुसार ठोकर मारून पळून गेलेल्या मोटार वाहनामुळे घडलेल्या अपघातामुळे झालेल्या व्यक्तीचा मृत्यू किंवा जबर दुखापत यांच्या संबंधातील भरपाईची रक्कम देण्याची तरतूद करतील.

(३) या अधिनियमाच्या व योजनेच्या उपबंधाच्या अधीनतेने, पुढीलप्रमाणे भरपाई देण्यात येईल :—

(क) ठोकर मारून व पळून गेलेल्या मोटार वाहनामुळे घडून आलेल्या अपघातामुळे कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू झाल्याच्या बाबतीत, [1][पंचवीस हजार रुपये] इतकी नियत रक्कम;

(ख) ठोकर मारून व पळून गेलेल्या मोटार वाहनामुळे घडलेल्या अपघातामुळे कोणत्याही व्यक्तीला जबर दुखापत झाल्याच्या बाबतीत, [2][बारा हजार आणि पाचशे रुपये] इतकी नियत रक्कम.

(४) कलम १६६ च्या पोट-कलम (१) चे उपबंध हे त्या पोट-कलमात निर्देशिलेल्या भरपाईबद्दल अर्ज करण्याच्या प्रयोजनासाठी ज्याप्रमाणे लागू होतात तसे ते या कलमाखालील भरपाईबद्दल अर्ज करण्याच्या प्रयोजनासाठी लागू होतील.

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम ५० (क) द्वारे मूळ मजकुराऐवजी घालण्यात आले (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ५० (ख) द्वारे मूळ मजकुराऐवजी घालण्यात आले (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून).

१६२. (१) कलम १६१ खालील कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू किंवा जबर दुखापत यांच्या संबंधातील भरपाईच्या रकमेचे प्रदान हे, या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही उपबंधाखाली किंवा अन्य कोणत्याही कायद्याखाली असा मृत्यू किंवा जबर दुखापत याबाबत भरपाईच्या मागणीच्या पूर्तीऐवजी किंवा त्या रुपाने प्रदान करण्यात आली असेल किंवा चुकती करण्यात आली असेल अशी कोणतीही भरपाई (या पोटकलमात यापुढे जिचा निर्देश अन्य भरपाई असा करण्यात आला आहे.) किंवा इतर रक्कम किंवा अन्यथा कलम १६१ खाली दिलेल्या भरपाईच्या रकमेइतकी आहे अशी उक्त इतर भरपाई किंवा इतर रक्कम, विमादाराला परत करण्यात येईल या अटीच्या अधीनतेने करण्यात येईल. कलम १६१ खाली देण्यात आलेल्या भरपाईचा काही विवक्षित प्रकरणात परतावा.

(२) या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाखाली (कलम १६१ शिवाय) किंवा इतर कोणत्याही कायद्याखाली एका मोटार वाहनाच्या किंवा अनेक मोटार वाहनांच्या उपयोगामुळे झालेला कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू किंवा शारीरिक इजा यांचा समावेश असणाऱ्या अपघाताच्या संबंधातील भरपाई प्रदान करण्यापूर्वी न्यायाधिकरण, न्यायालय किंवा इतर प्राधिकरण, अशी भरपाई देताना, कलम १६१ खाली असा मृत्यू किंवा शारीरिक इजा यांच्या संबंधात अगोदरच भरपाई देण्यात आली आहे किंवा नाही याची पडताळणी करील किंवा त्या कलमाखाली भरपाई देण्याचा अर्ज प्रलंबित असेल आणि असे न्यायाधिकरण, न्यायालय किंवा इतर प्राधिकरण हे,—

(क) जर कलम १६१ खाली अगोदरच भरपाई देण्यात आली असेल तर, न्यायाधिकरण, न्यायालय किंवा इतर प्राधिकरण यांच्याकडून देण्यात आलेली भरपाई चुकती करण्यास पात्र असणाऱ्या व्यक्तीला पोटकलम (१) च्या उपबंधानुसार परत करणे आवश्यक असेल इतकी रक्कम विमादाराला परत करण्याबाबत निदेश देईल;

(ख) जर कलम १६१ खाली भरपाईच्या रकमेसाठी अर्ज प्रलंबित असेल तर, त्यांच्याकडून देण्यात आलेल्या भरपाईचा तपशील विमादाराकडे अग्रेषित करतील.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, कलम १६१ खालील भरपाईचा अर्ज पुढील बाबींच्या संबंधात प्रलंबित असल्याचे समजण्यात येईल :—

(एक) जर असा अर्ज नाकारण्यात आला असेल तर, अर्ज नाकारण्यात आल्याच्या तारखेपर्यंत; आणि

(दोन) अन्य कोणत्याही प्रकरणात अर्जास अनुसरून भरपाईच्या रकमेच्या प्रदानाच्या तारखेपर्यंत.

१६३. (१) केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, आयुर्विमेतर विमा महामंडळाकडून ज्या रीतीने योजनेची अंमलबजावणी करण्यात येईल ती रीत, ज्या नमुन्यात, ज्या रीतीने आणि ज्या वेळात भरपाईचे अर्ज करता येतील तो नमुना, ती रीत व ती वेळ, ज्या अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकाऱ्याकडे असे अर्ज करता येतील ते अधिकारी किंवा प्राधिकारी, जी कार्यपद्धती अनुसरून असे अधिकारी किंवा प्राधिकारी असे अर्ज विचारात घेऊन आदेश देतील ती कार्यपद्धती, योजनेची अंमलबजावणी आणि भरपाईची रक्कम देणे, यांच्याशी अनुषंगिक किंवा संबंधित अशा इतर सर्व बाबी विनिर्दिष्ट करणारी एक योजना तयार करील. ठोकर मारून व पळून गेलेल्या मोटार वाहनामुळे घडलेल्या अपघाताच्या प्रकरणात भरपाई देण्याची योजना.

(२) पोटकलम (१) खाली तयार केलेल्या योजनेत पुढील बाबींसाठी उपबंध करण्यात येतील :—

(क) योजनेतील कोणत्याही उपबंधाच्या व्यतिक्रमणाच्या बाबतीत, विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीच्या परंतु कोणत्याही परिस्थितीत अशी मुदत तीन महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या मर्यादेपर्यंतच्या कारावासाची शिक्षा किंवा विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रकमेच्या, परंतु कोणत्याही परिस्थितीत अशी रक्कम पाचशे रुपयांपेक्षा अधिक नसेल अशा मर्यादेपर्यंतच्या द्रव्यदंडाची शिक्षा किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतील;

(ख) या योजनेद्वारे, कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा प्राधिकाऱ्याला प्रदान केलेल्या कोणत्याही शक्ती, किंवा त्यांच्यावर लादलेली कोणतीही कार्ये किंवा कर्तव्ये ही, असे अधिकारी किंवा प्राधिकारी केंद्र शासनाच्या पूर्वमान्यतेने इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकाऱ्याकडे सोपवू शकतील ;

(ग) अशा योजनेचा कोणताही उपबंध हा या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या मोटार वाहन अधिनियम, १९३९ (१९३९ चा ४) खालील दिलासा निधीच्या स्थापनेच्या तारखेच्या आधीची नसेल अशा तारखेपासून, पूर्वलक्षी प्रभावाने प्रवर्तनात येईल :

परंतु, जिला असा उपबंध लागू असेल अशा कोणत्याही व्यक्तीच्या हितसंबंधावर प्रतिकूल परिणाम होईल अशाप्रकारे असा पूर्वलक्षी प्रभाव देण्यात येणार नाही.

[1][**१६३क.** (१) या अधिनियमामध्ये किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये किंवा कायद्याचा प्रभाव असणाऱ्या कोणत्याही संलेखामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मोटार वाहनाचा उपयोग केल्यामुळे झालेल्या अपघातात कोणाचा मृत्यू होईल किंवा त्याला कायमची विकलांगता येईल तर मोटार वाहनाचा मालक किंवा प्राधिकृत विमाकार प्रकरणपरत्वे कायदेशीर वारसांना किंवा कायमची विकलांगता आलेल्या व्यक्तीला, दुसऱ्या अनुसूचीत दर्शविल्याप्रमाणे भरपाई देण्यास पात्र असेल. पूर्व निर्धारित सूत्राच्या आधारे भरपाई देण्याबाबत विशेष उपबंध.

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम ५१ द्वारे '१६३क आणि १६३ख' ही कलमे समाविष्ट करण्यात आली (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, "कायमची विकलांगता" या शब्दप्रयोगाला, कामगार भरपाई अधिनियम, १९२३ (१९२३ चा ८) यात जो अर्थ आणि जी व्याप्ती दिलेली आहे. तोच अर्थ व तीच व्याप्ती आहे.

(२) पोटकलम (१) खालील भरपाई मिळण्यासाठी केलेल्या कोणत्याही हक्कमागणीत हक्क-मागणीदाराला, ज्यासंबंधात हक्कमागणी करण्यात आलेली असेल तो मृत्यू किंवा कायमची विकलांगता, ही संबंधित वाहनाच्या किंवा वाहनांच्या मालकाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या दोषपूर्ण कृतीमुळे किंवा हयगयीमुळे किंवा कसुरीमुळे ओढवलेली आहे, असा युक्तिवाद करण्याची किंवा असे शाबीत करण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) केंद्र शासन, शासकिय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, राहणीखर्च विचारात घेऊन, वेळोवेळी दुसरी अनुसूची विशोधित करू शकेल.

विवक्षित प्रकरणी हक्क मागणी दाखल करण्याचा पर्याय. **१६३ ख.** कलम १४० आणि कलम १६३ क खाली भरपाईची हक्क मागणी करण्यास हक्कदार असणारी एखादी व्यक्ती, उक्त दोन्ही कलमांखाली आणि नव्हे, तर त्यापैकी एका कलमाखाली दावा दाखल करील.]

केंद्र शासनाची नियम करण्याची शक्ती. **१६४.** (१) केंद्र शासनास, कलम १५९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींव्यतिरिक्त या प्रकरणाच्या उपबंधाची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनासाठी नियम करता येतील.

(२) पूर्वगामी शक्तीच्या सर्वसाधारणतेला हानी न पोचवता, अशा नियमांमध्ये खालीलप्रमाणे उपबंध करता येतील :—

(क) या प्रकरणाच्या प्रयोजनासाठी उपयोगात आणावयाचे नमुने;

(ख) विमा प्रमाणपत्रांकरता अर्ज करणे व ती देणे;

(ग) गहाळ झालेली, नष्ट झालेली किंवा जीर्णशीर्ण झालेली अशी जी विमा प्रमाणपत्रे असतील त्यांच्याऐवजी त्यांच्या दुसऱ्या प्रती देणे;

(घ) विमा प्रमाणपत्रे सांभाळून ठेवणे, ती सादर करणे, रद्द करणे व स्वाधीन करणे;

(ङ) या प्रकरणाखाली दिलेल्या विमापत्रांबाबत विमाकारांनी नोंदी ठेवणे;

(च) या प्रकरणाच्या उपबंधांपासून सूट मिळालेल्या व्यक्तींची किंवा वाहनांची प्रमाणपत्रांवरून किंवा अन्यथा ओळख पटवणे;

(छ) विमाकारांनी विमापत्रांसंबंधांतील माहिती पुरवणे;

(ज) भारतात केवळ तात्पुरते वास्तव्य करण्यासाठी आलेल्या व्यक्तींनी भारतात आणलेल्या वाहनांना किंवा एखाद्या देवाण घेवाण करणाऱ्या देशात नोंदणी केलेल्या व भारतातील कोणत्याही नियत मार्गावर किंवा कोणत्याही क्षेत्रात चालवण्यात येणाऱ्या वाहनांना या प्रकरणाचे उपबंध अनुकूल करणे;

(झ) कलम १६० मध्ये निर्देशिलेला तपशील, ज्या नमुन्यात आणि ज्या कालमर्यादेत द्यावयाचा आहे तो नमुना आणि ती कालमर्यादा; आणि

(ञ) विहित करावयाची किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

## प्रकरण बारा

### मागणीहक्क अधिकरणे

मागणीहक्क अधिकरणे. १६५. (१) ज्या अपघातांमध्ये मोटार वाहनांच्या उपयोगातून व्यक्तींचा मृत्यू घडून येतो किंवा त्यांना शारीरिक इजा पोचते किंवा त्रयस्थ पक्षाच्या कोणत्याही मालमत्तेचे नुकसान होते किंवा दोन्ही गोष्टी घडतात अशा अपघातांच्या बाबतीत, भरपाईसाठी होणाऱ्या मागण्यांबाबत अभिनिर्णय करण्यासाठी, राज्य शासनाला शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्राकरता एक किंवा अधिक "मोटार अपघात मागणीहक्क अधिकरणे" (यात यापुढे "मागणीहक्क अधिकरणे" म्हणून निर्देशिलेली) घटित करता येतील.

**स्पष्टीकरण.**—शंकांचे निरसन करण्यासाठी, याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, "मोटार वाहनांच्या उपयोगातून व्यक्तींचा मृत्यू घडून येतो किंवा त्यांना शारीरिक इजा पोहचते अशा अपघातांच्या बाबतीत भरपाईसाठी मागण्या" या शब्दप्रयोगात कलम १४० [1][आणि कलम १६३क] अन्वये भरपाई मागण्यांचाही समावेश होतो.

(२) "मागणी हक्क अधिकरण" हे राज्य शासनास जितके सदस्य नियुक्त करणे योग्य वाटेल तितक्या सदस्यांचे मिळून बनलेले असेल आणि जेव्हा ते दोन किंवा अधिक सदस्यांचे मिळून बनलेले असेल तेव्हा, त्यांच्यापैकी एकास अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात येईल.

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम ५२(क) द्वारे हे शब्द घालण्यात आले (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(३) एखादी व्यक्ती,—

(क) उच्च न्यायालयाचा न्यायाधीश आहे किंवा होती; अथवा

(ख) जिल्हा न्यायाधीश आहे किंवा होती; अथवा

(ग) उच्च न्यायालयाचा न्यायधीश म्हणून [१][किंवा जिल्हा न्यायाधीश] नियुक्ती केली जाण्यास अर्ह आहे;

असे असल्याशिवाय, ती व्यक्ती "मागणीहक्क अधिकरणाचा" सदस्य म्हणून नियुक्त केली जाण्यास अर्ह होणार नाही.

(४) जेव्हा एखाद्या क्षेत्राकरता दोन किंवा अधिक मागणीहक्क अधिकरणे घटित करण्यात आली असतील तेव्हा, राज्य शासनाला सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, त्यांच्यामधील कामकाज वाटपाचे नियमन करता येईल.

**१६६.** (१) कलम १६५, पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचा अपघात घडल्यामुळे देय झालेल्या भरपाईकरता करावयाचा अर्ज, **भरपाईसाठी अर्ज.**

(क) ज्या व्यक्तीला इजा पोहचली आहे त्या व्यक्तीला; किंवा

(ख) मालमत्ता मालकाला; किंवा

(ग) अपघातामुळे मृत्यू घडून आला असेल तर, मृताच्या सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही वैध प्रतिनिधींना; किंवा

(घ) इजा पोचलेल्या व्यक्तीने किंवा, प्रकरणपरत्वे, मृत व्यक्तीच्या सर्व वैध प्रतिनिधींनी किंवा त्यापैकी कोणीही रीतसर प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अभिकर्त्याला;

करता येईल :

परंतु, भरपाईसाठी केलेल्या अशा कोणत्याही अर्जात मृतांचे सर्व वैध प्रतिनिधी सामील झाले नसतील तर, मृतांच्या सर्व वैध प्रतिनिधींच्या वतीने किंवा त्यांच्या फायद्याकरता अर्ज करण्यात येईल आणि जे त्याप्रमाणे सामील झाले नसतील अशा वैध प्रतिनिधींना अर्जाचे उत्तरदाते म्हणून त्यामध्ये गोवण्यात येईल.

[२][(२) पोटकलम (१) खालील प्रत्येक अर्ज मागणीदाराच्या इच्छेनुसार, जेथे अपघात घडला त्या क्षेत्रावर अधिकारिता असलेल्या दावा अधिकरणाकडे किंवा मागणीदार ज्याच्या अधिकार क्षेत्राच्या स्थानिक सीमांमध्ये राहत असेल किंवा कामधंदा करत असेल, त्या दावा अधिकरणाकडे किंवा प्रतिवादी ज्याच्या अधिकारक्षेत्राच्या स्थानिक सीमांमध्ये राहत असेल, त्या दावा अधिकरणाकडे करण्यात येईल आणि तो अर्ज, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात असेल व त्यात असा तपशील अंतर्भूत असेल :

परंतु, अशा अर्जामध्ये, कलम १४० खालील भरपाईसाठी कोणतीही मागणी केली नसल्यास त्या अर्जामध्ये अर्जदाराच्या सहीच्या लगतपूर्व तशा अर्थाचे एक स्वतंत्र निवेदन करण्यात येईल.]

[३][(३) * * * * * *]

[४][(४) दावा अधिकरण कलम १५८ च्या पोटकलम (६) खाली त्याच्याकडे अग्रेषित करण्यात आलेला अपघाताचा कोणताही अहवाल हा, या अधिनियमाखालील भरपाईसाठी करण्यात आलेला अर्ज असल्याचे समजेल.]

**१६७.** कामगार भरपाई अधिनियम, १९२३ (१९२३ चा ८) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू झाल्यामुळे किंवा तिला शारीरिक इजा झाल्यामुळे या अधिनियमाखाली भरपाई करता आणि तसेच कामगार भरपाई अधिनियम, १९२३ (१९२३ चा ८) याही अधिनियमाखाली भरपाईचा करावयाच्या मागणी हक्क प्राप्त झाला असेल तर, भरपाई मिळण्यास हक्कदार असलेल्या व्यक्तीला, प्रकरण १० च्या उपबंधांना हानी न पोचवता, त्या अधिनियमापैकी कोणत्याही एका अधिनियमाखाली अशा भरपाईची मागणी करता येईल दोन्ही अधिनियमांखाली नाही. **विवक्षित प्रकरणात मागण्यांसंबंधी विकल्पाधिकार.**

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम ५२ (ख) द्वारे हे शब्द घालण्यात आले. (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ५३ (क) द्वारे मूळ कलम १६६ याचे पोटकलम (२) ऐवजी नवीन पोटकलम (२) घालण्यात आले (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ५३ (ख) द्वारे कलम १६६ (३) वगळण्यात आले (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ५३ (ग) द्वारे मूळ कलम १६६ (४) ऐवजी नवीन पोटकलम (४) घालण्यात आले (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

मागणी हक्क अधिकरणाचा निवाडा. १६८. (१) कलम १६६ खाली भरपाईसाठी केलेले अर्ज मिळाल्यावर, मागणी हक्क अधिकरण, विमाकाराला अर्जविषयक सूचना दिल्यानंतर आणि पक्षकारांना (विमाकाराचा समावेश करून) आपापली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर, मागणीबाबत किंवा प्रकरणपरत्वे मागण्यांपैकी प्रत्येक मागणीबाबत चौकशी करील आणि कलम १६२ च्या उपबंधांच्या अधीन राहून, त्याला न्याय्य वाटेल अशी भरपाईची रक्कम ठरवणारा व भरपाई जिला द्यावयाची आहे अशी व्यक्ती किंवा अशा व्यक्ती विनिर्दिष्ट करणारा निवाडा देऊ शकेल आणि निवाडा देताना मागणी हक्क अधिकरण, विमाकाराने किंवा अपघातात गोवलेल्या वाहनाच्या मालकाने किंवा चालकाने किंवा प्रकरणपरत्वे त्या सर्वांनी किंवा त्यांच्यापैकी कोणीही किती रक्कम दिली पाहिजे ते विनिर्दिष्ट करील :

परंतु, जेव्हा कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू किंवा कायमचे अपंगत्व यांच्या संबंधांत कलम १४० खाली भरपाईच्या मागणीसाठी अर्ज केला असेल तेव्हा, असा मृत्यू किंवा कायम अपंगत्वाच्या संबंधातील भरपाई-साठी म्हणून केलेली अशी मागणी व अन्य कोणतीही मागणी (अशा अर्जात किंवा अन्यथा केलेली असो किंवा नसो) प्रकरण १० च्या उपबंधांच्या अनुसार निकालात काढण्यात येईल.

(२) मागणी हक्क अधिकरण, शीघ्रतेने आणि कोणत्याही प्रकरणात निवाडा दिल्याच्या तारखे-पासून पंधरा दिवसांच्या कालावधीच्या आत, संबंधित पक्षकारांना निवाड्याची प्रत पाठविण्याची व्यवस्था करील.

(३) जेव्हा या कलमाखाली निवाडा करण्यात आला असेल आणि ज्या व्यक्तीला अशा निवाड्या-च्या शर्तीनुसार कोणतीही रक्कम देण्याबाबत फर्माविण्यात आले असेल अशी व्यक्ती, मागणी हक्क अधिकरणाने निवाडा जाहीर केल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, मागणी हक्क अधिकरण निदेश देईल अशा रीतीने निवाडा दिलेली समग्र रक्कम जमा करील.

मागणी हक्क अधिकरणाची कार्यपद्धती व त्यांची शक्ती. १६९. (१) कलम १६८ खाली कोणतीही चौकशी करताना, मागणी हक्क अधिकरणास या बाबतीत करण्यात येतील अशा कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, त्यास योग्य वाटेल अशी संक्षिप्त कार्य-पद्धती अनुसरता येईल.

(२) शपथेवर पुरावा घेण्याच्या आणि साक्षीदारांना उपस्थित राहण्यास भाग पाडण्याच्या आणि दस्तऐवज व महत्त्वाच्या वस्तू प्रगट करावयास लावून त्या हजर करण्याची सक्ती करण्याच्या प्रयोजनासाठी व विहित करण्यात येतील अशा अन्य प्रयोजनांसाठी मागणी हक्क अधिकरणाला दिवाणी न्यायालयाच्या सर्व शक्ती असतील आणि मागणी हक्क अधिकरण हे, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याचे कलम १९५ व प्रकरण २६ यांच्या सर्व प्रयोजनांसाठी दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल.

(३) याबाबतीत करण्यात येतील अशा नियमांच्या अधीनतेने, मागणी हक्क अधिकरणास, भरपाई च्या कोणत्याही मागणीचा अभिनिर्णय करण्याच्या प्रयोजनार्थ, चौकशी करण्याच्या कामात आपणास सहाय्य करण्यासाठी चौकशीशी संबंधित अशा कोणत्याही बाबीचे विशेष ज्ञान असणाऱ्या एका किंवा अधिक व्यक्तींची निवड करता येईल.

विवक्षित प्रकरणात विमाकारावर कार्यवाही करणे. १७०. कोणत्याही चौकशीच्या ओघात जर मागणीहक्क अधिकरणाची अशी खात्री झाली की,—

(क) मागणी करणारी व्यक्ती व जिच्याविरुद्ध मागणी करण्यात आली आहे अशी व्यक्ती यांच्यामध्ये संगनमत झाले आहे ; किंवा

(ख) जिच्याविरुद्ध मागणी करण्यात आली आहे अशी व्यक्ती मागणीचा प्रतिवाद करण्यास चुकली असेल तर तीं कारणे लेखी नमूद करून असा निदेश देऊ शकेल की, अशा मागणीच्या बाबतीत, जो दायी असेल अशा विमाकाराला कार्यवाहीतील पक्षकार म्हणून गोवण्यात यावे आणि याप्रमाणे गोवण्यात आलेल्या विमाकाराला त्यानंतर कलम १४९ चे पोटकलम (२) मध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांना हानी न पोचवता, जिच्याविरुद्ध मागणी करण्यात आली आहे अशा व्यक्तीस ज्यांचा आधार घेता येतो अशा सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही कारणांच्या आधारे मागणीचा प्रतिवाद करण्याचा अधिकार असेल.

कोणतीही मागणी मान्य झाल्यास व्याज देवविणे. १७१. कोणत्याही मागणीहक्क अधिकरणाने या अधिनियमाखाली भरपाईसाठी करण्यात आलेली मागणी मान्य केली तर असे अधिकरण असे निदेशित करू शकेल की, भरपाईच्या रकमेशिवाय आणखी ते याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा दराने व मागणी करण्याच्या दिनांकाच्या आधीचा नसेल अशा विहित दिनांकापासून सरळ व्याजही देण्यात यावे.

विवक्षित प्रकरणी भरपाईदाखल खर्च देणे. १७२. (१) या अधिनियमाखाली भरपाईसाठी केलेल्या कोणत्याही मागणीवर अधिनिर्णय देणाऱ्या कोणत्याही मागणीहक्क अधिकरणाची जर एखाद्या प्रकरणी अशी खात्री झाली की—

(क) एखादी गोष्ट महत्त्वाच्या तपशिलाबाबत खोटी असल्याचे अभिवेदन करून विमापत्र मिळविण्यात आल्याकारणाने ते विमापत्र शून्य ठरले आहे, किंवा

(ख) एखाद्या पक्षकाराने किंवा विमाकाराने खोटा किंवा त्रासदायक दावा किंवा बचाव मांडला आहे,

तर, असे अधिकरण, त्याबाबतची कारणे लेखी नमूद करून, अपवेदन केल्याबद्दल जो दोषी आहे किंवा ज्याने असा दावा किंवा बचाव मांडला आहे अशा पक्षकाराने विमाकारास किंवा, प्रकरणपरत्वे ज्याच्याविरुद्ध असा दावा किंवा बचाव मांडण्यात आला असेल अशा पक्षकारास भरपाई म्हणून विशेष खर्च द्यावा असा आदेश देऊ शकेल.

(२) मागणीहक्क अधिकरण, पोटकलम (१) खाली विशेष खर्चादाखल एक हजार रुपयांहून अधिक होणाऱ्या कोणत्याही रकमेचा आदेश काढणार नाही.

(३) या कलमाखाली जिच्याविरुद्ध आदेश देण्यात आला आहे अशा कोणत्याही व्यक्तीस किंवा विमाकारास, त्या कारणामुळे, पोटकलम (१) मध्ये निर्देशिल्याप्रमाणे असे अपवेदन, मागणी किंवा बचाव यासंबंधातील कोणत्याही फौजदारी दायित्वापासून सूट मिळणार नाही.

(४) कोणतेही अपवेदन, मागणी किंवा बचाव यासंबंधात भरपाई म्हणून या कलमाखाली देवविलेली कोणतीही रक्कम ही असे अपवेदन, मागणी किंवा बचाव यासंबंधात भरपाई मिळण्याकरता नंतर लावलेल्या कोणत्याही नुकसानीच्या दाव्यामध्ये हिशेबात घेतली जाईल.

**१७३.** (१) पोटकलम (२) च्या उपबंधाच्या अधीनतेने, मागणी हक्क अधिकरणाच्या निवाड्यामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, निवाड्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, उच्च न्यायालयाकडे अपील करता येईल : अपिले.

परंतु, ज्या व्यक्तीला अशा निवाड्याच्या रूपात कोणतीही रक्कम द्यावयाची आहे अशा व्यक्तीने पंचवीस हजार रुपये किंवा निवाड्यात दिलेल्या रकमेच्या पन्नास टक्के यांपैकी जी कमी असेल अशी रक्कम, उच्च न्यायालयाने निदेशित केली असेल त्या रीतीने जमा केल्याशिवाय उच्च न्यायालयाकडून त्या व्यक्तीचे अपील विचारार्थ स्वीकारण्यात येणार नाही :

परंतु, आणखी असे की, अपीलकर्ता अपील वेळीच करू शकला नाही याला पुरेसे कारण होते अशी जर उच्च न्यायालयाची खात्री झाली तर, उक्त नव्वद दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतरही त्याला अपील स्वीकारता येईल.

(२) अपिलामधील विवाद्य रक्कम दहा हजार रुपयांहून कमी असेल तर, मागणी हक्क अधिकरणाच्या कोणत्याही निवाड्याविरुद्ध अपील होऊ शकणार नाही.

**१७४.** एखाद्या निवाड्याखाली कोणत्याही व्यक्तीकडून कोणतीही रक्कम येणे असेल त्या बाबतीत, मागणीहक्क अधिकरणास, त्या रकमेवर हक्क असलेल्या व्यक्तीने त्याच्याकडे अर्ज केल्यास जिल्हाधिकाऱ्याकडे तेवढ्या रकमेचे प्रमाणपत्र देता येईल आणि जिल्हाधिकारी जमीन महसुलाची थकबाकी जशी वसूल केली जाते त्याच रीतीने ती रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करील. विमाकाराकडून जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे पैशांची वसुली.

**१७५.** कोणत्याही एखाद्या क्षेत्राकरता मागणीहक्क अधिकरण घटित करण्यात आले असेल तर, त्या क्षेत्राच्या मागणीहक्क अधिकरणाला अभिनिर्णित करता येईल असा कोणत्याही भरपाईच्या मागणीसंबंधातील कोणताही प्रश्न विचारार्थ स्वीकारण्यास कोणत्याही दिवाणी न्यायालयाला अधिकारिता असणार नाही, आणि भरपाईच्या मागणीसंबंधी मागणीहक्क अधिकरणाने किंवा त्याच्यासमोर केलेल्या किंवा करावयाच्या कोणत्याही कारवाईबाबत दिवाणी न्यायालय कोणताही व्यादेश देणार नाही. दिवाणी न्यायालयाच्या अधिकारितेस आडकाठी.

**१७६.** राज्य शासनाला कलमे १६५ ते १७४ यांच्या उपबंधाची अंमलबजावणी करण्यासाठी नियम करता येतील आणि विशेषत: अशा नियमांत पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येतील, त्या अशा— नियम करण्याची राज्य शासनाची शक्ती.

(क) भरपाईच्या मागण्यांकरता करावयाच्या अर्जाचा नमुना व त्यात अंतर्भूत असेल असा तपशील, आणि अशा अर्जाच्या बाबतीत कोणतीही फी द्यावी लागत असल्यास फीच्या रकमा ;

(ख) या प्रकरणाखाली चौकशी करताना मागणीहक्क अधिकरणाने अनुसरावयाची कार्यपद्धती;

(ग) मागणीहक्क अधिकरणाला वापरता येतील अशा, दिवाणी न्यायालयामध्ये निहित असलेल्या शक्ती;

(घ) मागणीहक्क अधिकरणाच्या निवाड्याविरुद्ध कोणत्या नमुन्यात व कशा रीतीने आणि किती फी (काही असल्यास) भरल्यावर अपील दाखल करता येईल; आणि

(ङ) विहित करावयाची किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

## प्रकरण तेरा

### अपराध, शास्ती व कार्यपद्धती

१७७. जो कोणी या अधिनियमांच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या, विनियमाच्या किंवा अधिसूचनेच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करील तो, अशा अपराधाबद्दल अन्य कोणत्याही शास्तीचा उपबंध केलेला नसल्यास, पहिल्या अपराधासाठी शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास आणि कोणत्याही दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधाकरता तीनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल. अपराधाबद्दल शास्ती लादण्यासाठी सर्वसाधारण उपबंध.

पास किंवा तिकीट याविना प्रवास करण्याबद्दल आणि वाहकाकडून कर्तव्यच्युती झाल्याबद्दल आणि संविदा गाडी इत्यादी चालविण्यास नकार देण्याबद्दल शास्ती.

१७८. (१) जो कोणी योग्य पास किंवा तिकीट याविना एखाद्या टप्पेगाडीमधून प्रवास करील किंवा एखाद्या टप्पेगाडीमध्ये असताना किंवा त्यामधून उतरल्यावर पास किंवा तिकिटाची मागणी करण्यात आली असता तात्काळ स्वत:चा पास किंवा तिकीट तपासणीसाठी सादर करण्यात किंवा ते सुपूर्द करण्यात कसूर करील किंवा तसे करण्याचे नाकारील तो पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

स्पष्टीकरण.—या कलमात "पास" व "तिकीट" यांना कलम १२४ मध्ये नेमून दिल्याप्रमाणे अनुक्रमे ते ते अर्थ असतील.

(२) जर एखाद्या टप्पेगाडीचा वाहक किंवा टप्पेगाडीचा चालक हा अशा टप्पेगाडीमध्ये वाहकाची कामे पार पाडत असेल त्याबाबतीत, अशा वाहकाने —

(क) टप्पेगाडीमधून प्रवास करणाऱ्या व्यक्तीला, तिने प्रवासभाडे दिल्यानंतर तिकीट देणे हे त्याचे कर्तव्य असून तो बुद्धिपुरस्सर किंवा हलगर्जीपणामुळे, —

(एक) प्रवासभाडे देऊ करण्यात आले असताना ते घेण्यात कसूर करील किंवा घेण्याचे नाकारील, किंवा

(दोन) तिकीटे देण्यात कसूर करील किंवा देण्याचे नाकारील, किंवा

(तीन) अवैध तिकीट पुरवील, किंवा

(चार) कमी किंमतीचे तिकीट देईल, किंवा

(ख) कोणताही पास किंवा तिकीट तपासणे याकामी एकतर बुद्धिपुरस्पर किंवा हलगर्जी-पणामुळे कसूर करील किंवा तसे करण्याचे नाकारील तर, तो पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल.

(३) जर एखादा परवानाधारक किंवा संविदा गाडीचा चालक, या अधिनियमाच्या किंवा त्या-खाली केलेल्या नियमांच्या उपबंधांचे व्यतिक्रमण करून, कंत्राटी गाडी चालविण्यास किंवा उतारूंची ने-आण करण्यास नकार देईल तर तो—

(क) दोन चाकी किंवा तीन चाकी मोटार वाहनांच्याबाबतीत, पन्नास रुपयांपर्यन्त असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल ; आणि

(ख) इतर कोणत्याही बाबतीत, तो दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल.

आदेशांची अवज्ञा करणे, अटकाव करणे व माहिती नाकारणे.

१७९. (१) जो कोणी, एखादा निदेश देण्याची शक्ती प्रदान झालेल्या कोणत्याही व्यक्तीने किंवा प्राधिकरणाने कायदेशीरपणे दिलेल्या कोणत्याही निदेशाची, या अधिनियमाखाली अवज्ञा करील, अथवा या अधिनियमाखाली अशा व्यक्तीला किंवा प्राधिकरणाला जी कार्ये पार पाडावी लागतात किंवा जी कार्ये करण्याची शक्ती प्रदान झालेली आहे अशी कोणतीही कार्ये पार पाडताना त्यांना अटकाव करील तो, अशा अपराधाबद्दल अन्य कोणत्याही शास्तीचा उपबंध केलेला नसल्यास, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र ठरेल.

(२) या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली कोणतीही माहिती पुरवण्यास फर्माविण्यात आले असता जो कोणी अशी माहिती अडवून ठेवील, किंवा जी खोटी असल्याचे स्वत:स माहीत आहे किंवा जी खरी आहे असे स्वत: समजत नाही अशी माहिती देईल तो, अशा अपराधाबद्दल अन्य कोणत्याही शास्तीचा उपबंध केलेला नसल्यास, एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या कारावासास किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा या दोन्ही शिक्षास पात्र होईल.

अनधिकृत व्यक्तींना वाहने चालविण्यास मुभा देणे.

१८०. मोटार वाहनाचा मालक किंवा ताबाधारक असेल असा जो कोणी कलम ३ किंवा कलम ४ च्या उपबंधांची पूर्ती न करणाऱ्या अशा कोणत्याही इतर व्यक्तीस वाहन चालवावयास लावील किंवा तशी मुभा देईल तो, तीन महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या कारावासास किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

कलम ३ किंवा कलम ४ चे व्यतिक्रमण करून वाहने चालविणे.

१८१. जो कोणी, कलम ३ किंवा कलम ४ चे व्यतिक्रमण करून मोटार वाहन चालवील तो तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

लायसनासंबंधीचे अपराध.

१८२. (१) जो कोणी चालन लायसन धारण करण्यास किंवा मिळवण्यास या अधिनियमाखाली निरर्ह असून, सार्वजनिक स्थळी किंवा अन्य कोणत्याही ठिकाणी मोटार वाहन चालवील किंवा चालन लायसन मिळण्याकरता अर्ज करील किंवा ते मिळवील किंवा पृष्ठांकनरहित असे चालन लायसन मिळण्यास हक्कदार नसताना आपण आधी धारण केलेल्या चालन लायसनावर असलेले पृष्ठांकन उघड केल्याविना चालन लायसन मिळवील अशी व्यक्ती, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासास किंवा पाचशे-रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल आणि त्याने याप्रमाणे मिळवलेले कोणतेही चालन लायसन परिणामक असणार नाही.

(२) जो कोणी, वाहक लायसन धारण करण्यास किंवा मिळवण्यास या अधिनियमाखाली निरर्ह असून सार्वजनिक स्थळी टप्पेगाडीचा वाहक म्हणून काम करील किंवा वाहक लायसन मिळण्याकरता अर्ज करील किंवा ते मिळवील अथवा पृष्ठांकनरहित असे वाहक लायसन मिळण्यास हक्कदार नसताना, आपण आधी धारण केलेल्या वाहक लायसनावर असलेले पृष्ठांकन उघड केल्याविना वाहक लायसन मिळण्यासाठी अर्ज करील किंवा ते मिळवील तर तो, एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल आणि त्याने याप्रमाणे मिळविलेले कोणतेही वाहक लायसन परिणामक असणार नाही.

[1][१८२क. कलम १०९, पोटकलम (३) च्या उपबंधाचे व्यतिक्रमण करणारी कोणतीही व्यक्ती, पहिल्या अपराधाबद्दल रुपये एक हजार एवढ्या द्रव्यदंडाच्या आणि त्यानंतरच्या कोणत्याही अपराधाबद्दल रुपये पाच हजार एवढ्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल.]

**वाहनांची बांधणी व देखभाल या संबंधांच्या अपराधांसाठी शिक्षा.**

१८३. (१) कलम ११२ मध्ये निर्देशिलेल्या वेगमर्यादांचे व्यतिक्रमण करून जो मोटार वाहन चालवील तो, चारशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा या पोटकलमाखालील अपराधाबद्दल तो पूर्वी दोषी ठरलेला असून त्यास या पोटकलमाखालील अपराधाबद्दल पुन्हा दोषी ठरवण्यात आले असेल तर, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

**वेगमर्यादेपेक्षा अधिक वेगाने वाहन चालवणे वगैरे.**

(२) जो कोणी, त्याने वाहन चालवण्यासाठी नोकरीस ठेवलेल्या किंवा त्या कामी त्याच्या नियंत्रणात असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, कलम ११२ मध्ये निर्देशिलेल्या वेगमर्यादांचे व्यतिक्रमण करून मोटार वाहन चालविण्यास भाग पाडील तो, तीनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा या पोटकलमाखालील अपराधाबद्दल त्यास पूर्वी दोषी ठरवण्यात आले असून, त्या अधिनियमाखालील अपराधाबद्दल पुन्हा दोषी ठरवण्यात आले तर, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

(३) आपल्या मते एखादी व्यक्ती बेकायदेशीर वेगाने वाहन चालवीत होती अशा आशयाची साक्ष एका साक्षीदाराने दिली असता, काही यांत्रिक साधनांचा वापर करून काढलेल्या अंदाजावर ते मत आधारलेले होते असे दाखवून दिल्याशिवाय, केवळ तेवढ्याच पुराव्यावरून अशा कोणत्याही व्यक्तीला पोटकलम (१) खाली शिक्षापात्र असलेल्या अपराधाबद्दल दोषी ठरवले जाणार नाही.

(४) एखादा प्रवास किंवा प्रवासाचा काही भाग, विनिर्दिष्ट मुदतीत संपावयाचा आहे असे दाखवणारे वेळापत्रक प्रसिद्ध झालेले असून किंवा तो त्याप्रमाणे संपवावा असा निदेश दिलेला असून जर न्यायालयाच्या मते, त्या प्रकरणाच्या परिस्थितीमुळे तो प्रवास किंवा प्रवासाचा भाग कलम ११२ मध्ये निर्देशिलेल्या वेगमर्यादांचे व्यतिक्रमण केल्याशिवाय विनिर्दिष्ट मुदतीत संपवणे शक्य नसेल तर, अशी प्रसिद्धी किंवा निदेश म्हणजेच ज्या व्यक्तीने ते वेळापत्रक प्रसिद्ध केले किंवा तो निदेश दिला त्या व्यक्तीने पोटकलम (२) खाली शिक्षापात्र असलेला अपराध केला असल्याचा प्रथमदर्शनी पुरावा असेल.

१८४. जेथे वाहन चालवण्यात आले त्या जागेचे स्वरूप, स्थिती व उपयोग आणि त्यावेळी जितकी वाहतूक तेथे प्रत्यक्षपणे असेल किंवा असण्याची वाजवी शक्यता असेल ते प्रमाण, यांसह प्रकरणाची सर्व परिस्थिती लक्षात घेता, जनतेस धोकादायक ठरेल अशा वेगाने किंवा अशा रीतीने ज्या व्यक्तीने मोटार वाहन चालवले असेल ती व्यक्ती, पहिल्या अपराधाबद्दल सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासास किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास आणि पूर्वीचा अपराध केल्यापासून तीन वर्षांच्या आत नंतर पुन्हा तसाच अपराध करण्यात आला तर, कोणत्याही दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधाबद्दल, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

**धोकादायकरित्या वाहन चालवणे.**

१८५. जर कोणी मोटार वाहन चालवत असताना किंवा चालविण्याच्या प्रयत्नात असताना—

[2][(क) उच्छ्वासाची तपासणी करणाऱ्याने केलेल्या चाचणीत त्याच्या रक्तात, प्रत्येक १०० मिली. रक्तात ३० मि. ग्रॅ. पेक्षा अधिक अल्कोहोल असल्याचे आढळल्यास.]

(ख) वाहनावर आपले योग्य नियंत्रण ठेवण्यास तो असमर्थ होईल इतपत तो औषधिद्रव्याच्या अंमलाखाली असेल तर, तो पहिल्या अपराधाबद्दल सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्हीही शिक्षांस पात्र होईल आणि दुसरा किंवा त्यानंतर केलेला अपराध, पूर्वीचा असाच अपराध घडल्यापासून तीन वर्षांच्या आत घडला असल्यास तो दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा तीन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

**दारू प्यालेल्या व्यक्तीने किंवा औषधिद्रव्याचा अंमल असणाऱ्या व्यक्तीने वाहन चालवणे.**

---

१ १९९४ चा अधिनियम ५४, कलम ५४ द्वारे कलम '१८२क' समाविष्ट करण्यात आले (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ५५ द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड समाविष्ट करण्यात आला. (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून).

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, केंद्र शासनाने याबाबतीत **शासकीय राजपत्रातील अधिसूचने-**द्वारे विनिर्दिष्ट केलेले अंमली औषधिद्रव्य किंवा अंमली औषधिद्रव्ये ही एखाद्या व्यक्तीस मोटार वाहनावर योग्य नियंत्रण ठेवण्यास असमर्थ करतात असे मानण्यात येईल.

वाहन चालवण्यास मानसिक किंवा शारीरिकदृष्ट्या अपात्र असताना वाहन चालवणे.

१८६. आपण वाहन चालवल्यामुळे लोकांना धोका होण्याची शक्यता आहे अशा कोणत्याही रोगाने किंवा निःसमर्थतेने आपण ग्रस्त असल्याचे माहीत असताना, जी व्यक्ती सार्वजनिक स्थळी मोटार वाहन चालविल ती व्यक्ती, पहिल्या अपराधाबद्दल दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधाबद्दल पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

अपघाताच्या संबंधातील अपराधाबद्दल शिक्षा.

१८७. जी कोणतीही व्यक्ती, कलम १३२, पोटकलम (१), खंड (ग) च्या किंवा कलम १३३ किंवा कलम १३४ च्या उपबंधाचे अनुपालन करण्यात कसूर करील ती व्यक्ती, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस अथवा ती या कलमाखालील अपराधाबद्दल पूर्वी दोषी ठरलेली असून या कलमाखालील अपराधा-बद्दल तिला पुन्हा दोषी ठरवण्यात आले तर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

विवक्षित अपराधांना अपप्रेरणा दिल्या-बद्दल शिक्षा.

१८८. जी कोणतीही व्यक्ती, कलम १८४, कलम १८५ किंवा कलम १८६ खालील अपराध करण्यास अपप्रेरणा देईल ती व्यक्ती त्या अपराधाकरता ज्या शिक्षेचा उपबंध केलेला असेल त्या शिक्षेस पात्र होईल.

शर्यत लावणे आणि वेग अजमावणे.

१८९. जो कोणी, राज्य शासनाच्या लेखी संमतीशिवाय, कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी, कोण-त्याही प्रकारच्या मोटार वाहनांच्या शर्यतीस किंवा वेग अजमावण्यास परवानगी देईल किंवा त्यात भाग घेईल तो एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

असुरक्षित स्थितीतील वाहनाचा उपयोग करणे.

१९०. (१) एखाद्या मोटार वाहनात किंवा अनुयानात कोणताही दोष असून जर एखाद्या व्यक्तीने ते सार्वजनिक ठिकाणी चालवले किंवा चालवावयास लावले किंवा तशी मुभा दिली आणि त्या व्यक्तीला त्या दोषांची जाणीव असून किंवा सर्वसामान्य दक्षता घेता, तो दोष हुडकून काढता येण्यासारखा असून त्या दोषामुळे असे वाहन चालवणे हे अशा जागेचा उपयोग करणाऱ्या व्यक्तींना व वाहनांना धोक्याचे ठरविण्याची शक्यता असेल तर अशी कोणतीही व्यक्ती, दोनशेपन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा अशा दोषाच्या परिणामी जर अपघात घडून कोणालाही शारीरिक इजा किंवा मालमत्तेस नुकसान पोचवले असेल तर, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

(२) जर एखाद्या व्यक्तीने, रस्ता सुरक्षा, आवाजनियंत्रण आणि हवाप्रदूषण यांच्या संबंधातील विहित प्रमाणांचे व्यतिक्रमण करून कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी मोटार वाहन चालवणे किंवा चालवावयास लावले किंवा तशी मुभा दिली तर अशी व्यक्ती, पहिल्या अपराधाबद्दल एक हजार रुपांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास आणि कोणत्याही दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधाबद्दल दोन हजार रुपयांपर्यंतच्या द्रव्यदंडास पात्र असेल.

(३) जर एखाद्या व्यक्तीने, मानवी जीवनाला धोकादायक किंवा जोखमीच्या स्वरूपाच्या वस्तुंची ने-आण करण्याच्या संबंधातील या अधिनियमाचे किंवा त्याखाली तयार करण्यात आलेल्या नियमांच्या उपबंधांचे व्यतिक्रमण करून कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी कोणतेही मोटार वाहन चालवले किंवा चालवा-वयास लावले किंवा तशी मुभा दिली तर अशी कोणतीही व्यक्ती पहिल्या अपराधाबद्दल तीन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा दोन्हीही शिक्षांस आणि कोणत्याही दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधाबद्दल पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

जीमुळे या अधि-नियमाचे व्यति-क्रमण होईल अशा स्थितीत वाहन विकणे किंवा त्यात फरबदल करून ते तशा स्थितीत आणणे.

१९१. जर कोणी मोटार वाहनांचा आयातदार किंवा व्यापारी असून एखादे मोटार वाहन किंवा अनुवाहन, ज्या स्थितीत त्याचा सार्वजनिक ठिकाणी उपयोग केल्यास प्रकरण सात किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम याचे व्यतिक्रमण होण्याची शक्यता आहे अशा स्थितीत ते त्याने विकले किंवा सुपूर्द केले अगर विक्री किंवा सुपूर्दगी करण्याची तयारी दाखविली तर किंवा त्या मोटार वाहनाचा किंवा अनुवाहनाचा ज्या स्थितीत सार्वजनिक ठिकाणी उपयोग केल्यास प्रकरण सात किंवा त्याखाली केलेल्या कोणताही नियम याचे व्यतिक्रमण होण्याची शक्यता आहे अशा प्रकारे त्यात फेरबदल करून त्या स्थितीत त्याने ते आणले तर, तो पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल :

परंतु, ज्या स्थितीत ते वाहन कायदेशीरपणे वापरता आले असते त्या स्थितीत ते आणले जाईपर्यंत ते सार्वजनिक ठिकाणी वापरले जाणार नाही असे समजण्यास स्वतःला वाजवी कारण होते असे जर एखाद्या व्यक्तीने शाबीत केले तर तिला या कलमाखाली सिद्धदोष ठरवले जाणार नाही.

**नोंदणी न करता वाहनाचा उपयोग करणे.**

१९२. [1][(१) जो कोणी, कलम ३९ च्या उपबंधाचे व्यतिक्रमणाकरून, मोटार वाहन चालविल किंवा मोटारवाहन चालवायला लावील किंवा चालवू देईल त्याला पहिल्या अपराधाबद्दल पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल, परंतु, दोन हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही इतक्या द्रव्यदंडास आणि दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपराधाबद्दल एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कारावासाच्या किंवा दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल, परंतु, पाच हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही इतक्या द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही शिक्षांस, पात्र असेल :

परंतु, न्यायालय, कारणे लेखी नमूद करून कमीत कमी शिक्षा ठोठावू शकेल.

(२) निकडीच्या प्रसंगी, आजारी पडलेल्या किंवा इजा झालेल्या व्यक्तींना नेण्यासाठी किंवा आपत्तीच्या वेळी मदत करण्यासाठी दुरुस्तीची सामग्री वाहून नेण्यासाठी किंवा आपत्तीच्या वेळी मदत करण्यासाठी वैद्यकीय पुरवठ्याची सामग्री वाहून नेण्यासाठी मोटार वाहनाचा उपयोग केल्यास अशा वाहनाला या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही :

परंतु, वाहनाचा उपयोग करणाऱ्या व्यक्तीने असा उपयोग केल्याबद्दल अशा उपयोगाच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाला कळवले पाहिजे.

(३) ज्या दोषसिद्धीच्या संबंधात असा आदेश देण्यात आला होता तिच्या विरुद्ध अपील होऊ शकत नसले तरी पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही स्वरुपाच्या अपराधाबद्दल कोणत्याही दोषसिद्धीसंबंधात ज्या न्यायालयाकडे अपील करता येते ते न्यायालय खालच्या न्यायालयाने दिलेल्या कोणताही आदेश रद्द करू शकेल किंवा त्यात फेरबदल करू शकेल.

**परवान्याशिवाय वाहनाचा वापर करणे.**

१९२क. (१) जो कोणी, कलम ६६, पोटकलम (१) च्या उपबंधाचे व्यतिक्रमण करून किंवा ते वाहन ज्या मार्गावर किंवा क्षेत्रात किंवा ज्या प्रयोजनासाठी वापरण्यात यणार असेल त्याच्याशी संबंधित असलेल्या परवान्यातील कोणत्याही शर्तीचे व्यतिक्रमण करून एखादे मोटारवाहन चालवेल किंवा तशी अनुज्ञा देईल तो, पहिल्या अपराधाबद्दल पाच हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल. परंतु, दोन हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही इतक्या द्रव्यदंडाच्या आणि तद्नंतरच्या कोणत्याही अपराधांसाठी एक वर्षापर्यंत वाढवता येईल, परंतु. तीन महिन्यापेक्षा कमी नसेल इतक्या कारावासाच्या किंवा दहा हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल. परंतु, पाच हजार रुपयांपेक्षा कमी नसेल अशा द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल :

परंतु, न्यायालय, कारणे लेखी नमूद करून कमीत कमी शिक्षा ठोठावू शकेल.

(२) निकडीच्या प्रसंगी आजारी पडलेल्या किंवा इजा झालेल्या व्यक्तींना नेण्यासाठी किंवा आपत्तीच्या वेळी मदत करण्यासाठी अन्न किंवा सामग्री वाहून नेण्यासाठी किंवा दुरुस्तीची सामग्री वाहून नेण्यासाठी किंवा तशाच प्रयोजनासाठी वैद्यकीय पुरवठ्याची सामग्री वाहून नेण्यासाठी मोटार वाहनाचा उपयोग केल्यास अशा वाहनाला या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही :

परंतु, वाहनाचा असा उपयोग करणाऱ्या व्यक्तीने, असा उपयोग केल्याबद्दल अशा उपयोगाच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत प्रादेशिक परिवहन प्राधिकरणास कळवले असले पाहिजे.

(३) ज्या दोषसिद्धीच्या संबंधात असा आदेश देण्यात आला होता तिच्या विरुद्ध अपील होऊ शकत नसले तरी पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही स्वरुपाच्या अपराधाबद्दल दोषी ठरवल्यास, त्यावर ज्या न्यायालयाकडे अपील करता येईल ते न्यायालय खालच्या न्यायालयान दिलेला कोणताही आदेश रद्द करू शकेल किंवा त्यात फरबदल करू शकेल.]

**योग्य प्राधिकाराविना काम करणाऱ्या एजंटांना व प्रचारकांना शिक्षा.**

१९३. जो कोणी, कलम ९३ च्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांच्या उपबंधांचे व्यतिक्रमण करून स्वत: एजंट किंवा प्रचारक म्हणून काम करील, तो पहिल्या अपराधाबद्दल एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास आणि कोणत्याही दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपराधाबद्दल सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासास किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

**अनुज्ञेय वजनाहून अधिक वजन लादून वाहन चालवणे.**

१९४. [2][(१) जो कोणी, कलम ११३ किंवा कलम ११४ किंवा कलम ११५ याच्या उपबंधाचे व्यतिक्रमण करून मोटार वाहन चालविल किंवा मोटार वाहन चालवावयास लावील किंवा चालवू देईल तो, कमीत कमी दोन हजार रुपयांच्या द्रव्यदंडास आणि अधिक असलेले वजन खाली उतरवण्याचा खर्च भरण्याच्या दायित्वासह अधिक वजनाच्या प्रत्येक टनामागे एक हजार रुपयांइतका दंड भरण्याच्या शिक्षेस पात्र ठरेल.]

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम ५६ द्वारे मूळ कलम '१९२' ऐवजी ही कलमे समाविष्ट करण्यात आली (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ५७ द्वारे पोटकलम (१) ऐवजी हे पोटकलम घालण्यात आले (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून).

(२) वाहनाचा कोणताही चालक वाहन थांबविण्यास आणि कलम ११४ खाली याबाबत प्राधिकृत असलेल्या अधिकाऱ्यांकडून तसे करण्याचे निदेश दिल्यानंतरही तो वाहन वजन करण्यासाठी सादर करण्यास नकार देईल किंवा असे वजन करण्यापूर्वी भरलेला माल किंवा त्यातील काही भाग हलविल किंवा हलविण्यास लावील तर तो वाहन चालक तीन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

**विवक्षित परिस्थितीत किमान द्रव्य दंड बसवणे.** १९५. (१) या अधिनियमाखाली किंवा त्याखाली तयार केलेल्या नियमांखाली एखाद्या अपराधाबद्दल सिद्धदोष ठरवण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीने तीन वर्षांच्या आत दुसऱ्या किंवा लागोपाठच्या प्रसंगी पूर्वीसारखाच अपराध केल्यास कोणतेही न्यायालय, अशा अपराधाबद्दल लादावयाच्या कमाल द्रव्यदंडाच्या रकमेच्या एक चतुर्थांशाहून कमी द्रव्यदंड लादणार नाही. मात्र, अपवाद करावयाचा असल्यास त्याबद्दलची कारणे लेखी नमूद करावी लागतील.

(२) एखाद्या प्रकरणाच्या परिस्थितीमध्ये स्वतःला आवश्यक वाटेल त्याप्रमाणे परंतु या अधिनियमात त्या अपराधाच्या संबंधात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कमाल मर्यादेपेक्षा अधिक असणार नाही इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा देण्याची न्यायालयाला जी शक्ती आहे ती पोटकलम (१) मधील कोणत्याही गोष्टींमुळे निर्बंधित होईल असा तिचा अर्थ लावण्यात येणार नाही.

**विमा न उतरवलेले वाहन चालवणे.** १९६. जो कोणी, कलम १४६ च्या उपबंधांचे व्यतिक्रमण करुन, मोटार वाहन चालविल किंवा चालवावयास लावील किंवा तशी मुभा देईल तो तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासास किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

**प्राधिकाराविना वाहन घेऊन जाणे.** १९७. (१) जो कोणी, कोणतेही मोटार वाहन, त्याच्या मालकाची संमती किंवा अन्य कायदेशीर प्राधिकार असल्याशिवाय, ताब्यात घेईल आणि चालविल तो तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासास किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल :

परंतु, जर आपणांस कायदेशीर प्राधिकार आहे अशा वाजवी समजुतीने किंवा मालकाची संमती मागण्यात आली असती तर, त्या प्रकरणाच्या परिस्थितीत त्याने ती दिली असती अशा वाजवी समजुतीने आरोपी वागला अशी जर न्यायालयाची खात्री झाली तर, अशा कोणत्याही आरोपी व्यक्तीस या कलमाखाली दोषी ठरवण्यात येणार नाही.

(२) जो कोणी, बेकायदेशीरपणे बळजबरीने धमकी देऊन किंवा धाकदपटशाच्या कोणत्याही मार्गाने मोटार वाहन ताब्यात घेईल किंवा त्यावर नियंत्रण ठेवील तो तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासास किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्हीही शिक्षांस पात्र होईल.

(३) जी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही मोटार वाहनाच्या संबंधात पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेली कृती करण्याचा प्रयत्न करील किंवा अशी कोणतीही कृती करण्यास अपप्रेरणा देईल, त्या व्यक्तीने पोटकलम (१) किंवा, प्रकरणपरत्वे, पोटकलम (२) खाली अपराध केला असल्याचे मानण्यात येईल.

**वाहनांच्या संबंधात विनाप्राधिकार ढवळाढवळ.** १९८. जो कोणी, कायदेशीर प्राधिकार किंवा वाजवी सबबी नसताना अन्यथा कोणत्याही स्थिर मोटार वाहनात प्रवेश करील किंवा त्यावर चढेल किंवा मोटार वाहनाचा ब्रेक किंवा त्याच्या यंत्ररचनेतील कोणताही भाग यामध्ये गैरफेर करील तो, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

**कंपन्यांनी केलेले अपराध.** १९९. (१) जेव्हा एखाद्या कंपनीने या अधिनियमाखाली एखादा अपराध केला असेल तेव्हा, असा अपराध घडला त्यावेळी, जी व्यक्ती कंपनीच्या कामकाज चालनाबद्दल कंपनीची प्रभारी होती व तिला जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती व त्याचबरोबर ती कंपनीही व्यतिक्रमणाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल व त्यांच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा मिळण्यास त्या पात्र असतील :

परंतु, अपराध आपल्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये म्हणून आपण सर्वप्रकारे यथायोग्य तत्परता दाखवली होती असे जर कोणत्याही व्यक्तीने शाबीत केले, तर ती या पोटकलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, या अधिनियमात उपबंधित केलेल्या कोणत्याही शिक्षेस पात्र होणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल आणि असा अपराध कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी यांच्या संमतीने किंवा मूकानुमतीने करण्यात आला होता किंवा त्याच्याकडून झालेल्या कोणत्याही हलगर्जीपणाशी त्या अपराधाचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे असे शाबीत करण्यात आले तर, त्या अपराधाबद्दल असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी हा देखील दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा मिळण्यास तो पात्र असेल.

स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनांसाठी,—

(क) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगम-निकाय, असा आहे आणि त्यात पेढी किंवा व्यक्तिसंघ यांचा समावेश आहे; आणि

(ख) "संचालक" याचा पेढीच्या संबंधातील अर्थ, पेढीतील भागीदार, असा आहे.

२००. (१) जर कलम १७७, कलम १७८, कलम १७९, कलम १८०, कलम १८१, कलम १८२, कलम १८३ चे पोटकलम (१) किंवा पोटकलम (२), कलम १८४, कलम १८६, कलम १८९, [1][कलम १९० चे पोटकलम (२)] कलम १९१, कलम १९२, कलम १९४, कलम १९६ किंवा कलम १९८ खाली, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा त्यानंतर कोणताही शिक्षापात्र अपराध घडला असेल तर, त्यावर खटला भरण्यात येण्यापूर्वी किंवा त्यानंतर, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे याबाबत विनिर्दिष्ट करील असे अधिकारी किंवा प्राधिकारी आणि अशा रकमेवर, तो अपराध आपसात मिटवू शकतील. विवक्षित अपराधांमध्ये आपसाती करण.

(२) जेव्हा पोटकलम (१) खाली अपराधात आपसाती करण्यात आली असेल तेव्हा, जर अपराधी अभिरक्षेत असेल तर, त्याला विमुक्त करण्यात येईल आणि अशा अपराधाच्या संबंधात त्याच्या विरुद्ध आणखी कोणतीही कार्यवाही हाती घेण्यात येणार नाही.

२०१. (१) जो कोणी, कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी, कोणतेही नादुरुस्त वाहन, सुरळीत वाहतुकीस प्रत्यवाय होईल अशा रीतीने उभे करील तो, ते वाहन त्या स्थितीत जोपर्यंत राहील त्या वेळात दर तासाला पन्नास रुपयांपर्यंतच्या शास्तीस पात्र ठरेल : सुरळीत वाहतुकीस अडथळा निर्माण करण्याच्या कारणासाठी शास्ती.

परंतु, अपघात झालेली वाहने, कायद्याखालील निरीक्षण उपचारांची पूर्तता झाल्यानंतरच्या वेळेपासूनच फक्त शास्तीसाठी पात्र ठरतील.

[2][परंतु आणखी असे की, ते वाहन सरकारी एजन्सीद्वारे हलविण्यात आले असेल तेव्हा ते खेचून नेण्याचा खर्च वाहनाच्या मालकाकडून किंवा असे वाहन ज्याच्या ताब्यात असेल त्या व्यक्तीकडून वसूल करण्यात येईल.]

[3][(२) या कलमाखालील शास्ती किंवा खेचून नेण्याचा खर्च राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे प्राधिकृत करू शकेल अशा अधिकाऱ्याकडून किंवा प्राधिकाऱ्याकडून वसूल करण्यात येईल.]

२०२. (१) वर्दीधारी पोलीस अधिकारी, त्याच्या उपस्थितीत ज्या व्यक्तीने कलम १८४ किंवा कलम १८५ किंवा कलम १९७ खाली शिक्षापात्र असलेला अपराध केला असेल अशा कोणत्याही व्यक्तीस वॉरंटविना अटक करू शकेल : वॉरंटविना अटक करण्याची शक्ती.

परंतु, कलम १८५ खाली शिक्षापात्र असलेल्या अपराधासंबंधात अशा प्रकारे अटक करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीची, तिला अटक करण्यात आल्यापासून दोन तासांच्या आत, नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीकडून, कलम २०३ आणि कलम २०४ मध्ये निर्देशिलेली वैद्यकीय तपासणी करण्यात येईल आणि अशी तपासणी करण्यात न आल्यास अभिरक्षेतून तिची मुक्तता करण्यात येईल.

[4][(२) वर्दीधारी पोलीस अधिकारी जिने या अधिनियमाखालील अपराध केला आहे, अशा कोणत्याही व्यक्तीला जिने जिचे नाव व पत्ता देण्यास नकार दिल्यास, वॉरंटाशिवाय अटक करू शकेल.]

(३) मोटार वाहनाच्या चालकास वॉरंटाविना अटक करणारा पोलीस अधिकारी, त्या परिस्थितीत तसे आवश्यक असेल तर, वाहनाची तात्पुरती व्यवस्था करण्यासाठी योग्य वाटेल अशी कोणतीही उपाययोजना करील किंवा करवील.

२०३. [5][(१) कोणतीही व्यक्ती, सार्वजनिक ठिकाणी मोटार वाहन चालवत असताना किंवा चालवण्याच्या प्रयत्नात असताना, कोणत्याही वर्दीधारी पोलीस अधिकाऱ्याला किंवा मोटार वाहन, विभागाने यासंबंधात प्राधिकृत केलेल्या, विभागातील प्राधिकाऱ्याला त्या व्यक्तीने कलम १८५ खाली अपराध केल्याचा संशय घेण्यास कोणतेही वाजवी कारण असेल तर असा अधिकारी, त्या व्यक्तीला उच्छवासाच्या चाचणीसाठी तेथल्या तेथे किंवा जवळपास त्याच्या उच्छवासाचे एक किंवा अधिक नमुने द्यावयास लावील : उच्छवासाच्या चाचण्या

परंतु, असा अपराध घडल्यानंतर, वाजवी रीत्या व्यवहार्य होईल तितक्या लवकर, उच्छवासाची चाचणी (ती करण्यात आली नसल्यास) करणे आवश्यक असेल.]

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम ५८ द्वारे मूळ अधिनियमातील कलम २००(१) मधील "कलम १८९" या शब्दाऐवजी हे शब्द घालण्यात आले (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ५९ (क) द्वारे मूळ अधिनियमातील कलम २०१ च्या पोटकलम (१) मध्ये मूळ परंतुकानंतर हे परंतुक घालण्यात आले (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ५९ (ख) द्वारे मूळ अधिनियमातील कलम २०२ च्या पोटकलम (२) ऐवजी घालण्यात आले (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ६० द्वारे मूळ अधिनियमातील कलम २०२ च्या पोटकलम (२) ऐवजी घालण्यात आले (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम ६१ द्वारे मूळ अधिनियमातील कलम २०३ च्या पोटकलम (१) ऐवजी घालण्यात आले (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(२) जर एखादे मोटार वाहन सार्वजनिक ठिकाणी अपघातात सापडले असेल आणि अपघाताच्या वेळी मोटार वाहन चालवत असलेल्या किंवा चालवण्याच्या प्रयत्नात असलेल्या व्यक्तीच्या रक्तामध्ये किंवा ती व्यक्ती, कलम १८५ मध्ये निर्देशित केलेल्या औषधिद्रव्याच्या नशेत वाहन चालवीत होती असा संशय घेण्यास वर्दीधारी पोलीस अधिकाऱ्याला कोणतेही वाजवी कारण असेल तर, तो अधिकारी मोटार वाहन अशा तऱ्हेने चालविणाऱ्या व्यक्तीला उच्छवासाच्या चाचणीसाठी पुढील ठिकाणी तिच्या उच्छवासाचा नमुना देण्यास भाग पाडू शकेल, ते असे,—

(क) ती व्यक्ती रुग्णालयातील आंतररुग्ण असल्यास, रुग्णालयात ;

(ख) अन्य कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, ज्या ठिकाणी असा नमुना देण्याबाबत फर्माविण्यात येईल त्या ठिकाणी अथवा त्या ठिकाणाच्या जवळपास किंवा पोलीस अधिकाऱ्याला योग्य वाटल्यास तो पोलीस अधिकारी विनिर्दिष्ट करील अशा पोलीस ठाण्यावर :

परंतु, ती व्यक्ती रुग्णालयामध्ये आंतररुग्ण म्हणून दाखल झालेली असताना, तो रुग्ण प्रत्यक्षपणे ज्याच्या ताब्यात असेल त्या नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीला, त्या रुग्णास नमुना देण्याबाबत फर्माविण्यात आल्याचे प्रथम कळवण्यात आलेले नसल्यास अथवा तो नमुना पुरवण्यामुळे किंवा पुरवण्यास फर्माविल्यामुळे रुग्णांची नीट देखभाल करण्याच्या किंवा त्याच्यावर योग्य उपचार करण्याच्या कामी बाध येईल या कारणास्तव त्या वैद्यक व्यवसायीने नमुना पुरवण्याला हरकत घेतल्यास, त्या रुग्णाला असा नमुना देण्याबाबत फर्माविले जाणार नाही.

(३) जर एखाद्या वर्दीधारी पोलीस अधिकाऱ्याने पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) खाली कोणत्याही व्यक्तीची जी उच्छवासाची चाचणी घेतली असेल त्या चाचणीअंती त्या पोलीस अधिकाऱ्याला ज्या साधनानिशी अशी चाचणी घेतली ते साधन त्या व्यक्तीच्या रक्तामध्ये अल्कोहोल असल्याचे दर्शवते असे आढळून आले तर, ती व्यक्ती, रुग्णालयात आंतररुग्ण मधून दाखल झाल्याचा अपवाद सोडून एरव्ही तो पोलीस अधिकारी तिला वॉरंटविना अटक करू शकेल.

(४) जर एखाद्या व्यक्तीला पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) खाली उच्छवासाच्या चाचणीसाठी उच्छवासाचा नमुना पुरवण्यास फर्माविले असताना तिने तसे करण्यास नकार दिला किंवा ती तसे करण्यास चुकली आणि तिच्या रक्तामध्ये अल्कोहोल असल्याचा संशय घेण्यास पोलीस अधिकाऱ्याला वाजवी कारण असेल तर, ती व्यक्ती रुग्णालयात आंतररुग्ण म्हणून दाखल झाल्याचा अपवाद सोडून एरव्ही, तो पोलीस अधिकारी तिला वॉरंटाविना अटक करू शकेल.

(५) या कलमाखाली अटक केलेल्या व्यक्तीला ती पोलीस ठाण्यावर असताना तेथे उच्छवासाच्या चाचणीसाठी उच्छवासाचा नमुना पुरविण्याची संधी दिली जाईल.

(६) या कलमाच्या उपबंधानुसार केलेल्या उच्छवासाच्या चाचणीचे निष्कर्ष पुराव्यामध्ये ग्राह्य असतील.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ उच्छवासाची चाचणी याचा अर्थ, एखाद्या व्यक्तीच्या रक्तामध्ये अल्कोहोल आहे किंवा काय हे समजण्यासाठी केंद्र शासनाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अशा चाचणीसाठी मान्य केलेल्या प्रकारच्या साधनांच्या सहाय्याने त्या व्यक्तीने पुरवलेल्या उच्छवासाच्या एका किंवा अधिक नमुन्यांची घेतलेली चाचणी, असा आहे.

प्रयोगशालेय चाचणी. २०४. (१) कलम २०३ खाली अटक केलेल्या व्यक्तीच्या बाबतीत जर, –

(क) अशा व्यक्तींच्या संबंधात ज्या साधनाद्वारे उच्छवासाची चाचणी घेतली गेली आहे ते साधन अशा व्यक्तीच्या रक्तात अल्कोहोल असल्याचे दर्शवते असे पोलीस अधिकाऱ्याला आढळून आले तर, किंवा

(ख) उच्छवासाची चाचणी देण्याची संधी दिलेली असताना अशा व्यक्तीने ते नाकारली असेल, तसे करण्याचे टाळले असेल किंवा ती तसे करण्यास चुकली असेल तर, आस पोलीस अधिकारी, त्या व्यक्तीला ती पोलीस ठाण्यावर असताना, त्याने हजर केलेल्या अशा नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायीकडे तिच्या रक्ताचा नमुना प्रयोगशालेय चाचणीसाठी देण्यास फर्मावू शकेल :

परंतु, नमुना पुरवण्यास फर्माविण्यात आलेली व्यक्ती स्त्री असेल आणि अशा पोलीस अधिकाऱ्याने हजर केलेला नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायी हा पुरुष असेल तर, तो नमुना एखाद्या स्त्रीच्या उपस्थितीत घेतला जाईल मग ती स्त्री वैद्यकीय व्यवसायी असो किंवा नसो.

(२) एखादी व्यक्ती आंतररुग्ण म्हणून दाखल झालेली असताना, —

(क) अशा व्यक्तीच्या उच्छवासासंबंधात घेतलेली चाचणी ज्या साधनाद्वारे घेतली ते साधन अशा व्यक्तीच्या रक्तामागे अल्कोहोल असल्याचे दर्शवते असे जर पोलीस अधिकाऱ्याला आढळून आले तर, किंवा

(ख) अशा व्यक्तीला उच्छवासाच्या चाचणीसाठी रुग्णालयात किंवा अन्यत्र उच्छवासाचा नमुना पुरवण्यास फर्माविले असताना, त्या व्यक्तीने त्यास नकार दिला असेल, ते टाळले असेल किंवा ती तसे करण्यास चुकली असेल आणि तिच्या रक्तामध्ये अल्कोहोल असल्याबद्दल संशय घेण्यास पोलीस अधिकाऱ्याला वाजवी कारण असेल तर, तो पोलीस अधिकारी त्या व्यक्तीला प्रयोगशालेय चाचणीसाठी तिच्या रक्ताचा नमुना पुरविण्यास फर्मावू शकेल :

परंतु, तो रुग्ण प्रत्यक्षपणे ज्याच्या ताब्यात असेल त्या नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीला, असा नमुना पुरविण्याचा प्रस्ताव प्रथम कळविण्यात आलेला नसल्यास अथवा तो नमुना पुरवण्यामुळे किंवा पुरवण्यास फर्मावल्यामुळे रुग्णांची नीट देखभाल करण्याच्या किंवा त्याच्यावर योग्य उपचार करण्याच्या कामी बाध येईल या कारणास्तव त्या वैद्यक व्यवसायीने नमुना पुरविण्यास हरकत घेतल्यास, या पोटकलमाखाली त्या व्यक्तीला प्रयोगशालेय चाचणीसाठी तिच्या रक्ताचा नमुना पुरवण्यास फर्मावण्यात येणार नाही.

(३) या कलमानुसार केलेल्या प्रयोगशालेय चाचणीचे निष्कर्ष पुराव्यामध्ये ग्राह्य असतील.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, "प्रयोगशालेय चाचणी" याचा अर्थ, केंद्र शासनाने किंवा राज्य शासनाने स्थापन केलेल्या, चालवलेल्या किंवा मान्यता दिलेल्या प्रयोगशाळेत रक्ताच्या नमुन्याचे पृथक्करण करणे, असा आहे.

वाहन चालवण्याच्या अपात्रतेबाबतचे गृहीतक.

२०५. कलम १८५ खाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाबाबतच्या कार्यवाहीमध्ये, एखाद्या पोलीस अधिकाऱ्याने, जर आरोपीला केव्हातरी तशी विनंती केली असता त्याने उच्छ्वासाच्या चाचणीसाठी उच्छ्वासाचा नमुना घेतला जाण्यास अथवा प्रयोगशालेय चाचणीसाठी त्याच्या रक्ताचा नमुना पुरवण्यास संमती देण्याचे नाकारले होते, टाळले होते किंवा त्याला संमती देण्यास तो चुकला होता असे शाबीत केले तर, त्याचा नकार, टाळाटाळ किंवा कसूर याबद्दल वाजवी कारण दाखवण्यात न आल्यास ती वस्तुस्थिती म्हणजे त्या वेळच्या त्याच्या स्थितीबाबत फिर्यादी पक्षाच्यावतीने देण्यात आलेल्या कोणत्याही पुराव्याला पुष्टी देणारी किंवा बचाव पक्षाच्या वतीने देण्यात आलेल्या कोणत्याही पुराव्याचे खंडन करणारी परिस्थिती होय, असे गृहीत धरले जाईल.

दस्तऐवज अडकवून ठेवण्याची पोलीस अधिकाऱ्याची शक्ती.

२०६. (१) राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला किंवा अन्य व्यक्तीला, मोटार वाहनावरील कोणतेही ओळखचिन्ह किंवा मोटार वाहनाच्या चालकाने किंवा त्यांच्या ताबाधारक व्यक्तीने त्यांच्याकडे सादर केलेले कोणतेही लायसन, परवाना, नोंदणी प्रमाणपत्र, विमा प्रमाणपत्र किंवा अन्य दस्तऐवज हा भारतीय दंड संहिता, १८६० (१८६० चा ४५) याच्या कलम ४६४ च्या अर्थानुसार खोटा दस्तऐवज आहे असे समजण्यास कारण असेल तर, तो पोलीस अधिकारी किंवा ती व्यक्ती ते चिन्ह किंवा दस्तऐवज सक्तीने ताब्यात घेऊ शकेल आणि वाहनाच्या चालकाला किंवा मालकाला, तसे चिन्ह किंवा दस्तऐवज त्याच्या कब्जात कसे आले किंवा ते मोटार वाहनात कसे आले याविषयी खुलासा करण्यास फर्मावू शकेल.

(२) राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला किंवा अन्य व्यक्तीला ज्याच्यावर या अधिनियमाखालील, अपराध केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. असा मोटार वाहनाचा चालक फरारी होण्याची किंवा अन्यथा समन्सची बजावणी चुकवण्याची शक्यता आहे असे वाटत असेल तर, त्याला अशा चालकाने धारण केलेले कोणतेही लायसन सक्तीने ताब्यात घेता येईल व अपराधाची दखल घेणाऱ्या न्यायालयाकडे ते पाठविता येईल आणि उक्त न्यायालय असा चालक त्याच्या पुढे प्रथम उपस्थित झाल्यावर पोटकलम (३) खाली दिलेल्या तात्पुरत्या अभिस्वीकृतीच्या बदल्यात लायसन त्याला परत करील.

(३) पोटकलम (१) खाली लायसन सक्तीने ताब्यात घेणारा पोलीस अधिकारी किंवा अन्य व्यक्ती, लायसन स्वाधीन करणाऱ्या व्यक्तीला त्याबद्दल तात्पुरती अभिस्वीकृती देईल आणि अशी अभिस्वीकृती धारण करणाऱ्या व्यक्तीला तीमुळे, लायसन तिच्याकडे परत करण्यात येण्याचा दिनांक किंवा पोलीस अधिकारी किंवा अन्य व्यक्ती अभिस्वीकृतीमध्ये विनिर्दिष्ट करील तो दिनांक यांपैकी जो आधीचा असेल त्या दिनांकापर्यंत वाहन चालविण्यास प्राधिकृत ठरेल :

परंतु, जर कोणत्याही दंडाधिकाऱ्यांचे, पोलीस अधिकाऱ्यांचे किंवा राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अन्य व्यक्तीचे, तिच्याकडे अर्ज केल्यानंतर, समाधान केले की, ज्या कोणत्याही कारणासाठी, धारक जबाबदार नाही, अशा कारणामुळे अभिस्वीकृतीत विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपूर्वी धारकाला त्याचे लायसन परत करणे शक्य नव्हते किंवा त्याला ते परत करण्यात आलेले नव्हते तर दंडाधिकारी पोलीस अधिकारी, किंवा प्रकरणपरत्वे अन्य व्यक्ती, अभिस्वीकृतीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेपर्यंत वाहन चालवण्याच्या प्राधिकाराचा कालावधी वाढवू शकेल.

नोंदणी प्रमाणपत्र किंवा परवाना इ. याशिवाय वापरण्यात आलेली वाहन सक्तीने अडवून ठेवण्याची शक्ती.

२०७. (१) राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला किंवा अन्य व्यक्तीला, कलम ३ किंवा कलम ४ किंवा कलम ३९ च्या उपबंधांचे व्यतिक्रमण करून किंवा कलम ६६ च्या पोटकलम (३) खाली आवश्यक असलेल्या परवान्याशिवाय किंवा ज्या मार्गावर किंवा ज्या क्षेत्रात किंवा ज्या प्रयोजनासाठी ते वाहन वापरता येईल त्याच्यासंबंधी परवान्यात असलेल्या कोणत्याही शर्तीचे व्यतिक्रमण करून वापरण्यात येत असेल तर, त्याला ते वाहन विहित रीतीने, सक्तीने ताब्यात घेता येईल व अडवून ठेवता येईल आणि त्या प्रयोजनाकरता, वाहन तात्पुरते सुरक्षितपणे सांभाळून ठेवण्यासाठी त्याला योग्य वाटेल अशी कोणतीही उपाययोजना करता किंवा करवता येईल :

परंतु, कलम ३ किंवा कलम ४ च्या उपबंधांचे व्यतिक्रमण करून किंवा कलम ६६, पोटकलम (१) द्वारे आवश्यक असलेल्या परवान्याविना मोटार वाहन वापरण्यात आले आहे किंवा येत आहे असे समजण्यात अशा कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा व्यक्तीला कारण असेल तर, वाहन सक्तीने ताब्यात घेण्याऐवजी त्याला नोंदणी प्रमाणपत्र सक्तीने ताब्यात घेता येईल व त्याबद्दल त्याला अभिस्वीकृती द्यावी लागेल.

(२) जेव्हा कोणतेही मोटार वाहन, पोटकलम (१) खाली सक्तीने ताब्यात घेण्यात आले असेल आणि अडवून ठेवण्यात आले असेल तेव्हा, मोटार वाहनाचा मालक किंवा ते वाहन ज्याच्या ताब्यात आहे, अशी व्यक्ती, वाहन सोडवून घेण्यासाठी संबद्ध दस्तऐवजांसह, परिवहन प्राधिकारी किंवा राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे अर्ज करू शकेल आणि असा प्राधिकारी किंवा असा अधिकारी अशा दस्तऐवजांची पडताळणी केल्यानंतर, त्या प्राधिकाऱ्याला किंवा अधिकाऱ्याला ज्या शर्ती लादणे इष्ट वाटेल अशा शर्तींच्या अधीन राहून आदेशाद्वारे वाहन सोडवून देऊ शकेल :

परंतु, राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेला कोणताही दंडाधिकारी, पोलीस अधिकारी किंवा अन्य व्यक्ती यांच्याकडे अर्ज करण्यात आल्यावर ज्यास धारक जबाबदार नाही अशा कोणत्याही कारणामुळे अभिस्वीकृतीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दिनांकापूर्वी लायसन त्याच्या धारकाकडे परत करता येणे शक्य नाही किंवा परत करण्यात आलेले नाही अशी खात्री झाली तर, दंडाधिकारी, पोलीस अधिकारी किंवा प्रकरणपरत्वे, अन्य व्यक्ती यांना वाहन चालवण्याचा कालावधी अभिस्वीकृतीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापर्यंत वाढवता येईल.

प्रकरण संक्षिप्त रीत्या निकालात काढणे.

२०८. (१) या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची (केंद्र शासन, नियमांद्वारे याबाबत विनिर्दिष्ट करील अशा अपराधाव्यतिरिक्त) दखल घेताना, न्यायालयाला, आरोपी व्यक्ती,—

(क) वकिलामार्फत उपस्थित होऊ शकेल किंवा स्वतः जातीने हजर होऊ शकेल ; किंवा

(ख) दोषारोपाची सुनावणी करण्यापूर्वीच्या विनिर्दिष्ट दिनांकापर्यंत दोषारोपाबाबतच्या अपराधाची कबुली देऊन आणि न्यायालयाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रकमेचा (अपराधाबद्दल बसवण्यात येईल अशा कमाल द्रव्यदंडाहून अधिक नव्हे) न्यायालयाकडे भरणा करू शकेल आणि तो स्वतः मनीऑर्डरच्या कूपनवर अपराधाबाबतच्या कबुलीजबाबाचा निर्देश करील, असे आरोपी व्यक्तीवर बजावयाच्या समन्सवर,—

(एक) अपराध हा जर अधिनियमाखाली कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध असेल तर, नमूद करता येईल, आणि

(दोन) अन्य कोणत्याही प्रकरणी, नमूद करावे लागेल :

परंतु, पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही अपराधाच्या प्रकरणात, आरोपी व्यक्तीवरील समन्समध्ये जर त्याने अपराध कबूल केला असेल आणि असे अभिकथन खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीत असल्याचे नमूद करण्यात येईल आणि तिला आपला कबुलीजबाब अंतर्भूत असणाऱ्या त्याच्या पत्रासह त्याचे चालन लायसन न्यायालयाकडे पाठवावे लागेल.

(२) पोटकलम (१) अनुसार कार्यवाही करण्यात आलेला अपराध हा, या पोटकलमाच्या प्रयोजनांसाठी असलेल्या नियमांद्वारे केंद्र शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात आलेला अपराध असेल त्याबाबतीत, जर आरोपी व्यक्तीने दोषारोपाचा अपराध कबूल केला असेल तर, न्यायालयाकडून दोषसिद्धीचा पृष्ठांकन लायसनावर नमूद व्हावे म्हणून तिला आपला कबुलीजबाब अंतर्भूत असणाऱ्या पत्रासह आपले लायसन न्यायालयाकडे पाठवावे लागेल.

(३) जर आरोपी व्यक्तीने अपराध कबूल केला आणि विनिर्दिष्ट रकमेचा भरणा केला आणि पोटकलम (१) किंवा, प्रकरणपरत्वे, पोटकलम (१) आणि (२) च्या उपबंधाचे पालन केले तर, त्या अपराधाच्यासंबंधात तिच्याविरुध्द आणखी कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही आणि या अधिनियमात काहीही विरुद्ध असले तरी, तिने अपराध कबूल केला या कारणावरून ती व्यक्ती लायसन धारण करण्याला किंवा मिळवण्याला निरर्ह होण्यास पात्र ठरणार नाही.

दोषसिद्धीवर निर्बंध.

२०९. कलम १८३ किंवा कलम १८४ खाली शिक्षापात्र असलेल्या अपराधाबद्दल खटला भरण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीला,—

(क) तिच्यावर खटला भरण्याच्या प्रश्नावर विचार करण्यात येईल अशी ताकीद अपराध घडला त्यावेळी तिला देण्यात आली होती, किंवा

(ख) अपराध घडल्यापासून चौदा दिवसांच्या आत, अपराधाचे स्वरूप व वेळ आणि तो जेथे घडला असे अभिकथन करण्यात आले आहे ते ठिकाण विनिर्दिष्ट करणारी नोटीस तिच्यावर किंवा अपराध घडण्याच्यावेळी वाहनाचा मालक म्हणून नोंदणी करण्यात आलेल्या व्यक्तीवर बजावण्यात आली आहे किंवा तिला डाकनोंद पत्राद्वारे पाठविण्यात आली आहे, किंवा

(ग) अपराध घडल्यापासून अठ्ठावीस दिवसांच्या आत, अपराधाबद्दल तिच्यावर समन्स बजावण्यात आले आहे,

असे झाल्याशिवाय तिला सिद्धदोष ठरवण्यात येणार नाही :

परंतु,—

(क) आरोपी व्यक्तीचे नाव व पत्ता तसेच वाहनाच्या नोंदलेल्या मालकाचे नाव व पत्ता यांची वाजवी तत्परतेने वेळीच खातरजमा केली न गेल्यामुळे या पोटकलमात निर्देशिलेली नोटीस किंवा समन्स बजावण्यात कसूर घडून आली, किंवा

(ख) आरोपी व्यक्तीच्या वर्तनामुळे अशी कसूर घडून आली,

—अशी न्यायालयाची खात्री झाली तर, त्याबाबतीत या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

२१०. ज्या न्यायालयाने चालन-लायसन धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, या अधिनियमाखालील अपराधाबद्दल किंवा जो अपराध करताना मोटार वाहन वापरण्यात आले होते, अशा अपराधाबद्दल सिद्धदोष ठरवले असेल असे प्रत्येक न्यायालय,— **न्यायालयांनी दोषसिद्धी झाल्याची सूचना पाठविणे.**

(क) चालन-लायसन दिले त्या लायसन प्राधिकरणास, आणि

(ख) लगतपूर्वी ज्याने लायसनचे नूतनीकरण केले त्या लायसन प्राधिकरणास, त्याबद्दलची सूचना पाठवील आणि अशा प्रत्येक सूचनेत लायसनधारकाचे नाव व पत्ता, लायसन क्रमांक, ते दिल्याचा व त्याचे नूतनीकरण केल्याचा दिनांक अपराधाचे स्वरूप, त्याबद्दल दिलेली शिक्षा व विहित करण्यात येईल असा अन्य तपशील नमूद केलेला असेल.

## प्रकरण चौदा

### संकीर्ण

२११. या अधिनियमाखाली केंद्र शासनाला किंवा राज्य शासनाला जो नियम करण्याची शक्ती प्रदान करण्यात आली आहे. अशा कोणत्याही नियमात अर्ज, दस्तऐवजांमधील प्रमाणपत्रे, लायसने, परवाने देणे, चाचण्या, पृष्ठांकन करणे, बिल्ले, पट्ट्या, प्रतिस्वाक्षऱ्या करणे, प्राधिकृत करणे, आकडेवारी किंवा दस्तऐवजांच्या किंवा आदेशाच्या प्रती पुरवणे यासंबंधात आणि या अधिनियमाखाली किंवा त्या अन्वये केलेल्या नियमांखाली ज्यामध्ये अधिकाऱ्यांनी किंवा प्राधिकरणांनी आपल्या कोणत्याही सेवा उपलब्ध करणे हे अनुस्यूत आहे अशा अन्य कोणत्याही प्रयोजनांसाठी किंवा बाबींसाठी आवश्यक वाटेल अशी फी आकारण्याचा उपबंध करता येईल मग तशा आशयाचा कोणताही व्यक्त उपबंध नसला तरी हरकत नाही : **फी आकारणीची शक्ती.**

परंतु, लोकहिताच्या दृष्टीने, शासनाला तसे आवश्यक वाटले तर, ते सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, अशी कोणतीही फी देण्यापासून कोणत्याही व्यक्तीवर्गास अंशतः किंवा पूर्णतः सूट देऊ शकेल.

२१२. (१) नियम करण्यासाठी या अधिनियमाद्वारे प्रदान करण्यात आलेली शक्ती, ते नियम पूर्वप्रकाशनानंतर करण्यात येतील या शर्तीच्या अधीन असेल. **नियमांचे आणि अधिसूचनांचे प्रकाशन व त्यांचा प्रारंभ व त्या काढणे.**

(२) या अधिनियमाखाली करण्यात आलेले सर्व नियम शासकीय राजपत्रात प्रकाशित करण्यात येतील आणि नंतरचा एखादा दिनांक नियत करण्यात आला नसेल तर, अशा प्रकाशनाच्या दिनांकी अंमलात येतील.

(३) कोणत्याही राज्य शासनाने या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, होईल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळापुढे ठेवण्यात येईल.

(४) केंद्र शासनाने, या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम, कलम ७५ चे पोटकलम (१) आणि कलम १६३ चे पोटकलम (१) खाली केंद्र शासनाने केलेली प्रत्येक योजना आणि कलम ४१ चे पोटकलम (४), कलम ५८ चे पोटकलम (१), कलम ५९ चे पोटकलम (१), कलम ११२ पोटकलम (१) चे परंतुक [१][कलम १६३क चे पोटकलम (४)] आणि कलम २१३ चे पोटकलम (४) खाली केंद्रशासनाने निर्गमित केलेली प्रत्येक अधिसूचना, हे सर्व करण्यात आल्यानंतर, होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीत सत्रासीन असताना ठेवला जाईल आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर त्या नियमात, योजनेत किंवा अधिसूचनेत कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा ते नियम किंवा योजना करण्यात येऊ नये किंवा अधिसूचना निर्गमित करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम, योजना किंवा अधिसूचना त्यानंतर अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही. तथापि, अशा आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे तत्पूर्वी त्या नियमाखाली, योजनेखाली किंवा अधिसूचनेखाली केलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

२१३. (१) या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनार्थ, राज्य शासनाला एक मोटारवाहन विभाग स्थापन करता येईल आणि त्यास त्या विभागाचे अधिकारी म्हणून योग्य वाटतील अशा व्यक्तींची नियुक्ती करता येईल. **मोटार वाहन अधिकाऱ्याची नियुक्ती.**

(२) असा प्रत्येक अधिकारी "भारतीय दंड संहिता, १८६०" (१८६० चा ४५) यात अभिप्रेत असल्याप्रमाणे लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

(३) मोटार वाहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपली कार्ये पार पाडण्याबाबत नियमन करण्यासाठी आणि विशेषत : व पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता त्यांनी परिधान करावयाची वर्दी, त्यांनी करावयाची कामे, ते ज्या प्राधिकाऱ्याच्या अधीनस्थ असतील तो प्राधिकारी, त्यांनी वापरावयाच्या शक्ती (या अधिनियमाखाली पोलीस अधिकाऱ्यांनी वापरावयाच्या शक्तींच्या अंतर्भावासह) व अशा शक्तींच्या वापराचे नियंत्रण करणाऱ्या शर्ती हे विहित करण्यासाठी राज्य शासनाला नियम करता येतील.

---

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम ६२ द्वारे घालण्यात आले (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हापासून).

(४) केंद्र शासन, या अधिनियमाची उद्दिष्टे लक्षात घेता, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अशा प्रकारे नियुक्ती होण्यासाठी उक्त अधिकारी किंवा कोणत्याही वर्गाचे अधिकारी धारण करतील ती किमान अर्हता विहित करू शकेल.

(५) पोटकलम (३) खाली, मोटार वाहन विभागाच्या कोणत्याही अधिकाऱ्याला प्रदान करण्यात येतील अशा शक्तींशिवाय आणखी, राज्य शासनाकडून अशा अधिकाऱ्यास याबाबतीत शक्ती प्रदान करण्यात येईल त्याप्रमाणे पुढील गोष्टी करण्याचीही शक्ती असेल :—

(क) या अधिनियमाच्या उपबंधांचे व त्याखाली केलेल्या नियमांचे अनुपालन करण्यात येत आहे किंवा कसे याबाबत खात्री करून घेण्यासाठी त्यास योग्य वाटेल अशी तपासणी व चौकशी करणे ;

(ख) ज्या व्यक्तीने या अधिनियमाखाली अपराध केला आहे असे त्याला सकारण वाटत असेल अशा व्यक्तीच्या ताब्यात असलेल्या किंवा ज्याच्या बाबतीत असा अपराध घडून आला है मोटार वाहन येथे ठेवण्यात आले असेल अशा कोणत्याही वास्तुमध्ये त्यास योग्य वाटेल असे कोणतेही सहाय्य मिळाल्यास त्यानिशी प्रवेश करणे, तिची पाहणी करणे व झडती घेणे :

परंतु,—

(एक) वॉरंटाविना घ्यावयाची अशी कोणतीही झडती, राजपत्रित अधिकाऱ्याच्या दर्जाच्या अधिकाऱ्याकडूनच घेण्यात येईल ;

(दोन) अपराध हा केवळ द्रव्यदंडासच पात्र असेल त्याबाबतीत झडती ही सूर्यास्तानंतर व सूर्योदयापूर्वी घेण्यात येणार नाही ;

(तीन) झडती वॉरंटाविना घेण्यात आली असेल तर, संबंधित राजपत्रित अधिकारी वॉरंट न मिळण्याची कारणे लेखी नमूद करील आणि अशी झडती घेण्यात आली आहे असे आपल्या निकटच्या वरिष्ठास कळवील ;

(ग) कोणत्याही व्यक्तीची तपासणी करणे व या अधिनियमानुसार ठेवलेली कोणतीही नोंदवही किंवा अन्य दस्तऐवज सादर करावयास फर्मावणे आणि या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी कोणत्याही व्यक्तीचे जागच्या जागी किंवा अन्यत्र स्वत:ला आवश्यक वाटतील असे जबाब घेणे ;

(घ) जो अपराध करण्यात आला आहे असे स्वत:ला सकारण वाटत असेल अशा या अधिनियमाखालील अपराधाच्या संबंधात आपणास संबद्ध वाटतील अशा कोणत्याही नोंदवह्या किंवा दस्तऐवज किंवा त्यांचे भाग सक्तीने ताब्यात घेणे किंवा त्यांच्या नकला घेणे ;

(ङ) या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधासंबंधात खटला भरणे आणि कोणत्याही न्यायालयासमोर अपराधी खात्रीने उपस्थित रहावा यासाठी बंधपत्र लिहून घेणे ;

(च) विहित करण्यात येतील अशा अन्य शक्ती वापरणे :

परंतु, या पोटकलमाखाली कोणत्याही व्यक्तीवर, तिला अपराधात गोवण्याकडे ज्याचा रोख आहे अशा कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देण्याची किंवा असा कोणताही जबाब देण्याची सक्ती केली जाणार नाही.

(६) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याचे उपबंध त्या संहितेच्या कलम ९४ खाली काढलेल्या कोणत्याही वॉरंटाच्या प्राधिकारान्वये घेण्यात येणाऱ्या कोणत्याही झडतीस किंवा अभिग्रहणास ज्याप्रमाणे लागू होतात त्याप्रमाणे ते होईल तेथवर, या कलमाखालील कोणत्याही झडतीस किंवा अभिग्रहणास लागू होतील.

**मूळ प्राधिकरणाने दिलेल्या आदेशांवर दाखल अपील व पुनरीक्षण यांचा परिणाम.**

२१४. (१) मूळ प्राधिकरणाने या अधिनियमाखाली दिलेल्या कोणत्याही आदेशाविरुद्ध अपील करण्यात आले असेल किंवा त्यांच्या पुनरीक्षणासाठी अर्ज करण्यात आला असेल त्याबाबतीत, अपील किंवा पुनरीक्षणाचा अर्ज यांमुळे मूळ प्राधिकरणाचा आदेश स्थगित होणार नाही आणि विहित प्राधिकरणाने किंवा पुनरीक्षण प्राधिकरणाने अन्यथा निदेश दिला नसेल तर, अपील किंवा, प्रकरणपरत्वे, पुनरीक्षणाचा अर्ज निकालात निघेपर्यंत असा आदेश अंमलात राहील.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर एखाद्या व्यक्तीने परवान्याच्या नतनीकरणासाठी केलेला अर्ज मूळ प्राधिकरणाकडून फेटाळण्यात आला असेल आणि अशा व्यक्तीने अशा फेटाळणीविरुद्ध या अधिनियमाखाली अपील दाखल केले असेल किंवा पुनरीक्षणाचा अर्ज केला असेल तर अपील प्राधिकरण किंवा, प्रकरणपरत्वे, पुनरीक्षण प्राधिकरण आदेशाद्वारे असा निदेश देऊ शकेल की, परवान्यात विनिर्दिष्ट केलेली मुदत संपली असली तरीही, तो परवाना अपिलाच्या किंवा पुनरीक्षणाच्या अर्जाचा निकाल होईपर्यंत विधिग्राह्य असण्याचे चालू राहील.

(३) सक्षम प्राधिकरणाने या अधिनियमाखाली कोणताही आदेश दिला असता कार्यवाहीत कोणतीही त्रुटी, अकृती किंवा नियमबाह्य गोष्ट झाली तरी, त्यामुळे प्रत्यक्षात न्याय विफल झाला असे विहित अपील प्राधिकरणाला किंवा, प्रकरणपरत्वे, पुनरीक्षण प्राधिकरणाला दिसून न आल्यास, अशी त्रुटी, अकृती किंवा नियमबाह्य गोष्ट यामुळे अपिलांती किंवा पुनरीक्षणांती असा कोणताही आदेश फिरवण्यात येणार नाही किंवा त्यात फेरबदल करण्यात येणार नाही.

२१५. (१) केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, शासनाला आवश्यक वाटेल असा अध्यक्ष आणि अशा इतर सदस्यांची मिळून बनलेली आणि शासन निश्चित करेल अशा अटींवर व शर्तींवर, देशासाठी एक राष्ट्रीय मार्ग सुरक्षा परिषद घटित करील. **मार्ग सुरक्षा परिषदा व समित्या.**

(२) राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे शासनाला आवश्यक वाटेल असा अध्यक्ष व अशा इतर सदस्यांची मिळून बनलेली आणि शासन निश्चित करेल अशा अटींवर व शर्तींवर राज्यासाठी, एक राज्य मार्ग सुरक्षा परिषद घटित करील.

(३) राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे शासनाला आवश्यक वाटेल असा अध्यक्ष आणि असे अन्य सदस्य यांची मिळून बनलेली आणि शासन निश्चित करील अशा अटींवर व शर्तींवर राज्यातील प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हा मार्ग सुरक्षा समिती घटित करील.

(४) या कलमात निर्देशिलेल्या परिषदा व समित्या ह्या, केंद्र शासन, किंवा प्रकरणपरत्वे, राज्य शासन या अधिनियमाची उद्दीष्टये विचारात घेऊन विनिर्दिष्ट करील त्या मार्ग सुरक्षा कार्यक्रमांशी संबंधित अशी कर्तव्ये पार पाडतील.

२१६. (१) या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, केंद्र शासन **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, अडचण दूर करण्यासाठी आवश्यक किंवा इष्ट असल्याचे दिसून येईल त्याप्रमाणे, या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसतील असे उपबंध तयार करील : **अडचणी दूर करण्याची शक्ती.**

परंतु, असा आदेश, या अधिनियमाच्या प्रारंभापासून तीन वर्षे समाप्त झाल्यानंतर काढण्यात येणार नाही.

(२) या कलमाखाली काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

२१७. (१) मोटार वाहन अधिनियम, १९३९ (१९३९ चा ४) आणि त्या राज्यात या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी कोणत्याही राज्यात अंमलात असणारा तत्सम कोणताही कायदा (या कलमात यापुढे ज्याचा निर्देश, "निरसित अधिनियमिती" असा करण्यात आला आहे) याद्वारे निरसित करण्यात येत आहे. **निरसन व व्यावृत्ती.**

(२) पोट-कलम (१) द्वारे अधिनियमितीचे निरसन झाले असले तरीही,

(क) अशा प्रारंभापूर्वी तात्काळ अंमलात असलेल्या आणि निरसित अधिनियमितीखाली काढलेली कोणतीही अधिसूचना, नियम, विनियम, आदेश किंवा केलेली कोणतीही नियुक्ती किंवा अधिघोषणा अथवा दिलेली सूट किंवा केलेले कोणतेही अधिहरण किंवा लादलेली कोणतीही शास्ती किंवा द्रव्यदंड, कोणतेही समपहरण, रद्द करणे किंवा केलेली कोणतीही अन्य गोष्ट किंवा करण्यात आलेली कोणतीही अन्य कार्यवाही, या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसेल तेथवर, ती या अधिनियमाच्या समनुरुप उपबंधाखाली काढण्यात आलेली, केलेली, दिलेली, किंवा करण्यात आलेली आहे असे मानले जाईल;

(ख) निरसित अधिनियमितीखाली निर्गमित केलेले किंवा दिलेले कोणतेही स्वास्थ्य प्रमाणपत्र किंवा नोंदणी किंवा लायसन किंवा परवाना हे, जर हा अधिनियम संमत झाला नसता तर, ते ज्या शर्तीखाली व ज्या कालावधीसाठी अंमलात असणे चालू राहिले असते त्याच शर्तीखाली व त्या कालावधीसाठी ते, अशा प्रारंभानंतर अंमलात असणे चालू राहील;

(ग) याद्वारे निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमितीचा किंवा तिच्या कोणत्याही उपबंधांचा निर्देश करणारा कोणताही दस्तऐवज, या अधिनियमाचा किंवा या अधिनियमाच्या समनुरुप उपबंधांचा निर्देश करणारा आहे असा त्याचा अर्थ लावण्यात येईल;

(घ) निरसित अधिनियमितीच्या उपबंधांच्या अनुसार, नोंदणी प्राधिकाऱ्याकडून विभेदक चिन्ह नेमून देण्याची आणि ते मोटार वाहनांवर लावण्याची रीत ही, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, या अधिनियमाच्या कलम ४१, पोटकलम (६) खाली अधिसूचना काढून होईपर्यंत अंमलात असणे चालू राहील;

(ङ) मोटार वाहन अधिनियम, १९३९ (१९३९ चा ४) याच्या कलम ६८ग खाली तयार केलेली कोणतीही योजना किंवा कोणत्याही राज्यात, जर कोणताही असल्यास समनुरुप कायदा, अंमलात असेल तर त्या कायद्याखाली तयार केलेली आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी प्रलंबित असलेली कोणतीही योजना, या अधिनियमाच्या कलम १०० च्या उपबंधाच्या अनुसार निकालात काढण्यात येईल;

(च) मोटार वाहन अधिनियम, १९३९ (१९३९ चा ४) याच्या कलम ६८च च्या पोटकलम (१क) खाली किंवा, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी, कोणत्याही राज्यात तत्सम उपबंध अंमलात असतील तर त्या उपबंधाखाली दिलेले परवाने, या अधिनियमाच्या (प्रकरण सहा खाली) मान्यता दिलेली योजना प्रसिद्ध होईपर्यंत अंमलात असणे चालू राहील;

(३) कोणत्याही निरसित अधिनियमितीखाली प्रदेय असलेली कोणतीही शास्ती या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली उपबंधित केलेल्या रीतीने वसूल करता येईल, परंतु अशी शास्ती वसूल करण्यासाठी निरसित अधिनियमितीखाली तत्पूर्वी केलेल्या कोणत्याही कार्यवाहीस त्यामुळे बाध येणार नाही;

(४) या कलमात विशेष बाबींचा उल्लेख करण्यात आल्यामुळे निरसनांच्या परिणामासंबंधी "सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७" (१८९७ चा १०) याच्या कलम ६ च्या सर्वसाधारण प्रयुक्तीला बाध येतो किंवा त्यावर परिणाम होतो असे समजले जाणार नाही.

" स्पष्टीकरणात्मक टीपा "

(१) जेथे जेथे सर्वसाधारण आकार विनिर्दिष्ट करण्यात आला आहे तेथे तेथे तो अशा ग्रामीण क्षेत्रातील त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणालाही कायद्या अन्वये राष्ट्रीय महामार्ग किंवा राज्य महामार्ग म्हणून जाहीर केलेल्या ग्रामीण क्षेत्रातील महामार्गावर वापरावयाच्या चिन्हांचा किमान आकार आहे.

(२) जेथे जेथे लहान आकार विनिर्दिष्ट करण्यात आला आहे तेथे तेथे तो पुढील ठिकाणी वापरावयाच्या चिन्हांचा किमान आकार आहे,—

(क) ग्रामीण क्षेत्रातील उक्त राष्ट्रीय महामार्ग आणि राज्य महामार्गाच्या व्यतिरिक्त सर्व मार्गांवर, आणि

(ख) शहरी क्षेत्रात सर्व मार्गांवर :

परंतु, अशा रस्त्यांवरील खांबांवर किंवा वाहतुकीच्या सिग्नलच्या, दिव्यांच्या बाजूलगत कोणत्याही योग्य आकाराचे चिन्ह वापरण्यात येईल.

(३) या चिन्हांची रंगयोजना त्यात विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे राहील आणि अशा सर्व चिन्हांच्या तबकडीच्या मागील बाजू करड्या रंगाने रंगविलेल्या असतील.

(४) या सर्व चिन्हांचे स्तंभावर २५ सेंमी रुंदीचे काळे आणि पांढरे पट्टे एक आड एक रंगविलेले असतील आणि जमिनीलगतचा पट्टा काळा असेल.

(५) विनिर्देशपट्टीवर जेव्हा जेव्हा चिन्ह असल्याचे विनिर्दिष्ट करण्यात आले असेल किंवा जेथे चिन्हाचा अर्थ अधिक स्पष्ट करण्याचा त्या पट्टीचा उद्देश असेल, तेव्हा तेव्हा त्या पट्टीवर पांढरा पार्श्वभाग, काळी अक्षरे आणि २० मि. मी. रुंदीची काळी पट्टी असेल आणि अर्थ नीट वाचता येण्याइतका पुरेसा तिचा आकार असेल ; परंतु, बटबटीत वाटावी इतकी ती मोठी नसावी.


२. ही अधिसूचना १ जुलै १९८९ रोजी अंमलात येईल.

[1] [ अनुसूची पहिली ]

[आदेशवजा चिन्हे] भाग-अ


मोटार वाहन अधिनियम, १९८८ याच्या अनुसूचीची आदेशवजा चिन्हे.

क्र. एम १—थांबा




सूचना :—रस्त्याचा वापर करणारे या चिन्हाशी परिचित होईपर्यंत " थांबा " शब्द इंग्रजीमध्ये आणि आवश्यकतेनुसार इतर भाषेत अंकित केलेली विनिर्देश पट्टी या चिन्हासोबत जोडण्यात येईल.


क्र. एम. २— रस्ता द्या





सूचना :—रस्त्याचा वापर करणारे या चिन्हाशी परिचित होईपर्यंत " रस्ता द्या " ही सूचना इंग्रजीमध्ये आणि आवश्यकतेनुसार इतर भाषेत अंकित केलेली विनिर्देश पट्टी चिन्हासोबत जोडण्यात येईल.

१. १९९४ चा अधिनियम ५४, कलम ६३ द्वारे मूळ अधिनियमातील अनुसूचीला अनुसूची पहिली असा नवीन क्रमांक देण्यात आला. (१४ नोव्हेंबर, १९९४ रोजी व तेव्हापासून)


**क्र. एम ३—सरळ जाण्यास मनाई किंवा प्रवेश बंद**





**क्र.एम ४ अ—एक दिशा मार्गाचे चिन्ह**
**एका-दिशेने वाहनांना मनाई**




क्र. एम ४ ब—एक दिशा मार्गाचे चिन्ह
एका दिशेने वाहनांना मनाई





क्र. एम ५ दोन्ही दिशेने वाहनांना मनाई




क्र. एम ६ सर्व मोटार वाहनांना मनाई





क्र. एम ७—मालमोटारींना मनाई




## क्र. एम ८—बैलगाड्या आणि हातगाड्यांना मनाई





## क्र. एम ९—बैलगाड्यांना मनाई




## क्र. एम १०—टांग्यांना मनाई





## क्र. एम ११—हातगाड्यांना मनाई




### क्र. एम १२–सायकलींना मनाई





### क्र. एम १३ – पादचाऱ्यांना मनाई




क्र. एम १४—उजवीकडे वळण्यास मनाई





क्र. एम १५—डावीकडे वळण्यास मनाई




**क्र. एम १६–U वळणास मनाई**





**क्र. एम १७–वाहनास मागे टाकून बाजूने पुढे जाण्यास मनाई**



**क्र. एम १८—हॉर्न वाजवण्यास मनाई**





**क्र. एम १९—वाहने उभी करू नयेत**





**सूचनाः**—इंग्रजी मध्ये आणि आवश्यकतेनुसार इतर भाषेत सूचना अंकित केलेली विनिर्देशपट्टी चिन्हासोबत जोडण्यात येईल; त्याचप्रमाणे निर्बंध कोणत्यावेळी अंमलात असतील किंवा ते कोणत्या विशिष्ट वाहनांना लागू होतील, अशाप्रकारची अतिरिक्त माहितीही सोबत देण्यात येईल.

### क्र. एम २०—थांबवू किंवा उभी करू नयेत





**सूचनाः**—इंग्रजी मध्ये आणि आवश्यकतेनुसार इतर भाषेत सूचना अंकित केलेली विनिर्देशपट्टी चिन्हासोबत जोडण्यात येईल; त्याचप्रमाणे निर्बंध कोणत्यावेळी अंमलात असतील किंवा ते कोणत्या विशिष्ट वाहनांना लागू होतील, त्याबाबतची अतिरिक्त माहितीही सोबत जोडण्यात येईल.

### क्र. एम २१—वेगमर्यादा





**सूचनाः**—जेथे केवळ विवक्षित वर्गाच्या किंवा वर्गांच्या मोटार वाहनावरच वेगमर्यादा घातलेली असेल, तेथे तसे विनिर्देश पट्टीवर, विनिर्दिष्ट करण्यात येईल. जेथे विवक्षित वर्गाच्या किंवा वर्गांच्या वाहनांवर सर्वसाधारण वेगमर्यादेखेरीज आणखी विशेष वेगमर्यादा घातलेली असेल तेथे, ती विशेष वेगमर्यादा आणि ज्यांना ती लागू होत असेल तो वर्ग किंवा ते वर्ग, विनिर्देश पट्टीवर विनिर्दिष्ट करण्यात येतील.


क्र. एम २२–रुंदी मर्यादा





क्र. एम २३–उंची मर्यादा




### क्र. एम २४—लांबी मर्यादा





### क्र. एम २५—वजन मर्यादा





### क्र. एम २६—अक्षल वजन मर्यादा



**क्र. एम २७–निर्बंध समाप्तीचे चिन्ह**





**क्र. एम २८–डावीकडे वळण आवश्यक**
**(चिन्ह उलटे असल्यास उजवीकडे)**



**क्र. एम २९—समोर जाणे आवश्यक**
**फक्त समोर**


सर्वसाधारण आकार ६० सें.मी.
लहान आकार ४० सें.मी.



पांढरे संकेत चिन्ह
निळा पार्श्वभाग


**क्र. एम ३०—समोर उजवीकडे वळण आवश्यक**
**(चिन्ह उलटे असल्यास डावीकडे)**

सर्वसाधारण आकार ६० सें.मी.
लहान आकार ४० सें.मी.




पांढरे संकेत चिन्ह
निळा पार्श्वभाग

क्र. एम. ३१—समोर जाणे किंवा उजवीकडे वळण आवश्यक





क्र. एम ३२—समोर जाणे किंवा डावीकडे वळण आवश्यक



### क्र. एम ३३—डाव्या बाजूने जाणे आवश्यक


सर्वसाधारण आकार ६० सें.मी.
लहान आकार ४० सें.मी.



पांढरे संकेत चिन्ह
निळा पार्श्वभाग

### क्र. एम ३४—सायकल मार्गाने जाणे आवश्यक

सर्वसाधारण आकार ६० सें.मी.
लहान आकार ४० सें.मी.



पांढरे संकेत चिन्ह
निळा पार्श्वभाग

### क्र. एम ३५—ध्वनिविषयक इशारा आवश्यक


सर्वसाधारण आकार ६० सें.मी.
लहान आकार ४० सें.मी.



काळे संकेत चिन्ह
निळा पार्श्वभाग


क्र. एम ३६–बस थांबा आवश्यक

लाल पट्टी
मध्य भाग पांढरा
चिन्ह-काळे



## मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या अनुसूचीची सावधगिरीची चिन्हे


### क्र. सी १--सर्वसाधारण आकृती





### क्र. सी २--उजव्या हाताला वळण




**क्र. सी ३—डाव्या हाताला वळण**





**क्र. सी ४—उजवीकडे आकड्यासारखे वाकण**




क्र. सी ५—डावीकडे आकड्यासारखे वाकण





क्र. सी ६—उजवीकडे उलटे वाकण




क्र. सी ७—डावीकडे उलटे वाकण





क्र. सी ८—उभी चढण




क्र. सी ९—उभी उतरण





क्र. सी १०—पुढे अरुंद रस्ता आहे



**क्र. सी ११–पुढे रस्ता रुंद आहे**





**क्र. सी १२–अरुंद पूल**



क्र. सी १३—निसरडा रस्ता

सर्वसाधारण आकार ७० मि.मी.
लहान आकार ४५ मि.मी.




काळे संकेत चिन्ह
पांढरा पार्श्वभाग
लाल पट्टी

सर्वसाधारण आकार ९० सें.मी.
लहान आकार ६० सें.मी.

क्र. सी १४—पोकळी रेती


सर्वसाधारण आकार ७० मि.मी.
लहान आकार ४५ मि.मी.




काळे संकेत चिन्ह
पांढरा पार्श्वभाग
लाल पट्टी

सर्वसाधारण आकार ९० सें.मी.
लहान आकार ६० सें.मी.

**क्र. सी १५–सायकलीसाठी ओलांडणी**




**क्र. सी १६–पादचाऱ्यांसाठी ओलांडणी**



## क्र. सी १७ – पुढे शाळा आहे

सर्वसाधारण आकार ७० मि. मी.
लहान आकार ४५ मि. मी.




काळे संकेत चिन्ह
पांढरा पार्श्वभाग
लाल पट्टी

सर्वसाधारण आकार ९० सें. मी.
लहान आकार ६० सें. मी.

## क्र. सी १८–कामगारांचे काम चालू आहे

सर्वसाधारण आकार ७० मि. मी.
लहान आकार ४५ मि. मी.




काळे संकेत चिन्ह
पांढरा पार्श्वभाग
लाल पट्टी

सर्वसाधारण आकार ९० सें. मी.
लहान आकार ६० सें. मी.

## क्र. सी १२–गुरे

सर्वसाधारण आकार ७० मि. मी.
लहान आकार ४५ मि. मी.




काळे संकेत चिन्ह
पांढरा पार्श्वभाग
लाल पट्टी

सर्वसाधारण आकार ९० सें. मी.
लहान आकार ६० सें. मी.

## क्र. सी २०–कोसळणारे दगड


सर्वसाधारण आकार ७० मि.मी.
लहान आकार ४५ मि.मी.




काळे संकेत चिन्ह
पांढरा पार्श्वभाग
लाल पट्टी

सर्वसाधारण आकार ९० सें.मी.
लहान आकार ६० सें.मी.


क्र. सी २१—तर





क्र. सी.२२ -- काट रस्ता




**क्र. सी २३ --मध्यावर खिंड आहे**





**क्र. सी २४-- बाजूचा रस्ता (उजवीकडे)**




क्र. सी २५ —बाजूचा रस्ता (डावीकडे)





क्र. सी २६ अ —Y छेदन




क्र. सी २६ ब–Y छेदन





क्र. सी २६ क–Y छेदन




**क्र. सी २७ —T छेदन**





**क्र. सी २८ अ – नागमोडी छेदन**




### क्र. सी २८ ब – नागमोडी छेदन





### क्र. सी २९ अ – मुख्य रस्ता पुढे आहे




## क्र. सी २९ ब – पुढे मुख्य रस्ता आहे





## क्र. सी ३० – चक्राकार रस्ता




क्र. सी ३१ — धोकादायक खळगा




क्र. सी ३२ — उंचसखल किंवा खडबडीत रस्ता




क्र. सी ३३ — पुढे अटकाव आहे





सूचनाः—चिन्हासोबत, अटकाव किती अंतरावर आहे ते आणि इतर कोणतीही माहिती दर्शविणारी विनिर्देशपट्टी जोडण्यात येईल.

## क्र. सी ३४ – सुरक्षा व्यवस्था नसलेली रेल्वे ओलांडणी (२०० मीटर्स)





सूचनाः–प्रत्येक ओलांडणीसाठी, क्र. सी ३४ आणि सी ३५ या दोन्ही चिन्हांचा वापर करावयाचा आहे, ओलांडणीपासून चिन्हाचे अंतर, चिन्हा-शीर्षकाखालील कंसात दर्शविण्यात आले आहे.

## क्र. सी ३५ – असुरक्षित रेल्वे ओलांडणी( ५०–१०० मीटर्स)





सूचनाः–प्रत्येक ओलांडणीसाठी, क्र. सी ३४ आणि सी ३५ या दोन्ही चिन्हांचा वापर करावयाचा आहे. ओलांडणीपासून चिन्हाचे अंतर, चिन्ह-शीर्षकाखालील कंसात दर्शविण्यात आले आहे. डोंगराळ भूप्रदेशात हे अंतर ३०–६० मी. पर्यंत कमी करण्यात येईल.

**क्र. सी ३६ – सुरक्षीत रेल्वे ओलांडणी ( २०० मीटर्स)**




सूचनाः—प्रत्येक ओलांडणीसाठी क्र. सी ३६ आणि सी ३७ या दोन्ही चिन्हांचा वापर करावयाचा आहे. ओलांडणीपासून चिन्हाचे अंतर, चिन्ह-शीर्षकाखालील कंसात दर्शविण्यात आले आहे.

**क्र. सी ३७ – सुरक्षित रेल्वे ओलांडणी ( ५०–१०० मीटर्स)**





सूचनाः—प्रत्येक ओलांडणीसाठी क्र. सी ३६ आणि सी ३७ या दोन्ही चिन्हांचा वापर करावयाचा आहे. ओलांडणीपासून चिन्हाचे अंतर, चिन्ह-शीर्षकाखालील कंसात दर्शविण्यात आले आहे. डोंगराळ भूप्रदेशात हे अंतर ३०–६० मी. पर्यंत कमी करण्यात येईल.

भाग क

## मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या अनुसूचीची माहिती-वजा चिन्हे

### क्र. ई १— पुढील दिशानिर्देशक चिन्ह




पांढरा पार्श्वभाग


काळी अक्षरे व बाण

काळी पट्टी

**सूचना १:—** हे चिन्ह उदाहरण म्हणून आहे. राष्ट्रीय महामार्गावर आवश्यकतेनुसार अधिक प्रादेशिक भाषांत लिहिण्यात येईल. इतर रस्त्यांच्या बाबतीत आवश्यक अशा भाषांत लिहिण्यात येईल.

**सूचना २: —** चिन्हाचा आकार, मजकुरावर आणि अक्षरांच्या आकारमानावर अवलंबून राहील.

### क्र. ई २— इष्टस्थल निर्देश चिन्ह




पांढरा पार्श्वभाग

काळी अक्षरे व बाण

काळी पट्टी

**सूचना १: —** हे चिन्ह उदाहरण म्हणून आहे. राष्ट्रीय महामार्गावर आवश्यकतेनुसार अधिक प्रादेशिक भाषांत लिहिण्यात येईल. इतर रस्त्यांच्या बाबतीत आवश्यक अशा भाषांत लिहिण्यात येईल.

**सूचना २: —** चिन्हाचा आकार, मजकुरावर आणि अक्षरांच्या आकारमानावर अवलंबून राहील.

**क्र. ई ३– दिशानिर्देशक चिन्ह**





पांढरा पार्श्वभाग
काळी अक्षरे
काळी पट्टी

**सूचना १:**– हे चिन्ह उदाहरण म्हणून आहे. राष्ट्रीय महामार्गावर आवश्यकतेनुसार अधिक प्रादेशिक भाषांत लिहिण्यात येईल. इतर रस्त्यांच्या बाबतीत आवश्यक अशा भाषांत लिहिण्यात येईल.

**सूचना २:**– चिन्हांचा आकार मजकुरावर आणि अक्षरांच्या आकारमानावर अवलंबून राहील.

**क्र. ई ४– फेर आश्वासन चिन्ह**




पांढरा पार्श्वभाग
काळी अक्षरे
काळी पट्टी

**सूचना १:**– हे चिन्ह उदाहरण म्हणून आहे. राष्ट्रीय महामार्गावर आवश्यकतेनुसार अधिक प्रादेशिक भाषांत लिहिण्यात येईल. इतर रस्त्यांच्या बाबतीत आवश्यक अशा भाषांत लिहिण्यात येईल.

**सूचना २:**– चिन्हांचा आकार मजकुरावर आणि अक्षरांच्या आकारमानावर अवलंबून राहील.

**क्र. ई ५— स्थल दर्शक चिन्ह**




पांढरा पार्श्वभाग
काळी अक्षरे
काळी पट्टी

सूचना १:— हे चिन्ह उदाहरण म्हणून आहे. राष्ट्रीय महामार्गावर, आवश्यकतेनुसार अधिक प्रादेशिक भाषांत लिहिण्यात येईल. इतर रस्त्यांच्या बाबतीत आवश्यक अशा भाषांत लिहिण्यात येईल.


सूचना २:— चिन्हांचा आकार मजकुरावर आणि अक्षरांच्या आकारमानावर अवलंबून राहील.

**क्र. ई ६ — सार्वजनिक दूरध्वनी**

सर्वसाधारण आकार
६० सें.मी.
लहान आकार ४५ सें.मी.

सर्वसाधारण आकार
८० सें.मी.
लहान आकार
६० सें.मी.

सर्वसाधारण
आकार
४० सें.मी.
लहान आकार ३०
सें.मी.




निळा पार्श्वभाग
पांढरा चौरस
काळे संकेत चिन्ह


**सूचनाः**—चिन्हाच्या तळाशी निळ्या पट्टीवर सुविधा किती अंतरावर आहे ते किंवा तिचा दिशानिदेश पांढऱ्या रंगामध्ये लिहिण्यात येईल. वर चिन्हात दर्शविलेला मजकूर हा केवळ एक उदाहरण म्हणून आहे.

**क्र. ई ७ — पेट्रोल पंप**

सर्वसाधारण आकार
६० सें.मी.
लहान आकार ४५ सें.मी.

सर्वसाधारण आकार
८० सें.मी.
लहान आकार
६० सें.मी.


सर्वसाधारण आकार
४० सें.मी.
लहान आकार
३० सें.मी.



निळा पार्श्वभाग
पांढरा चौरस
काळे संकेत चिन्ह


**सूचनाः**—चिन्हाच्या तळाला निळ्या पट्टीवर (पेट्रोल पंपाच्या) सोयीचे अंतर किंवा त्याचा दिशानिदेश पांढऱ्या रंगामध्ये लिहिण्यात येईल. वर चिन्हात दर्शविलेला मजकूर हा केवळ एक उदाहरण म्हणून आहे.

### क्र. ई ८ – रुग्णालय





**सूचना:**–चिन्हाच्या तळाला निळ्या पट्टीवर (रुग्णालयाच्या) सोयीचे अंतर किंवा दिशानिदेश पांढऱ्या रंगामध्ये लिहिण्यात येईल. वर चिन्हात दर्शविलेला मजकूर हा केवळ उदाहरण म्हणून आहे.

### क्र. ई ९–प्रथमोपचार केंद्र





**सूचना:**–चिन्हाच्या तळाला निळ्या पट्टीवर (प्रथमोपचाराच्या) सोयीचे अंतर किंवा दिशानिदेश पांढऱ्या रंगामध्ये लिहिण्यात येईल.

**क्र. ई १० – खाद्यगृह**





सूचनाः–चिन्हाच्या तळाला निळ्या पट्टीवर (खाद्यगृहाच्या) सोयीचे अंतर किंवा दिशानिदेश पांढऱ्या रंगामध्ये लिहिण्यात येईल. वर चिन्हात दर्शविलेला मजकूर हा केवळ एक उदाहरण म्हणून आहे.

**क्र. ई ११ – अल्पोपहारगृह**




सूचनाः–चिन्हाच्या तळाला निळ्या पट्टीवर (अल्पोपहारगृहाच्या) सोयीचे अंतर किंवा दिशानिदेश पांढऱ्या रंगामध्ये लिहिण्यात येईल.


क्र. ई १२–विश्रामगृह




**सूचना १:–** चिन्हाच्या तळाला निळ्या पट्टीवर (विश्रामगृहाच्या) सोयीचे अंतर किंवा दिशानिदेश पांढऱ्या रंगामध्ये लिहिण्यात येईल.


**सूचना २:–** ते स्थळ उपाहारगृह आहे की हॉटेल आहे की मोटेल आहे ते दर्शविणारी विनिर्देशपट्टी सोबत जोडण्यात येईल.

क्र. ई १३ – थेट रस्ता नाही





**सूचना:–**चिन्हाच्या तळाला निळ्या पट्टीवर मार्ग किती अंतरावर संपतो ते किंवा त्याचा दिशानिदेश पांढऱ्या रंगामध्ये लिहिण्यात येईल.

**क्र. ई १४ – बाजूचा रस्ता थेट नाही**





सूचनाः–चिन्हाच्या तळाला निळ्या पट्टीवर किती अंतरावर रस्ता नाही ते किंवा त्याचा दिशानिदेश पांढऱ्या रंगामध्ये लिहिण्यात येईल.


**क्र. ई १५ – या बाजूला वाहने उभी करा**




**क्र. ई १६ – दोन्ही बाजूला वाहने उभी करा**





**क्र. ई १७ – स्कूटर्स आणि मोटार सायकली उभ्या करण्याची जागा**




## क्र. ई १८ – सायकली उभ्या करण्याची जागा





## क्र. ई १९ – टॅक्सी उभ्या करण्याचा विभाग




क्र. ई २० — ऑटो-रिक्षा उभ्या करण्याचा विभाग




क्र. ई २१ — सायकल रिक्षा उभ्या करण्याचा विभाग



**क्र. ई २२ — पूर मापी**


१३ सें.मी.
५ सें.मी.
२०० सें.मी.
पांढरा
१६० सें.मी.
लाल
१३० सें.मी.
पांढरा
१०० सें.मी.
काळा
६० सें.मी.
लाल
३० सें.मी.
पांढरा

[१][अनुसूची

[कलम १६३

**मरणांतक अपघाताच्या प्रकरणी मागणीमध्ये त्रयस्थ पक्षकारांना**

१. **मरणांतक अपघातः**

| वार्षिक प्राप्ती | | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| | | २००० | ४२०० | ५४०० | ६६०० |
| अपघातग्रस्त व्यक्तींचे वय | गुणक | रुपये हजारात मृत्यूप्रकरणी भरपाईची रक्कम | | | |
| | | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| १५ वर्षांपर्यंत | १५ | ६० | ८४ | १०८ | १३२ |
| १५ वर्षांच्या वर परंतु २० वर्षांहून अधिक नाही. | १६ | ५७ | ७९.८ | १०२ | १२५.४ |
| २० वर्षांच्या वर परंतु २५ वर्षांहून अधिक नाही. | १७ | ५४ | ७५.६ | ९७.२ | ११८.८ |
| २५ वर्षांच्या वर परंतु ३० वर्षांहून अधिक नाही. | १८ | ५१ | ७१.४ | ९१.८ | ११२.२ |
| ३० वर्षांच्या वर परंतु ३५ वर्षांहून अधिक नाही. | १७ | ५० | ६७.२ | ८६.४ | १०५.६ |
| ३५ वर्षांच्या वर परंतु ४० वर्षांहून अधिक नाही. | १६ | ५० | ६३ | ८१ | ९९ |
| ४० वर्षांच्या वर परंतु ४५ वर्षांहून अधिक नाही. | १५ | ५० | ५८.८ | ७५.६ | ९२.४ |
| ४५ वर्षांच्या वर परंतु ५० वर्षांहून अधिक नाही. | १३ | ५० | ५०.४ | ६४.८ | ७९.२ |
| ५० वर्षांच्या वर परंतु ५५ वर्षांहून अधिक नाही. | ११ | ५० | ५० | ५४ | ६६ |
| ५५ वर्षांच्या वर परंतु ६० वर्षांहून अधिक नाही. | ८ | ५० | ५० | ५० | ५२.८ |
| ६० वर्षांच्या वर परंतु ६५ वर्षांहून अधिक नाही. | ५ | ५० | ५० | ५० | ५० |
| ६५ वर्षांच्या वर. | ५ | ५० | ५० | ५० | ५० |

**टीप.**—मरणांतक अपघाताच्या मागणीप्रकरणी काढण्यात आलेल्या भरपाईच्या रकमेमधून १/३ रक्कम ही, ती करण्यात येईल.

दुसरी]
क पहा]
**यावयाच्या भरपाई संबंधीची अनुसूची**

| रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७८०० | ९००० | १०२०० | ११४०० | १२००० | १८००० | २४००० | ३६००० | ४०००० |
| रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| १५६ | १८० | २०४ | २२८ | २४० | ३६० | ४८० | ७२० | ८०० |
| १४८.२ | १७१ | १९३.८ | २१६.६ | २२८ | ३४२ | ४५६ | ६८४ | ७६० |
| १४०.४ | १६२ | १८३.६ | २०५.२ | २१६ | ३२४ | ४३२ | ६४८ | ७२० |
| १३२.६ | १५३ | १७३.४ | १९३.८ | २०४ | ३०६ | ४०८ | ६१२ | ६८० |
| १२४.८ | १४४ | १६३.२ | १९२.४ | १९२ | २८८ | ३८४ | ५७६ | ६४० |
| ११७ | १३५ | १५३ | १७१ | १८० | २७० | ३६० | ५४० | ६०० |
| १०९.२ | १२६ | १४२.८ | १५९.६ | १६८ | २५२ | ३३६ | ५०४ | ५६० |
| ९३.६ | १०८ | १२२.४ | १३६.८ | १४४ | २१६ | २८८ | ४३२ | ४८० |
| ७८ | ९० | १०२ | ११४ | १२० | १८० | २४० | ३६० | ४०० |
| ६२.४ | ७२ | ८१.६ | ९१.२ | ९६ | १४४ | १९२ | २८८ | ३२० |
| ५० | ५४ | ६१.२ | ६८.४ | ७२ | १०८ | १४४ | २१६ | २४० |
| ५० | ५० | ५१ | ५७ | ६० | ९० | १२० | १८० | २०० |

व्यक्ती जिवंत असती तर तिच्या निर्वाहासाठी खर्च झाली असती असे गृहीत धरून भरपाईच्या रकमेतून कमी

२. भरपाईची रक्कम ५०,००० रुपयांपेक्षा कमी असणार नाही.

३. सर्वसाधारण नुकसानभरपाई (मृत्यू प्रकरणी).

वर आराखडा देण्यात आलेल्या भरपाईखेरीज पुढील सर्वसाधारण नुकसान भरपाई देय असेल.

| | रुपये |
|---|---|
| (एक) अंत्यसंस्कारावरील खर्च .. .. .. | २,००० |
| (दोन) लाभधारी व्यक्ती ही विवाहसाथी असेल तर सहवासाला मुकण्यावाबतीची नुकसान भरपाई. | ५,००० |
| (तीन) संपत्तीची हानी .. .. .. | २,५०० |
| (चार) वैद्यकीय खर्च--मृत्यूपूर्वी केलेला आणि देयके प्रमाणके सोवत जोडलेला प्रत्यक्ष खर्च परंतु या रकमेपेक्षा अधिक नाही. | १५,००० |

४. जखमी होणे आणि अपंगत्व यावाबतीत सर्वसाधारण नुकसान भरपाई.

| | रुपये |
|---|---|
| (एक) वेदना व त्रास | |
| (क) गंभीर जखमा .. .. .. | ५,००० |
| (ख) गंभीर नसलेल्या जखमा .. .. .. | १,००० |
| (दोन) वैद्यकीय खर्च केलेला आणि देयके/प्रमाणके यासोवत जोडलेला प्रत्यक्ष खर्च परंतु एका वेळचे प्रदान या रकमेपेक्षा अधिक नाही. | १५,००० |

५. मरणांतक नसलेल्या अपघातात आलेली विकलांगता. मरणांतक नसलेल्या अपघातामध्ये अपघातग्रस्त व्यक्तीला विकलांगता आल्यास खालील भरपाई देय असेल.

बावन्न आठवड्यांपेक्षा अधिक नाही अशा कालावधीसाठी उत्पन्नाची हानी झाली असेल, असल्यास, त्या प्रत्यक्ष कालावधीसाठी उत्पन्नाची हानी.

याव्यतिरिक्त आणखी पुढीलपैकी कोणतीही :--

(क) कायमची संपूर्ण विकलांगता आली असल्यास, वार्षिक उत्पन्नाच्या हानीला भरपाई ठरवायच्या वेळी असलेल्या वयाला प्रयुक्त असेल अशा गुणकाने गुणून भरपाईची देय रक्कम काढण्यात आली असली पाहिजे.

(ख) कायमची आंशिक विकलांगता आली असल्यास, भरपाईची रक्कम, कायमस्वरूपी पूर्णपणे विकलांगतेवावत देय झाली असती अशा भरपाईच्या रकमेच्या, वरील बाव (क) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या टक्केवारी इतकी असेल.

कायमची संपूर्ण विकलांगता/कायमची आंशिक विकलांगता व उत्पन्न हानीची टक्केवारी या गोष्टी कामगार भरपाई अधिनियम, १९२३ याखालील अनुसूचीप्रमाणे असतील.

६. अपघातापूर्वी ज्यांचे कोणतेही उत्पन्न नसेल अशा व्यक्तींच्या वाबतीत राष्ट्रीय उत्पन्न--

मरणांतक अपघात आणि मरणांतक नसलेल्या अपघातात आलेली विकलांगता

(क) उत्पन्न नसलेली व्यक्ती--रुपये १५,००० प्रतिवर्षी,

(ख) विवाहसाथी--उत्पन्न असलेल्या जिवंत विवाह साथीच्या उत्पन्नाच्या १/३

अन्य जखमांच्या बाबतीत फक्त प्रयुक्त असलेली " सर्वसाधारण नुकसान भरपाई ".]

---

१. १९९४ चा अधिनियम--५४, कलम ६४ द्वारे ' अनुसूची दुसरी ' जादा दाखल करण्यात आली. (१४ नोव्हेंबर १९९४ रोजी व तेव्हा पासून).

# THE MOTOR VEHICLES ACT, 1988

## No. 59 OF 1988

# मोटार वाहन अधिनियम, १९८८

## (१९८८ चा अधिनियम क्रमांक ५९)

### इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| abscond | फरारी असणे. | [S. 51(5)] |
| accessories | उपसाधने | [S. 52(1)(b) (Prov.)] |
| acquittal | दोषमुक्ती | [S. 21(1)(b)] |
| act or omission | कृती अथवा अकृती | [S. 147(1) (Expl.)] |
| adapted | तदनुकुल बदल करून घेतलेले | [S. 2(33)] |
| adjudicating authority | अभिनिर्णयन प्राधिकारी | [S. 68 (2)] |
| aggrieved | नाराज | [S. 57(1)] |
| agreement of hypothecation | तारण-गहाणाचा करार | [S. 2 (30)] |
| agreement of lease | भाडेपट्टयाचा करार | [S. 2 (30)] |
| amount of traffic | वाहतुकीचे प्रमाण | [S. 184] |
| appellate authority | अपिलीय प्राधिकरण | [S. 17 (2)] |
| appropriate authority | समुचित प्राधिकरण | [S. 51 (6)] |
| appropriate licensing authority | समुचित लायसन प्राधिकरण | [S. 8(6)] |
| articulated vehicle | सांधीव वाहन | [S. 2(2)] |
| association of individuals | व्यक्तींचा अधिसंघ | [S. 71(Expl.)] |
| attendent | परिचर | [S. 2(48)] |
| audible signal | श्राव्य संकेत | [S. 111(2)(b)] |
| authorisation | प्राधिकारपत्र | [S. 9 (4)] |
| authorised insurer | प्राधिकृत विमाकार | [S. 145(9)] |
| authorised testing station | प्राधिकृत चाचणी केंद्र | [S. 56(2)] |
| auto-dippers | ऑटो डिप्पर | [S. 110(1)(j)] |
| automobile association | स्वयंचलित अधिसंघ | [S. 9(3)(b) (Proviso)] |
| axle weight | अक्षल वजन | [S. 2(3)] |
| body | सांगाडा | [S. 2(8)(b)] |
| business | धंदा | [S. 2(33)] |
| by fraud or misrepresentation | कपटाने किंवा अपवेदनाने | [S. 19(1)(e)] |
| by virtue of | च्याआधारे, च्यामुळे | [S 149(1)] |
| causes of action | वादकारणे | [S. 155 (m.n.)] |
| causeway | सेतुमार्ग | [S. 145 (e)] |
| certificate of registration | नोंदणी प्रमाणपत्र | [S. 2(4)] |
| chasis | आधार | [S. 2(8)(b)] |
| circulating | प्रसृत | [S. 102(2)] |
| civil commotion | नागरी विक्षोभ | [S. 149(2)(a)(iii)] |
| claim | हक्कमागणी | [S. 92] |

| | | |
|---|---|---|
| claims Tribunal | मागणी हक्क अधिकरण | [S. 149(7)(Expl.)] |
| Commercial enterprise | वाणिज्यिक उद्यम | [S. 146(2)] |
| communication | संसूचना | [S. 51(8)] |
| competent authority | सक्षम प्राधिकरण | [S. 2(19)] |
| composition | आपसाती | [S. 200(1)(m.n.)] |
| conduct of appeal | अपिलाची कार्यवाही | [S. 65(2)(a)] |
| conductor | वाहक | [S. 2(5)] |
| conductor's licence | वाहक लायसन | [S. 2(6)] |
| connivance of | च्या मूकानुमतीने | [S. 119(2)] |
| consular officer | वाणिज्य दौतिक अधिकारी | [S. 42(m.n.)] |
| contagious | स्पर्शजन्य | [S. 96(2)(*xix*)] |
| contract carriage | कंत्राटी गाडी | [S. 2(12)] |
| contract of insurance | विमा संविदा | [S. 149(2)(i)(a)] |
| cover note | उपरि टिप्पणी | [S. 145(b)] |
| currency of licences | लायसने चालू राहण्याचा अवधी | [S. 14(m.n.)] |
| dealer | व्यापारी | [S. 2(8)] |
| deceased holder | मृतधारक | [S. 82(2) (2nd Proviso)] |
| declaration | प्रतिज्ञापत्र | [S. 47(1) Provi. (ii)(b)] |
| decree | हुकूमनामा | [S. 81(4)(a)] |
| delegate powers | शक्ती प्रत्यायुक्त करणे | [S. 68(5)] |
| demand | फर्माविणे | [S. 95(2)(c)] |
| Deterioration of road system | रस्ते व्यवस्थेचा ऱ्हास | [S. 67(1)(c)] |
| diplomatic officer | राजदौतिक अधिकारी | [S. 42(m.n.)] |
| direction post | दिशादर्शक स्तंभ | [S. 2(45)] |
| disability | निःसमर्थता | [S. 8(4)] |
| disabled vehicle | नादुरुस्त वाहन | [S. 201(1)] |
| discharge | विनादोषारोप सुटका | [S. 21(1)(b)] |
| displayed | प्रदर्शित | [S. 64(d)] |
| disqualification order | निरर्हता आदेश | [S. 23(m.n.)] |
| disqualified | निरर्ह | [S. 8(1)] |
| driving certificate | चालन प्रमाणपत्र | [S. 12(2)(0)] |
| driving licence | चालन लायसन | [S. 2(10)] |
| educational institution bus | शैक्षणिक संस्थेची बस | [S. 2(ii)] |
| effective conductor's licence | परिणामक असे वाहक लायसन | [S. 29(m.n.)] |
| effective driving licence | परिणामक चालन लायसन | [S. 3(1)] |
| embossed | उमटरेखित | [S. 55(5)] |
| emission of air pollutants | हवा प्रदूषित करणारे उत्सर्ग | [S. 110(1)(m)] |
| enactment | अधिनियमिती | [S. 71(3) (d)(iii) (Prov.) (ii)] |

## इंग्रजी-मराठी शब्दसूची—चालू

| | | |
|---|---|---|
| endorse | पृष्ठांकित करणे | [S. 19(2)(b)] |
| fares | प्रवासभाडे | [S. 2(12)] |
| fare table | भाडेपत्रिका | [S. 72(2)(xiv)] |
| financier | वित्तदाता | [S. 51(6)] |
| fine | द्रव्यदंड | [S. 163(2)(a)] |
| firm | पेढी | [S. 71(expl.)] |
| fitting | जोडसामग्री | [S. 52(1)(b)(prov.)] |
| fixed rails | ठरीव रूळ | [S. 2(28)] |
| floating charge | तरता प्रभार | [S. 150(1)(b)] |
| free of endorsement | पृष्ठांकनरहित | [S. 182(1)] |
| garage | दुरुस्ती कक्ष | [S. 56(2)] |
| gear | गिअर | [S. 4 (Proviso)] |
| General Insurance Business (Nationalisation) Act, 1972. | आयुर्विमेतर विमा व्यवसायी (राष्ट्रीयीकरण) अधिनियम, १९७२. | [S. 145(a)] |
| good | माल | [S. 93(1)(ii)] |
| goods carriage | मालगाडी | [S. 93(1)(ii)] |
| goods in transit | मार्गस्थ माल | [S. 93(2)(u)] |
| governing | नियामक | [S. 65(2)(c)] |
| graders | ग्रेडर्स | [S. 65(2)(c)] |
| grit | रेवाळ | [S. 110(1)(g)] |
| gross vehicle weight | एकूण वाहन वजन | [S. 2(15)] |
| habitual criminal | सराईत गुन्हेगार | [S. 9(8)(9)] |
| habitual drunkard | अट्टल दारूबाज | [S. 9(8)(9)] |
| halt | थांबा | [S. 72(2)(iv)] |
| halting places | थांबे | [S. 96(2)(xxi)] |
| heavier weights | अधिक अवजड वजनसार | [S. 58(3)(Prov.)] |
| heavy goods vehicle | अवजड मालवाहक | [S. 2(16)] |
| heay passenger motor vehicle | अवजड प्रवासी मोटारवाहन | [S. 2(17)] |
| hire or reward | भाडे किंवा बक्षिसी | [S. 88(8)] |
| hypothecation | जंगम गहाण | [S. 2(8)(d)] |
| Impediment to the traffic | वाहतुकीस व्यत्यय | [S. 127(2)] |
| India Succession Act, 1925 | भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५. | [S. 155] |
| Infectious | संसर्गजन्य | [S. 96(2)(xix)] |
| Insolvency | नादारी | [S. 81(1)(4)(a)] |
| Insured | विमारक्षित | [S. 152(2)] |
| International convention | आंतरराष्ट्रीय अभिसंधी | [S. 116(7)] |
| Invalid carriage | अपंगगाडी | [S. 2(18)] |

| | | |
|---|---|---|
| judgement debtor | न्यायनिर्णीत ऋणको | [S. 149(1)] |
| lapsed | व्यपगत | [S. 100(4)] |
| learner's licence | शिकाऊ व्यक्ती लायसन | [S. 2(19)] |
| leasing | भाडेपट्टयाने देणे | [S. 2(8)(d)] |
| legal or customary fare | वैध किंवा नेहमीचे भाडे | [S. 96(2)(xxvi)] |
| liability without fault | दोष नसतानाचे दायित्व | [Chapter X heading] |
| licensing authority | लायसन प्राधिकरण | [S. 2(20)] |
| light motor vehicle | हलके मोटारवाहन | [S. 2(21)] |
| line of travel | प्रवासाचा मार्ग | [S. 2(38)] |
| live stock | पशुधन | [S. 2(13)] |
| luggage | प्रवासी सामान | [S. 2(13)] |
| maintenance | देखभाल | [S. 109(1)(m.n.)] |
| mandatory traffic sign | अनिवार्य वाहतूक संकेत चिन्ह | [S. 119(1)] |
| Manoeuvres, field firing and Artillery Practice Act, 1938. | युद्धाभ्यास, मैदानी गोळीबार आणि तोफखाना यांचे सराव अधिनियम, १९३८. | [S. 112(3)] |
| marking on the road | रस्त्यावरील चिन्हांकन | [S. 2(45)] |
| maxicab | मेक्सीकॅब | [S. 2(7)(b)(i)] |
| maximum safe axle-weight | कमाल सुरक्षित अक्षल वजन | [S. 58(1)] |
| maximum safe laden weight | कमाल सुरक्षित भारसहित वजन | [S. 58(1)] |
| mechanically propelled vehicle | यंत्रचालित वाहन | [S. 2(28)] |
| mechanical or electrical signalling device. | यांत्रिक किंवा विद्युतचलित संकेतदर्शक उपकरण. | [S. 109(2)] |
| medium goods vehicle | मध्यम मालवाहन | [S. 7(1)(d)] |
| medium motoı vehicle | मध्यम मालवाहन | [S. 2(23)] |
| medium passenger motor vehicel | मध्यम प्रवासी मोटार वाहन | [S. 2(24)] |
| minor | अज्ञान व्यक्ती | [S. 2(30)] |
| mob fury | जमावाचा प्रक्षोभ | [S. 134(1)] |
| motorcab | मोटारकॅब | [S. 2(7)(b)(ii)] |
| motor car | मोटार गाडी | [S. 2(26)] |
| motor cycle | मोटार-सायकल | [S. 2(24)] |
| motor vehicle | मोटार वाहन | [S. 2(28)]. |
| Motor Vehicles Act, 1988 | मोटार वाहन अधिनियम, १९८८ | |
| mutiliated | जीर्णशीर्ण झालेल्या | [S. 65(2)(d)] |
| Narcotic Drugs and Psychotropic Substances Act, 1985. | अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५. | [S. 9(8)(b)] |
| omnibus | ओम्नीबस | [S. 2(17)] |
| On the allegation | अभिकथन करून | [S. 21(1)] |
| operation | प्रवर्तन | [S. 59(2)] |
| option | विकल्पाधिकार | [S. 167(m.n.)] |

| | | |
|---|---|---|
| original registering authority | मूळ नोंदणी प्राधिकरण | [S. 52(5)] |
| overhang | वरपसारा | [S. 110(1)(a)] |
| override | अधिभावी असणे | [S. 98(m.n.)] |
| owner | मालक | [S. 2(30)] |
| pass | पारित करणे | [S. 89(3)] |
| penalties and procedure | शास्ती व कार्यपद्धती | [Chap. 13.T] |
| penalty | शास्ती | [S. 127(3)] |
| permanent disablement | कायमस्वरुपी विकलांगता | [S. 140(2)] |
| permit | परवाना | [S. 2(31)] |
| personal effects | वैयक्तिक चीजवस्तू | [S. 2(13)] |
| personal luggage | वैयक्तिक सामान | [S. 2(13)] |
| pneumatic tyres | हवेने भरलेले टायर | [S. 113(2)] |
| police officer in uniform | वर्दीधारी पोलीस अधिकारी | [S. 130(1)] |
| postal acknowledgement | डाक पोचपावती | [S. 47(1)(prov(ii)(b)] |
| power of propulsion | चालनशक्ती | [S. 2.(28)] |
| power conferred | प्रदान केलेल्या शक्ती | [S. 105(5)] |
| prefer an appeal | अपील दाखल करणे | [S. 65(2)(a)] |
| primary permit | प्राथमिक परवाना | [S. 81(1)prov.] |
| private service vehicle | खाजगी सेवा वाहन,<br>निजी सेवा वाहन | [S. 2(17)] |
| protective headgear | संरक्षिक शिरटोप | [S. 129(m.n.)] |
| public place | सार्वजनिक ठिकाण | [S. 2(34)] |
| public service vehicle | लोकसेवा वाहन | [S. 2(17)] |
| reciprocating country | देवाणघेवाण करणारा देश | [S. 145(f)] |
| reflector | परावर्तक | [S. 110(1)(e)] |
| registered axle weight | नोंदलेले अक्षल वजन | [S. 2(36)] |
| registering authority | नोंदणी प्राधिकरण | [S. 2(37)] |
| religious gatherings | धार्मिक मेळावे | [S. 87(1)(a)] |
| rescind | विखंडीत होणे | [S. 53(5)] |
| revocation | प्रत्याहृत करणे | [S. 12(2)(a)] |
| reward | बक्षिसी | [S. 2(22)] |
| road-roller | रोड रोलर | [S. (2)(16)] |
| road safety | रस्ता सुरक्षा | [S. 190(2)] |
| road transport service | मार्ग परिवहन सेवा | [S. 2(42)(iii)(Expl.)] |
| route | नियतमार्ग, मार्ग | [S. 69(1)(Prov.)] |
| running board | पायफळी | [S. 123(1)(m.n.)] |
| search or seizure | जप्ती किंवा अभिग्रहण | [S. 213(6)] |
| season ticket | मुदती तिकीट | [S. 2(12)] |
| semi-trailor | अर्ध-अनुवाहन | [S. 2(39)] |

| | | |
|---|---|---|
| shelter | छप्परबंदी | [S. 72(2)(xx)] |
| side car | जोडयान | [S. 129] |
| signalling appliances | संकेतन उपयंत्रे | [S. 110(1)(e)] |
| signals | संकेत | [S. 2(45)] |
| solatium fund | दिलासा निधी | [S. 163(2)(c)] |
| specification | विनिर्देश | [S. 2(43)] |
| specimens of breath | उच्छवासाचे नमुने | [S. 203(1)] |
| speed testing | वेग चाचणी | [S. 149(2)(a)(i)(b)] |
| stage carriage | टप्पेगाडी | [S. 2(34)] |
| stage carriage operator | टप्पेगाडी प्रचालक | [S. 71(3)(d)(ii)] |
| stand | विरामस्थान | [S. 2(34)] |
| State or Regional Transport Authority | राज्य किंवा प्रादेशिक परिवहन प्राधिकरण | [S. 2(31)] |
| State Transport Undertaking | राज्य परिवहन उपक्रम | [S. 2(42)] |
| steering control | स्टीअरिंग कंट्रोल | [S. 109(2)] |
| steering gear | स्टीअरिंग गिअर | [S. 110(1)(c)] |
| steersman | स्टीअरमन | [S. 2(9)] |
| subordinate | अधिनस्थ | [S. 213(3)] |
| temper | गैरफेर | [S. 198] |
| terminus | अंतिमस्थान | [S. 2(38)] |
| third party risk | त्रयस्थ पक्षीय जोखीम | [S. 146(m.n.)] |
| to be of no effect | निष्परिणामक होणे | [S. 25(2)(b)] |
| to contest the claim | हक्क मागणीचा प्रतिवाद करणे | [S. 170(b)] |
| to plead | प्रतिकथन करणे | [S. 140(3)] |
| tourist vehicle | पर्यटन वाहन | [S. 2(43)] |
| towing service | खेचसेवा | [S. 127(2)] |
| tractor | कर्षित्र | [S. 2(16)] |
| traffic signs | वाहतूक संकेतचिन्हे | [S. 2(45)] |
| trailor | अनुवाहन | [S. 2(13)] |
| transfer of endorsement | पृष्ठांकनाचा नोंदबदल | [S. 25(m.n.)] |
| transferor | हस्तांतरक | [S. 50(1)(a)] |
| transport vehicle | परिवहन वाहन | [S. 2(47)] |
| trip | फेरी | [S. 70(1)(c)(Expl.)] |
| trolley | ढकलगाडी | [S. 131] |

| | | |
|---|---|---|
| truck parking complex | मालमोटारी उभ्या करण्यासाठी वाहनतळ. | [S. 135(1)(d)] |
| unguarded railway level crossing | रक्षकरहित रेल्वे ओलांडणी | [S. 131(m.n.)] |
| unladen weight | भाररहित वजन | [S. 2(16)] |
| vehicle service station | वाहन संधारण केंद्र | [S. 56(2)] |
| warning sign post | संकेत चिन्हांचे स्तंभ | [S. 2(45)] |
| working of the vehicle | वाहन चालन कार्य | [S. 95(2)(g)] |
| Workmen's Compensation Act, 1923. | कामगार भरपाई अधिनियम, १९२३. | [S. 143] |

# मोटार वाहन अधिनियम, १९८८

## (१९८८ चा अधिनियम क्रमांक ५९)

### मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अट्टल दारूबाज | habitual drunkard | [क. ९ (८) (क्)] |
| अधिक अवजड कार्यभार | heavier weights | [क. ५८(३) (परंतुक)] |
| अधिनियमिती | enactment | [क. ७१(३) (घ्) (तीन) परंतुक (दोन)] |
| अधिभावी असणे | override | [क. ९८ (स.टी.)] |
| अधीनस्थ | subordinate | [क. २१३ (३)] |
| अनिवार्य वाहतूक संकेत चिन्ह | mandatory traffic sign | [क. ११९(१)] |
| अनुवाहन | trailor | [क. २(१३)] |
| अपिलाची कार्यवाही | conduct of appeal | [क. ६५(२) (क्)] |
| अपिलीय प्राधिकरण | appellate authority | [क. १७(२)] |
| अपील दाखल करणे | prefer an appeal | [क. ६५ (२) (क्)] |
| अपंगगाडी | invalid carriage | [क. २ (१८)] |
| अभिकथन करून | on the allegation | [क. २१ (१)] |
| अभिनिर्णयन प्राधिकारी | adjudicating authority | [क. ६८ (२)] |
| अरक्षित रेल्वे ओलांडणी | unguarded railway level crossing | [क. १३१ (स. टी.)] |
| अर्ध-अनुवाहन | semi-trailor | [क. २ (३९)] |
| अवजड प्रवासी मोटार वाहन | heavy passenger motor vehicle | [क. २ (१७)] |
| अवजड माल वाहन | heavy goods vehicle | [क. ७(१) (क्)] |
| अक्षल वजन | axle weight | [क. २ (३)] |
| अज्ञान व्यक्ती | minor | [क. २ (३०)] |
| आंतरराष्ट्रीय अभिसंधी | International convention | [क. ११६ (७)] |
| आपसाती | composition | [क. २०० (१) (स.टी.)] |
| आयुर्विमेतर विमा व्यवसायी (राष्ट्रीयीकरण) अधिनियम, १९७२. | General Insurance Business (Nationalisation) Act, 1972. | [क. १४५ (क्)] |
| इशारेवजा चिन्हाचे स्तंभ | warning sign post | [क. २ (४५)] |
| उच्छ्वासाचे नमुने | specimens of breath | [क. २०३ (१)] |
| उपरिटिप्पणी | covernote | [क. १४५ (ख्)] |
| उपसाधने | accessories | [क. ५२(१) (ख्) (परंतुक)] |
| उसटरेखीत | embossed | [क. ५५ (५)] |
| एकूण वाहन वजन | gross vehicle weight | [क. २ (५)] |
| ओम्नीबस | omnibus | [क. २ (१७)] |
| ऑटो-डिप्पर | auto-dippers | [क. ११०(१) (ञ)] |
| अंतिमस्थान | terminus | [क. २ (३८)] |
| अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५. | Narcotic Drugs and Psychotropic substances Act, 1985. | [क. ९ (८) (ख्)] |
| कपटाने किंवा अपवेदनाने | by fraud or misrepresentation | [क. १९ (१) (ङ्)] |

| | | |
|---|---|---|
| कमाल सुरक्षित अक्षल वजन | maximum safe axle weight | [क. ५८ (१)] |
| कमाल सुरक्षित भारसहित वजन | maximum safe laden weight | [क. ५८ (१)] |
| कर्षित्र | tractor. | [क. २ (१६)] |
| कामगार भरपाई अधिनियम, १९२३. | Workmen's Compensation Act, 1923. | [क. १४३] |
| कायमस्वरूपी विकलांगता | permanent disablement | [क. १४० (२)] |
| कंत्राटी गाडी | contract carriage | [क. २ (१२)] |
| कृती अथवा अकृती | act or omission | [क. १४७ (१) (स्पष्टी.)] |
| खाजगी सेवा वाहन | private service vehicle | [क. २ (१७)] |
| खेचसेवा | towing service | [क. १२७ (२)] |
| गिअर | gear | [क. ४ (परंतुक)] |
| ग्रेडर्स | graders | [क. ६५ (२) (ग्)] |
| गैरफेर | tamper | (क. ११६ (५)) |
| चालन प्रमाणपत्र | driving certificate | [क. १२ (२) (ण्)] |
| चालन शक्ती | power of propulsion | [क. २ (२८)] |
| —च्या आधारे | by virtue of | [क. १४९ (१)] |
| —च्या बदल्यात | In acknowledgement of | [क. २०६ (२)] |
| —च्या मूकानुमतीने | connivance of | [क. १९९ (२)] |
| छप्परबंदी | shelter | [क. ७२ (२) (वीस)] |
| जमावाचा प्रक्षोभ | mob fury | [क. १३४ (१)] |
| जीर्णशीर्ण झालेला | mutiliated | [क. ६५ (२) (घ्)] |
| जोडयान | side car | [क. १२९] |
| जोडसामग्री | fittings | [क. ५२ (१) (ख्) (परंतुक] |
| जंगम गहाण | hypothecation | [क. २ (८) (घ्)] |
| झडती किंवा अभिग्रहण | search or seizure | [क. २१३ (६)] |
| टप्पे गाडी | stage carriage | [क. २ (३४)] |
| टप्पेगाडी प्रचालक | stage carriage operator | [क. ७१ (३) (घ्) (दोन)] |
| ठरीव रूळ | fixed rails | [क. २ (२८)] |
| डाक पोचपावती | postal acknowledgement | [क. ४७ (एक) परंतुक (दोन) (ख्)] |
| ढकलगाडी | trolley | [क. १३१] |
| तद्नुकूल बदल करून घेतलेले | adapted | [क. २ (३३)] |
| तरता प्रभार | floating charge | [क. ५० (१) (ख्)] |
| तारण-गहाणाचा करार | agreement of hypothecation | [क. २ (३०)] |
| त्रयस्थ पक्षीय जोखीम | third party risk | [क. १४६ (सं. टी.)] |
| थांबा | halt | [क. ७२ (२) (चार)] |
| थांबे | halting places | [क. ९६ (२) (एकवीस)] |
| दिलासा निधी | solatium fund | [क. १६३ (२) (ग्)] |

## मराठी-इंग्रजी शब्दसूची—चालू

| | | |
|---|---|---|
| दिशादर्शक स्तंभ | direction post | [क. २ (४५)] |
| दुरूस्ती कक्ष | garage | [क. ५६ (२)] |
| देखभाल | maintenance | [क. १०९ (१) (स. टी.)] |
| देवाणघेवाण करणारा देश | reciprocating country | [क. १४५ (च्)] |
| दोषमुक्ती | acquittal | [क. २१ (१) (ख्)] |
| दोष नसतानाचे दायित्व | liability without fault | [प्रकरण दहा-शीर्षक] |
| द्रव्यदंड | fine | [क. १६३ (२) (क्)] |
| धार्मिक मेळावे | religious gatherings | [क. ८७ (१) (क्)] |
| धंदा | Business | [क. २ (३३)] |
| नागरी विक्षोभ | civil commotion | [क. १५९ (२) (क्) (तीन)] |
| नादारी | insolvency | [क. ८१ (१) (४) (क्)] |
| नादुरुस्त वाहन | disabled vehicle | [क. २०१ (१)] |
| नाराज | aggrieved | [क. ५७ (१)] |
| निजी सेवा वाहन | private service vehicle | [क. ७६ (स. टी. )] |
| नियत मार्ग | route | [क. ६९ (१) (परंतुक)] |
| नियामक | governing | [क. ६५ (२) (ग्)] |
| निरर्ह | disqualified | [क. ८ (१)] |
| निरर्हता आदेश | disqualification order | [क. २३ (स. टी.)] |
| निष्परिणामक | to be of no effects | [क. २५ (२) (ख्)] |
| निष्परिणामक करणे | to be of no effects | [क. १०३ (२) (ग्) (एक)] |
| निसमर्थता | disability | [क. ८ (४)] |
| नोंदणी प्रमाणपत्र | certificate of registration | [क. २ (४)] |
| नोंदणी प्राधिकरण | Registering authority | [क. २ (२७)] |
| नोंदलेले अक्षल वजन | registered axle weight | [क. २ (३६)] |
| न्याधार | chasis | [क. २ (८) (ख्)] |
| न्यायानिर्णित ऋणको | judgement debtor | [क. १४९ (१)] |
| परवाना | permit | [क. २ (३१)] |
| परागंदा असणे | abscond | [क. ५१ (५))] |
| परावर्तक | reflector | [क. ११० (१) (ङ्)] |
| परिचर | attendent | [क. २ (४८)] |
| परिणामक असे वाहक लायसन | effective conductors licence | [क. २९ (१)] |
| परिणामक चालन लायसन | effective driving licence | [क. ३ (१)] |
| परिवाहन वाहन | transport vehicle | [क. २ (४७)] |
| पर्यटन वाहन | tourist vehicle | [क. २ (४३)] |
| पशुधन | live stock | [क. २ (१३)] |
| पायफळी | running board | [क. १२३ (१) (स. टी.)] |
| पारित करणे | pass | [क. ८९ (३)] |
| पृष्ठांकनरहित | free of endorsement | [क. १८२ (१)] |

| | | |
|---|---|---|
| पृष्ठांकनाचा नोंदबदल | transfer of endorsement | [क. २५ (स.टी.)] |
| पृष्ठांकित करणे .. | endorse | [क. १९ (२) (ख)] |
| पेढी .. | firm | [क. ७१ (स्पष्टी.)] |
| प्रतिकथन करणे .. | To plead | [क. १४० (३)] |
| प्रतिज्ञापत्र .. | declaration | [क. ४७ (एक)] [(परंतुक) (दोन) (ख)] |
| प्रत्याहृत करणे .. | revocation | [क. १२ (२) (क)] |
| प्रदर्शित .. | displayed | [क. ६४ (घ)] |
| प्रदान केलेल्या शक्ती | powers conferred | [क. १०५ (५)] |
| प्रवर्तन .. | operation | [क. ५९ (२)] |
| प्रवासभाडे .. | fares | [क. २(१२)] |
| प्रवासाचा मार्ग .. | line of travel | [क. २(३८)] |
| प्रवासी सामान .. | luggage | [क. २(१३)] |
| प्रसृत .. | circulating | [क. १०२ (२)] |
| प्राथमिक परवाना .. | primary permit | [क. ८१ (१) (परंतुक)] |
| प्राधिकारपत्र .. | authorisation | [क. ९ (४)] |
| प्राधिकृत चाचणी केंद्र | authorised testing station | [क. ५६ (२)] |
| प्राधिकृत विमाकार | authorised insurer | [क. १४५ (क)] |
| फर्मावणे .. | demand | [क. ९५ (२) (ग)] |
| फेरी .. | trip | [क. ७० (१) (ग) (स्पष्टी)] |
| बक्षिसी .. | reward | [क. २(२२)] |
| भाडे किंवा बक्षिसी .. | hire or reward | [क. ८८ (८)] |
| भाडेपट्टयाचा करार .. | agreement of lease | [क. २(३०)] |
| भाडेपट्ट्याने देणे .. | leasing | [क. २(८) (घ)] |
| भाडेपत्रिका .. | fare table | [क. ७२(२) (चौदा)] |
| भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५. | Indian Succession Act, 1925. | [क. १५५] |
| भाररहित वजन .. | Unladen weight | [क. २(१६)] |
| मध्यम प्रवासी मोटार वाहन | medium passanger motor vehicle | [क. २(२४)] |
| मध्यम माल वाहन | medium goods vehicle | [क. (७) (१) (क)] |
| मध्यम मोटार वाहन | medium motor vehicle | [क. २(२३)] |
| मागणीहक्क अधिकरणे | claims tribunals | [क. १६५(१) (स.टी.)] |
| मागणीहक्क न्यायाधिकरण | claims tribunals | [क. १४९ (७) (स्पष्टी.)] |
| मार्ग .. | route | [क. २(३८)] |
| मार्ग परिवहन सेवा | road transport service | [क. २(४२) (तीन) (स्पष्टी.)] |
| मार्गस्थ माल .. | goods in transit | [क. ९३ (२) (ड)] |
| माल .. | goods | [क. २(१३)] |
| मालक .. | owner | [क. २(३०)] |

**मराठी-इंग्रजी शब्दसूची—चालू**

| | | |
|---|---|---|
| मालगाडी .. | Goods carriage | [क. ९३ (१) दोन] |
| माल मोटारी उभ्या करण्यासाठी वाहनतळ. | truck parking complex | [क. १३५ (१) (घ)] |
| मालवाहन .. | goods carriage | [क. २ (१४)] |
| मुदती तिकीट .. | season ticket | [क. २ (१२)] |
| मूळ नोंदणी प्राधिकरण | original registering authority | [क. ५२ (५)] |
| मृतधारक .. | deceased holder | [क. ८२ (२) (दुसरे परंतुक)] |
| मॅक्सीकॅब .. | maxicab | [क. २ (७) (ख) (एक)] |
| मोटारगाडी .. | motor car | [क. २ (२६)] |
| मोटारकॅब .. | motorcab | [क. २ (७) (ख) दोन)] |
| मोटारवाहन .. | motor vehicle | [क. २ (२८)] |
| मोटारवाहन अधिनियम, १९८८ | Motor Vehicles Act, 1988 | |
| मोटार सायकल .. | motor-cycle | [क. २ (२४)] |
| युद्धाभ्यास, मैदानी गोळीबार आणि तोफखाना यांचा सराव अधिनियम, १९३८. | Manoeuver's, Field Firing and Artillery Practice Act, 1938. | [क. ११२ (३)] |
| यंत्रचालीत वाहन .. | mechanically propelled vehicle | [क. २ (२८)] |
| यांत्रिकी किंवा विद्युतचलित संकेतदर्शन उपकरण. | mechanical, electrical signalling device. | [क. १०९ (२)] |
| रस्ता सुरक्षा .. | road safety | [क. १९० (२)] |
| रस्ते व्यवस्थेचा ऱ्हास | Deterioration of road system | [क. ६७ (१) (क)] |
| रस्त्यावरील चिन्हांकन | markings on the road | [क. २ (४५)] |
| रहदारी संकेत .. | traffic signs | [क. २ (४५)] |
| रहदारी संकेत चिन्हे | traffic signs | [क. ११६ (१) (क)] |
| रक्षकरहित रेल्वे ओलांडणी | Unguarded railway level crossing | [क. १३१ (स. टी.)] |
| राजद्यौतिक अधिकारी | diplomatic officer | [क. ४२ (स. टी.)] |
| राज्य किंवा प्रादेशिक परिवहन प्राधिकरण. | State or Regional Transport Authority. | [क. २ (३१)] |
| राज्य परिवहन उपक्रम | State Transport Undertaking | [क. २ (४२)] |
| रेवाळ .. | grit | [क. ११० (१) (घ)] |
| रोडरोलर .. | road-roller | [क. २ (१६)] |
| लायसन प्राधिकरण | Licensing authority | [क. २ (२०)] |
| लायसने चालू राहण्याचा अवधी | currency of licences | [क. १४ (स. टी.)] |
| लोकसेवा वाहन .. | Public Service Vehicle | [क. २ (१७)] |
| वरपसारा .. | overhang | [क. ११० (१) (क)] |
| वर्दीधारी पोलीस अधिकारी | Police officer in uniform | [क. १३० (१)] |
| वाणिज्यद्यौतिक अधिकारी | consular officer | [क. ४२ (स. टी.] |
| वाणिज्यिक उद्यम .. | commercial enterprise | [क. १४६ (२)] |
| वादकारणे | causes of action | [क. १५५ (स. टी.)] |

मराठी-इंग्रजी शब्दसूची—चालू

| | | |
|---|---|---|
| वाहक .. | conductor | [क. २ (५)] |
| वाहक लायसन .. | conductors licence | [क. २ (६)] |
| वाहतूक संकेत चिन्ह | traffic signs | [क. २ (४५)] |
| वाहतुकीचे प्रमाण .. | amount of traffic | [क. १८४] |
| वाहनचलन कार्य .. | working of the vehicle | [क. ९५ (२) (घ)] |
| वाहनसंधारण केंद्र .. | vehicle service station | [क. ५६ (२)] |
| विकल्पाधिकार .. | option | [क. १६७ (स. टी.)] |
| विखंडीत होणे .. | rescind | [क. ५३ (५)] |
| वाहतुकीस व्यत्यय .. | impediment to the traffic | [क. १२७ (२)] |
| वित्तदाता .. | financier | [क. ५१ (६)] |
| विनादोषारोप सुटका | discharge | [क. २१ (१) (ख)] |
| विनिर्देश .. | specification | [क. २ (४३)] |
| विमा रक्षित .. | insured | [क. १५२ (२)] |
| विमा संविदा .. | contract of insurance | [क. १४९ (२) (एक) (क)] |
| वेग चाचणी .. | speed testing | [क. १४९ (२) (क) (एक) (ख] |
| विरामस्थाने .. | stands | [क. ९६ (२) (एकवीस)] |
| वैध किंवा नेहमीचे भाडे | legal or customary fare | [क. ९६ (२) (सव्वीस)] |
| वैयक्तिक चीजवस्तू .. | personal effects | [क. २ (१३)] |
| वैयक्तिक सामान .. | personal luggage | [क. २ (१३)] |
| व्यक्तींचा अधिसंघ .. | associations of individuals | [क. ७१ स्पष्टी.] |
| व्यपगत .. | lapsed | [क. १०० (४)] |
| व्यापारी .. | dealer | [क. २ (८)] |
| शक्ती प्रत्यायुक्त करणे | delegate powers | [क. ६८ (५)] |
| शास्ती .. | penalty | [क. १२७ (३)] |
| शास्ती व कार्यपद्धती | penalties and procedure | [क. १३ नाव] |
| शिकाऊ व्यक्ती लायसन | learners licence | [क. २ (१९)] |
| शैक्षणिक संस्थेची बस | educational institution bus | [क. २ (दोन)] |
| श्राव्य संकेत .. | audible-signal | [क. १११ (२) (ख)] |
| समुचित प्राधिकरण .. | appropriate authority | [क. ५१ (७)] |
| समुचित लायसन प्राधिकरण | appropriate licensing authority | [क. ८ (६)] |
| सराईत गुन्हेगार .. | habitual criminal | [क. ९ (८) (क)] |
| सक्षम प्राधिकरण .. | competent authority | [क. २ (१९)] |
| सार्वजनिक ठिकाण .. | public place | [क. २ (३४)] |
| सेतुमार्ग .. | causeway | [क. १४५ (ङ)] |
| संकेत .. | signals | [क. २ (४५)] |
| संकेत चिन्हांचे यंत्र | warning sign post | [क. २ (४५)] |
| संकेतन उपयंत्रे .. | signalling appliances | [क. ११० (१) (ङ)] |
| संरक्षक शिरटोप .. | protective headgear | [क. १२९ (स.टी.)] |
| संसर्गजन्य .. | infectious | [क. ९६ (२) (एकोणीस)] |

| | | | |
|---|---|---|---|
| संसूचना | .. | communication | [क. ५१(८)] |
| सांगाडा | .. | body | [क. २(८) (ख्)] |
| सांधीव वाहन | .. | articulated vehicle | [क. २(२)] |
| स्टीरमन | .. | steerman | [क. २(९)] |
| स्टीअरींग कंट्रोल | .. | steering control | [क. १०९(२)] |
| स्टीअरींग गिअर | .. | steering gear | [क. ११०(१) (ग्)] |
| स्पर्शजन्य | .. | contagious | [क. ९६(२) (एकोणीस] |
| स्वयंचलित अधिसंघ | | automobile association | [क. ९(३) (ख्) (परंतुक] |
| हक्कमागणी | .. | claim | [क. ९२)] |
| हक्कमागणीचा प्रतिवाद करणे | | to contest the claim | [क. २५(२) (ख्)] |
| हलके मोटार वाहन | | light motor vehicle | [क. ७(१) (क्)] |
| हवा प्रदूषित करणारे उत्सर्ग | | emission of air pollutants | [क. ११०(१) (ड्)] |
| हवेने भरलेले टायर | | pneumatic tyres | [क. ११३(२)] |
| हस्तांतरक | .. | transferor | [क. ५०(१) (क्)] |
| हुकूमनामा | .. | decree | [क. ८१(४) (क्)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई